MEMOIR

OF

MRS. MARY E. MUNGER.

मंगर मडम साहेब इचें निरूपण.

PUBLISHED BY THE AMERICAN MISSION.

BOMBAY:

AMERICAN MISSION PRESS.

T. GRAHAM, PRINTER.

1858.

खरेपणाचीं युद्धें.

सर्वेश्वर हा सर्व सृष्टीचा अधिपति होय. तो सर्व सत्ताधारी आहे. पराक्रम, ज्ञान, चातुर्य, औदार्य, प्रीति, दया, सत्यता, शुद्धि, इत्यादि जे त्याचे गुण ते सकल अपरिमित आहेत. त्यांतील एक देखील सावधिक नाहीं. तो ईश्वर प्रेमरूप आहे. तो प्रकाशरूप आहे. त्याच्या ठायीं कांहींच अंधार नाहीं. अपार जें वैभव आणि सौख्य तें त्याच्या ठायीं नित्य आहे. कोणतेंहि उत्पन्न झालें नव्हतें तेव्हां त्याला कांहींच प्रयोजन नव्हतें. कांहींच उत्पन्न झालें होतें तेव्हां त्याला कोणतेंहि अधिक्य झालें नव्हतें. अनादि संतोष त्याच्या ठायीं आहे. तर परमेश्वर सर्व प्रकारें वंदनीय आहे.

सृष्टीच्या प्रारंभीं ईश्वराने असंख्य आत्मे निर्माण करून आपल्या सेवेंत ठेविले. ते आत्मे आपल्या उत्पादकाच्या रूपाने उत्पन्न झाले. तथापि त्या उभयतांमध्यें अपार अंतर आहे. तो अमूर्त्त आत्मा होय. ते मूर्त्तिमंत आत्मे होत. त्याचे गुण अपरिमित आहेत. त्यांचे गुण परिमित आहेत. त्याला कोणाचेंहि अवलंबन नाहीं. त्यांस त्याचाच अवलंब आहे. तो उपास्य होय. ते उपासक होत. ते त्याचे अंश आहेत असें समजूं नये. ते कोणाचे अंश नाहींत. ते ईश्वराच्या संकल्पाने उत्पन्न होऊन तत्क्षणीं त्याची सेवा करण्यांत आसक्त झाले पवित्रता, प्रीति, सत्यता, इत्यादि जे सद्गुण त्यांच्या ठायीं सहज झाले होते त्यांच्या योगाने त्यांचा व सर्वेश्वराचा सं-

योग होत असतां ते विचाराने व करण्याने त्याला संतोषवीत असत. ते देहविरहित असून त्याची आज्ञा मानून देवलोकीं सेवा करितात. नाहीं तर ते आपल्या ईश्वराचा निरोप घेऊन मनाच्या वेगाने विश्वाच्या पैलपार जाऊन सेवा करितात. ती सेवा कोठेंहि असो किंवा ती कसीहि असो तरी ती करण्यावरून त्यांस परिपूर्ण संतोष होत असे. कारण कीं ईश्वराने ती सेवा सांगून दिल्ही होती. ती तर त्याची इच्छाप्रदर्शक होय. त्या समयीं कोणी देवाची इच्छा अव्हेरून पाप केलें नव्हतें. पापाची ओळख कोणाला झाली नव्हती. कोणी पापाचें फळ भोगिलें नव्हतें. मरण कोठेंहि नव्हतें. दुःख किंचित्हि कोणाला प्राप्त झालें नव्हतें.

सृष्टीच्या आरंभीं जे आत्मे उत्पन्न होऊन देवाची सेवा कर्त्ते झाले त्यांला दूत असें ह्मटलें आहे. ते देवाची सेवा करून तिच्या फळाचा अनुभव घेत असतां अहर्गणांचे अहर्गण लोटले. पुढें त्या दुतांतील कोणी कोणी सर्वेश्वराची इच्छा अव्हेरून स्वच्छंदाने वर्त्तूं लागले. त्या योगाने ते भ्रष्ट झाले. आणि तत्काळ त्या भ्रष्ट दुतांच्या ठायीं पाप उपजून फळास आलें. त्यांचा व देवाचा वियोग झाला. त्यावरून त्यांच्या ठायीं मरण आलें. ह्मणजे अंतःकरण, मन, बुद्धि, चित्त इत्यादि त्यांची आंतली व्यवस्था बिघडली असतां त्यांच्या तदाकार वृत्ति ईश्वराला प्रतिकूल होत चालल्या. श्रद्धा, प्रीति, शुद्धता इत्यादि जे सद्गुण पूर्वीं त्यांच्या ठायीं भरले होते त्यांच्या ठिकाणीं आतां अश्रद्धा, अप्रीति, अशुद्धता इत्यादि अवगुण भरले आहेत. यामुळें ईश्वराचा क्लेशावह क्रोध त्या दुतां-

र प्राप्त झाला आहे. ते कोठेंहि जाऊन स्वेच्छाचार करोत तथापि त्यावरून त्यांस वास्तविक सुख होत नाहीं. पापमूलक दुःख त्यांच्या ठायीं भरलें आहे. स्वैरगतीने वर्त्तून आपणांलाच संतोषवावें ही त्यांची मनीषा होय. पण सर्व प्रकारानी ते स्वेच्छेने करण्यास समर्थ नाहींत. ईश्वराने बंधनांमध्यें त्यांस घालून ठेविलें आहे. याविषयीं शास्त्रांत असें लिहिलें आहे; ज्या दुतानी पाप केलें, त्यांस देवाने राखिलें नाहीं, परंतु नरकांत टाकून न्यायाकरितां राखिलें जाण्यासाठीं निबिड काळोखाच्या बंधनांत ठेविलें; २ पेत्र० २:४. ज्या दुतानी आपल्या पहिल्या स्थितींत न राहतां आपली वस्ती सोडिली, त्यांस त्याने सर्वकाळच्या बंधनांमध्यें निबिड काळोखाखालीं मोठ्या दिवसांतील न्यायासाठीं राखिलें आहे. यहू० ६.

असले जे आत्मे ईश्वराची इच्छा अव्हेरून पतित झाले यांतील एक अग्रगण्य आहे. त्याला विविध स्वभावानुरूप अभिधानें आहेत. देवाचा व त्याच्या भक्तांचा विरोध करणारा तो आहे ह्मणून त्याला सैतान असें ह्मणतात. तो अपवादी व दोष ठेविणारा आहे यामुळें त्याला द्याबलस असें ह्मटलें आहे. नष्ट करणारा ह्मणून त्याला अबाद्दोन व आपल्लयोन असीं नावें आहेत. जगाचा अधिकारी, अंधाराचा सत्ताधारी, प्रारंभींचा पाप करणारा, दुष्ट आत्मा, बलियाल ह्मणजे पापात्मा, लबाडीचा बाप,. पापयुक्त मोहांत पाडणारा, हत्या करणारा, अधोगतीचा दूत, अजगर, प्राचीन साप, जगाला ठकविणारा, आज्ञाभंगाच्या लेंकरांस प्रेरणारा आत्मा, असलीं अभिधानें ह्या पातत आत्म्याला आहेत. तीं तर त्याला शोभतात. त्यां-

वरून त्याचे मनोधर्म व क्रिया लक्षित होतात. तो पतित आत्म्यांचा अधिपति होय. त्याने सर्वेश्वराच्या इच्छेची अवज्ञा करून त्याचें यथान्याय राज्य धिक्कारिलें, त्याच समयीं जें खोटेपण त्याच्या ठायीं आणि त्या सर्व पतित दुतांच्या ठायीं उपजलें त्याच्या योगेंकरून त्या उभयतांचा संयोग झाला. मग त्याने त्या पतित आत्म्यांवर खोटेपणाचें राज्य उभारून स्थापिलें. त्यांच्या द्वारें तो ईश्वराविरुद्ध वर्त्तून त्याचा राज्यलोप करावयास आयास करूं लागला. तर हें राज्य केवळ आत्म्यांच्या वस्तुशक्तींवर होत चालतें. त्याच्या प्राबल्याने कुकल्पना, कुमति, दुर्वासना इत्यादि दुःस्वभावाच्या वृत्ति उपजून आकाराला येतात. कृत्रिम, लबाडी, चहाडी इत्यादि असल्या खोट्या गोष्टी ह्या खोटेपणाच्या राज्याची शस्त्रसामग्री आहे. या राज्याकडला जो जो जय झाला आहे तो तो खोटेपणाच्या योगानें झाला आहे. तर या राज्याचा परिणाम हा क्लेशच होय.

मनुष्यजातीने पृथ्वीवर वसून ईश्वराची सेवा व गौरव करावें यासाठीं त्याने हाव्वा व आदाम या दोन स्त्रीपुरुषांस उत्पन्न केलें. त्यांची आंतली व्यवस्था त्यांच्या उत्पादकाची प्रतिच्छाया असी झाली. खरेपणाच्या योगानें त्यांस देवाचा साक्षात्कार होत असे. ते देवाची इच्छा जाणून तदनुसार आचरण करण्यांत आसक्त होत असत. देवाची इच्छा त्यांजवर धनीपण करीत असे. ती इच्छा मानून ते परिपूर्ण तृप्ति अनुभवीत असत. त्यांचें सबाह्याभ्यंतर ईश्वराच्या मनास अनुकूल होतें. ह्मणून त्यांच्या आचरणावरून त्याला संतोष होत असे. त्यांच्या ठायीं कांहींच उणें होत नसे. त्यांला पापाचा अनुभव

झाला नाहीं. यामुळें तेथे मरण नाहीं. रोग नाहीं. दुःख नाहीं. खेद नाहीं. रडणें नाहीं. तेथे केवळ परितोष आहे. अस्या प्रकारचें देवाचें राज्य आहे. त्याचा परिणाम सर्व प्रकारें हर्षच आहे.

पृथ्वीवर जें प्रथम पाप घडलें त्याचें निरूपण शास्त्रांत सविस्तर केलें आहे. सैतान आपले मनोरथ तृप्त करावयास पृथ्वीवर आला तेव्हां त्याच्या लबाडीवरून ते मूल स्त्रीपुरुष आपला उत्पन्न कर्त्ता व सर्वेश्वर याचें सत्य वचन अवमानून भ्रष्ट होतील आणि त्या योगाने त्या उभयतांचा वियोग होऊन ते दोघे त्या आस्याच्या राज्यांत प्रजा होतील, असें देवाला माहित होतें, तथापि त्याने त्या अंधाराच्या अधिकाऱ्याला पृथ्वीवर येऊं दिल्हें. तदनंतर हाव्वा ही प्रथम उत्पन्न झालेली स्त्री सैतानाच्या लबाडीस खरें मानून मोहांत पडली. मग काय झालें पाहा. प्रथम पुरुष जो आदाम त्याला यथोचित सहाय होण्याकरितां जी सुंदर स्त्री देवाने आपल्या अत्यंत औदार्याने उत्पन्न करून दिल्ही होती, तिने तें वर्जित केलेलें फळ खाल्लें, असें केवळ नाहीं. तर तिने आपल्या नवऱ्यासहि खायाला दिल्हें. आणि त्याने तिची इच्छा मानून तें खाल्लें. याप्रमाणें ते दोघे बुद्धिपूर्वक देवाची आज्ञा मोडून पाप करणारे झाले. त्यानी देवाचें खरेपण अवमानून सैतानाचें खोटेपण पत्करिलें. त्या योगाने त्यांचा व देवाचा वियोग झाला. असा वियोग कोणी केला हें उघड आहे. जें खोटेपण त्या स्त्री पुरुषानी स्वीकारून घेतलें त्याच्या योगेंकरून त्यांचा व सैतानाच्या संबंध झाला. मग त्यांचा व देवाचा काय संबंध आहे? खोटेपण व खरेपण यांचा

काय मेळ आहे? कांहींच नाहीं. खोटेपण जें पापाचें बीज आणि सर्व प्रकारच्या दुःखाचें मूळ तें घेऊन त्यांनी आपल्या आत्म्याच्या ठायीं रुझवण केलें होतें. मग त्यांची व देवाची वहिवाट कसी होईल? होणार नाहीं. देवाची जी शांति पुण्यावरून होत असती ती त्यांच्या ठायीं नाहींसी झाली. देवाचा जो क्रोध पापाने पेटून मरण आदिकरून अनंतकालचें दुःख देणारा आहे तो त्यांच्या आत्म्यावर होऊन राहिला.

मूलस्त्रीपुरुषांस फितावून त्यांच्या द्वारें पृथ्वीवर आपलेंच राज्य स्थापित करावें, या अभिप्रायाने पतित दुतांचा अधिपति सर्पाचा वेष धरून एदेनांतल्या बागांत आला. नंतर त्याने आपली द्वेषयुक्त तृष्णा तृप्त केली. त्याच्या धूर्त्ताईने त्या स्त्रीपुरुषांचा व देवाचा संबंध तुटला. तत्क्षणीं तो दुष्ट आत्मा त्यांच्या ठायीं प्रवेशून आपलें खोटेपणाचें राज्य प्रवृत्त करूं लागला. त्या उपरांत प्रथम पाप करणारी असी जी स्त्री ती पृथ्वींतील प्रथम लेंकराला प्रसवली, त्याला काइन असें नांव मिळालें. हा काइन आपल्या मातापितरांच्या असत्यरूप प्रतिमेने जन्मून नरहिंसक झाला. तर हें समजा, जो दुष्ट आत्मा पतित आत्म्याचा अध्यक्ष आहे, त्याच्या ठायीं जें खोटेपण आदीं उपजलें तें बीजरूप होय. त्याने त्या मूलस्त्रीपुरुषांच्या आत्म्यांच्या ठायीं तें बीज घालून त्यांस फिरून जन्मवून आपलेंच स्वरूप दिल्हें. त्या योगाने तो त्यांचा बाप झाला. मग खोटेपण त्या स्त्रीपुरुषांच्या ठायीं बीजरूप होऊन रुजलें, तें जननीजनकांच्या योगाने संतानांच्या आत्म्यांत पिढ्यानुपिढ्यांत भ्रष्टपणाचें कारण होत असतें. या प्रकारें पृथ्वींतली सर्व मनुष्यजाति

भ्रष्ट होऊन सैतानाच्या राज्यांतील प्रजा होत आली आहे. ह्मणून त्याला या जगाचा अधिकारी असें ह्मटलें आहे. त्याचा जो अधिकार तो केवळ खोटेपणाचा होय. तर तो शाश्वत नाहीं. खरेपणाच्या प्रबलाने तो विरून जात असतो. अंधारचा पिता असा जो भ्रष्टजनांचा अधिकारी तो केवळ त्याच्या योगाने आपले राज्य उभारून स्थापित करावयास समर्थ आहे.

पतित आत्म्यांचा अधिपति जो जगाचा अधिकारी त्याचें राज्य नाहींसें करून जो आपलेंच राज्य स्थापित करणार आहे, असा एक राजा उठला आहे. याविषयीं शास्त्रांत भविष्य गोष्ट असी लिहिली आहे, परमेश्वर देव सापाला बोलला, त्वां हें केलें आहे, यास्तव मी तुझ्या व स्त्रीच्या मध्यें परस्परें आणि तुझें संतान व तिचें संतान यांमध्यें परस्परें वैर ठेवीन; तें तुझें मस्तक फोडील, आणि तूं त्याची टांच फोडसील. याचें तात्पर्य सांगतों. ज्या कोणांच्या ठायीं खोटेपणाचें प्राबल्य आहे, असले पतित आत्मे आणि भ्रष्ट मनुष्यजाति सैतानाचें संतान आहे. स्त्रीचें संतान कोण आहे पाहा. देवपणामध्यें बाप पुत्र व पवित्र आत्मा असे तिघे आहेत. त्यांतील पुत्र हा स्त्रीच्या गर्भीं जन्म घेऊन अवतार झाला. तर त्याच्या ठायीं पूर्ण देवपण आणि पूर्ण मनुष्यपण आहे. तो कृपेने व खरेपणाने भरला आहे. त्याने देवपणांतला जो बाप त्याची इच्छा मानून यथाविधि तरणोपाय सिद्ध करून ठेविला आहे. यामुळें सर्व जगाच्या पापाविषयीं तो प्रायश्चित आहे. या कारणास्तव त्याच्या द्वारें देव जो बाप त्याकडे माघारें जाण्याला खोटेपणाच्या राज्यांतल्या प्रजांस मार्ग होत आहे. पवित्र आत्मा जो देव-

पणांतला तिसरा त्याची प्रेरणा मानून जे पापी मनुष्य अवतरलेल्या पुत्रावर विश्वास ठेवितात त्यांस देवाचीं लेंकरें होण्याचा अधिकार होतो. त्या पवित्र आत्म्याच्या योगेंकरून त्यांच्या ठायीं खरेपण हें बीज पडून पुनर्जन्म होण्याचें कारण होतें. खरेपण जें पवित्र आत्माच्या प्रेरण्यानें त्यांच्या ठायीं रुझून विश्वास, प्रीति, पवित्रता इत्यादि सद्गुणरूपानें फळास येत असतें त्याच्या योगानें त्यांचा व देवाचा संयोग होत असतो. तर हें जाणा कीं देवपणांतला अवतरलेला पुत्र जो प्रभु येशू ख्रीस्त तो त्या स्त्रीचें संतान असा आहे. आणि त्याचें संतान कोण आहे असें जर पुसाल तर पाहा. सैतानाच्या राज्यांतील जे मनुष्य ख्रीस्ताविषयींच्या गोष्टी ऐकून त्याजवर विश्वास ठेवितात आणि देवाकडे फिरून खरेपणाच्या राज्यांतील प्रजा होतात ते प्रभु येशू ख्रीस्ताचें संतान असे असतात.

खोटेपणाच्या राज्याचा राजा जो सैतान त्याच्या पक्षीं सगळे पतित झालेले दूत आणि जन्मानें सर्व मनुष्यजात आहे. खरेपणाच्या राज्याचा राजा जो प्रभु येशू ख्रीस्त त्याच्या पक्षीं पतित झालेले नव्हेत असले अगणित दूत आणि देवाकडे फिरलेले मनुष्य आहेत. या सर्व उभयतांमध्यें परस्परें वैर ठेविलें आहे असें निरूपिलें. तर यांत काय संशय आहे? कांहींच नाहीं. सैतानाकडले जे आत्मे व मनुष्य असतात ते ज्या नियमानें वर्त्तून आपणांला संतोषवितात तो केवळ स्वार्थभाव आहे. ते सदाचार किंवा दुराचार करोत तरी आपलीच इच्छा व स्वार्थ व्हावा असा त्यांचा मनोरथ असतो. तर असल्या आचारावरून देवाला संतोष होईल काय? उलटा असंतोष होईल

कीं नाहीं? होईल. पण देवाचा आधार ज्यांस आहे, त्यांस त्याच्या आज्ञा पाळणें भाग आहे. आणि जे त्याची इच्छा अवमानून स्वच्छंदाने आचरण करीत असतात ते त्याचा क्रोध सोसण्यास योग्य असतात. बरें, तर खोटेपणाच्या राज्याचा राजा जो अग्रगण्य दुष्ट आत्मा त्याच्या हातांतून त्याच्या यावत् प्रजांतील कोणीएकांस सोडवून देवाकडे फिरवावें आणि त्याच्या मार्गाने त्यांस चालवून देवलोकीं पोहंचवावें आणि अनंतकालचें जीवन द्यावें या अभिप्रायाने देवपणांत जो पुत्र तो अवतरून मनुष्य झाला. यावरून येशू ह्मणजे तारणारा आणि तारणाचा अधिकारी अशीं नावें त्याला मिळालीं. जे मनुष्य त्याजवर विश्वास ठेवून खरेपणाच्या राज्यांत येत असतात ते ज्या नियमाने वर्त्तून देवाला संतोषवितात तो देवाचीच इच्छा असा आहे. तर ते प्रभु येशू ख्रीस्ताचे सैनिक होऊन देवाच्या आज्ञेने खोटेपणाच्या राज्यांतल्या प्रजांशीं लढाई आणि आपल्या राजाच्या नावाने विजय करून त्याच्या राज्याचें स्थापन प्रसारण करीत असतात. अणीक खोटेपणाच्या राज्याचा राजा असा सैतान याने कृत्रिम व अन्याय यांच्या योगें जो अधिकार आपलाच करून घेतला तो खरेपण व न्याय यांच्या योगाने त्यापासून घेऊन त्याला त्याचे पतित आत्मे व अविश्वासी मनुष्य यांसुद्धां नरकांत घालून अनंतकालचा दंड सोसणारा करावा असाहि प्रभु येशू ख्रीस्ताचा मनोरथ आहे.

अद्यापि खोटेपणाच्या राज्याचा राजा जो जगाचा अधिकारी त्याने फारकरून पृथ्वींतील सर्व देशांतल्या मनुष्यांस मोहित करून आपल्याकडे सर्व राज्यें, प्रभुत्वें, सत्ता, अ-

धिकार, धनीपण, शासन इत्यादि प्रजांचीं नियंतृत्वें अट- पून ठेविलीं आहेत. सकल मनुष्यजातीला देवभक्ति, वगैरे धर्मसंप्रदाय अवश्य असावे लागतात. ज्यांच्या ठायीं ख- रेपणच नाहीं असल्या गोष्टी मनुष्य बहुधा स्वीकारणार नाहींत. ज्यांच्या योगानें आपआपली कीर्त्ति व स्वार्थ होईल असल्या सर्व गोष्टी मनुष्यांच्या मूलस्वभावाला अनु- रूप आहेत. या प्रकारें कार्याकार्यविचार करून लबाडी- चा बाप जो सैतान त्यानें देवभक्तीच्या पद्धती, देशाचार, जनव्यवहार इत्यादि धर्मांचे सांप्रदाय आपल्या इच्छेस अनुकूल करून मांडिले आहेत. असल्या सर्व गोष्टींमध्यें कसाहि मतांचा भेदाभेद असो तरी त्या सर्व परात्पर देवा- च्या भक्तिसेवेस प्रतिकूल आहेत. यामुळें त्यांच्या योगें- करून जरी यथोक्त सेवा केली तरी ती देवाची होत नाहीं, त्या दुष्ट आत्म्याची होती. एतदर्थ त्या गोष्टींकडून त्या- ची कूबुद्धि तृप्त होत असती. त्या गोष्टी काय काय आ- हेत पाहा. सूर्य आदिकरून ग्रहांचें आराधन, पृथ्वी इ- त्यादि महाभूतांचें अर्चन, गंगादि नद्या, सप्तसमुद्रादिक या उदकांचें उपासन, मृतरणशूरांचें पूजन, पितृगणाचें संतर्पण, गुरूभजन, मनःकल्पित पदार्थांची पूजा, साप, ब्रा- ह्मण इत्यादि प्राण्यांचें पूजन, असलीं जीं कार्यें अंधारमय देशांतील मनुष्यांकडून घडतात तीं अवघीं भजनपूजन कार्यें, खोटेपणाच्या राज्याच्या राजाला आवडतीं आहेत. तींच कार्यें केल्यावरून त्याला संतोष होत असतो. जेथें सैतान प्राबल्य पावून यथेच्छ आपलें राज्य चालवितो, ते- थें मनाचें आकलन केल्यावांचून त्याचे प्रजालोक यथाबुद्धि आपल्या सर्व कुवासना तृप्त करून सर्व प्रकारचीं पातकें व

अघोर अपराध करीत असतात. जे कोणी सर्व गुणानी दोषी होऊन वर्त्ततात त्यांच्या कर्मांवरून या अंधाराच्या अधिकाऱ्याला विशेष हर्ष होत असतो. या अर्थीं लबाडी, चोरी, चहाडी, कुचोद्य, लढाई, बंड, देशलुंठन, प्रजापीडन, स्त्रीधर्षण, मातृगमन, भ्रूणहत्या, मातापितृवध, कन्यावध, स्त्रीयांचें सहगमन, व्यभिचारभक्ति, साकाराचें भजनपूजन, दांभिकभक्ति, कुविद्या, आसुरीमाया, विदारण इत्यादि मंत्रांचीं कार्यें, असलीं पुष्कळ प्रकाराचीं दुष्कर्में दुष्ट आत्मा जो सैतान तो आपल्या खोटेपणाच्या राज्यांतील प्रजांकडून घडवून आपलें राज्य स्थापित करितो- पण त्याच्या राज्याचा अंत होणार आहे. त्याचा मस्तक फोडला जाणार आहे. आतां त्याचा शेवट होऊं लागला आहे

देवपणांत जो पुत्र तो सैतानाचा मस्तक फोडणारा आहे खरा. तथापि देवपणांत जो बाप व जो पवित्र आत्मा ते दोघेहि सैतानाचा संहार करण्यांत आसक्त आहेत. अणीक देवाचे अस्खलित व परिशुद्ध दूत आणि सर्व पवित्र झालेले मनुष्य त्या दुष्ट आत्म्यास संहारण्यांत तत्पर असतात. हें कसें आहे पाहा. पुत्र हा बापाचा निरोप घेऊन जगांत अवतरून मनुष्य झाला. मग एथें त्याने बापाची इच्छा मानून जगासाठीं पापाचें प्रायश्चित्त सिद्ध करून ठेवावें ह्मणूनच तो वधस्तंभावर मरण पावला. नंतर तें मरणरूप खंडणी व प्रायश्चित्त देव जो बाप त्याला मान्य झालें असतां त्याने तिसऱ्या दिवसीं त्याला जीवंत करून मेलेल्यांमधून उठविलें आणि त्याला आकाशांत व पृथ्वीवर सर्व अधिकार दिल्हा. या प्रायश्चित्ताच्या योगाने पापी

मनुष्यांनी देवाला शरण जाऊन पाप क्षमा पावावीं यासाठीं प्रभु येशू ख्रीस्तानें आपल्या शिष्यांस ही आज्ञा केली कीं, तुम्ही संपूर्ण जगांत जाऊन सर्व मनुष्यांला शुभवर्त्तमान गाजवा. जो विश्वास धरील आणि बाप्तिस्मा घेईल त्याचें तारण होईल. परंतु जो विश्वास धरणार नाहीं तो दंडी ठरविला जाईल. तदनंतर मनुष्यांच्या देखतां तो चढून देवलोकीं पोहंचला. तेथून पवित्र आत्मा त्याचा निरोप घेऊन मनुष्यांच्या ठायीं उतरतो, आणि त्याकडून जें पापांचें प्रायश्चित्त सिद्ध झालें त्याविषयींच्या गोष्टींनी त्यांमध्यें प्रेरणा करून पापांविषयीं त्यांची खातरी करितो, आणि ख्रीस्ताची योग्यता त्यांस समजवून त्याच्या मध्यस्थी कडून देवाल शरण नेतो. या प्रकारें जे कोणी पवित्र आत्म्याच्या प्रेरण्यानें प्रभु येशू ख्रीस्तावर विश्वास ठेवून देवाकडे फिरतात ते पुनर्जन्म पावून खरेपणाच्या राज्यांत प्रजा होतात. तर जी देवाची प्रतीमा मूलस्त्रीपुरूषानी सांडिली होती ती ख्रीस्ताकडून या फिरून जन्मविलेल्या मनुष्यांस मिळाली आहे. म्हणून त्यांजवरून सैतानाचा अधिकार गेला आहे. तो अणखी त्यांजवर राज्य करणार नाहीं. आपलें धनीपण त्यांच्या ठायीं भग्न झालें आहे असें जाणून तो सुखासुखीं त्यांस जाऊं देतो असें समजूं नये. तर फिरून त्यांस बिघडवून आपल्याकडे घ्यावें या हेतूनें तो त्यांच्या मनांत पापवासना आणितो, खोटेपणाचीं वचनें सूचवून मोहांत पाडायास आयास करितो, त्यांचीं कुष्टेंपिष्टें काढून देवाकडे असण्याविषयीं त्यांच्या अंतःकरणांत संशय आणितो, आणि कधीं कधीं यथाबुद्धि प्रसंग पाहून त्यांचे पाठलाग मांडून त्यांची दटावणी व तारंबळ करितो. या-

प्रमाणें अंधकाराचा अधिकारी जो सैतान तो ख्रीस्तावर विश्वासणाऱ्या मनुष्यांस देवापासून फितावून पुन्हा आपल्या कापट्याने घेतलेल्या राज्यांत मिळविण्यास अत्यंत साक्षेप करीत असतो. यावरून त्या उभयतांमध्यें परस्परें वैर होऊन युद्धें प्रतियुद्धें होत असतात. या प्रकारें हा प्राचीन साप मागें निरूपिलेलें जें स्त्रीचें संतान त्याची टांच फोडीत असतो. कां तर सदासर्वदा धन्य व स्तुत्य प्रभु व उद्धारक असा जो येशू ख्रीस्त तो आपल्यावर प्रीति करणाऱ्या मनुष्यांस जीं संकटें व दुःखें होतात तीं आपलींच मानून स्वीकारीत असतो.

जे कोणी पवित्र आत्म्याच्या प्रेरण्याने पुनर्जन्म पावून देवाकडे होतात ते पुरूष व स्त्रिया, वृद्ध व तरूण, जातींचे व गैरजातींचे असले कोणतेहि असोत तरी ते सर्व तारणाचा अधिकारी जो प्रभु येशू ख्रीस्त त्याचे सैनिक होऊन उद्धारप्रद युद्धें करितात. तीं युद्धें अंतरींचीं व बाहेरचीं असीं दोन प्रकारचीं असतात. आपआपल्या अंतःकरणांवर ख्रीस्ताचें राज्य स्थापित करून त्याला सर्व मान द्यावा यासाठीं ते अंतरींचीं युद्धें करून सैतानाला घालवून देतात. तर एथें आयुष्य हें युद्धांगण होय. सैनिक आमरणांत युद्धें करीत असतात. ते मरून पूर्ण जय पावतात. इतर जनांच्या अंतःकरणांवर ख्रीस्ताचें राज्य स्थापित व्हावें आणि त्या योगाने त्याला त्यांचा मान प्राप्त व्हावा याविषयीं ख्रीस्ताचे सैनिक तीं बाहेरचीं युद्धें करून परस्परें एकमेकांच्या ठायीं आणि जगांतील मनुष्यांच्या ठायीं खोटेंपणाचें राज्य नाहींसें करावयास झटतात.

येशू ख्रीस्ताने जीं कर्में करून आणि जीं दुःखें सोसून तारणोपाय सिद्ध केला आहे त्यांविषयींच्या गोष्टींच्या द्वारें

जी युद्धसामग्री युद्धांत लावितात ती सिद्ध होती. ती या प्रकारची आहे. खरेपण हा कंबरबंद होय. नीति हें चिलखत आहे. शुभवर्त्तमानाने जी शांति होती ती पायांस सिद्धि आहे. जिजकडून त्या दुष्टाचे सर्व जळते बाण विझून जातील असा विश्वास ही ढाल आहे. तारणाची आशा हा टोप आहे. देवाची गोष्ट ही तरवार आहे. पवित्र आत्म्याच्या प्रेरण्याने ती गोष्ट सिद्ध होती यामुळें तिजला आत्म्याची तरवार असें ह्मटलें आहे. ज्यांच्या अंगावर ही देवाची सगळी युद्धसामग्री आहे त्यांस देवाचें सामर्थ्य प्राप्त होतें. ह्मणूनच ते सैतानाच्या समस्त युक्ति प्रयुक्ति निवारून उभे राहावयास समर्थ आहेत. देवाच्या सगळ्या युद्धसामग्रीच्या द्वारें ख्रीस्ताचे सैनिक खोटेपणाच्या राज्यांतील पराकाष्ठेच्या युद्धवीरांस दवडायाला बळवान होत असतात. लेंकरें देखील आपल्या अंगावर ती देवाची सगळी युद्धसामग्री घेऊन सैतानाच्या सहस्रावधि रणशूरांस पळवीत असतात. तर मग जे कोणी ती युद्धसामग्री लावून युद्धें करितात त्यानी आमरणांत एक क्षणभरहि सोडून ठेवूं नये. जे सोडून ठेवितात त्यांची हानि होती. तिचा सुप्रयोग कसा करून आपल्या वैऱ्यांस जिंकून जय पावावा हें समजावें असी ज्यांची इच्छा आहे ते प्रत्यहीं पवित्र शास्त्राचें पठन व मनन करून युद्धांचे विधि व निरूपिलेलीं उदाहरणें ध्यानांत ठेवितात, आणि देवाची प्रार्थना करून यथास्थित ज्ञान, धैर्य इत्यादि सर्व प्रकारचें साह्य मागतात. या रीतीने जे ख्रीस्ताचे सैनिक युद्धें करितात ते आपल्या अंतःकरणांतील कुभावना, दुष्ट विचार इत्यादि शत्रूंस घालवून सैतानाचें राज्य नाहींसें करितात आणि ख्रीस्ताचें

राज्य स्थापितात. या प्रकारें आमरणांत दिवसानुदिवस खोटेपणाचें बळ न्यून आणि खरेपणाचें प्राबल्य अधिक होत असतें. तर अंतकाळीं ते सैनिक शेवटला जय पावून देवलोकीं पोहंचतात. तेव्हांपासून त्यांच्या ठायीं पापवासना होत नाहीं. अशुद्धता होत नाहीं. केवळ सत्ययुक्त वृत्ति होत असतात. तर समजा कीं ख्रीस्ताच्या सैनिकांच्या अंतकाळीं त्यांस परिपूर्ण तारण प्राप्त होतें. ते मरण पावून तरतात. मरतांच त्यांच्या ठायीं सैतानाचा अधिकार अगदीं नाहींसा होऊन जातो. तेव्हांच ख्रीस्ताचा अधिकार त्यांच्या ठायीं परिपूर्ण होऊन एकलाच चालतो. तर अस्या तरलेल्या जनांविषयीं सैतानाचा मस्तक फोडलेला आहे असें ह्मणण्यांत दोष काय आहे ? कांहींच नाहीं. जेथे ते आपल्या तारणाऱ्याजवळ वस्ती करून देवाची अखंड सेवा व गौरव करितात आणि अनंत हर्ष अनुभवितात तेथे तो दुष्ट आत्मा कदापि प्रवेश करून जाणार नाहीं.

एथे खरेपणाच्या राज्यांतील प्रथम जो तरून देवलोकीं पोहंचला तो हाबेल नामा होता. जो जगदुद्धारक प्रगट होणार ह्मणून सांगितलें होतें त्यावर विश्वास ठेवून तो पुनर्जन्म पावला होता. मग तो आपल्या भावाच्या हातून मरण सोसून देवाच्या घरीं गेला. देवपणांत जो पुत्र तो स्त्रीच्या पोटीं अवतरल्यापूर्वीं सुमारें ३८७५ वर्षें हाबेल मरून तारण पावला होता. तेव्हांपासून कोट्यानकोटी मनुष्य पुनर्जन्म पावून तरले आहेत. ते सर्व एका तरणोपायाने तारण पावून एका प्रीतियुक्त खंडणीसंबंधी गायन करून ह्मणतात कीं, "ज्याने आह्मावर प्रीति केली आणि आपल्या रक्ताने आमच्या पापांपासून आह्मास धुतलें, आणि देव ह्मणजे आ-

पला बाप यासाठीं आह्मास राजे व उपाध्ये केलें आहे त्याला गौरव व पराक्रम सदासर्वकाळ असो, आमेन."

खरेपणाच्या राज्यांतील जे प्रजाजन पृथ्वीवर वस्ती करून तारणाच्या अधिकाऱ्याच्या आज्ञांत वर्त्तत आहेत, त्यांच्या योगाने तो पृथ्वींतील सर्व देशांतल्या मनुष्यांमध्यें आपल्या राज्याचें स्थापन करीत आहे. कोणी कोणी त्याची इच्छा मानून आपआपल्या स्वदेशीं राहतात आणि तारणप्रद युद्धें करून खरेपणाचें राज्य स्थापण्यांत आपलें आयुष्य घालवितात. ते आपला कामधंदा करून प्रपंचनिर्वाह चालवितात, तथापि ते देवाची युद्धसामग्री सोडीत नाहींत. कारण कीं त्यांचा उद्योग कोणताहि असो, तरी सदोदित आणि सर्व ठिकाणीं ते प्रभु येशू ख्रीस्ताचे सैनिक आहेत. आपण आपले नव्हों· आपण पापांच्या दासपणापासून सोनें व रूपें अशा नाशवंत वस्तूंनी खंडून घेतले गेलों असें नाहीं, तर ख्रीस्ताच्या मोलवान रक्ताने खंडून घेतले गेलों. ह्मणून आपलें शरीर आणि आपला आत्मा जीं देवाचीं आहेत, त्यांच्या द्वारें आपणास देवाची सेवा व गौरव करणें भाग आहे, असें मानून ते सदसद्विवेकाने वर्त्तत असतात. ते देवाचें गौरव पाहून खातात आणि पितात. ते प्रीतीने व नम्रतेने चालून ख्रीस्ताची योग्यता दाखवितात. ते कुटिल व कृत्रिमी मनुष्यांमध्यें वर्त्तून जीवनाची गोष्ट प्रगट करितात. ते तेजःपुंजांसारिखे जगांत प्रकाशतात· ते अभक्तीला व जगांतल्या हांवांस नाकारून इहलोकीं सुबुद्धीने व न्यायाने व सुभक्तीने वागतात, ते अज्ञान्यांस शिकवितात, नागव्यांस पांघरवितात, दरिद्र्यांस अन्नोदक देतात, विधवा पोरकीं इत्यादि जीं संकटांत

असतात त्यांस भेटून त्यांच्या गरजा पुरवितात. जी देवाची गोष्ट मनुष्यांच्या आत्म्यांस तारावयास समर्थ आहे तिचा प्रसार करून घरोघरांतील जनांला श्रवण करण्याकरितां ते धन मिळवून खर्चितात, आणि देवभक्तीने देतात. खरेपणाचें राज्य जें पवित्र आत्म्याच्या प्रेरण्याने नीति व शांति व आनंद यांहींकरून संपन्न आहे. तें देशोदेशीं आणि प्रांतोप्रांतीं आणि घरोघरीं प्रवर्त्तित करण्याची त्यांस उत्कंठा आहे. या अभिप्रायाने ते जगतात. त्यांचा स्नेहयुक्त बोल असा आहे कीं, "ख्रीस्ताची प्रीति आह्मास उद्युक्त करिती. आह्मी तर असें ठरवितों कीं एक जर सर्वांसाठीं मेला तर सर्व मेले होते. आणि तो सर्वांकरितां मेला यासाठीं कीं जे जगतात, त्यानी पुढें आपणासाठीं नव्हे तर आपणाकरितां जो मेला आणि उठला त्यासाठीं जगावें."

प्रभु येशू ख्रीस्त जो खरेपणाच्या राज्याचा राजा त्याने वधस्तंभावर जें प्रायश्चित्त जगासाठीं सिद्ध केलें त्याच्या योगाने परात्पर देव मनुष्यांस पापक्षमा आणि दोषापासून शुद्धता देऊन तारायाला समर्थ आहे. पण ज्यानी त्या प्रायश्चित्ताचें श्रवण केलें नाहीं, असले परदेशांतील कोट्यानकोटी स्त्रीपुरुष आहेत, त्यांचें तारण कसें होईल? शुभवर्त्तमानाचें श्रवण केल्यावांचून ते तरणार नाहींत. ते जर आपल्या पापांत जगून मरतील तर ते देवाच्या घरीं पोहंचणार नाहींत. उलटें अनंतकाल अग्नीने व गंधकाने जळतो जो डोह त्यांत त्यांचा भाग होईल. त्यानी विद्या व ज्ञानाभ्यास केला असेल तरी त्याच्या योगाने त्यांचें तारण होणार नाहीं. त्या ज्ञानाच्या योगेंकरून त्यांजवर सैतानाचें राज्य सदृढ झालें असेल. पापाकरितां येशू ख्रीस्त वधस्तं-

भावर जीवें मारिला गेला. पापाकरितां तो मेलेल्यांमधून उठला. आणि देवलोकीं जाऊन मध्यस्थीकर्त्ता झाला आहे. हें शुभवर्त्तमान त्यानी श्रवण करून तारणाचें ज्ञान संपादन केलें पाहिजे. असला विचार करून कोणी कोणी ख्रीस्ताचे सैनिक त्याचा निरोप घेऊन परदेशीं जात असतात, आणि तेथे प्रवास करून तारणप्रद युद्धें करीत असतात. ते वधस्तंभींविषयींच्या गोष्टीचें घोषण करून खोटेपणाचें राज्य मोडावयास आणि खरेपणाचें राज्य स्थापावयास यथाशास्त्र साधनें लावित असतात. ते सैतानाचा मस्तक फोडून त्याच्या पासून प्रजाजनांस सोडविण्याला यथास्थित अयास करीत आहेत. त्यांचा मनोरथ प्रत्यहीं सिद्धीस जात असतो.

प्रभु येशू ख्रीस्त सर्व पृथ्वीच्या पाठीवर आपलें राज्य स्थापित करणार आहे. यांत संशय नाहीं. खोटेपणाचें राज्य अनंतकाल टिकेल असें कोणाला वाटूं नये. त्या राज्याचा संहार होत आहे. सैतानाचा मस्तक फोडून खरेपणाचें राज्य स्थापित करण्यांत सर्व सृष्टींतले खरेपणाचे पक्षधारी आसक्त आहेत. ज्यानी परीक्षा सोसून आपली पदवी सोडिली नाहीं असले कोट्यावधि परिशुद्ध आत्मे आणि कोट्यानकोटी देवाकडे फिरलेले मनुष्य यांहींकरून प्रभु येशू ख्रीस्ताचीं सैन्यें संपन्न आहेत. तर तो कसा सैन्याध्यक्ष आहे पाहा. तो रक्तांत बुचकळलेलें वस्त्र पांघरला आहे. राजांचा राजा आणि प्रभूंचा प्रभु असें अभिधान त्याच्या पांघरूणावर व त्याच्या मांडीवर लिहिलेलें आहे. पुष्कळ मुगुट त्याच्या डोक्यावर आहेत. दुधारी व तिखट असी तरवार त्याच्या तोंडांतून निघत आहे. असला

सैतानाचा मस्तक फोडणारा आहे. तो पृथ्वींतील समस्त देशांत त्या नष्टपद व दुष्ट अस्या आत्म्याविरुद्ध विग्रहवदणूक गाजवून खोटेपणाच्या राज्याचें विघाटन आणि आपलेंच खरेपणच्या राज्याचें स्थापन करीत आहे. जी सत्यरूप तरवार त्याच्या तोंडांतून निघत आहे ती दुधारी व तिखट असी निरूपिली आहे. बरें तर तिच्या द्वारें दोन प्रकारचें छेदन होत आहे. तें एक जीवनकारक आणि एक संहारकारक असें आहे. कोणी कोणी छेदित होऊन देवाकडे फिरतात, आणि ख्रीस्ताचे सैनिक होऊन खरेपणाचीं युद्धें करूं लागतात. यथायोग्य कालीं ते आपल्या सर्व शत्रूंस जिंकून जीवनाचे मुगुट पावतात. त्या तरवारीच्या दुसऱ्या धारेने कोणी छेदित होऊन नरकलोकाच्या यातना सोसायाला जातात.

प्रभु येशू ख्रीस्त जो खरेपणाच्या राज्याचा राजा त्याची सत्ता व कार्य यांविषयीं पवित्र शास्त्रांत असें लिहिलें आहे. “माझ्या जवळ माग, ह्मणजे मी राष्ट्रें तुझें वतन आणि पृथ्वीच्या सीमा तुझें धन असें करून देईन. तूं लोखंडी काठीने त्यांजवर राज्य करसील, कुंभाराच्या मडक्यासारिखें त्यांस फोडसील.” खरेपणाच्या राजाचा अधिकार आपणांवर नसावा असा निश्चय जे करितात आणि जे पवित्र आत्म्याच्या गोष्टीने प्रेरित होऊन खरेपणाच्या राज्यांत येणार नाहींत त्यांजवर प्रभु येशू ख्रीस्त आपला अधिकार घालून बलात्काराने त्यांचा संहार करीत असतो. “राष्ट्र अथवा राज्य जें तुझी सेवा करणार नाहीं तें नाहींसें होईल. तीं राष्ट्रें अगदीं लयास जातील.” “राज्य व प्रभुत्व आणि सर्व आकाशाखालच्या राज्याचें मोठेपण परात्पराच्या

पवित्र लोकांस मिळेल. त्याचें राज्य सर्वकाळचें आहे. आणि सर्व प्रभुत्वें त्याची सेवा आणि मान्यता करितील." जेथे प्रभु येशू ख्रीस्ताचें राज्य प्रबळ होऊन चालतें तेथे कृत्रिम, लबाडी, कुचोद्य, चोरी, जारकर्म, हत्या, मूर्त्तीपूजा, साकारभक्ति इत्यादि खोटेपणाचीं कृत्यें नाहींसीं होतात. तेथें सत्यतारूप वृक्ष अंकुरित होऊन वाढत असतो. आणि त्याला प्रीति, श्रद्धा, नीति, शांति, दया, नम्रता, औदार्य, शुद्धता इत्यादि खरेपणाचीं फळें येत असतात.

खरेपणाचा राजा जो प्रभु येशू ख्रीस्त त्याने वीरघोषणा करून हिंदूदेशांत खोटेपणाचा राजा जो सैतान त्याच्या विरुद्ध विग्रहवदणूक केली आहे. अलिकडे सन १७९३ यांत त्याचे सैनिक तारणाचा ध्वज घेऊन एथे उभारूं लागले. तेव्हांपासून पुष्कळ स्त्रीपुरुषानी येऊन प्रांतोप्रांतीं खरेपणाचीं युद्धें चालविलीं आहेत. एथच्या रणभूमीवर बहुत युद्धेंप्रतियुद्धें झालीं आहेत. इतक्यांत खोटेपणाच्या राजाचे लक्षावधि जन वैरशांतीचें आमंत्रण मानून खरेपणाच्या राज्यांत मिळाले, आणि देवाची युद्धसामग्री घेऊन तारणाच्या अधिकाऱ्याचे सैनिक झाले आहेत. प्रभु येशू ख्रीस्ताने आपल्या सैन्यांच्या द्वारें एथें जागोजागीं सैतानाचा विघात करून कितीएक महान जय संपादिले आहेत. स्त्रियांचें सहगमन, कन्याहत्या, गंगातीरीं हत्या, विधवापुनर्विवाहनिषेध, इत्यादि त्या दुष्ट आत्म्याचे दुर्ग व कोट हिरावून घेऊन जाळिले आहेत. होळी वगैरे कुत्सित जनव्यवहार, आणि स्त्रिया आदिकरून लोकांचें अज्ञान यांची निराकृति केली आहे. तर एथे खरेपणाच्या योगाने विजय

होत आहेत. खोटेपणाचें प्राबल्य नाहींसें होत आहे.

एथे येशू ख्रीस्ताचे कोणी कोणी वीर सैतानासीं लढाई करून पडले आहेत. पण त्या योगाने त्यांची हानी झाली असें समजूं नये. जे कोणी आपल्या अंगावर देवाची सगळी युद्धसामग्री घेऊन खरेपणाच्या युद्धांग-णांत पडतात ते त्या योगाने अलभ्यलाभ पावतात. तारणाचा अधिकारी जो राजांचा राजा व प्रभूंचा प्रभु तो आपल्या दुतांस निरोप देऊन प्रकाशरूप वहनाने त्या पडले-ल्या विरांस आपल्या राजमंदिरीं पोहंचवितो, आणि त्यांच्या डोक्यांवर जीवनाचे मुगुट व त्यांच्या हातांत देवाची वीणा ठेवून देतो. मग ते प्रीतियुक्त खंडणीचें गायन करून आ-पल्या उद्धारकाची सेवा व कीर्त्ति करितात. त्यांच्या सर्व तृष्णा तृप्त झाल्या आहेत. अणखी पापाच्या योगाने त्यांस भय, शोक, इत्यादिकांचा उद्वेग होणार नाहीं. तर ते खरेपणाच्या युद्धांगणांत सर्व शत्रूंस जिंकून विजयी झाले, असें समजावें. केवळ एक ऐच्छिक गोष्ट राहिली. ती कोणती आहे पाहा. मरणाचा अधिकारी जो सैतान त्याच्या हातांत भूमि आहे, आणि त्या विरांचे देह भूमींत मिळाले आहेत. तर आपणांस ते देह परतून प्राप्त व्हावे, असी यांची आशा आहे. ही आशा तर तृप्त होईल. कारण कीं विश्वासाने ते देह ख्रीस्ताच्या टायीं संयुक्त आहेत. यामुळें ते भूमींत किंवा पाण्यांत कोठेंहि जरी असले, तरी ख्रीस्ता-ची रक्षणावहदृष्टि त्यांजवर आहे. यथायोग्य कालीं तो गर्तांतून ते देह सजीव करून उठवील आणि आपल्या तेजस्वी शरिरासारिखें होण्यासाठीं पालटील. मग आत्म्यांचा व देहांचा संयोग होत असतां ते सूर्यासारिखे लकलकीत

शोभतील. अणीक भूमि जरी सांप्रतकालीं सैतानाच्या हातीं आहे तरी देवाच्या वचनाने ती ख्रीस्ताची होणारच आहे, अस्या श्रद्धेने व आशेने खरेपणाचे शूर आपले देह त्यागून देवाच्या घरीं जातात, आणि त्याची पुनः प्राप्ति होण्याची वाट पाहतात. एथे खोटेपणाचें विघाटन आणि खरेपणाचें समर्थन करण्यांत ज्यांची जसी आसक्ति व साक्षेप आहे, त्यांची तसी प्राप्ति व शोभा तेथे आहे. याविषयीं पवित्र शास्त्रांत असें लिहिलें आहे. "भूमीच्या धुळींत निजले आहेत, त्यांतले बहुत जागे होऊन उठतील. कितीएक सर्वकालच्या जीवनासाठीं, आणि कितीएक निंदेसाठीं व सर्वकालच्या धिक्कारासाठीं उठतील. आणि जे ज्ञानी ते अंतराळाच्या प्रकाशासारिखे, आणि ज्यानी बहुतांस न्यायी केलें ते तार्‍यांसारिखे सदासर्वकाळपर्यंत प्रकाशतील."

या पुस्तकाच्या पुढच्या प्रकरणांत ज्या प्रिय बाईच्या स्वानुभूति व चरित्रें निरूपून ठेविलीं आहेत तीं एथें हिंदुदेशीं खरेपणाच्या युद्धांमध्यें पडली आहे. तिचा देह सातारा शहराच्या भूमींत निद्रित होत आहे. देवाच्या घरांतल्या सभेंत तिच्या आत्म्याला जागा मिळाली आहे. कोणत्या हेतूने ती आपले बंधुवर्ग व स्वदेश सोडून इकडे आली, आणि एथें प्रवास करून तिच्या अंतःकरणांत कशाची उत्कंठा भरली, आणि ती कसी प्रभूचीं युद्धें करून विजयी झाली, या गोष्टींचा उमज व्हावा ह्मणून ह्या बाईचें निरूपण करून लिहिलें आहे.

मंगर मडम साहेब इचें निरूपण.

प्रकरण १.

मातापितरें आणि चालचर्या.

माणूस जें पेरितो तेंच पीक पावेल. ज्या मार्गांत चालावें त्यांत मूल लाव ह्मणजे तो प्रौढ झाल्यावर त्यांतून ढळणार नाहीं. असलीं वाक्यें जीं पवित्र शास्त्रांतून काढून एथे लिहिलीं आहेत, त्यांचें तात्पर्य उघड आहे. तर त्यांवरून जाणावें कीं कुलजनांची प्रतिष्ठा किंवा अप्रतिष्ठा मातापितरांच्या आकळण्यांत आहे. जीं मातापितरें आपल्या लेंकरांच्या चालचर्यांची अवज्ञा करून त्यांस स्वच्छंदाने वागूं देतात, तीं वायु पेरितात, असें म्हणण्यांत दोष नाहीं. तर तीं वावटूळ असें पीक पावतील. यांत संशय नाहीं. असलीं आईबापें आपल्यासाठीं शोच्यता सांठवून यथाकालीं शोचन करतील, असें केवळ नाहीं. तर त्यांचीं लेंकरेंहि नष्टविवेक होऊन अधोगति पावतील. "जो डोळा बापाचा उपहास करितो आणि आईची आज्ञा तुच्छ मानितो, त्याला खोऱ्यांतले डोमकावळे टोचितील, आणि गरूडाचीं पिलें त्याला खातील." ज्यांच्या ठायीं देवाची भीड व सद्भय आहे असीं मातापितरें आचरण्याविषयीं आपल्या लेंकरांस देवाची इच्छा व आज्ञा शिकवितात. गर्भींचीं फळें हीं इहलोकीं देवाचीं सर्वोत्कृष्ट दानें आहेत, असें मानून तीं परात्पर देवाची सेवा व गौरव करण्याचें वळण

आपल्या मुलांस लागावें म्हणून सुबोध करून आपल्याच आचरण्याने शुद्ध उदाहरणें दाखवितात. त्यावरून त्यांस इष्टापत्ति झाली आहे. त्यांच्या लेंकरानी प्रौढ होऊन त्यांस धन्य असें म्हटलें आहे. शलमोन जो सूज्ञ जन त्याच्या वचनाची प्रतीति त्यांस आली, असी कीं "तूं आपल्या पुत्राला शिक्षा कर म्हणजे तो तुला चैन पडूं देईल, होय तो तुझ्या जीवाला आनंद वाटूं देईल. परमेश्वराचें भय जीवनदायक आहे. जो त्याजकडून तृप्त आहे त्याजवर अरिष्ट येणार नाहीं." प्रभूसंबंधी शिक्षा व बोध यांकडून ज्यांचा प्रतिपाळ आईबापानी केला आहे, असीं पुष्कळ लेंकरें प्रौढ होऊन नीतीच्या मार्गानें चाललीं आहेत. बोलून चालून त्यांच्या सर्व स्थिति रीति दोषविरहित झाल्या आहेत. त्यानी आपल्या कुलाचें महत्व व क्षेम पाहून जगास हितप्रापण केलें आहे.

एथे ज्या प्रियतम बाईचें निरूपण करितों तिच्या माता-पितरांस ईलि असें आडनांव आहे. ह्मणून तिजला मेरी ई० ईलि असें ह्मटलें आहे. तीं मातापितरें मृत्यु पावलीं आहेत. तीं भाविक, धार्मिक व अनन्यभक्तिक असीं होतीं. पवित्र आत्म्याच्या प्रेरण्याने तीं पुनर्जन्म पावून खरेपणाच्या राज्यांत राहिलीं होतीं. ख्रीस्ताचे सैनिक होऊन आणि देवाचीं युद्धसामग्री घेऊन त्यानी एकमेकांसरसें सुमारें पन्नास वर्षें सैतानाच्या विरुद्ध प्रभूचीं युद्धें केलीं होतीं, तेव्हां ईलि मडम साहेब वीराचीं हत्यारें सोडून देवलोकीं देवाचीं वीणा व जीवनाचा मुगुट घ्यावयास गेली. नंतर तीन वर्षांनी ईलि साहेब तेथे जाऊन तरलेल्या मनुष्यांवरोबर अतिशय मधुर स्वरानी प्रीतियुक्त खंडणीचें हर्षदायक गायन करूं लागला.

साहा पुत्र व तीन कन्या असीं नऊ लेंकरें त्या मातापितरांस होतीं. इहलोकीं आणि परलोकीं आपल्या लेंकरांचा निभाव कसा होईल याविषयीं त्यानी सद्सद्विचार करून यथोचित निर्धार केला. पृथ्वी, चंद्र, इत्यादि जगांचा उपसंहार झाल्यावरहि हीं लेंकरें जगतील. जरी इहलोकीं त्यांचें आयुष्य सरेल तरी परलोकीं कदापि त्यांच्या आहेपणाचा अंत होणार नाहीं. तीं जर पुनर्जन्म पावून सर्व दुराचारांपासून पळतील, आणि विश्वाससंबंधी उत्तम युद्धें करून नीति, सुभक्ति, विश्वास, प्रीति, सहनशीलता, लीनता, यांस अनुसरून चालतील, तर इहलोकीं त्यांची प्रतिष्ठा व निर्वाह होईल, आणि परलोकीं तीं सर्वकाळचें जीवन पावतील. तर निश्चयें या जगीं त्यांच्या योगेंकरून देवाची सेवा व गौरव झालें पाहिजे. एतदर्थ त्यांच्या शरिराची वृद्धि होऊन यथाशक्ति हितकारक उद्योग घडावा ह्मणून जसें त्यांस आतृप्ति पौष्टिक अन्न मिळालें पाहिजे, त्याप्रमाणें त्यांच्या मनाची प्रौढी होऊन यथेच्छ प्राप्ति होण्याकरितां त्यांस यथास्थित ज्ञानयुक्त आप्यायन मिळण्याचें प्रयोजन आहे. असा विचार करून त्या आईबापानी आपल्या सामर्थ्याप्रमाणें आपल्या लेंकरांस देवाच्या आज्ञा इत्यादि शास्त्रार्थ शिकविला, आणि धर्मसिद्धांत व विद्याभ्यास शिकण्याचा प्रसंग दाखविला. अस्या आयासांच्या योगेंकरून आपल्या पुत्रीपुत्रांच्या ठायीं पुनर्जन्म होऊन पवित्र आत्म्याचीं फळें निपजावीं, या अभिप्रायानें त्यानी सदोदित आग्रहानें देवाची प्रार्थना व विनंती केली. तर असल्या आयासांवरून कसी प्राप्ति झाली, हें पाहा. त्या नऊ लेंकरांतील एक पुत्र बाळपणीं मरण

पावला. ख्रीस्ताच्या प्रायश्चित्ताच्या सामर्थ्यानें तो बाळ स्वच्छ होऊन देवाच्या घरास पावला, असें अनुमान खचीत आहे. आणीक एक पुत्र जो वडील लेंकरूं तो प्रौढपणीं मेला. त्याची वर्त्तणूक निर्दोष नीट होती. पण तो पर्त्तून जन्मून तारण पावला कीं नाहीं, याविषयीं निर्धार नाहीं. या दोन पुत्रांवांचून दुसरीं सात बहीणभावंडें आपल्या आईबापांच्या सुबोधानें वर्त्तलीं, आणि पुनर्जन्म पावून खरेपणाच्या राज्यांत ईश्वराचीं युद्धें करणारीं झालीं. त्यांतील दोन बहिणी आणि दोन भाऊ आपल्या मातापितरांसुद्धां अर्धीच देवलोकीं जाऊन आपल्या प्रभु येशू ख्रीस्ताच्या सौधांत वास कर्त्तीं झालीं आहेत. त्यांची एक बहीण आणि दोन भाऊ एथे अद्यापि प्रवास करून तेथे त्या सर्वांसहवर्त्तमान वस्ती करण्याची वाट पाहत आहेत.

मेरी ई० ईलि बाई आपल्या मातापितरांचें चौथें लेंकरूं आणि पहिली कन्या होती. तिच्या मूलस्वभावाच्या ठायीं फार सौम्यता व माधुर्य होतें. ज्ञानदृष्टि, सुमनस्क, सुहृदय, व प्रसन्नमुख असी ती होती. प्रीति, श्रद्धा व लीनता यांचा विकास तिच्या चित्तांत होऊन तद्रूप फळें तिच्या वर्त्तण्यांत पक्क झालीं. आपल्या आईबापांच्या अनुग्रहानें व सुबोधानें ती लाहानपणीं सद्धर्मानी अलंकृत झाली. तिनें त्यांचें प्रतिफळ पाहून नित्य अनिवार मान्यता व ममता केली. मरणानें देखील तिचा आणि मातापितरांचा स्नेह तुटला नाहीं. तिच्या सर्व आप्तजनांस तिचें सखित्व फार इष्ट होतें. ती सर्व सुसंगतींत शिरोमणी असी झाली.

प्रियतम मेरी ईलि बाई सुमारें वीस वर्षें खोटेपणाच्या राज्यांत जगून राहिली. मनुष्यांच्या दिसण्यांत तिची वर्त्त-

णूक फारकरून शुद्ध होती. लबाडी सांगणें, अपशब्द बोलणें, चहाडी करणें, पैशून्य पाहणें, इत्यादि प्रकारची कांहींच खोड तिच्या स्वभावांत नव्हती. तिने सर्वांवर प्रीति केली, आणि सर्वांची प्रीति तिजवर झाली. तथापि तिच्या ठायीं जो जन्मस्वभाव राहिला, तो भ्रष्ट होता. त्यामुळें तिने कधीं देवावर प्रीति केली नव्हती. कधीं त्याची इच्छा मानून आणि त्याचें गौरव पाहून त्याच्या आज्ञा पाळिल्या नव्हत्या. तिने केवळ आपलाच स्वार्थ आणि आपल्या इष्टमित्रांचा संतोष पाहून सदाचरण केलें होतें. तिने आपल्या घरीं आणि आदितवारींच्या शाळेंत पवित्र शास्त्रांतील सहस्त्रावधि वाक्यें मुखपाठ करून मनांत सांठविलीं होतीं. तिने फार वेळां आपल्या आईबापांसंगतीं देवभक्तीच्या स्थळीं जाऊन शास्त्रार्थ आणि आप्तवचनांकडून उपदेश ऐकिला होता. असल्या गोष्टींच्या योगाने खरेपणाची प्रेरणा तिच्या आत्म्यांत होऊन ती वारंवार आपल्या पापांविषयींची खातरी पावून आक्रोशाने रडली होती. त्या समयीं आपण देवाकडे फिरून पापक्षमा मागावी आणि उपरांत त्याचीच इच्छा मानून तदनुसार आचरण करावें, असें ह्मणून तिने मनःपूर्वक निश्चय केला होता. तरीं पुढें जगावरच्या प्रीतीमुळें तिने आपल्या देहस्वभावाला मान्य होऊन देवाच्या पवित्र आत्म्याला खेद देऊन पळविलें होतें. याप्रमाणें कांहीं वर्षांपर्यंत तिने आपल्या आत्म्याच्या तारणाची अवज्ञा करून आपलीं मातापितरें इत्यादि खरेपणाच्या राज्यांतील प्रजांस खिन्न केलें होतें.

ही दुःखाची गोष्ट केवळ ह्या प्रिय ईलि बाईच्या प्रती-

तीस आली होती, असें समजूं नये. आणि इतर मनुष्यांच्याहून तिच्या ठायीं देवाविषयींचा अधिक अविश्वास, अपश्चात्ताप, अप्रीति, इत्यादि अवगुण राहिले होते, असेंहि नाहीं. तर असी गोष्ट फारकरून ख्रीस्तावरच्या सर्व विश्वासणाऱ्या मनुष्यांच्या अनुभवास आली आहे. आणि तसले अवगुण जन्मतः सर्व मनुष्यजातीच्या ठायीं सहज असतात. तर यावरून समजावें कीं जे देहप्रधान आहेत, त्यांचें आचरण कसेंहि शुद्ध असो तरी त्याच्यानी देवाला संतुष्ट करवत नाहीं. केवळ पवित्र आत्म्याच्या परम सामर्थ्याच्या द्वारें कोणीएकाच्या अपश्चात्तापी अंतःकरणाला यथाशास्त्र पालट होऊन त्याच्या ठायीं श्रद्धा, प्रेम, नम्रता, इत्यादि देवाला अनुकूल गुण उत्पन्न होत असतात. आपल्या पराक्रमाच्या दिवसीं तो ज्यांस मान्य करून देवाकडे फिरवितो ते मात्र आत्मिक जन्म पावून पवित्रतेच्या शोभेने वर्त्ततात. तर कोणी देवाच्या पवित्र आत्म्याची प्रेरणा तुच्छ मानूं नये.

प्रकरण २.

पुनर्जन्म आणि तद्रूप मनोवृत्ति.

सैतान जो खोटेपणाच्या राज्याचा अधिपति त्याच्या मोहाने खोटेपणाची छाया मनुष्यांच्या आत्म्यांवर पडली आहे. यामुळें देवाची ओळख त्यांस नाहीं. मनुष्यानी शिकविलेल्या ज्ञानाच्या योगाने ती छाया नाहींसी होत नाहीं, ह्मणून त्या योगाने देवाची ओळख होत नाहीं. तारणसंबंधी यथार्थ गोष्टी जरी कोणीएकाच्या मनांत भर-

ल्या आहेत तरी पवित्र आत्म्याने त्याच्या ठायीं प्रेरणा केल्या-वांचून त्या गोष्टी पुनर्जन्म होण्याविषयीं उपयोगी पडणार नाहींत. तर जो कोणी प्रबोधित होऊन देवाकडे फिरतो आणि सत्यतेच्या मार्गानें चालून तारणाची वाट पाहतो, त्याला ईश्वराने आपल्या पवित्र आत्म्याकडून परतून जन्म-वून आपल्या प्रिय पुत्राच्या राज्यांत आणिलें आहे असें समजावें. याकरितां या सर्वोत्कृष्ट कार्याविषयींची प्रशंसा करणें ती सर्व देवाचीच करावी. आणि जो पुनर्जन्म पावलेला मनुष्य आहे, त्याने देवाला तनुमनधन समर्पण करून नित्य त्याची सेवा व गौरव करावें.

या प्रकारें प्रियतम ईलि बाई पुनर्जन्म पावून देवाकडे फिरली. मग तिने आपला प्रभु व तारणारा जो येशू ख्रीस्त त्याला आपलें आत्मनिवेदन करून आयुष्यांत त्याचें स्तवन व सेवा केली. जेव्हां पवित्र आत्म्यानें तिच्या ठायीं देवाचा प्रकाश घालून तिच्या अंतःकरणांतले दुष्ट विचार उघड केले आणि ईश्वराची दया व सहिष्णुता दाखविली, तेव्हां तिच्या मनांत लज्जा व शोक भरला. आपण आपला उत्पन्न कर्त्ता व पोषण रक्षण कर्त्ता याच्या इच्छेस विरुद्ध वागणूक केली, त्याची अनंत प्रीति व उपकार अ-वमानिले, त्याचें अनिर्वाच्य कृपादान अवगणिलें, प्रभु येशू ख्रीस्त ज्याने मज पापिणीसाठीं वधस्तंभावर आपला जीव दिल्हा, त्याचीं अत्यंत दुखें आणि अमूल्य रक्त आणि कठोर मरण अव्हेरिलें, आपल्या उद्धारकाचा तिरस्कार केला, पवित्र आत्म्याची प्रेरणा तुच्छ मानून त्याला खेद दिल्हा, असलीं महापातकें मनांत आणून ती पश्चात्तापी होऊन फार फार रडली. असल्या पापांविषयीं तिने आमरणांत

शोक व रोदन केलें, असें केवळ नाहीं. तर विश्वासाने येशू ख्रीस्ताचा अंगीकार केला आणि तो तिला अतिप्रिय वाटला. तो माझ्या सर्व मानास आणि माझ्या सर्व प्रीतीस आणि माझ्या सर्व सेवेस योग्यच आहे, असें ती ह्मणत असे. पापाच्या योगाने देवाचा व माझा वियोग होऊन मी क्रोधपात्र झाल्यें. पण प्रभु येशू ख्रीस्त माझ्या मरणीं मेला. तर त्याच्या मरणाच्या योगाने देवाचा व माझा संयोग होऊन मी त्याच्या घरीं सर्व काळचें जिवन अनुभविण्याची वाट पाहत आहें. तर मग माझ्या आत्म्याने व देहाने ख्रीस्ताचें जें स्तवन व सेवन होईल, तें सतत होत असावें. असल्या प्रीतिभावानी तिने ख्रीस्ताचे उपकार मानून त्याला आपला जीव व सर्वस्व समर्पण करून दिल्हें. वेळोवेळीं आपल्या आश्चर्यकारक पुनर्जन्माची आठवण करून तिने येशू ख्रीस्ताची सेवा करण्यांत आपणाला उत्तेजन धरून अधिक आयास केला. शेवटल्या व्याधीच्या वेळेस ती त्या हर्षदायक कार्याविषयीं अश्रुपात करून बोलली. ख्रीस्ताच्या योग्यतेविषयीं तिच्या मनोवृत्ति एथे जें स्वरबद्ध गायन लिहिलें आहे त्यावरून प्रसिद्ध होतील.

“हे प्रभू, तुझ्या करितां
अवघें तुच्छ मानितों,
तुझीच आशा धरितां
संपूर्ण जग टाकितों,
तुझी ती प्रीति स्मरूनी
हे प्रभू, तुला देतों प्राण,
ये माझ्या अंतःकरणीं,
मी तुझा दास प्रेमवान.”

प्रिय मेरी बाई पुनर्जन्म पावून देवाचें लेंकरूं झाली. एतदर्थ देवाने आपले नेम तिच्या बुद्धीमध्यें ठेविले आणि तिच्या अंतःकरणांत लिहिले. ती त्या नेमानी आचरण करायास असक्त झाली. आपण काय करून देवाला संतोषवावें असा विचार करून तिने प्रत्यहीं पवित्र शास्त्र वाचिलें आणि त्याचें मनन केलें. आपल्या पवित्र शास्त्राच्या द्वारें परात्पर देव आह्मास बोलून आपली इच्छा कळविती. तर मग सोनें व रूपें यांच्या हजारोपेक्षां त्याच्या तोंडचें शास्त्र आह्मास बरें वाटावें. आणि आह्मी एकचित्ताने त्याचें पठन करून तदनुसार आचाराने वर्त्तावें; असें मनांत आणून ती देवाच्या पवित्र शास्त्राच्या उजेडाने चालूं लागली. पुनर्जन्म झालें तोंपर्यंत जगाची मैत्री जी देवाचें वैर असी आहे तीच तिने केली होती. तर जगांतील गोष्टींवर चित्त ठेवून तिने या जगाचा अधिकारी जो सैतान त्यालाच आपलीं अंगें खोटेपणाचीं शस्त्रें सोपून मरणप्रद फळें मिळविलीं होतीं. पण तिच्या आत्म्याच्या ठायीं पुनर्जन्म झालें तेव्हां जगाची मैत्री तुटली ह्मणून तेव्हांपासून जेथे प्रभु येशू ख्रीस्त आपल्या बापाच्या घरीं खरेपणाच्या राज्यांतल्या प्रजांस एकवटून अनंतकालचें सुख अनुभवायाला देतो तेथच्या गोष्टींवर चित्त ठेवून आपल्या प्रभूला व उद्धारकाला आपलीं अंगें खरेपणाचीं शस्त्रें असीं सोपून द्यावीं आणि जीवनप्रद फळें मिळवावीं, यांत आसक्त होऊन तिने दीर्घप्रयत्न केले.

प्रिय मेरी ईलि बाई इने कसी देवाची इच्छा मानून आपल्या जन्माचें सार्थक केलें हें पुढें सिद्ध होईल. शलमोन नामा ज्या सूज्ञ राजाने बहुत ह्मणी रचून नीति प्रसिद्ध

केली त्याने असें लिहून ठेविलें. "मंधक्रोध पराक्रम्यापेक्षां प्रतापी होय. आणि जो आपला आत्मा स्वाधीन ठेवितो, तो नगर हल्ला करून घेणाऱ्यापेक्षां उत्तम आहे." "मनुष्याचा विवेक त्याच्या क्रोधाला मंद राखितो, आणि अपराधाची क्षमा करणें त्याची शोभा आहे." ही गोष्ट मनांत धरून या प्रेमळ व सहिष्णु अश्या बाईचा परिपाठ पाहा. तिने सर्व मनुष्यजातीवर ममता केली. जरी कोण्याएकाने तिचा अन्याय केला तरी तिच्याने त्याचा द्वेष करवला नाहीं. असल्या अन्यायामुळें तिला रोदन येत असे. पण तिच्याने कोणाची वैरप्रतिक्रिया करवली नाहीं. तिच्या ऐकण्यांत जर कोणी कोणावर वैपरीत्य दाखविणारी गोष्ट सांगून दोषारोप केला, तर तिने त्या दोषारूढ केलेल्या मनुष्यावर प्रीतिरूप आवरण घालून आच्छादिलें. कोण्याएका जनाविरुद्ध सांगितलेली गोष्ट ऐकून तिजला खेद झाला. कितीएक वर्षांत तिच्या ठायीं क्रोधभाव उत्पन्न झाला नाहीं. कोणी तिची अवज्ञा किंवा दुष्टाई केली तरी त्यावरून तिचा शांत आत्मा रोषाविष्ट झाला नाहीं. यापेक्षां तिने अपराधी जनाचें निमित्त पाहून क्षमा केली असावी.

प्रिय मेरी बाईची एक भावजई जी येशू ख्रीस्ताची सेवकीण आहे तिने तिजविषयीं लिहून प्रीतियुक्त असी साक्ष दिल्ही आहे. "साहा वर्षांपर्यंत मेरी नणंदेची आणि माझी वहिवाट फारकरून नित्य झाली आहे. तर इतक्या वर्षांत मजसीं कसा तिचा परिचय बहिणीच्या सारखा संतोषदायक होत चालला. माझें आणि माझ्या कुटुंबांतल्या जनांचें अभीष्ट पाहाणें आणि आमची काकळूत व सहन

करणें असल्या कामांत ही जिवलग नणंद संसक्त होऊन राहिली. अणीक तिचें दुसरें सुलक्षण असें आहे कीं ती क्रोधविरहित आहे. आपल्या मनाचें आकलन करून क्रोधाला आवरण्याविषयीं ज्याला तिच्या पेक्षां अधिक शक्ति मिळाली आहे असा कोणी माझ्या दृष्टीस आला नाहीं, असें मला वाटतें. तिचा जो मूळचा स्वभाव तो निस्संशय फारच संथ आहे. तथापि ती दिवसोदिवसीं आपल्या स्वभावावर विजयी होऊन रोषहीन असती. हें तर केवळ देवाच्या अनुग्रहानें होत असतें. ती वारंवार रोष होण्याविषयींची परीक्षा सोसून माझ्या अढळण्यांत आली आहे. असल्या समयीं मी थरथर भिऊन कांपून ह्मणाल्यें आहें कीं अरेरे आतां मेरी बाई खचीत पाडाव होऊन पडेल." पण असें झालें नाहीं, तर हास्यवचन अथवा क्षणभर मौन झालें ह्मणजे जसें जाणू कोणी चुक्या करून तिच्या मनाला उद्विग्न केलेंच नव्हतें, त्याप्रमाणें यथापूर्व ती शांत दिसली. तिजला चिंता नव्हती ह्मणून रोष झाला नाहीं असें समजूं नये. तर एकांतीं तिनें अश्रुपात करून आपल्या शोकाचें निवेदन केलें. मनुष्यापासीं ज्या गोष्टी सांगावयास तिजला संतोष वाटला नाहीं, त्याच तिनें देवापासीं सांगून ठेविल्या. काकळूत हो प्रिय मेरी बाईच्या ठायीं सखोल आहे. निश्चयें तिनें इतर लोकांचीं सुखदुःखें आपलींच मानून घेतलीं आहेत."

प्रियतम मेरी ईलि बाई वात्सल्य, सौम्यता व संतोष या गुणांच्या द्वारें विशेषेंकरून विख्यात झाली. पण ते गुण सर्वात्मना तिच्या ठायीं स्वाभाविक असून वृद्धिंगत झाले होते, असें समजूं नये. तर या बाईनें सावध होऊन

अत्यंत आयासांच्या द्वारें त्यांची वृद्धि केली. ती पुनःपुन्हा बोलली कीं "म्या समर्थ होऊन आपला आत्मा आवांक्यांत ठेवावा या कार्याला काय काय प्रार्थना व कष्ट करून साधनें लाविलीं आहेत, हें मला सांगतां येत नाहीं." आपला प्रभु व राजा याची ज्योति ज्यावर पडून प्रतिबिंबित होईल, असला मणि आपला आत्मा करून राखावा, आणि अंतकाळीं तो आपल्या उद्धारकाच्या मुगुटांत खचित केला जाण्याजोगा व्हावा, याची उत्कंठा धरून तिने तदनुसार आचरण केलें. ती ह्मणाली कीं "सूर्य जो प्रेम त्याच्या किरणाने मला जगावें लागतें. नाहीं तर माझ्याने जगवत नाहीं. आपण प्रीति करणें आणि प्रीतीचा विषय होणें या दोन गोष्टी आवश्य आपणाला करावयाच्या आहेत. जसें जीवनप्रद दहिंवर सुवासिक फुलांवर पडून उष्णतेने शोषित होतें, आणि त्या योगाने फुलांची कांति अधिक होऊन फांकती, तसा माझा आत्मा उत्तरोत्तर अधिक नम्रतेने शृंगारित आणि जी प्रीति प्रातःकाळींच्या दहिंवरासारिखी जीवनदायक आहे ती प्राप्त करून घेण्यास अधिक सिद्ध होत असावा, याविषयीं मला उत्कंठा होत आहे. तर हृदय हें त्याच्या वृत्तीसुद्धां क्षीण होत नाहीं, आणि प्रीति ही नित्य नूतन आहे, या दोन अर्थांवरून मजला परितोष होत असतो.

प्रिय मेरी ईलि बाई पवित्र आत्म्याच्या करण्याने परतून जन्मून खरेपणाच्या राज्यांत प्रजेपण पावल्यावर एक विशेष गोष्टीची उकंठा तिच्या मनांत उत्पन्न होऊन भरली. ती असी कीं आपण परदेशीं जाऊन साकार पदार्थांचें भजनपूजन करणाऱ्या मनुष्यांस निराकर व जीवंत देवाची भजनपद्धति आणि तारणप्रदर्शक असें ख्रीस्ताचें शुभ-

वर्त्तमान कळवावें आणि असल्या खऱ्या गोष्टींविषयीं त्यांची खातरी करावी. ख्रीस्ताची योग्यता सर्व जगांतल्या मनुष्यांस कळावी, आणि त्यांनीं त्याचा अंगीकार करून पापाच्या अशुद्धपणापासून व त्याच्या दंडापासून तारण पावावें, ही इच्छा जे कोणी येशू ख्रीस्तावर विश्वास ठेवून प्रीति करितात त्या सर्वांच्या अंतःकरणांत उत्पन्न होऊन राहती. तर जेथे कोट्यानकोटि मनुष्य खोटेपणाच्या अंधारांत असून प्रत्यहीं पापाचा अघोर दंड सोसण्यास पात्र होत असतात, आणि जे त्यांस निभाव होण्याचा विहित उपाय सांगत असतात ते पुष्कळ नाहींत, तेथच्या लोकांस त्या उपायाचें घोषण करायाला जावें, हें विशेषेंकरून यथोचित आहे. पण असला अर्थ सिद्धीस नेण्याला फार अवघड आहे. कां तर आपला स्वदेश सोडणें, आपले गोत्रबंधु इत्यादि स्नेही जनांचा त्याग करून समुद्रयान करणें, परदेशीं प्रवास करून परभाषा व परजनव्यवहार शिकणें, आणि लोकांच्या धर्माचाराविरुद्ध बोलून त्यांचे अपयश करणें, असल्या गोष्टींत गमत नाहीं. तथापि जर कोणी ख्रीस्ताचे सैनिक स्वार्थ सोडून अंधारांत बसलेल्या मनुष्यांस जीवनाचा मार्ग दाखविणार नाहींत तर खरेपणाचें राज्य त्यांतील कोणीएकावरहि चालणार नाहीं. पण ज्यांच्या अंतःकरणांत ख्रीस्ताची प्रीति भरली आहे ते त्याची आज्ञा मानून आपली मनीषा, स्वास्थ्य, आप्तलोकांचा सहवास, इत्यादि स्वहितें नाकारितील, आणि आपल्या प्रभूचें राज्य स्थापित करायाला आपले प्राण वाहतील.

प्रिय मेरी ईलि बाई इचा एक वडील भाऊ परदेशीं

जाऊन ख्रीस्ताचें राज्य स्थापित करण्यांत आपलें आयुष्य घालवावें, असा निश्चय करून विद्या शिकला होता. तर त्याच्या संगतीं जाऊन आपल्या मनाच्या तृष्णा तृप्त कराव्या, असा मनोरथ तिने आपल्या चित्तांत केला. मग देवाचें तें भारी काम संपादण्याकरितां ती ज्ञानाभ्यास करून आपणाला सिद्ध करूं लागली. शुद्धाक्षरन्यास, व्याकरण, गुणनभजन, बीजगणित, भूगोलविद्या, क्षेत्रत्वविद्या, प्राचीन अर्वाचीन इतिहास, तर्कविद्या, नीतिविद्या, उद्भिज्जविद्या, इत्यादि ज्या विद्यांचा अभ्यास इतर तरूण बायका त्या समयीं करीत असत, त्यांत ती प्रवीण झाली. नंतर तिने या गोष्टीची आस्था केली कीं देवाची गोष्ट सांगणें आणि विद्या शिकविणें यांच्या द्वारें अज्ञानी आणि कुधर्मसंप्रदाय अनुसरणारे अस्या मनुष्यांस खऱ्या देवाकडे वळवून खरेपणाचा मार्ग क्रमिण्यास लावावें, यासाठीं ज्ञानोपदेश करण्यांत आपणाला कांहीं विशेष परिचय प्राप्त केला पाहिजे, तर एथचीं मुलें व तरूण बायका ज्यांस तारणाचा बोध ऐकण्याचा प्रसंग नेहेमी येत असतो, त्यांस शिकवून सद्धर्माच्या मार्गाने चालविण्याचीं आणि देवाकडे फिरविण्याचीं यथोचित साधनें करावीं. यांत जर मी निपुण झालें तर परदेशांतले लोक ज्यांस खऱ्या देवाचें ज्ञान नाहीं, त्यांतील कोणोएकांस शिकवून मी कदाचित देवाच्या कृपेने उपयोगी पडेन.

याप्रमाणें सारासारविचार करून प्रिय ईलि बाई आपल्या मातापितरांचें घर सोडून दोन तीनशें कोस स्वदेशाच्या दुसऱ्या प्रांतांत गेली. तेथे ज्यांची ओळख तिला नव्हती त्या लोकांमध्यें तिने आपल्या अंगत्वें तरूण स्त्रियां-

ची पाठशाला स्थापून शिकविली. सुमारें साडेतीन वर्षांपर्यंत ती त्या उद्योगांत आसक्त होऊन राहिली. तिने आपल्या शिकणाऱ्यांस शिक्षण करून जो जो सत्यभाव पाळायाला आणि जो जो धर्मव्यवहार करायाला सांगितला, त्याचीं उदाहरणें आपलाच स्वभाव आणि आपलेंच आचरण यांच्या योगेंकरून प्रसिद्ध व्हावीं, ह्मणून ती फार जपून चालली. सदाचरण आणि सुभक्ति यांच्या मार्गाने त्यांस चालवावें, याकरितां विश्वास, प्रीति, लीनता, सत्यवचन, माधुर्य, सौजन्य, तृप्ति, स्थैर्य, निष्ठा, प्रार्थना, असल्या गोष्टींविषयीं ती स्वतां त्या तरूणींचा कित्ता होऊन वर्त्तली. आपली इच्छा एकीकडे ठेवून आपला स्वार्थ सोडावा आणि इतर जनांचीं शोकदुःखें आत्मसात् करून त्यांचें हितक्षेम करावें, याचा ह्या सुहृदय बाईला अत्यंत सोस असे.

ज्या स्त्रीपुरूषानी आपल्या कन्या प्रिय ईलि बाईच्या स्वाधीन ज्ञानाभ्यास करविण्यासाठीं ठेविल्या होत्या, त्यांतील एका स्नेहयुक्त बाईने तिजला हें स्तुतिपत्र लिहून दिल्हें. "प्रियोत्तम ईलि बाईने जी माझी काकळूत व परिचर्या केली आहे त्या आभारापासून मी कदापि उत्तीर्ण होणार नाहीं. तिने माझ्या जिवलग कन्यांला विद्या शिकवून जी मनाची प्रौढी केली तितकी पूर्वीं कोणत्याहि शिक्षकाकडून त्यांस मिळाली नाहीं. माझा जिवलग भर्त्ता जो मृत्यु पावला त्याच्या अंतकाळीं तिने माझ्या शोकाने उद्विग्न होऊन माझें सांत्वन केलें. तर असला शोक पुन्हा फारच वेळापर्यंत तिच्या आर्त्तसाधु हृदयाला लागूं नये. या सर्व अर्थांविषयीं मी तिची कृतज्ञता आणि आभारस्तुति करित्यें."

या मडम साहेबाच्या दुःखावस्थेविषयीं प्रिय ईलि बाईने

आपल्या दिनवृत्तपत्रांत असें लिहिलें. "उद्यांच्या दिवसाविषयीं जल्पूं नको. आपण या जगीं ज्या ज्याचें धोरण बांधून ठेवितों तें तें कसें निश्चित असतें. ईश्वराची योजना करणारी असी दृष्टि अवघ्या कार्यांवर असत आहे, हें कोणी कदापि विसरूं नये. आरोग्याने टवटवीत आणि आशेने उत्सुक झालेले असे जरी आपण सकाळीं उठलों, तरी सायंकाळाची सावली पृथ्वीवर पडली नाहीं, इतक्यांत व्याधीने व पीडेने आपण कदाचित् अंथरूणावर लोळत असतों. हे देवा, मी ज्या कुटुंबाच्या जनांमध्यें राहत आहें त्यांजवर दया कर. आपला सेवक जो घरधनी त्याचें आपल्या दयेप्रमाणें कर. तुझी इच्छा असेल तर त्याला निरोगी करून वांचीव, आणि फिरून त्याला हितकारक सार्थकास लाव. ज्याच्या योगाने ह्या कुटुंबांतील जनांचें अभीष्ट होईल तेंच त्यांस नेमून ठेव." "परात्पर देवाचा पर्याय हा विचित्र आहे. तथापि त्याचें नाव स्तुत्य असो. जरी त्याच्या सभोंवतीं ढग व निबिडता आहे तरी पवित्रता व न्याय त्याच्या सिंहासनाचा आधार आहे. हे देवा, त्वां या स्नेहाळू कुटुंबास भारी शिक्षा केली आहे. तर या शिक्षेच्या योगाने पुढें पुण्याचें शांतिकारक फळ त्याला प्राप्त व्हावें असें कर. एक स्त्री आशेने आपल्या आईबापांचें घर सोडून भ्रताराच्या गृहीं गेली होती. आतां ती विधवा होऊन आपलीं जनकहीन लेंकरें घेऊन आपल्या पितृगृहीं शोकाने परत आली आहे. ही गोष्ट बंधुजनांस केवढी खेदयुक्त वाटली असावी? म्या देवाची प्रार्थना करून पवित्र आत्माचें साह्य यासाठीं मागितलें कीं मरणाच्या योगाने ज्या कोणांस भार्या भर्त्ता किंवा इतर बंधुवर्ग यांचा

वियोग झाला आहे, त्यांचें सांत्वन करण्यासाठीं ज्या स्वादुभाकी पवित्र शास्त्रांत लिहिल्या आहेत, त्यांचा प्रयोग यथास्थित करून म्या ह्या शोकातुर कुटुंबांतल्या मनुष्यांस शांत करावें."

"ज्या मनोहर व दयावंत अस्या मित्रांच्या बरोबर मी एक सुखदायक संवत्सर क्रमिण्याची आशा धरीत होत्यें त्यांचा त्याग म्या आज केला आहे. अहा त्यांतील एकाचा त्याग तर म्या आज केला असें नाहीं. कां तर जो या कुटुंबाचा विख्यात धनी होता त्याचा देह कितीएक सप्तकें या अंधारमय व संकोचित अस्या प्रेतकुंडांत राहिला आहे, आणि त्याचा आत्मा जो देवाने उत्पन्न करून त्याला दिल्हा होता तो परात्पर देवापासीं गेला आहे. तर मी या प्रकारें आपणाला आश्वासून निघाल्यें कीं माझा आकाशांतील बाप हा माझ्या विधवाभूत सखीस पाठिंबा आणि तिच्या पितृहीन लेंकरांस बाप असा होईल. अणीक तो यथापूर्व परकीय जनांस माझे पुरस्कर्त्ते व स्नेह करणारे असें करून ठेवील.

प्रिय ईलि बाईने जी शाला स्थापना करून शिकविली तिजविषयीं सन १८३९ यांत तिने असें लिहिलें. "म्या संसार एकीकडे ठेवून आजचा दिवस या अर्थीं क्रमिला कीं जें जें देवाचें विस्मरण मजकडून झालें त्या सर्वांवरून म्या त्याच्या पुढें आपणाला नम्र करावें आणि त्याची प्रार्थना करून ही विशेष विनंती करावी कीं या शालेचें शिक्षण व वहिवाट करण्यासंबंधी त्याने मला यथायोग्य ज्ञान द्यावें त्याने ही शाला आपंगण्याविषयीं आपल्या लक्षांत ठेवावी. त्या योगाने पुष्कळ शिकणाऱ्या मुली सुशिक्षित होऊन जगाचें अभीष्टहित करितील असें करावें. हे पवित्र बापा, तुझ्या

साह्यावांचून माझ्याने कांहींच करवत नाहीं. तुझ्या पवित्र आत्म्याची प्रेरणा जी जीवनदायक आहे ती मला प्राप्त होत नाहीं, तर केवळ कीड असी मी कसा या शाळेवर अधिकार करून अमर आत्म्यांकडून ज्ञानाभ्यास करवीन?

"नऊ महिन्यानीं मी आजच्या दिवशीं फिरून शाळेचीं कर्मैं करूं लागल्यें आहें. ह्या कर्मांच्या योगेंकरून माझ्या आत्म्याचें अखंड श्रेय होत असावें, आणि माझ्या शिकणाऱ्या मुलींनी पुनर्जन्म पावून देवाचें गौरव करावें, असी माझी फार इच्छा आहे. म्या वस्तुतः नम्र होऊन केवळ देवाचा आश्रय करावा, हें तर यथोचित आहे. ख्रीस्ताने मला सामर्थ्य दिल्हें असतां मी अवघ्या गोष्टी करावयास समर्थ आहें. सदासर्वदा त्याच्या नांवाला गौरव असो." आज शाळा शिकविण्याची प्रथम मुदत संपली आहे. मी आपल्या विद्या शिकणाऱ्यांच्या आत्मिक क्षेमांत आसक्त होऊन त्याचा अत्यंत साक्षेप नित्य करीन, असा निश्चय म्या या मुदतीच्या आरंभीं केला. पण त्याप्रमाणें मजकडून झालें नाहीं. हे माझ्या आकाशांतील बापा, माझ्या शिकणाऱ्यांच्या आत्म्यांच्या तारणाविषयीं जी अवज्ञा म्या केली आहे, तिची क्षमा तूं आपल्या प्रिय पुत्राप्रीत्यर्थ कर, आणि प्रसन्न होऊन आपल्या जीवनाच्या पुस्तकांत त्या सर्वांचीं नावें लिहून ठेव. तुझें गौरव आणि तुझ्या राज्यांतील हितसंपादक अर्थ यांचें वर्धन करण्यांत म्या या पुढल्या मासाचा अवकाश क्रमावा यासाठीं तूं आपल्या अयोग्य सेवकिणीला यथास्थित ज्ञान दे.

सन १८३६ यांत प्रियतम मेरी इलि बाईने आपल्या दिनवृत्तपत्रांत असें लिहिलें. "देवाचा आशीर्वाद असल्यास

ज्यांचीं मनें वृत्तिविरहित कदापि होणार नाहींत, असल्या तरूणींस विद्या शिकविण्याची पदवी मी उद्यां फिरून घेणार आहें. ही तर वजनाची पदवी होय. या कामास कोण योग्य आहे, असें ह्मटलें तर उचित आहे. पण ख्रीस्तानें मला सामर्थ्य दिल्ह्यावरून मी सर्व गोष्टी करावयास समर्थ आहें, आणि त्याची कृपा मला पुरे आहे, या दोन गोष्टींचें विस्मरण म्या कधींहि करूं नये. त्यांची आठवण नित्य माझ्या मनांत होत असावी. हे प्रिय येशू, ज्या तरूण शिकणाऱ्या माझ्या आपंगण्यांत असतात त्यांच्या शुद्ध वर्त्तणुकीवरून आणि लोकांतरींच्या लेखप्रमाणावरून असें सिद्ध होऊं दे कीं मी आपल्याच सामर्थ्यानें या कामावर गेलें नाहीं आणि म्या व्यर्थ कष्ट केले नाहींत." "म्या जीं कर्मे अधींच हातीं धरून आरंभिलीं आहेत तीं करायास मला प्रभूनें यथायोग्य ज्ञान देऊन साह्य करावें. माझ्या शाळेंतील सर्व शिकणाऱ्यानी राजवाड्याच्या घडलेल्या कोपऱ्यांसारिखें व्हावें. येशू ख्रीस्त जो वधस्तंभावर मरण पावला त्याजविषयींचें जें ज्ञान तें सर्व इतर ज्ञानाहून उत्तम आहे, असें गणून त्यानी शिकावें. असें मी इच्छितें.

सन १८३७. आजच्या दिवसीं म्या आपली शाला सोडून दिल्ही, इतक्यांत सर्व विद्याभ्यास करणाऱ्या शोकानें उच्छ्वास टाकून रडल्या. ईश्वरानें आपला आशीर्वाद त्यांस द्यावा आणि एथे आपल्या मंडळींत त्यांस मिळवून शृंगार असें करावें. मग शेवटीं पापापासून खंडणी करणारा जो प्रभू येशू ख्रीस्त त्याच्या उजवेकडे वैभवयुक्त आसन पावण्यासाठीं त्यानें त्यांस सिद्ध करून ठेवावें. ही माझी प्रार्थना आहे.

जेथे या दयाळु स्त्रीने शाला स्थापून शिक्षण केलें त्या नगरांत पुष्कळ सिद्दी लोक राहात होते. ही प्रिय बाई त्यांतील कोणीएकांस आदितवारीं एकवट करून शास्त्राचें पठन व ध्यान करायाला शिकवीत असे. याविषयीं तिने लिहून ठेविलें आहे. "देवसंबंधी आणि मनुष्यसंबंधी जीं कर्में कर्त्तव्य आहेत तींच करण्याविषयीं मी शाब्बाथ दिवसीं ज्या विवेकहीन व कीर्त्तिहीन अस्या मनुष्यांस शिकवून प्रबोध करण्याला आयास करीत असतें, त्यांस आणि एथचे सगळे हपशी लोक जे अधर्म कामांत निमग्न होऊन राहिले आहेत, त्यासर्वांसहि तारण प्राप्त व्हावें, यासाठीं मी परतते वेळेस आणि सायंकाळीं देवाची प्रार्थना करीत असतां फारच प्राशस्त्य माझ्या अंतःकरणांतील भावनांस झालें." "मी आदितवारींच्या शाळेंत ज्या अभाविक मनुष्यांस ज्ञान शिकवीत असतें त्यांतील एक पोरगा आज अकस्मात मेला, असा वृत्तांत कोणी परतते वेळीं सांगितला. या गोष्टीवरून मला सूचना असी असावी कीं जीं अंधारमय स्त्रीपुरूषें या शाळेंत शिकत असतात त्यांच्या हितास्तव जें जें मला करायाचें आहे तें तें त्वरेने केलें पाहिजे. शाला सोडून घरीं जाण्याच्या वाटेवर जेथे खोपटांत त्या पोराचा निर्जीव देह पडला होता तेथें मी अमळसीं खोळंबलें. तेथें जे नष्टबुद्धि व कुत्सित मनुष्य मिळाले होते आणि जे जे ओंगळ पदार्थ पडलेले दिसत होते त्या सर्वांच्या योगेंकरून मी प्रबोधित होऊन मनांत ह्मणालें कीं कशास्तव मजवर उपकारांची एवढी पराकाष्ठा झाली आहे, ईश्वर जो दाता त्याचा आभार मानून स्तुति करावी हेंच केवळ उचित आहे.

प्रकरण ३.

मातापितरें इत्यादि आप्तजनांविषयींचे स्नेहभाव.

जसा ज्यांचा संबंध तसें त्यांचें आचरण असावें. हा न्याय यथोचित आहे. तर त्याप्रमाणें जे कोणी पवित्र आत्म्याच्या प्रेरण्याने पुनर्जन्म पावून देवाचीं लेंकरें होत असतात, त्यांस परात्पर देवाचा संबंध होतो. एतदर्थ त्यांचें आचरण दुसऱ्या सर्व जनांच्याहून श्रेष्ठ होत असावें. हें जन्म झाल्यापूर्वीं त्यांचें आचरण कसेंहि चांगलें असो तरी त्या जन्माच्या योगानें ते अधिक चांगल्या प्रकारें आचरितात. पुनर्जन्म पावल्याने ते सर्वोत्कृष्ट देवासीं संबंध पावून तदनुरूप आचरण करूं लागतात. ते भार्याभर्त्ता किंवा मातापितरें किंवा पुत्रीपुत्र किंवा कोणत्याहि संबंधाचे असोत तरी त्या संबंधाला अनुसरणारीं जीं जीं कर्मे त्यांस करावयाचीं आहेत तीं तीं ते विशेष श्रद्धेने व स्नेहाने करून देवाचें गौरव आणि एकमेकांचें सनातन जीवन पाहात असतात. पुनर्जन्माच्या द्वारें खरेपणाच्या राज्यांत गेले असतां ते एकमेकांच्या ठायीं खोटेपण संहारण्यांत आणि खरेपण स्थापण्यांत आसक्त होऊन अत्यंत साक्षेप करीत असतात. देव जो त्यांचा बाप आणि प्रभु येशू ख्रिस्त जो त्यांचा वडील भाऊ असा आहे, त्यांवरची प्रीति त्यांच्या अंतःकरणांत भरती. यामुळें ते भार्याभर्त्ता असून आपआपला इच्छाविनाश करितात, आणि परस्परें एकमेकांचें तारण पाहतात. ते मातापितरें असतात तर ते आपल्या लेंकरांचें पालन पोषण करायास झटतात, असें

केवळ नाहीं, तर आपल्या लेंकरांच्या द्वारें खरेपणाचें राज्य चालावें, यांत फार आस्थेवाईक होऊन ते यथाशास्त्र साधनें करितात, आणि त्यांच्या ठायीं पुनर्जन्म होण्याची वाट पाहतात. पुत्रीपुत्र जे पुनर्जन्म पावून देवाकडे होतात ते स्वार्थ भावाने वर्त्तून आपलेंच हित पाहतात, असें अगदीं नाहीं. तर ते स्नेहभावाने वर्त्तून आपापला स्वार्थ नाकारितात, आणि देवाची इच्छा मानून आईबापांचें समाधान व एकमेकांचें सुख वृद्धिंगत करायास झटतात.

सन १८३१यांत प्रिय मेरि ईलि बाई पवित्र आत्म्याच्या करण्याने पुनर्जन्म पावून देवाचें लेंकरूं झाली होती. तिजला हें जन्म प्राप्त झाल्यापूर्वीं आपल्या बंधुजनांसीं तिची वहिवाट सदोदित प्रीतीने व सद्भावाने होती. त्यांच्या शोकाने तिला शोक झाला. त्यांच्या हर्षाने तिला हर्ष झाला. पण केवळ या जगीं त्यांचें कल्याण व्हावें, याची तिला उत्कंठा होती. त्यांचें मरण होणार आहे असें तिच्या मनांत येई, तेव्हां तिची शांति नाहींसी होऊन तिला फार खेद वाटत असे. तिच्या ठायीं तें पुनर्जन्म झाल्यावर आपल्या आप्तजनांच्या पापांची क्षमा होऊन देवाच्या घरीं त्यांस अनंतकालचें जीवन प्राप्त व्हावें, याची तिला आसक्ति झाली. या गोष्टीविषयीं पंचवीस वर्षांपर्यंत ती प्रत्यहीं देवाची प्रार्थना इत्यादि तारणसाधनें करीत असे. ख्रीस्ताच्या प्रीतीने तिजवर धनीपण केलें ह्मणूनच ती त्या रीतीनें वर्त्तली.

आपला स्वदेश सोडून अंधकारमय देशांत प्रवास करावा, आणि देवाच्या सन्मार्गांत न जाणारे असे जे मूर्त्ति-पूजक त्यांमध्यें आमच्या तारणाचें शुभवर्तमान गाजवावें, असा निश्चय करून प्रिय ईलि बाई ज्या प्रियतम भावासंगतीं

जाण्याची वाट पाहत होती, तो सन १८३४ यांत मृत्यु पावला. त्या वर्षाच्या शेवटल्या दिवसीं या प्रियंकर बाईनें मागें पुढें पाहून आपल्या दिनवृत्तपत्रांत असें लिहिलें. जें वर्ष आतां सरतच आहे त्याच्या आरंभीं आमचें कुटुंब एक अभग्न मंडळी असें होतें. त्या समयीं आह्मी सर्व फारकरून निरोगी होतों. इतक्यांत आह्मांतील एकाचा वियेग होईल असा संभवहि कोणाच्या मनांत झाला नव्हता. पण एक जणानें आपलें पृथ्वीवरचें कर्म संपविलें आहे. त्याचा आत्मा देवलोकीं जाण्यास पक्क झाला होता, आणि त्याच्या बापानें आपल्याजवळ त्याला घेतलें आहे. तथापि त्यानें शांतवन करणारें आश्वासन आम्हास दिल्हें आहे, असें कीं धन्य उद्धारकानें आपल्या विश्वासू अनुसरणाऱ्यांसाठीं जीं सुखयुक्त वासस्थानें सिद्ध केलीं आहेत, त्यांतील कोणत्या एकांत हा प्रिय भाऊ वस्ती करणारा आहे. तो देवाचा सेवक मोशे याचें गायन आणि कोंकऱ्याचें गायन गाऊं लागला आहे. तेथें तो देवपणांतील सहज सिद्ध वैभवें न्यहाळून पाहात आहे. पाप, रोग, दुःख व संकट यांपासून मुक्त असतां तो पवित्र नगर जें नवें यरूशालेम त्याच्या मार्गांत चालत आहे. जसी पापाची जी खंडणी तिच्या यशस्कर अनुसंधानावरून आश्चर्यकारक कार्यें प्रगट होत आणि परात्पर देवाचे गुण ओळखण्यांत येत असतात, तस्या परितोष करणाऱ्या अस्या नवीन गोष्टी निरंतर त्याच्या आढळण्यांत येत आहेत.

अहाहा हृदय फोडण्यासारिखी ही कल्पना मनांत स्फुरती असी कीं मी अणीक पृथ्वीवर त्यांला पाहाणार नाहीं. माझा भाऊ जो मृत्यु पावला त्याचा आज हा वाढदिवस

आहे, असें जेव्हां मनांत येतें तेव्हां जे मनोधर्म उठतात ते साधारण नाहींत. अगोदर असल्या भावना उत्पन्न झाल्या नव्हत्या. त्याच्या आयुष्यरूप दिवसाच्या सकाळीं त्याच्या सत्संगतीस आम्ही अंतरलों आहों. अजून त्याचा सूर्य मध्यान्हीं आला नाहीं. फारच अंतर आहे. असें असतां त्याला देवाज्ञा झाली. यावरून डोळ्यांस अनावर आसवें येतात. पण हें त्याला कळत नाहीं. तो ऐकत नाहीं. त्याचें शरीर शवस्थलांत निद्रित झालें आहे. तो पुन्हा माझ्या दृष्टीस पडणार नाहीं. आमच्या गृहजनांवर दिव्य उपकार होण्याविषयीं तो देवाची विनवणी करीत असतां त्याची मधुर वाणी अणीक माझ्या कानांत पडणार नाहीं. खरेपणाची पूर्त्ति होई तोंपर्यंत म्या उत्तरोत्तर अधिक अधिक पवित्रतेच्या प्राप्ति संपादून घ्याव्या, या संबंधी त्याच्या क्रियाने आणि बोलाने मला अणखी उत्तेजन मिळणार नाहीं. प्रपंचाच्या अर्थाविषयीं जो पर्याय बहुत प्रकारांनी हितावह ठरेल तोच तो पुन्हा आपल्या सुजाण बुद्धीने सुचवून स्पष्ट करणार नाहीं. मी ख्रीस्ताच्या द्राक्षमळ्यांत कष्ट करून उपयोगाने वर्त्तावें यासाठीं काय काय ग्रंथांचें पठन आणि काय काय विद्याभ्यास करावा लागेल हें तो मला पुन्हा सांगणार नाहीं. हे माझ्या पवित्र केलेल्या भावा, वस्तुतः तूं आपल्या जगण्यांत आह्माला प्रियंकर होतास, आणि तूं माझ्यापासून वियुक्त झालास तेव्हां देवाने पृथ्वींतलीं जीं दानें मला दिल्हीं होतीं, त्यांतील जें सर्वोत्कृष्ट व प्रियोत्तम त्याच्या हानीमुळें जसा जाणू मी शोक पावलें त्याप्रमाणें माझ्याने शोक करितांना राहवत नाहीं. तथापि माझ्या आकाशांतील बापाने या भावाचें मरण

नेमून ठेविलें होतें. तर मग त्याची इच्छा होवो, असें मी ह्मणेन कीं नाहीं. या दुःखाच्या गोष्टीमुळें जो शोक मी करितें तो सावधिक करावा. होय, उपकारस्तुतीसुद्धां शोक करावा. कारण कीं येशू जो ख्रिस्ती मनुष्यांच्या आशेचा मुख्य विषय आहे, तो शवस्थानांतल्या हिमभवनांतून पार गेला आहे. ह्या प्रकारें त्यांतलीं अंधकारयुक्त दारें अनादिसिद्ध वैभवाच्या प्रभेनें सुप्रभ झालीं आहेत. अणखी ख्रीस्ताच्या दिसण्यांत त्याच्या पवित्रांचें मरण मोलाचें आहे. पुन्हा उठण्याच्या दिवसाच्या सकाळीं तो त्यांचीं मातीस मिळालेलीं शरीरें सजीव करून उठवील, तोंपर्यंत त्यांस तो जतन करून ठेवील. तेव्हां ती धूळ तेजस्वी शरीररूपानें उठून दिव्य वासस्थानीं वसण्याजोगी होईल.

या भावाविषयीं या प्रीतिमान बहिणीनें दुसऱ्या वेळेस असें लिहिलें. पूर्वीच्या शोकाच्या गोष्टी आज देवाच्या भजनस्थानीं मनांत स्फुरद्रूप झाल्या ह्मणजे डोळ्यांतून अश्रुधारा येतात. तथापि म्या देवाचा आभार मानिला. कारण, त्यानें मला आश्वासन दिल्हें आहे कीं माझ्या प्रिय भावाचा खंडणी पावलेला आत्मा वरल्या भजनस्थानीं पोहंचला आहे. तेथें कांहीं अव्यवस्था झाल्यावांचून अनंतकाल आनंदाच्या व न कोमजणाऱ्या वैभवाच्या भुवनांत राहून तो अविच्छिन्न भक्ति करील, आणि अखंडित उत्साहानें सवन चढवून स्तुति करील. तर त्याचा आत्मा केवढा धन्य आहे! त्यानें माघारें या पापयुक्त जगांत येऊन राहावें, असी इच्छा माझ्यानें करवत नाहीं. पण जेव्हां त्याचा गुणोत्कर्ष ध्यानांत येतो, आणि जेव्हां त्याच्या

सर्व कुटुंबास किती अनिवार हानि प्राप्त झाली आहे, हें मनांत येतें, त्या समयीं माझ्या रुदनाचें निवारण होत नाहीं. पण माझें मन ईश्वरावर खिजतें, असें मला वाटत नाहीं. ईश्वराने आह्मापासून या भावाला घेऊन आपल्या-जवळ नेलें आहे. अर्णीक जिच्या द्वारें तो सर्व प्रकारानी आमच्या इच्छेस अनुकूल झाला होता, आणि जिच्या योगेंकरून त्याला एवढें वात्सल्य आलें, आणि त्याने आपल्या जगण्याने पाप्यांच्या उद्धारकाला विभव देऊन स्तविलें, आणि आपल्या मरण्याने विजय करून घेतला, ती तर देवाची कृपा होय. त्याप्रमाणें, हे पवित्र बापा, माझीं मातापितरें आणि बहीणभावंडें या सर्वांनी तुझ्या अयोग्य सेवकिणीसुद्धां आपआपल्या जगण्याकडून तुझी सेवा व मान करावा, आपआपल्या मरणाकडून तुझें स्तवन करावें, आणि खंडणी पावलेले जे कोट्यावधि मनुष्य त्यांच्या मेळ्यांत मिळून अनंतकाळच्या युगांत प्रेम-युक्त खंडणीचें गायन करावें, यासाठीं तूं आह्मा सर्वांस सिद्ध कर.

सन १८३६. अरेरे जीवा, दम धर. अंतःकरणा, शांत ऐस. ज्याने ही गोष्ट केली तो देवच होय. त्याने आमच्या कुलाचें आत्मिक हित पाहून ती केली आहे. तरी तिचा प्रत्यय फारच अवघड आहे. अणखी एक प्रिय भाऊ मृत्यु पावला आहे. आणि तोहि ज्येष्ठ होता. काल दोन वर्षें मी दुसऱ्या भावाच्या प्रेतस्थलीं उभी राहिलें असतां माझ्या हृदयाला शोकाचें हिंव आलें होतें. मी आधार व्हावा ह्मणून ज्याच्या हातावर ओठंगलें, तो माझा भाऊ आतां वारला आहे. हे माझ्या पूर्वजांच्या देवा, ह्या

अघटित व कठीण दुःखावस्थेंत तूं माझ्या अत्यंत प्रीतिमान मातेला आणि माझ्या फारच वत्सल पित्याला आधार हो. ह्या दुःखाच्या योगेंकरून तूं बहीणभावंडें अस्या आम्हा सर्वांस पवित्र कर. आणि तुझ्या नावाला स्तवन होवो.

म्या सगळी रात्र शोकाने तळमळत घालविली. सकाळीं अमळसी झोंप लागल्यावरून माझ्या मनाला कांहींसी शांति होत आहे. हायहाय! मला केवढा खेद व्हावयाचा आहे. जसा दावीद राजा विलाप करून बोलला त्याप्रमाणें बोलण्याचा प्रसंग मला आला आहे. असें कीं अरेरे भावा एड्विन, अरेरे माझ्या जिवलग भावा, मी तुजबदल मरण पावलें असतें तर बरें झालें असतें. त्याच्या मरणासंबंधी ज्या गोष्टी त्या विशेषेंकरून दुःखाच्या आहेत. तो आपल्या आईबापांच्या घरापासून दूर होता, आणि परकीय लोकांमध्यें राहत होता. त्याच्या गरजा पाहून पुरवाव्या; त्या आसन्न मरणाच्या डोक्याखालची उशी सारखी सोईची करून ठेवावी, आणि आत्म्यांचा वैद्य जो ख्रीस्त त्याकडे त्याचें मन लावून द्यावें, हें करण्यास तेथें त्याच्या प्रीतिमान बंधुजनांतील कोणीएक नव्हता. तो केव्हां व कसा मेला याविषयीं तेथल्या लोकांनीं कांहींच लिहून कळविलें नाहीं. विश्वासाने आपला आत्मा आपल्या उद्धारकाच्या व देवाच्या हातांत सोपून देऊन तो मृत्यु पावला, एवढें जर मला कळलें असतें तर वियोगाचें कडुपण नाहींसें झालें असतें. पण ईश्वर जो सर्व गोष्टी यथार्थ नेमून करीत असतो त्यापासून हें दुःख झालें आहे. त्याने त्याविषयीं सर्व कार्यें योजिलीं आहेत. ह्मणून मी त्याच्या दयेवर व चांगलेपणावर भरवसा ठेवित्यें. "त्याच्या सभों-

वतीं ढग व निबिडता आहे. पवित्रता व न्याय त्याच्या सिंहासनाचा आधार आहे." म्या आज आपल्या दुःखातुर आईबापांस आणि बहीणभावंडांस पत्र पाठवून शांतवन करून पाहिलें आहे.

आज जबूलुन नामा जो माझा प्रिय भाऊ त्याचा वाढदिवस आहे. त्याने आपल्या दुसऱ्या भावांसुद्धां प्रभु येशू ख्रीस्ताची संतोषप्रद सेवा करायास आपणाला समर्पावें, आणि जें अवघड दुःख आमच्या कुटुंबाला नुक्तें झालें आहे तें ईश्वराच्या आशीर्वादाने त्याला अनंतकाळचें हितकारक व्हावें, याविषयीं माझें अंतःकरण तृष्णेने देवाकडे फार ओढिलें आहे." "आज माझा प्रिय भाऊ जबूलुन पितृगृह सोडून परकीय लोकांमध्यें प्रवास करणार आहे. तर हे ईश्वरा देवा, तूं त्याला बाप होऊन त्याविषयीं जागरूक अस. भयापासून त्याला राख. परीक्षेच्या वेळेस त्याला पापापासून निवारून संभाळ. समस्त संकटांतून त्याला वाट दाखवून ने. आपल्या कृपेने या जगीं त्याला ज्वलित दिवा असें करून सुप्रभ ठेव. आणि तुझ्याच सुप्रसंगीं त्याच्या अंतःकरणांत तुजवरची प्रीति व कृतज्ञता भरली असतां त्याने माघारें पितृगृहीं यावें असें कर. हे माझ्या बापा आणि माझ्या देवा, तूं आपल्या अनंत कृपेने असें होऊं दे कीं माझ्या घरांतील प्रियंकर माणसें कसींहि इकडे तिकडे जाऊन राहिलीं तरी त्या आम्हीं सर्वांनी तुझ्या घरीं मिळावें, आणि बाप, पुत्र व पवित्र आत्मा असे जे आम्हा बंडखोरांस तारण्यांत आसक्त झाले आहेत, त्यांचें स्तवन आम्हीं सर्वांनी करावें.

सन १८४९. माझ्या प्रियतम मातेच्या डोक्याची व डोळ्यांची आग होऊं लागल्यावरून ती फार दुःखभागी झाली आहे. देवाने तिची या दुःखापासून सोडवणूक करावी, आणि विशेषेंकरून या दुःखाच्या योगाने ती पवित्र होऊन त्याच्या घरीं वस्ती करण्यास तयार होत असावी; असें म्या वारंवार प्रार्थना करून मागितलें आहे. इहलोकीं तिला फार स्वास्थ्य व्हायाचें नाहीं. तर देवाजवळ तिची शांति नदीसारिखी व्हावी." "आमच्या कुटुंबांतलीं प्रिय माणसें जीं चीकागो नगरांत राहतात त्या सर्वांच्या भोंवतीं परमेश्वराच्या दुताने वस्ती करून सर्व अरिष्टापासून त्यांचें रक्षण करावें. तेथे जरीमरी उठली आहे, ही आवई जर खरी आहे तर तिचा जो झपाटा काळोखांत होतो आणि तिजकडून जो घात दुपारीं होतो त्यापासून त्यांस सोडवण व्हावी." "एथे जे माझे दोन प्रिय भाऊ आहेत त्यांसाठीं ईश्वराने माझ्या विनंत्या ऐकाव्या, याविषयीं मला उत्कंठा एवढी झाली आहे कीं म्या फारकरून शनिवारची रात्र प्रार्थना करण्यांत घालविली. म्या प्रार्थना करून मागितलें कीं येशू त्यांचा वडील भाऊ होत असतां त्याची प्रीति त्या दोघांमध्यें एकीचें वळकट बंधन असी व्हावी, आणि त्या योगाने त्यांला सर्व पदार्थांमध्यें ख्रीस्त उत्कृष्ट वाटावा, आणि त्यांनी एकमेकांवर फारच प्रीति करावी.

हे ईश्वरा, तूं आपल्यावरच्या आणि एकमेकांवरच्या प्रीतीने माझ्या भावांचीं अंतःकरणें भरीव. हे प्रिय इम्मानूवेला, विशेषेंकरून हें होऊं दे कीं एथें जे भाऊ संगतीने राहतात त्यांनी प्रत्यहीं एकमेकांसीं आपआपल्या सर्व

चालीनी व उद्योगानें तुझा प्रीतिरूप स्वभाव दाखवून वर्त्तावें, असी तुजपासीं माझी अनुदिन प्रार्थना आहे, हें तुला कळतें. हे देवा, मी तुझें स्तवन करितें यासाठीं कीं बहीणभावंडांचा सहजसिद्ध स्नेहभाव हें आह्मा कुटुंबांतल्या मनुष्यांस बंधन आहे. तर आह्मी सर्व तुझ्या वासस्थानीं मिळून राहूं तोंपर्यंत तें बंधन आमच्या कुटुंबांत बळकट होत असावें, आणि विशेषेंकरून मी हें मागतें कीं येशू जो तारणाचा महान अधिकारी, आणि जो आमचा वडील भाऊ, त्याच्या धाकट्या बहीणभावंडांस जसें शोभतें त्याप्रमाणें आह्मी सर्वांनी एकमेकांवर प्रीति करून वर्त्तावें. हे पवित्र बापा, तुझ्या कृपेनें आह्मी एकमेकांचे हात सदृढ आणि एकमेकांचीं हृदयें आश्वासित करावीं. आह्मांतील कोणी जर बहकून जातील तर वरकडानी मर्यादेनें व माधुर्यानें त्यांला बोल लावून माघारें सुमार्गावर आणावें. हे प्रिय व धन्य नियामका व उद्धारका, घट्ट व संथ असला जो एकमेकांचा स्नेह आह्माला असावा ह्मणून तूं इच्छितोस तसाच व्हावा. मग जरी आह्मी मरणानें एकमेकांपासून वियुक्त होणार आहों तरी सर्व पुन्हा तुझ्या सिंहासनासभोंवतीं संयुक्त होऊं. आह्मा सर्वांला असें अंतःकरण असावें कीं आह्मी आपल्या वयोवृद्ध मातापितरांसाठीं देवाची पुष्कळ प्रार्थना करून मागावें कीं त्यानें आयुष्याच्या उतरणीवरून त्यांस नेऊन सुदामत उतरावें. त्यानें त्यांचीं अंतःकरणें शुद्ध करून राखावीं, आणि जसें त्यांचें ऐंद्रियक सुख न्यून होत आहे त्याप्रमाणें त्याच्या उजव्या हातीं जीं सुखें सर्वकाळ आहेत तीं त्यानें त्यांच्या आत्म्यांच्या दृष्टीस उघड करून दाखवावीं.

माणूस एकला असणें हें बरें नाहीं, असें बोलून अपार ज्ञानी देवानें त्यासाठीं योग्य साह्य करणारी उत्पन्न करून दिल्ही. हे परात्पर देवा, मी ज्यावर फार ममता करित्यें असला भाऊ त्वां मला दिल्हा आहे. तर तो सडा आहे. आणि तुला कळतें कीं माझ्या मनाची तृष्णा म्या बहुवार प्रार्थना करून सांगितली आहे. ती असी कीं जी प्रभु येशू ख्रीस्ताची प्रियतम व भाविक शिष्यीण आहे, असली कोणीएक सखी यथायोग्य प्रसंगीं त्वां त्या माझ्या भावाला द्यावी. मग त्याच्या पुढच्या व वरच्या वाटेविषयीं ती त्याचें साहाय्य करील. हे प्रभू, तुझें ओढणें व नेणें यांवांचून तो यथायोग्य स्त्रीला वरणार नाहीं. तर तूं त्याच्या मनाला ओढून जिचें मोल माणकांपेक्षां थोर आहे असली सद्गुणी स्त्री नेऊन त्याला दे." "हे आकशांतील बापा, माझें विशेष प्रयोजन कोठें लागतें अथवा सर्वोत्तम प्रकारें माझें जन्मसार्थक कोठें होईल, हें मला कळत नाहीं. तर तूं माझीं पावलें निटाव. म्या आपलेंच सुख पाहून चालावें असें नाहीं. तर आपलें कर्त्तव्यकर्म कोठें नेतें याचा विचार करून चालावें. जेव्हां माझ्या वृद्ध मातापितरांस माझा कळवळा, संगति, किंवा साहाय्य पाहिजे आहे, त्या समयीं म्या त्यांपासून एक घटिकाहि दूर नसावें.

सन १८५३. हाय हाय, मजवर जी प्रीति होती ती कसी प्रेतस्थळांत आच्छादित झाली आहे! अहा, असें मी ह्मणणार नाहीं. कां तर माझ्या प्रियतम मातेच्या ठायीं प्रीति करणारा असा जो तिचा आत्मा तो प्रेतस्थळांत नव्हे. अहो, नाहीं! तो वरतीं चढून सर्व काळ जगेल आणि प्रीति करील, असी माझी खातरी आहे. आठा दिवसांमागें माझ्या

हृदयावर शोकाच्या लहरी येऊं लागल्या. आतांपासून मला कोणी आई नाहीं, असली कुवार्त्ता ज्या समयीं तारा-यंत्राच्या द्वारें मला कळली, तेव्हां म्यां शोक केला. तिच्या व्याधीच्या पलंगाजवळ जागरण करून तिची पीडा शांत करायास झटावें, तिच्या कपाळावरून थंडघाम पुसावा, आणि मरणकाळीं ज्यांच्या अवलोकनाने प्रीति दिसती ते तिचे डोळे मिटावे, हें करायास मी एथे नव्हतें, यामुळें मी मोठ्याने रडलें. पण देव सर्व गोष्टी यथायोग्य करीत असतो. म्या उगेंच चुळमुळूं नये. माझी आई मरते वेळेस तिच्या जवळ असण्याची मला फारच इच्छा होती, असें देवाला ठाऊक होतें. तें जर त्याच्या इच्छेस अनुकूळ असतें तर त्याने मला एथून जाऊं दिल्हें नसतें. हे ईश्वरा, मी तुला विनवितें कीं मजसंबंधी ज्या दुःखाच्या गोष्टी त्वां घडूं दिल्ह्या आहेत, त्यांविषयीं म्या योग्य विचार करून आणि यथो-चित भावना वाळगून आचरावें, ह्मणून तूं माझें साह्य कर. या दुःखाच्या द्वारें मला पवित्र कर. म्या आपल्या मनांत असें आणावें कीं तूं खचीत माझा बाप आहेस. मी तर केवळ धूल आहें. मी कालची कीड आहें, आणि कांहीं जाणत नाहीं, तरी तूं मजवर दया करितोस.

आज माझा प्रिय भाऊ हनोख याचें लग्न झालें आहे. कृपेच्या आसनासमोर देवापासीं विनंती करण्यांत म्या कांहीं वेळ क्रमावा यासाठीं म्या आपल्या गृहकृत्यांची व्यवस्था करून कांहींसा अवकाश मिळविला. तेव्हां म्या मागि-तलें कीं देवाच्या पवित्र आत्म्याने ह्या जिवलग दंपत्यांवर उतरून राहावें. एथे पृथ्वीवर जें लग्न झालें आहे तें देव-लोकीं स्थापित व्हावें. येशू जो गालीलांतील काना या

गार्वी लग्नास गेला त्याने या लग्नास येऊन आदरावें, आणि जसी त्याची समक्षता इस्राएल लोकांच्या संगतीं चालली, त्याप्रमाणें हे दोघे आयुष्य संपून विश्रांति घेण्याच्या स्थानीं पोहंचतील तोंपर्यंत ती यांच्या संगतीं चालावी. प्रिय भाऊ हनोख याच्या लग्नास जाण्याविषयीं माझ्या प्रीतिपात्र आईने पुष्कळ संतोषयुक्त योजना केल्या होत्या. पण तें सुख अनुभविण्यास ती इहलोकीं नव्हती. आणि पित्याला तिजवांचून त्याच्या लग्नास जाणें बरें वाटलें नाहीं. ह्मणून तो घरीं राहिला. यास्तव त्याच्या बरोबर मी घरीं राहिलें आहें.

लग्न हा संस्कार केवढा क्षेमकारक आहे! ज्याच्या ठायीं अनंत ज्ञान व औदार्य आहे त्याची सनद या संस्काराला आहे कीं नाहीं! त्याच्या योगाने ज्या सांसर्गिक भावना उत्पन्न होऊन वाढतात त्या कस्या मनोहर असतात! या संस्काराच्या द्वारें स्त्रीपुरुषांची चालचर्या कसी सौम्य व शिष्ट होत असती! आणि ज्यांचे मनोभाव दारुण असतात ते वारंवार कसे वश्य होतात! या संस्काराच्या योगेंकरून काय काय सुखाचीं घरें आणि स्नेहाने कस्या कस्या कुटुंबाच्या एकया झाल्या आहेत! तर हा संस्कार सद्धर्माचा केवढा पाठिंगा आहे!

या सणाचा शेवटला दिवस आला आहे. तर आजच्या दिवसीं पुष्कळ गंभीर भावना माझ्या मनांत उठल्या आहेत. माझी आई नसल्यामुळें म्या शोक केला आहे. मागल्या वर्षीं या समयीं ती एथे होती. आपली सौम्य प्रीति आणि मनोरम संगती यांच्या योगाने ती मला संतोषवीत असे. पण आतां आमच्या घरीं एक प्रसन्नवदन

परोक्ष आहे. कुटुंबाच्या भजनस्थानीं एक आदराचें आसन रिकामें आहे. पंक्तिव्यवहारीं एक मुख्य जागा मोकळी आहे. एथून एक जें आस्थायुक्त हृदय गेलें त्याला हिमानें आलिंगिलें आहे. जेव्हां आमच्या कुटुंबांतील लोक एकत्र मिळतात तेव्हां अस्या भावना त्यांच्या मनांत उठत असतात, आणि त्यांच्या योगेंकरून आह्मांतील सर्व मंडळीवर वचकेचा व गांभीर्याचा आभास होत असतो. मागल्या मंगळवारीं आमच्या कुटुंबांतल्या मंडळीची जी स्नेहमय सांखळी तिची एक कडी तुटून गेली आहे, असें माझ्या मनांत आलें, त्या वेळेस माझा प्रिय भाऊ जो दावीद त्याची लहान कारोलैन नामक कन्या इचा बाप्तिस्मा हा संस्कार करावा, आणि मग सांसर्गिक सुखाचा अनुभव घ्यावा, यासाठीं माझा आदरणीय पिता व त्याचीं सर्व लेंकरें आणि फारकरून सर्व नातवंडें त्या भावाच्या घरीं मिळालीं होतीं. तेव्हां माझा प्रियतम बाप फारच उदास दिसला. तें पाहून मला खेद वाटला. त्याखेरीज दुसरें काय वाटलें असावें? कां तर तेथें माझी प्रियतम आई त्याच्या संगतीं नव्हती. पण आह्मी तिची आठवण केली. ती आमच्या प्रीतीस प्रत्यक्ष होती, आणि देवाच्या घरीं तिजसीं आमचा सहवास फिरून होणार आहे, असें आह्मांतील कितिएकांनीं आपल्या ध्यानांत आणिलें. प्रभूसंबंधी शिक्षा व बोध ह्यांकडून ह्या मुलीचा प्रतिपाळ करण्याविषयीं म्या इतर जनांसुद्धां उभी राहून, मी तिच्या आईबापांचा प्रतिनिधि होईन, असें वचन दिल्हें आहे. तर या लहान प्रीतिपात्राविषयीं जें जें करणें भाग आहे तें तें म्या करावेंच. इहलोकीं तिने जगाचें कल्याण करण्यांत उत्सुक

होऊन उपयोगी पडावें, आणि परलोकीं अनंत गौरव पावून अनुभवावें, यासाठीं तिला यथाशास्त्र वळण लागावें.

सन १८५४. आज बाप्तिस्मा या संस्काराच्या योगें माझा लाडका लहान भाचा एद्वाड स्तैलस् नामा याला त्याच्या मातापितरांनीं देवाला समर्पिलें. तर जें बाहेरील प्रक्षालन उदकाने होतें तें अंतरींचें जें शुद्धपण व पुनर्जन्म पवित्र आत्म्याच्या प्रेरण्याने होतें त्याचें चिन्ह व्हावें. त्याच्या बाल्यापासून तो कृपेचा बाळ असावा. कदापि त्याच्या कुटिल हृदयाची खोड त्याला न लागावी. जसजसा तो प्रौढ होत जाईल तसतसा तो देवसेवापरायण होत जावा.

अणखी एका शाब्बाथ दिवसाचा प्रकाश मजवर पडला, तेव्हां मी देवाच्या भजनस्थानीं जाण्याची तयारी करीत होतें, तों माझा भाऊ हनोख येऊन ही खेदकारक वार्त्ता बोलला कीं आमच्या कळपांतील एक लहानगी कोंकरी वारली आहे. कसी शोकाच्या आकाराने ती वार्त्ता माझ्या कानांवर पडली! केवळ साडेतीन महिन्यांपर्यंत आमची छावडी कार्री पृथ्वीवर विकासित होऊन राहिली, आणि आतां ती देवाच्या पुष्पवाटिकेंत लावली जाऊन अक्षय परिमळ विस्तारित करीत आहे. तेथे सर्वकाळपर्यंत ती उत्तरोत्तर अधिक सुंदर व तेजस्वी होत जाईल. माझ्या भावाभावजईची सौंदर्याची कलिका एकाएकीं त्यांपासून गेली. यावरून मला खेद झाला. पण माझी ही आशा आहे कीं ज्याने आपल्या उरावर तिला घेतलें आहे, असा महान मेंढपाळ त्यांस कोंवळ्या कुरणांत बसवील, आणि त्यांस निवांत पाण्यांवर नेईल, आणि या दुःखाच्या द्वारें तो आपल्याकडे अधिक ओढीने त्यांचीं हृदयें ओढून घेईल. त्यांची लाडकी

कन्या जी विश्रांति व शोभा अनुभवीत आहे त्यांचा लाभ घेण्यांत त्यानीं आसक्त होऊन अत्यंत साक्षेप करावा.

आमची लहानगी लाडकी एवढी सौंदर्याची राशि दिसली कीं तिला प्रेतस्थलांत नेऊन ठेवणार आहेत, असें मनांत आल्यावरून मला फार दुःख वाटलें. तिचें एवढें सुंदर शरीर आहे तोंपर्यंत तें ठेवून तिचें मधुर व भाबडें तोंड पाहावें, आणि अस्यांचें देवाचें राज्य आहे, असा विचार करावा, हें चांगलें दिसलें. तिचें शरीर एवढ्या सुरेखाईने आणि अस्या विस्मयकारक प्रकारें घडलें आहे, आणि तिचें वदन असें अकृत्रिमाचें प्रतिरूप आहे कीं तें शरीर-सौख्याच्या भुवनीं तिच्या परिशुद्ध आत्म्याला वसन होण्यास सर्व प्रकारें अनुचित आहे, असें दिसलें नाहीं. पण मृत-जनांच्या उठण्याच्या प्रातःकाळीं तिचा आत्मा या शरीरा-पेक्षां जें फारच तेजस्वी व शाश्वत अस्या शरीरांत वास करील. आजच्या सकाळीं उत्तरक्रिया कसी गांभीर्याची होती! जेथे कांहीं सप्तकांमागें बाप्तिस्मा या संस्काराकडून देवाला ही बालकन्या समर्पून द्यावी, यासाठीं तिचीं माता-पितरें इतर आप्तजनांसुद्धां मिळालीं होतीं, तेथच्या खोलींत त्याच मनुष्यानी आज एकत्र जमून तिची उत्तरक्रिया केली आहे. ही गोष्ट तर शोकाची आहे. महान मेंढपाळ एवढ्या त्वरेने आपल्या दिव्य कळपांत ही लहानगी कोंकरी बोला-वून घेईल, असें त्यांस वाटलें नसेल. प्रिय बाला, तूं स्वस्थ आहेस. कदापि पाप किंवा दुःख किंवा शोक तुला लाग-णार नाहीं. आमच्या लहानग्या कोंकरीच्या मागें पुरण्याच्या ठिकाणीं जाणें आणि तिच्या प्रेतावर माती टाकून "माती मातींत, रक्षा रक्षेंत, धूलि धूलींत," असें ह्मणणें यांत केवढें

गांभीर्य असतें. सर्व समर्थ देवानें ह्या मृतापत्य व दुःखित झालेल्या आईचें शांतवन करून तिला आधार द्यावा.

शाब्बाथ दिवसापासून आमची दुसरी प्रिय लहानगी कारर्‍ी व्याधित झाली होती. आह्मी तिला जपून चांगला संभाळ केला. ती जगून आपल्या आईबापांस आणि जगासहि आशीर्वादरूप होईल, असी आह्माला आशा होती. पण आज सूर्य उगवतांच तिचा आत्मा प्रातःकाळच्या किरणांवर आरोहण करणार आहे असें दिसलें. मग जसा जाणू आपण सौख्याच्या भुवनाकडे जात असतां आपल्याला संतोषविण्याचा आह्मास प्रसंग द्यावा, त्याप्रमाणें तो अमळसा खोळंबला. या प्रीतिपात्राला एवढें माधुर्य होतें कीं ती पृथ्वींतली नव्हे, असी सूचना अवश्य झाली. तीन महिने लोटले नव्हते तेव्हां ती लाडकी आपल्या आईच्या गाढ आलिंगनांतून घेतली जाऊन आपल्या उद्धारकाच्या दृढ आलिंगनांत ठेविली गेली. सौंदर्याच्या सुवासित कलिकेसारखी ती वसंतकालीं उगवली. पण ती एथचा थंड वारा सोसून राहिना. ती रडली. ती हंसली. तिच्या दृष्टीनें आम्ही हर्षित झालों. मग ती गभावून देवाच्या घरीं गेली. माझी भावजई आपल्या गोड व कनिष्ट कन्येची आठवण करून रडत आहे. ती प्रियतम कसी होती आणि ती जगून कसी झाली असती याचा विचार करून ती अश्रुपात करीत असती. पण यानंतर तिचा आशारूप तारा तिच्या मार्गावर प्रकाशेल, आणि आपली सौम्य मुलगी जिला आपण आपल्या हृदयावर फारच स्नेहानें आलिंगिलें, ती आतां अनंत सुख भोगीत आहे. असें ती लक्ष्यांत घेईल, आणि

मग ती आपलीं आसवें शोषून टाकील आणि फिरून मंद हास्य करील.

माझ्याने कसें लिहवतें? मी काय गोष्ट सांगूं! आम्हासीं देवाची वहिवाट अतिशय विस्मयकारक आहे. दाहा दिवसां-मागें आमच्या घरांतलीं मनुष्यें सर्व निरोगी होतीं, आणि हर्षयुक्त आशेने या जगीं सौभाग्य पावण्याची वाट पाहात होतीं. पण मरण हा भयंकर दूत एथे आला होता. त्याने आम्हांतील दोन प्रियजनांचीं तोंडें पालटून त्यांस पाठवून दिल्हें आहे. प्रियतम भावजई हेत्ती व्याधित आहे, असें म्या शुक्रवारीं ऐकिलें. लागलेंच मी तिच्या घरीं गेलें. तेव्हां ती पटकीने मरणास टेंकली आहे, असें समजून मी धकावलें. तिला जगविण्याकरितां दोन वैद्यानी अत्यंत आयास केले होते. माझा प्रिय भाऊ हनोख ग्लान व चिंतातुर होऊन लोभाने तिजवर लवून राहिला. देहाच्या व्यथेमुळें आणि ऊर्ध्व झाल्यामुळें ती केवळ आपल्या गरजाविषयीं मात्र बोलूं शकत होती. नंतर मी प्रियंकर तारणाऱ्याविषयीं तिला कांहीं बोललें. ती ह्मणाली, "त्याचीं सर्व वचनें निश्चित आहेत. मी त्याचा आश्रय करितें." मग म्या तिला तेविसावें गीत सांगितलें. तिने लक्ष देऊन ऐकिलें. सुमारें मध्यान कालीं वैद्याने सांगितलें कीं ती लवकर थकत जात आहे. ती जगेल असी कांहीं आशा राहिली नाहीं. म्या फारच सौम्य रीतीने ही शोकाची वार्त्ता माझ्या प्रिय भावाला सुचविली. तो डचकून उठून अतिशय खेदयुक्त शब्दाने बोलला कीं "ती मरेल हें असंभाव्य आहे. पूर्वीं ती फारच रोगी झाली होती पण बरी झाली." मग ज्या स्नेहाच्या रीतीने त्याने

तिजवर लवून तिचें चुंबन व लालन केलें ती पाहून पाषाणहि पाझरला असता. जसी ती अधिक मरण्यासारिखी दिसली तसा तो अधिक खिन्न झाला. पृथ्वींतला प्रकाश तिच्या दृष्टीपासून अधिक अंधक होत चालला असतां आणि प्रीतियुक्त शब्द तिच्या ऐकण्यांत आले नसतां तिचा भर्त्ता म्हणत असे कीं जीवप्राणा, प्रीतिपात्रा, माझ्याशीं बोल, अणीक एकदां मला तुझी मधुर वाणी ऐकूं दे." तिसरा प्रहर झाला तेव्हां तिचीं सर्व दुःखें संपलीं. दिव्य दूतानी तिचा वलावा करून तिला सौख्याच्या भुवनीं सुखरूप पोंचविलें, असी आमची खातरी आहे. ती भावजई फार प्रिय होती. ती जरी दाहा महिने आमच्या कुटुंबांत राहिली नव्हती तरी तिने आपणावर आम्हा सर्वांस फारच स्नेहाळू केलें होतें. संतुष्ट, सहिष्णु, आपला स्वार्थ नाकारणारी, असी ती होती. ती सदोदित आपल्याच्यापेक्षां आपल्या इष्टमित्रांचें समाधान व क्षेम चिंतीत असे. तिचें हृदय तिच्या भर्त्त्याच्या ठायीं बद्ध होतें आणि त्याने मनापासून तिजवर भरवसा ठेविला. एकमेकांच्या संगतीने त्या परस्परांचा संतोष फारच होत होता. असल्या भावजईपासून वियुक्त होणें हें मला फार अवघड वाटलें. परंत्यापेक्षां माझ्या भावाचा अत्यंत खेद पाहाणें आणि हा खेद आयुष्यभर राहील हें मनांत आणणें फारच अवघड वाटलें. मग शयनावर निजून आणि आपलें डोकें माझ्या उरावर ठेवून तो उद्धारकाच्या प्रीतिमत्वाविषयीं आणि आपल्या भार्येच्या वात्सल्याविषयीं बोलता झाला.

आज सकाळीं प्रिय भावजई हेत्ती स्मशानीं नेली तेव्हां तिचा खिन्न झालेला भर्त्ता हा एवढा व्याधित झालेला हो-

ता कीं त्याने तिजविषयीं कांहींच विचारिलें नाहीं. सुमारें मध्यानकाळीं तो मृत्यूच्या वेगेंत सांपडून धडपडण्यासारिखा दिसला. तेव्हां विरहाच्या सर्व व्यथा मला झाल्या. तेव्हांपासून त्याचा श्वासोच्छ्वास बंद झाला, असें मला दिसलें. त्याच्या गळ्यांत कांहींसी वायुगति होती. उरांत कांहीं उडणें होतें. पण डोळे स्तब्ध होऊन राहिले. हें मरण आहे असें वैद्य बोलले. माझ्या मनांत आलें कीं आतांसें ऊर्ध्वलोकींचें वैभव त्याच्या दिसण्यांत येत आहे. मग गर्जना आणि पाऊस झाल्यावर त्याचा तोंडवळा फिरला. नंतर वैद्याच्या उपचाराने तो सावध होऊन संतोषाने व विस्मयाने आह्माकडे पाहूं लागला. तो बोलला कीं, "तुह्मी सर्व मला फार प्रसन्न दिसतां. मला कसी चांगली झोंप लागली. तेणेंकरून मी फार विश्रांत झालों आहें." आमचा भाऊ जागृत झाला आहे, तो कबरेच्या उघड्या तोंडापासून माघारें आह्मास दिल्हा आहे, असें ध्यानांत आणून आह्मी हर्ष पावलों. तो निश्चयें जगण्याच्या आचारें चालून आह्मास संतोषविणार आहे, असें समजून म्या मनोभावाने देवाची उपकारस्तुति केली. तथापि हे पवित्र बापा, तुझे मार्ग आमच्या मार्गांसारिखे नाहींत. आमचा तो हर्ष अल्पकालचा होता. त्याच रात्रीं तो भाऊ फार फार रोगी झाला. त्याला अत्यंत दुःख झालें. तो मृत्यु पावून निघाला असता तर हीं एवढीं दुःखें सोसण्यापेक्षां चांगलें झालें असतें, असें फारकरून मला वाटण्यासारिखें झालें. पण त्याचा जीव राहिला तोंपर्यंत दिवसोदिवसीं तो तारणारा जो प्रभु येशू ख्रीस्त त्याच्या विश्वासूपणाविषयीं साक्ष देत असे. आपण पुण्यवान् ठरण्या-

विषयीं त्याच्या पुण्यावर आणि आपण सर्व पापांपासून शुद्ध होण्याविषयीं त्याच्या रक्तावर त्याचा पूर्ण भरवसा होता. देवाच्या घरांतल्या वासस्थानाविषयींच्या ज्या गौरवयुक्त समजुती त्याच्या मनांत झाल्या होत्या आणि अनंतकाल धन्य उद्धारकाजवळ असण्यावरून जो परितोष आपल्याला मिळणार आहे त्यांसंबंधी गोष्टी तो आह्मासीं बोलला. अहो मी कसा अपात्र आहें! मी कसा अपात्र आहें! असें त्याने पुन्हा ह्मटलें. "देवाच्या घरांतल्या सुखाविषयीं मला शोभायुक्त, शोभायुक्त भावना होत आहेत. भाषेने त्याचें वर्णन होणार नाहीं. आकाशाखालीं सर्व वंश व राष्ट्रं यांतून मनुष्यांचे समुदाय तेथे एकत्र मिळत आहेत, असें दिसतें. तेथे वरिष्ठ आणि कनिष्ठ, धनवान आणि दरिद्री, सर्व मिळत आहेत. पण ते एवढ्या विनयाच्या रीतीने येतात कीं ते सर्व खुजे दिसतात, आणि ते प्रत्येक आपआपल्यासाठीं नीच आसनें घ्यावयास पाहतात. म्याहि तसें केलें तरी राजे आणि उपाध्ये यांचा मला अढळ झाला."

आह्मी मंदगतीने व गंभीरपणाने श्मशानीं गेलों आणि तेथे माझ्या प्रिय भावाचें निर्जीव शरीर सोडिलें. तेथे तें अनंतकाळ राहणार नाहीं. कां तर येशू ख्रीस्त हा पुन्हा उठणें आणि जीवन असा आहे. आमच्या प्रीतिपात्राने मरणावर जय करावा यासाठीं ख्रीस्ताने त्याला विश्वास दिल्हा. ज्या प्रेतासाठीं आह्मी अश्रुपात करून रडलों, त्याला तो यथायोग्य कालीं उठवून आपल्याच्या सारिखें तेजस्वी शरीर असें करील. अहो ज्या उद्धारकाने प्रेतस्थलावर एवढी प्रभा घातली आहे, आणि स्वतां मेलेल्यांमधून उठण्याने त्या स्थलाचीं अंधकारयुक्त दारें सुप्रभ

केलीं आहेत, त्याचे आह्मा आप्तजनविरहित झालेल्या माणसांस किती आभारी व्हावें लागतें. माझी जी हानि झाली तिच्या शोकापेक्षां मला आपल्या बापाच्या हानीवरून फार अधिक शोक झाला."

एथे ह्या प्रियंकर बाईच्या दिनवृत्तपत्रांतील ज्या गोष्टी लिहिल्या आहेत, त्यांवरून एक दोन सूचना करितों. जे मनुष्य पवित्र आत्म्याच्या योगाने पुनर्जन्म पावून देवाचीं लेंकरें होतात, त्यांचा जो वियोग मरणाने होतो तो फार अल्पकालिक आहे. तो केवळ रात्रीच्या झोंपेसारिखा आहे. ती झोंप होऊन सकाळ झाला तेव्हां जे पुढें जाऊन देवाच्या घरीं पोहंचले आहेत, आणि जे मागून पोहंचतील, त्या उभयांची भेट होऊन ते अत्यंत संतोष पावतील. तर जे आधीं आपल्या बापाच्या घरीं पोहंचून अनंतकाळचें जीवन अनुभवीत आहेत, ते मृत आहेत, असें कसें ह्मणाल? असें ह्मणूं नये. तर ते केवळ पुढें गेले आहेत, असें ह्मणणें यथोचित आहे. याकरितां त्यांविषयीं शोक करण्याचें प्रयोजन नाहीं. त्यापेक्षां उत्साह करावा. कां तर ते तरले आहेत. त्यांच्या सर्व तृष्णा तृप्त झाल्या आहेत. पण जे मागून जातात त्यांस त्यांचा अमळसा वियोग झाल्यामुळें सावधिक शोक करण्यांत दोष नाहीं. फुटलेल्या हृदयांतून रक्त अवश्य निघेल. लागलेल्या डोळ्याला अश्रु येईल. जे जे आपल्या बहीणभावंडांच्या सुखदायक संगतीस अंतरले आहेत, त्यांच्या ठायीं विरहानल पेटून जळेल, यांत काय संशय आहे? कांहींच नाहीं.

देवाच्या लेंकरांच्या ठायीं जी बंधुजनेषणा सहज सिद्ध आहे ती त्यांस संयुक्त करणारी असी सांखळी आहे. ती

केवळ प्रीतीकरून संपन्न आहे. तिची प्रथम कडी देवाच्या हृदयांत आहे. ती तर कधीं तुटणार नाहीं. ह्या सांखळीने जे एका कुटुंबांतील मनुष्य संबद्ध आहेत त्यांतल्या कोणीएकाच्या मरणाच्या योगेंकरून ती सांखळी सदृढ होऊन फारच ओढीने त्या जनांला धरिती. एथे कोणी स्त्री आहे. तिचा भ्रतार आणि लेंकरें देवाच्या सौख्यवासस्थानीं जाऊन राहत आहेत. तर ती कशी आशायुक्त दृष्टि तिकडे लावून हर्षाने तेथे जाण्याच्या मार्गावर चालती. एथे कोणी पुरुष आहे. त्याची भार्या मातापितरें इत्यादि उत्तम बंधुजन पुढें देवाच्या घरीं जाऊन त्याची सेवा करीत आणि त्याचें सुख भोगीत आहेत. तर आपल्या दिव्य बापाच्या घरीं जाऊन त्या प्रिय बंधूंची भेट घ्यावी आणि त्यांबरोबर वस्ती करून देवाचें स्तवन व गौरव करावें, यांत त्याची फार आसक्ति असती.

देवाच्या घरीं आह्मास एकमेकांची भेट होऊन अनंत सत्संगति मिळणार आहे, असी आशा ज्या कुटुंबांतल्या जनांस आहे, ते केवढे धन्य आहेत पाहा. त्यांनी आपआपल्या मनांत विचार करून ह्मणावें कीं आह्मी जी प्रीति एकमेकांवर करून देवाला संतोषवीत आणि एकमेकांचें कल्याण घडवीत असतों, ती कधीं सरणार नाहीं. ती देवलोकीं आमच्या हृदयांत स्फुरद्रूप होऊन अनंतकाळ वाढेल. ज्या शुद्ध संगतीच्या योगाने आह्मास अत्यंत सुख प्राप्त होत असतें, तिची समाप्ति कदापि होणार नाहीं. जरी मरणाने तिचा अमळसा वियोग होणार आहे तरी ती पुन्हा परलोकीं आह्मास मिळेल. तर तें सुख संपणार नाहीं. आह्मी एकमेकांचें समाधान पाहून जीं करुणायुक्त कृत्यें,

मधुर शब्द बोलणें, सौम्य स्वभाव दाखविणें, इत्यादि यथाशास्त्र आचार करितों, त्याची पूर्ण प्राप्ती इहलोकीं आह्मास होती, असें नाहीं. तर त्याची स्फूर्त्ति परलोकीं आमच्या ठायीं होऊन सदासर्वकाळची इष्टप्राप्ति होईल. तर आह्मी नित्यांत एकमेकांवर प्रीति करून तेच आचार करण्यांत तत्पर व्हावें, हें उचित होय.

प्रकरण ४.

खरेपणाचीं युद्धें करण्यासंबंधी स्वानुभवाच्या गोष्टी.

हृदय आपला खेद जाणतें आणि त्याचा हर्ष परके जाणत नाहींत. असें ह्मण शलमोन राजा बोलला. तें तर उघड आहे. कारण कीं प्रत्येक जनाला जो खेद अथवा हर्ष आहे, त्याची माहीत केवळ स्वानुभवाने होती. ह्मणून ज्याचा जो खेद व हर्ष त्यालाच त्याची माहीत होय. पण जर कोणी आपल्या सुखदुःखांचा स्वानुभव सांगितला तर त्याचा अर्थ श्रवण करणाऱ्यांस अगदीं कळत नाहीं, असें ह्मणणें असंभावित आहे. कां तर जगांतील गोष्टींचा अनुभव जो कोणाला येतो तोच फारकरून एकसारिख्या प्रसंगीं सर्व मनुष्यांस येईल. कारण ज्याला जसा प्रसंग त्याला तसा स्वानुभव हा न्याय यथार्थ आहे.

प्रभु येशू ख्रीस्त जो खरेपणाच्या राज्याचा अधिकारी त्यावर विश्वास ठेवण्याने जो पुनर्जन्म पावून खरा ख्रीस्ती झाला आहे, त्याच्या ठायीं नवा व शुद्ध स्वभाव आहे. त्या योगाने तो सर्व गोष्टींसंबंधी पालट पावून नवा माणूस झाला

आहे. यास्तव त्या सर्व गोष्टींचा जो स्वानुभव त्याला येत असतो तो नवा होय. तो केवळ ख्रीस्ती जनांस माहीत आहे. कां तर ते मात्र त्याच्या प्रसंगीं असतात. तो जर आपल्या स्वानुभवाचें निरूपण करील आणि इतर मनुष्य त्याचें पठन करितील तर त्याची माहीत त्यांस होणार नाहीं. कारण कीं त्या नव्या मनुष्याचा स्वभाव त्यांस नाहीं. ते त्याच्या बुद्धीने विचार करीत नाहींत. ते त्याच्या दृष्टीने पाहत नाहींत. ते त्याच्या प्रसंगीं होऊन अनुभव घेत नाहींत.

जो माणूस पुनर्जन्म पावून देवाकडे झाला आहे त्याला त्याने सैतानाच्या अंधकाररूप अधिकारांतून सोडवून आपल्या प्रिय पुत्राच्या राज्यांत आणिलें आहे. तर त्या दुष्ट आत्म्याचें धनीपण त्याजवर नाहीं. तथापि खोटेपणा जें सैतानाच्या राज्याचें मूळ आणि सर्व अपवित्रपणाचें बीज आहे तें सर्व ख्रीस्ती जनांच्या ठायीं अगदी नाहींसें झालें नाहीं. परंतु तें अगदी नाहींसें व्हायाचें आहे. जोंपर्यंत खोटेपणाचा कांहीं लेश कोणाच्या ठायीं राहिला आहे, तोंपर्यंत अंधकाराचा अधिकारी जो पतित आत्म्यांचा आणि भ्रष्ट मनुष्यांचा अधिपति आहे, तो कधीं कधीं त्यांवर अमळसा अधिकार चालवून संतोष पावेल, असें भय आहे. तर खोटेपणाचा नाश निस्तोष करावा आणि अंतःकरणांतून त्या दुष्ट आत्म्याला अगदी घालवून त्यामध्यें खरेपणाचें राज्य स्थापावें; यासाठीं तारणाचा अधिकारी जो प्रभु येशू ख्रीस्त त्याने आपणावर विश्वासणाऱ्या मनुष्यांस खरेपणाचीं युद्धें करायाला सांगितलें आहे. हीं युद्धें करणारे असे जे सर्व खरे ख्रीस्ती ते सारे एकसारिखे आहेत,

असें समजूं नये. तर त्यांमध्यें केवढें तारतम्य आहे पाहा. कोणी शूर आणि कोणी अशूर असे आहेत. कोणी धैर्य धरून आपल्या सैन्याध्यक्षाला लगटतात आणि रणांगणीं वीरांचें स्थल निवडून घेऊन लढतात. हे देवाची प्रार्थना करणारे आहेत. आपला देह व जीव व आत्मा यांच्या योगानें देवाला केवळ संतोष व्हावा, याकरितां ते आपलें मन अत्यंत जतनेस ठेवून वर्त्ततात. ख्रीस्त आणि त्याचा वधस्तंभ यांविषयीं ते फारकरून बोलतात आणि मनन करितात. ते देवाच्या आज्ञांच्या मार्गानें धांवून चालतात. कोणी लढाई करणारे असे आहेत कीं ते जसे जाणू कृत्रिम युद्धें करितात त्याप्रमाणें कधीं कधीं आपल्या प्रभूचीं युद्धें करीत असतात. ते जगांतील गोष्टींचें फार चिंतन करितात. ख्रीस्त आणि त्याचा वधस्तंभ यांविषयीं त्यांच्या मनांत पुष्कळ भावना उठत नाहींत. ते देवाच्या आज्ञांच्या मार्गानें अडखळून जातात. नाहीं तर केवळ रिंगणानें जातात.

एथें ज्या भिन्न भिन्न ख्रीस्ती जनांचें निरूपण केलें आहे, त्या उभयांस एकसारिखा स्वानुभव येत असतो, असें वाटूं नये. विश्वास, प्रीति, नम्रता, इत्यादि जे सद्गुण पवित्र आत्म्याच्या योगानें उत्पन्न होऊन वाढतात, ते त्या उभयांच्या ठायीं आहेत. पण वीरवर्गाच्या ठायीं त्या गुणांला प्रौढपणाची वृद्धि झाली आहे. आणि अवीरवर्गाच्या ठायीं त्यांस केवळ बाळपणाची वृद्धि आहे. त्या उभयांस स्वानुभव प्रकारानें सारिखाच येतो. पण प्रौढीनें त्यांस स्वानुभव भिन्न भिन्न येतो. एकसारिखीच खरेपणरूप युद्धसामग्री उभयतांस आहे. त्या उभयांचे शत्रु आणि त्यांचे कैवारी एकसारिखे असतात. ते उभय सारिखाच खरे-

पणयुक्त ध्वज घेऊन लढतात. तारणाचा अधिकारी जो प्रभु येशू ख्रीस्त त्याच्या प्रकाशानें ते उभय युद्ध करितात. पण जेथें अवीरांच्या दिसण्यांत थोडेच वैरी येतात तेथें वीरांच्या दिसण्यांत वैरी दाटीनें उभे राहातात. जेथें अवीरांस आभाळ फारकरून उघडें दिसतें, तेथें वीरांस भारी अंधाराचे मेघ आणि अंतरिक्षांत भरलेले सैतानाचे जळत बाण दिसतात. हे वीर बहुधा यथाशास्त्र देवाच्या युद्धसामग्रीचा प्रयोग करून आपल्या वैऱ्यांवर जय पावतात. ते अवीर बहुवार विहित प्रकाराप्रमाणें देवाच्या युद्धसामग्रीचा प्रयोग न करून आपल्या वैऱ्यांच्या आहारीं पडतात. तर देवाची जी शुद्धतायुक्त प्रतिमा प्रत्येक ख्रीस्ती जनांला प्राप्त व्हावयाची आहे, तिचें संपादन करण्यांत जय व अपजय, आशा व भय, हर्ष व शोक, इत्यादि मनोभावांचा जो अनुभव वीरांला येत असतो, त्याची पूर्ण माहीत अवीरांला कसी होईल? होणार नाहीं.

ख्रीस्ती वीराची निष्ठा देवावर आहे. देवाचें खरेपण त्याला फार आवडतें आहे. त्याच्या खरेपणाची परिपूर्ण प्रतिमा आपणाला प्राप्त व्हावी, यांत उत्सुक होऊन तो दिवसोदिवसीं आयास करीत असतो. सर्व गोष्टींविषयीं देवाची इच्छा मानून त्याला संतोषवावें; हा त्याचा निश्चय आहे. कोणतें काम करावें आणि कोणतें काम सोडावें, याचें ज्ञान पवित्र शास्त्रांत आहे. याकरितां देहाची अथवा आत्म्याची चूक होऊन आपल्या आचारांत न्यूनाधिक झालें आहे कीं नाहीं, हें कळावें ह्मणून तो प्रत्यहीं देवाची प्रार्थना आणि शास्त्र वाचून आपल्या जीवाची परीक्षा करीत असतो. तर देवाचें पवित्र शास्त्र दर्पणरूप होय. आणि कांहींच मल

या दर्पणांत नाहीं. ह्मणून जसी ज्याची दृष्टि आहे तसें आचरण त्याला त्यांत दिसेल. जो कोणी दिवसोदिवसीं त्यांत पाहून आपलें आचरण शुद्ध करितो, त्याचें आचरण त्या योगानें निर्मल होत जातें, असें केवळ नाहीं. तर त्याची दृष्टिहि निर्मल होत जाती. असा ह्या वीराचा परिपाठ आहे. यास्तव जीं कामें इतर जनांला केवळ क्षुद्रकें दिसतात तीं त्याला अघोर पातकें दिसतात. देवाचें पवित्रपण जें इतराला हलकें दिसतें तें त्याला अत्यंत वजनाचें दिसतें. ह्मणून त्याचें जें आचरण लोकदृष्ट्या अबाध्य आहे त्याची आणि शास्त्रांत सांगितलेल्या आचरणाची तुलना करून पाहतो, तेव्हां लाज व शोक त्याच्या मनांत भरून तो फार फार रुदन करितो. ज्याच्या अंगांत आणि वस्त्रप्रावरणांतहि मल भरला आहे, त्याला चिखलाचें काय भय आहे? कांहींच नाहीं. पण जो निर्मल अंगाचा माणूस अंगावर स्वच्छ कापडें घेऊन मार्गानें चालतो, त्याला जर चिखलवर्णांतून जावयाचें आहे, तर तो आपलीं वस्त्रें आवरून जतनेनें चालेल. याप्रमाणें हा ख्रिस्ती वीर या मलरूप जगांत प्रवास करून आपल्या आत्म्यावरचीं पांघरलेलीं पुण्यरूप वस्त्रें आवरून जतनेस ठेवीत असतो. पापाचें त्याला फारच भय आहे. कां तर देवाची आज्ञा मोडणें हें पाप होय. आणि पाप हरण करण्याकरितां येशू ख्रीस्त जो वधस्तंभावर अपार दुःखें सोसून मरण पावला, त्याची आठवण करून आणि त्याचा वधस्तंभ लक्ष्यांत ठेवून तो पापाचें वाईटपण व पात्रता शिकत असतो. पवित्रपणाची त्याला फारच उत्कंठा आहे. कां तर ख्रीस्ताच्या अमोल्य रक्ताच्या योगानें तें त्याला प्राप्त होत आहे.

खरेपणाचीं युद्धें करण्यांत जो स्वानुभव प्रिय मेरी ईलि बाईला आला तो साधारण ख्रिस्ती जनांचा नव्हता. तर वीराचा होता. पण वीराचें माहात्म्य कळवावें म्हणून तिने आपल्या स्वानुभवाचें निरूपण करून आपल्या दिनवृत्तपत्रांत ठेविलें होतें, असें कोणाला वाटूं नये. दीनजनांतील अति दीन असी ती बाई होती. तिच्या मनांत गर्व नव्हता. तिच्या ठायीं दैन्य भरलें होतें. आपणापेक्षां इतर जनांस मानणें यांत ती निपुण झाली होती. तर तिने कशाला आपल्या स्वानुभवाचें निरूपण करून ठेविलें? अस्या प्रश्नाला तिने स्वतां उत्तर दिल्हें आहे. तें असें कीं, आपल्या वर्त्तणुकींतल्या गोष्टींची पुनरावृत्ति करण्याने आणि ईश्वराने ज्या मार्गाने मला नेलें आहे तोच सूक्ष्म दृष्टीने पाहून लक्षण्याने म्या जें कांहीं वाईट मनांत आणिलें होतें, अथवा बोलिलें होतें, अथवा केलें होतें, त्याकरितां म्या पुनरपि आपणाला नीच करावें, आणि देवाच्या ज्या अनुग्रहाच्या योगेंकरून म्या जें यथायोग्य मनांत आणिलें होतें, अथवा बोलिलें होतें, त्याकरितां देवाचें स्तवन पुनः करावें, या अभिप्रायाने म्या जर प्रतिदिवसींच्या आपल्या वर्त्तणुकींतील लिहून ठेविलेल्या गोष्टी राखिल्या असत्या तर बरें झालें असतें, असें बहुवार माझ्या मनांत आलें आहे. परंतु म्या आपल्या पूर्वींच्या वर्त्तणुकीचें जें निरूपण केलें होतें तें यदाकदाचित् एकाद्या मानवाच्या दृष्टींत येईल, याच्या भयाने जाळून टाकिलें. सद्यां ज्या दिनवृत्तपत्रांत मी आपल्या मनाच्या भावना विस्ताराने लिहून ठेवीत असतें, तें माझ्या खेरीज कोणाच्या दृष्टीस कदापि येणार नाहीं, आणि माझें मरण झाल्यापूर्वीं मी त्याचा नाश करूं शकेन, असी माझी

आशा आहे. मी लक्ष्यांत असें आणितें कीं नित्यांत देवापासीं माझ्या सर्व वासना व कृत्यें लिखितांत लिहून ठेविलीं जात आहेत. तेथे पक्षपात होत नाहीं. इतका निःपक्षपात माझ्याने होईल तर त्याप्रमाणें म्या आपल्या अंतःकरणाला निहाळून त्याच्या गोष्टी लिहाव्या. तें मजकडून घडावें यासाठीं ईश्वराचें साह्य मला मिळावें. कारण कीं "सर्व जें कांहीं आहे त्यापेक्षां हृदय कपटी आहे, आणि तें अति दुष्ट आहे." हा विचार तर अनंतकाळीं जी मनुष्य जगणार आहे तिला केवढा गांभीर्याचा असावा! म्या प्रतिदिवसीं आपल्यावर झालेले उपकार मोजावे यासाठीं कीं या दिनवृत्तपत्रांत कृपायुक्त दानांचें लिखित व्हावें. मनन व विचार करण्याविषयीं मला प्रशस्त गोष्टी मिळाव्या, याकरितां म्या सृष्टीचें पुस्तक शिकावें. देवाच्या पवित्र शास्त्राचें जें मनन मी प्रत्यहीं करीत असतें तें माझ्या रसनेला मधुर होत असावें."

या प्रिय बाईचें मरण जवळ आलें आहे असें एका समयीं तिच्या भ्रतारानें समजून तिला सुचविलें, तेव्हां तिने त्या दिनवृत्तपत्राचा नाश व्हावा, असें मागितलें. भ्रतारानें तें कधीं वाचिलें नव्हतें, तरी तें रक्षिलें असतां त्याच्या योगेंकरून कुटुंबांतील जनांला समाधान व आश्वासन होईल, याच्या निर्धारानें त्यानें तिला मनावून त्याचें रक्षण होण्याकरितां तें आपल्या स्वाधीन करून घेतलें. तर आतां प्रिय ईलि बाईच्या स्वानुभवाचें निरूपण वाचून देवाची विचित्र कृपा स्तवावी.

सन १८३४. (सर्व जगांतील राष्ट्रांमध्यें शुभवर्त्तमानाचें घोषण करणें इत्यादि जीं साधनें तारणप्रकरणीं

लाविलीं आहेत, त्यांची सिद्धि करण्यासंबंधी देशोदेशीं आणि गांवोगांवीं महिन्याच्या प्रथम सोमवारीं कोणी कोणी ख्रीस्ती जन जमून देवाची प्रार्थना करीत असतात. त्या वेळींच्या सभेस महिन्याची ऐक्यमत्यसभा असें ह्मणतात.) माझा प्रिय भाऊ आपल्या आकाशांतील बापाच्या सिंव्हासनासमोर प्रार्थना व विनंती करीत आहे, असी भावना पूर्वींच्या महिन्याच्या ऐक्यमत्यसभेंत माझ्या मनांत येऊन उत्तेजन देणारी होत असे. परंतु कालच्या ऐक्यमत्यसभेंत ती संतोषयुक्त भावना माझ्या ठायीं उठली नाहीं. अहा! या ईश्वरीतंत्राच्या योगाने कसी शोकाची सावली माझ्या पूर्वींच्या सर्व संतोषकारक गोष्टींवर पडली आहे. हे कृपावंत देवा, या भारी दुःखाच्या वेळीं तूं मला आधार हो. म्या दीन व्हावें. जो वधस्तंभाचा फार धैर्यवान् सैनिक होता, जो उद्धारकापासीं मरणशील मनुष्यांस नेण्यांत आसक्त होऊन अनुरूप आयास करून थकला नव्हता, असा भाऊ त्वां मजपासून नेला आहे. असलें आश्चर्यकारक कार्य होण्याचें प्रयोजन काय होतें, हें जरी माझ्याने ह्मणवत नाहीं, तरी “माझी इच्छा आहे तसें नको, तर हे देवा, तुझी इच्छा आहे तसें होवो,” असें म्या मनोभावाने ह्मणावें ह्मणून तूं माझें साह्य कर. “हे प्रभू, म्या काय करावें ह्मणून तूं इच्छितोस!” असें मी निरंतर प्रार्थित आहें, इतक्यांत त्या भावाचें अंगवस्त्र मजवर पडून राहावें. म्या आपल्या मनांत असें आणावें कीं देवाने मजजवळ येऊन आपला अनुसरणारा जो एथे विस्तृत शेतांत हिताचा उद्योग करीत होता त्याला घेऊन आपल्या घरांत आपल्या समक्षतेंत ठेविलें आहे. तर मला ही मोठी सूचक वाणी

झाली कीं "जें कांहीं करायाला तुझ्या हाताला प्राप्त होतें, तें तूं आपल्या पराक्रमाने कर."

या सनाच्या शेवटाची छाया माझ्या सभोंवतीं गाढ होत आहे, इतक्यांत म्या आपल्या भ्रमणयुक्त कल्पना आवरून सिद्ध कराव्या, आणि या वर्षांत म्या देवाच्या आज्ञा मोडून जीं पापें केलीं आहेत, आणि देवाचे जे उपकार मजवर झाले आहेत, ते लक्ष्यांत आणून सूक्ष्म दृष्टीने पाहावे. हे प्रभू येशू, तुला कळतें कीं माझ्या भ्रष्टपणामुळें तीं पापें यथायोग्य प्रकारें स्फुरून मला भासत नाहींत, आणि माझें अशक्तपण व स्खलनशीलता यांच्यामुळें ते उपकार सम्यक् मनांत येऊन दिसत नाहींत. माझ्या सर्व वर्त्तणुकींतील गोष्टी मला कळाव्या, असी माझी इच्छा आहे कीं नाहीं? "हे देवा, तूं मला शोधून माझें हृदय जाण; मला पारखून माझ्या भावना जाण." जरी असंख्य पातकांचें विस्मरण झालें आहे तरी माझें मन जें कल्मषाने मळीण व अंधारमय झालें आहे, त्याला जीं पापें तीं इतकीं पुष्कळ व एवढीं अघोर असतात कीं जो डाग सर्वांहून ओंगळ आहे त्याला धुवून दूर करण्याकरितां जर एक झरा उघडा झाला नसता तर माझ्याने पवित्र देवापासीं आपल्या पापांची क्षमा मागवली नसती. या वर्षांत जीं कार्यें मजकडून घडलीं आहेत, तीं जसीं या पाप द्वेषणाऱ्या देवाला उघड दिसतात, तसीं आयुष्यांतलीं माझीं सर्व कामें त्याला दिसतात. एथे पृथ्वीवर सर्व गोष्टी पापाच्या काळ्या रंगाने रंगलेल्या दिसण्यांत येतात. त्याप्रमाणें एथचीं कामें देवाला दिसतात असें नाहीं. तर जेथे सर्व गोष्टींवर शुद्धीचा छाप बसला आहे, तेथे देवलोकाच्या उजेडाने

तो सर्व कामें पाहात असतो. बरें तर देवानें तारणोपाय सिद्ध करून ठेविला त्यामुळें त्याचें स्तवन होवो, असें ह्मणणें मला शोभतें.

ज्यांच्या योगानें माझ्या आकाशांतील बापाचा मान होत असतो, त्या गोष्टी करण्यासाठीं मला पुष्कळ प्रसंग आले आहेत. तर मग त्या समयीं म्या काय केलें आहे? माझीं सर्व कृत्यें कसीं पापानें मिश्रित आणि केवढाल्या भिन्न भिन्न हेतूंनी झालेलीं आहेत! यामुळें मला फारच भय आहे कीं जें जें म्या केलें आहे तें तें सर्व देव जो अंतः-करणाकडे पाहातो त्याच्या दिसण्यांत केवळ ओंगळपण झालें आहे. मी येशूच्या संगतीं झालें आहें, असा उमज माझ्या वर्त्तणुकीवरून मनुष्याला व्हावा यासाठीं माझें बोलणें चालणें यथोचित झालें नाहीं. अंधळी, दुर्बल व निरूपाय असी जी मी आहें तरी जसें मला करणें भाग व करण्याचा मान आहे, तसें म्या आपल्या पोषकाला व रक्षकाला प्रार्थून गौरविलें नाहीं. हे धन्य खंडणी करणाऱ्या, त्वां प्रार्थिण्याविषयीं यथायोग्य अभयवचन दिल्हें नव्हतें ह्मणून म्या प्रार्थना केली नाहीं, असें कसें ह्मणेन? असें ह्मणूं नये. कां तर "जें कांहीं तुह्मी माझ्या नावानें बापापाशीं मागाल तें त्यानें तुह्मास द्यावें," असें जें तुझें वचन त्यापेक्षां मला दुसरें कोणतें अभयवचन पाहिजे? जे कोणी मागतात, त्यांला पवित्र आत्म्याची प्रेरणा प्राप्त होण्याविषयीं जीं वचनें शास्त्रांत आहेत, तीं देणें परमपराक्रमी व परमदयावंत देवाला शोभतें. आश्रय व पवित्रपण प्राप्त होण्याविषयीं जसीं वचनें पाहिजेत तसीं हीं आहेत. "आईबापें जीं आपल्या लेंकरांस उत्तम देणीं द्यायास राजी आहेत त्यां-

पेक्षां जे आकाशांतील बापाजवळ मागतात त्यांस तो किती विशेषेंकरून पवित्र आत्मा देण्यास राजी होईल!" हें वचन केवढें संतोष कारक आहे! अहा माझ्या आत्म्या, तूं उगाच ऐस, आणि त्या वचनाचा विचार करून पाहा.

या वर्षाच्या आरंभीं देवाच्या कृपेकरून मला एक वजनाची पदवी मिळाली. तिच्या योगाने मला एका तरूण मुली मंडळींवर प्रचंड बुद्धिबल चालविण्याचा प्रसंग आला. तर तें बल कसें होतें? तें पवित्र होतें काय? त्या तरूण मुलींस पापाचा अति कंटाळा व्हावा आणि देवाच्या आज्ञा मोडण्याविषयीं त्यांस फारच भय व्हावें, यासाठीं म्या अधिक आग्रहाने त्यांच्या अपक्क मनांत देवाची गोष्ट ठसविण्याकरितां आयास कां केला नाहीं! जे दैवहीन व नष्टविवेक हपशी लोक आदितवारींच्या शाळेंत मजपाशीं शिकत होते, त्यांच्या आत्म्यांचें तारण साधण्यांत अधिक उत्सुक होऊन अत्यंत साक्षेपाने म्या देवाचा कोंकरा जो जगाचें पाप हरण करितो, त्याकडे त्यांची दृष्टि लावून त्यांस कां नेलें नाहीं? जेथे तरूण व सुंदर जन एकत्र मिळून या अशाश्वत जगांतील हलक्या गोष्टींविषयीं प्रीतिवाद व संभाषण करीत असतात, तेथे बोलून म्या एक जो अविकार्य त्याविषयींची गोष्ट कां सांगितली नाहीं! ज्या भुवनांत अनिर्वाच्य सुख आणि अक्षय वैभव आहे, त्याविषयीं मी कां बोललें नाहीं! अरे माझ्या जीवा, मनासमोर तुला असल्या प्रश्नाचें समर्पक उत्तर देतां येत नाहीं, तर मग देवापुढें निश्चयें मी आपल्याला केवळ अतिदोषी ह्मणून निरूत्तर होईन.

सन १८३५. हे धन्य येशू, पूर्वीं कितीएक रात्री मी

आपलें डोकें उशीवर ठेवी तेव्हां हा हृदय फोडणारा उमज मला होत असे कीं, हा दिवस तुझ्या सेवेंत क्रमून तुझें गौरवकारक झाला नाहीं. तुझ्या पुण्याच्या द्वारें माझ्या पापांची क्षमा झाली नाहीं; देवलोकीं अनंतकाळचें सुख मला प्राप्त होईल, असा निश्चय नाहीं. तर पुढें म्या कदापि असा उमज धरून न निजावें. दिवसाच्या सायंकाळीं जें जें कर्त्तव्य होतें, तें तें अव्हेरून मी निर्धार करून ह्मणालें कीं उद्यां पाहाटेस उठून तें तें करीन, आणि आग्रहानें आपल्या सर्व पापांची क्षमा मागेन. मी देवाचे सर्व उपकार मनांत आणून त्याची स्तुति करीन, आणि पवित्र आत्म्याचें नियमन मागेन. असा निर्धार करून म्या आपले डोळे झोपेनें मिटले. याप्रमाणें म्या फिरून कधीं न करावें. पण आजचें काम आज करावें. आज सकाळीं मी उठलें तेव्हां प्रार्थना करण्यांत उत्सुक नव्हतें, पण देवाच्या करणीवरून पापाचें कांहीं कडूपण माझ्या प्रत्ययास आलें, माझ्या आचरणाचा कांहीं अनुताप मला झाला. परिपूर्ण शुद्धता प्राप्त होण्याविषयीं माझ्या ठायीं कांहींसी उत्कंठा झाली. ईश्वराची सेवा करण्याकडे सर्वात्मना आपला देह व आत्मा लावावा, असी कांहींसी आसक्ति झाली.

देवाच्या उपकारिकपणाचीं प्रमाणें मला क्षणोक्षणीं इतकीं अढळत असतात कीं त्यांचा यथोचित छाप मजवर बसला असता तर मी बोललें असतें कीं कशास्तव! अहा कशास्तव हे उपकार मजवर ह्मणजे धूळींतील किडेवर झाले आहेत! हे धन्य खंडणी करणाऱ्या, वस्तुतः तुजकरितां ही दया मजवर झाली आहे. तर मग म्या

निरंतर तुझी दया स्तवावी आणि तुझें नाव वाखाणावें. ह्या शालेच्या कष्टाच्या उद्योगामध्यें तीन दिवसांचा अवकाश करून तो वेळ डोंगर खोरे काननें शेतें इत्यादि पदार्थांचें अवलोकन करण्यांत घालविला. त्यावरून मला वारंवार असें ह्मणणें योग्य होतें कीं पृथ्वी जिजवर भ्रष्ट मनुष्य वसतात ती इतकी रमणीय व मंडित आहे तर देवलोक किती मनोहर असेल. हे प्रिय उद्धारका, माझ्या मनांत हा विचार ठसावा कीं त्वां जें जें केलें आणि सोसिलें आहे, त्याकरितां मी सृष्टीचें सौंदर्य पाहात असतें, सांसर्गिक मंडळीचा हर्ष अनुभवीत असतें, आणि मजवर उपकार व माझी परिचर्या करणारे इष्टमित्र मला परकीय लोकांमध्येंहि मिळतात.

आत्मिक गोष्टींविषयीं मला निर्जीवपण झालें आहे, त्यामुळें शोक होण्याचें प्रयोजन आहे खरें. तथापि हे माझ्या बापा, मी तुला स्तवितें कारण कीं मला मागच्यापेक्षां अलिकडे कितीएक दिवसांत कांहीं अधिक भक्तिभावना झाल्या आहेत. अहा! मला प्रार्थना करण्याची अधिक आसक्ति झाली असती तर किती बरें असतें?

आज ह्या मिश्शनेरी वर्त्तमान पत्रांत असें वाचिलें कीं पासिफिक द्वीप आणि हिंदुदेश यांतल्या लोकांमध्यें शुभवर्त्तमानाचें घोषण करण्याकरितां अणखी पुष्कळ कामकरी पाहिजे आहेत. त्या वर्त्तमानाच्या योगानें मूर्त्तिपूजकांमध्यें शुभवर्त्तमानाचा प्रसार करण्याविषयीं माझ्या पूर्वींच्या सर्व आशायुक्त भावना स्फुरद्रूप झाल्या. दोष आरोपणारें मन जागृत झालें. अनंत वैभवामध्यें मला जीवन प्राप्त व्हावें यासाठीं ज्यानें आपलें गौरव आणि आपल्या

बापाचें गौरव सोडिलें, आणि या जगीं उतरून फार उपहास व अघोर मरण सोसिलें, त्याविषयीं माझा अनुपकारीपणा व पापीपणा माझ्या मनाला खाऊं लागला. कां तर हाकालपर्यंत मी आपल्या जन्मदेशांत राहात आहें, मी स्वास्थ्य अनुभवीत आहें. होय या जगांतलीं जीं सुखसाधनें त्यांची संपत्ति मला प्राप्त होत आहे. आणि ज्याला कांहींच नाहीं असें ह्मणणें उचित आहे तेंच मात्र काय तें मी ख्रीस्तासाठीं करीत आहें. इतक्यांत ज्यांस जीवनाची भाकर मिळाली नाहीं असीं कोट्यानकोटी माणसें मरत आहेत. तर माझ्या वर्त्तण्यावरून मला लाज वाटावी. म्या पश्चात्ताप करावा, आणि रात्रंदिवस हाक मारून म्हणावें कीं," हे प्रभू, म्या काय करावें ह्मणून तूं इच्छितोस?" तुझ्या पवित्र इच्छेस अनुकूळ असेल तर आपल्या पवित्र आत्म्याची वृष्टि मजवर करून त्याच्या प्रेरण्याने वधस्तंभाच्या मिश्शनेरीजनांची पदवी संपादण्यास मला योग्य व सिद्ध कर. म्या अंधारमय मूर्त्तिपूजकांस तारणाऱ्याची प्रीति देणारी सुवार्त्ता सांगावी, यासाठीं तूं माझा मार्ग स्पष्ट कर.

काल मी प्रभूच्या मेजावर बसलें आणि त्याचें मोडिलेलें शरीर व पाडिलेलें रक्त यांच्या खुणा दाखविणारी भाकर व द्राक्षरस घेऊन भोजन केलें. त्या मेजावर बसण्याचा मान प्राप्त होण्यास मला पात्रता नाहीं, तर केवळ अपात्रता आहे. तरी त्या अपात्रतेचा उमज मला यथास्थित झाला नाहीं. ज्यामुळें हा दिव्य व वैभवयुक्त यज्ञ सिद्ध झाला तें पाप मला जसें अघोर वाटावें तसें वाटलें नाहीं. माझें हृदय इतकें कठीण होतें कीं पाप्यांसाठीं

जीं अत्यंत दुःखें उद्धारकाला वधस्तंभावर झालीं त्यांचा त्याला उमज पडणें अघटित दिसलें. तर आपल्या पवित्र आत्म्याच्या द्वारें देवाने त्याचें कठीणपण नाहींसें करावें आणि त्याला मऊ करून रक्षावें.

सन १८३६. लीनता धरणें आणि उपवास व प्रार्थना करणें यांत आजचा दिवस घालवावा, असी आज्ञा या प्रांताच्या सरकाराने केली आहे. तर देवाचें ध्यान करते वेळेस आणि विशेषेंकरून त्याच्या भजनस्थानीं जगाविषयींच्या गोष्टी चिंतू नयेत, तरी त्या गोष्टी म्या आपल्या मनांत येऊं दिल्ह्या. त्यामुळें मला खेद झाला. सायंकाळाची छाय पृथ्वीवर पडली नव्हती, त्या समयीं जेथे माझ्या प्रिय भावाचें निर्जीव शरीर मातीच्या टेंकडाखालीं निद्रेंत निजलें आहे, तेथे मी जाऊन बसलें. तें टेंकड मला फार आवडतें आहें. अगोदर तेथे जाऊन म्या वारंवार आपला प्रभु व धनी यास आपल्याला समर्पून दिल्हें होतें, त्यास एक वर्ष होत आलें आहे. तर माझ्या आयूष्याच्या त्या गेलेल्या भागाकडे म्या पाहिलें. त्या मागें पाहाण्यावरून देवाची मजसीं जी वहिवाट कळण्यांत आली, ती केवळ सुष्टाई व दया आहे. माझ्या देहाला रोग झाला नाहीं. आणि माझ्या मनाला वेड लागलें नाहीं. जेथे जेथे माझी वसति झाली आहे तेथे तेथे माझें क्षेम करण्याकरितां मला स्नेही मिळाले आहेत. याशिवाय दुसरे सर्वोत्कृष्ट उपकार मजवर झाले आहेत, ते असे कीं प्रत्यहीं ज्याचें पठन करावें असें पवित्र शास्त्र मला मिळालें आहे. ख्रिस्ताचे जे वकील शुभवर्त्तमान गाजवितात, त्यांकडून दर आठवड्यास मला तारणाची सुवार्त्ता ऐक-

ण्याचा प्रसंग आला आहे. तर विपुल उपकरांच्या योगें-करून आकाशापर्यंत उंच केलेली असी मी झालें आहें. पण म्या कसा आपल्या आकाशांतील बापाचा आभार मानिला आहे? गर्व, अकृतज्ञता, वैपरीत्य, विस्मरण, असंतोष, असल्या भावांच्या द्वारेंकरून म्या त्याचे उपकार अवमानिले आहेत कीं नाहीं? आगोदर जसा म्या निर्धार करून ह्मटलें होतें कीं, मी अधिक विश्वासूपणाने वर्त्तून देवाची सेवा करीन, तसा निर्धार करायाला मी भ्यालें. कां तर म्या बहुत वेळा असला निर्धार मोडिला आहे. याकरितां माझ्याने हाक मारून केवळ इतकेंच ह्मणवलें कीं, हे प्रभू तूं मला समर्थ कर, नाहीं तर मी थकून पडेन. तुजवांचून माझ्याने कांहींच करवत नाहीं.

हा दिवस मनोहर होय. आपला उत्पन्न करणारा जो ईश्वर त्याला स्तवून कोण अधिक माधुर्याने त्याचें गायन करील, अस्या अभिप्रायाने पांखरें एकमेकांची स्पर्धा करून गात आहेत, असें दिसतें. वसंतकालचीं फुलें सूर्याच्या जीवनदायक गुणासमोर आपल्या पांकळ्या विकासित करून मौनाने त्यांच्या निर्माण करणाऱ्याचें चातुर्य व उपकारिकपण प्रसिद्ध करीत आहेत. तर मग ज्याच्या क्षेमाकरितां हे सर्व पदार्थ उत्पन्न केले आहेत, असा माणूस हा मौनाने राहील काय? त्याच्या उत्पादकाचें स्तवन करण्यांत त्याचा स्वर ऐकिला जाणार नाहीं काय? हे माझ्या देवा, आजपर्यंत जसी मी असावध झालें आहें तसें या उपरांत म्या न व्हावें असें कर. या महिन्याच्या आरंभीं मी तुझ्या इच्छेप्रमाणें आचरण करीन असा निश्चय केला. अहा मला सामर्थ्य दे. प्रयोजनाप्रमाणें मजवर कृपा कर. सकल

पृथ्वीच्या पाठीवर ख्रीस्ताचें राज्य चालावें, याविषयीं आजच्या दिवसीं आणि रात्रीं सर्व ख्रीस्ती देशांत विश्वासणारे मनुष्य एकत्र जमून प्रार्थना करीत असतील. तर सहस्रावधि स्थंडिलांवरून आणि लक्षावधि पश्चात्तापी हृदयांवरून असे धूपाचे मेघ वाहून चढावे कीं, तारणाच्या रथाचीं चाकें विघ्नांवांचून वेगाने फिरत जातील, आणि सर्व बोल्या व राष्ट्रें यांतील माणसें पापाच्या आणि मरणाच्या दासपणांतून सोडवण पावून देवाचीं सद्गीतें गाऊन स्तुति करितील.

अहा देवाची प्रीति कसी निरूपम आहे! त्याची निवड करणारी प्रीति मजवर झाली आहे. त्याकरितां म्या त्याची केवढी उपकार स्तुति करावी! त्याचा केवढा आभार मानावा! अहा! माझ्या आकाशांतील बापाने जी कृपा मजवर करून जे जन्मतः माझ्या बराबरीचे असल्या किती मनुष्यांतून मला निवडून वेगळें केलें आहे, ती कृपा तर अनुपमेय आहे खरी. या पवित्र दिवसीं मी फिरून आपला उठलेला व वैभवयुक्त उद्धारक व प्रभु याच्या मेजावर बसलें. तेव्हां म्या त्याचीं दुःखें व मरण मनांत आणून स्तवन केलें. तर हें भोजन करण्याचा मान केवढा आहे! माझा धन्य तारक ज्याने मजवर अनादि निधन प्रीति केली. आणि त्याची वैरीण अस्या मला अनंतकालच्या मरणापासून तारावें, यासाठीं ज्याने आपला जीव दिल्हा, त्याची सेवा करण्याविषयीं म्या त्यापासीं शपथ वाहून वचनें केलीं, तीं कसीं अवमानिलीं आहेत, याची आठवण होती तेव्हां केवढा शोक माझ्या अंतःकरणांत भरावा! सकाळीं कांहींच यथोचित भावना मला झाली नव्हती, असें वाटलें. माझें

हृदय फार कठीण होतें. पण देवाच्या कोंकऱ्याचें मोडिलेलें शरीर व ओतिलेलें रक्त यांच्या खुणा दाखविणाऱ्याकडे दृढ अवलोकन केल्याने तें प्रीतीने व पश्चात्तापाने पाझरलें. तेव्हां माझ्या प्रिय कुटुंबांतल्या सर्व जनांनी देवाच्या राज्यांत भाकर खावी असी उत्कंठा माझ्या ठायीं भरली.

सन १८३७. सद्यां मी ज्या वर्षाच्या उंबऱ्यावर उभी राहात आहें, त्याकडे पुढें अवलोकन केलें, आणि या वर्षांत जीं जीं कार्यें संभवत आहेत त्यांविषयीं विचार केला. कदाचित मागल्या वर्षांतल्या सारिखें कांहीं संकट होईल. नम्रभावाने आपल्या सर्व चिंता ईश्वरावर टाकाव्या आणि तो माझ्या वाटा निटावील या निश्चयाने आपले सारे मार्ग त्याला सोपून द्यावे ह्मणून म्या यत्न केला आहे. जो माझ्या डोक्याचे केस मोजितो, तो माझें आणि माझ्या कुटुंबांतल्या जनांचें संरक्षण करील, आणि आह्मास प्रत्येक उत्तम दानें देईल. आपला आचार परिशुद्ध करण्याविषयीं म्या वारंवार निर्धार केले आहेत. पण ते निरर्थक ठरले, यामुळें मी अणखी निश्चय करायाला धजलें नाहीं. पण जसें जाणू माझें शेवटलें त्याप्रमाणें म्या या वर्षाचा उपयोग करण्यांत सावध व्हावें, यासाठीं म्या देवाची प्रार्थना करून कृपा मागितली. अहा या वर्षांत मूर्त्तिपूजकांवर आणि ख्रीस्ताच्या मिशनेरी जनांवर संपत्तीचे आशीर्वाद उतरून राहावे.

सोमवारीं मी आपल्या घरीं जायाला निघालें. पण मोठा वारा सुटला आणि भारी पाऊस पडला. यावरून मी बुधवारपर्यंत गलबतावर राहिलें. जे मजबरोबर जल-

यात्रिक होते त्यांवरून मला फारच आभार वाटण्याचें कारण होतें. कां तर त्यांतील कितीएक पृथ्वीचें मीठ आहेत, असें दिसलें. कोणी लोकांसमोर पवित्र शास्त्र वाचण्यांत आणि सकाळीं व सायंकाळीं देवाची प्रार्थना करण्यांत संतोष पावत असत. दिवसास केव्हां केव्हां आणि प्रतिरात्रीस ते देवाचीं स्तवनगीतें गात असत.

काल म्या धन्य तारकाची प्रीति प्रदर्शविणारी भाकर व द्राक्षरस घेतला. त्या समयीं माझ्या आकाशांतील बापाने आपलें वदन मजपासून अगदी आच्छादिलें असें नाहीं. मला वाटलें कीं जसें यथोचित तसी मी पश्चात्तापी नव्हतें. माझ्या पापाकरितां म्या यथायोग्य प्रकारें आपणाला नम्र केलें नव्हतें. आणि त्याच्या लेंकरांसंगतीं त्याच्या मेजावर बसल्याने मजवर त्याचा असंतोष होईल, असें भय मला झालें. म्या सद्गुणांची वृद्धि संपादावी आणि आमच्या कुटुंबाच्या सर्व प्रिय जनांचें तारण व्हावें, याविषयीं आज प्रार्थना व विनंती केली आहे.

सन १८३८. म्या हा पवित्र शाब्बाथ योग्य प्रकारें घालविला नाहीं. मी देवाच्या भजनस्थानीं गेलें, तों तें फारकरून रिकामें होतें. आणि जीवनाची भाकर वाढावी यासाठीं तेथे कोणी नव्हता. तथापि या मंडळीची ओसाडी झाल्यामुळें म्या मनोभावाने शोक केला नाहीं. तिचें संजीवन होण्याविषयीं आग्रहाने प्रार्थना केली नाहीं. आणि माझ्या आदितवारींच्या शाळेंतल्या शिकणाऱ्यानी पापाचा पश्चात्ताप करावा आणि होणार जो क्रोध त्यापासून पळावें, याविषयीं जसें विनवावें त्याप्रमाणें म्या त्यांस बोलावून विनविलें नाहीं. मरणाच्या योगाने कसी नासधूस आमच्या

प्रिय कुटुंबाच्या मंडळीमध्यें झाली आहे, याचा विचार म्या संध्याकाळीं केला. अहाहा! आह्मांतील केवळ शेष राहिला आहे. आमच्या आकाशांतील बापाने आह्मास कठीण शिक्षा केली आहे. तिच्या द्वारें माझें आणि सर्व कुटुंबाचें यथायोग्य हित झालें नाहीं; यामुळें मला फार खेद वाटला. देवाच्या उपकारानी आमची ओढ त्याकडे होत नाहीं, आणि त्याच्या शासनाने आह्मी दबकून त्याला अनुसरत नाहीं, अथवा नम्र होत नाहीं, असें दिसतें. ह्या अवघड दुःखाच्या योगाने आह्मा सर्वांस पवित्रता प्राप्त व्हावी, या इच्छेने म्या उत्सुक होऊन देवापासीं विनंती केली. अहा तें दुःख आमच्या कुटुंबांतील कोणीएकाला तारणाचें साधन होईल कीं नाहीं? तें माझ्या प्रिय भावा जबूलुनाला देखील जीवन प्राप्त होण्याचें कारण व्हावें.

अहा मी केव्हां जगाविषयीं विरक्त होऊन केवळ देवाच्या घरीं जाण्याची तयारी चिंतीन? वस्तुतः जर केवळ दुःखाच्या योगेंकरून जगाविषयींची विरक्ति होईल तर माझीं संकटें तितक्या दुःखापुरतीं कठीण झालीं आहेत. पण देवाच्या कृपेखेरीज दुसऱ्या कोणत्याहि योगानें हें भ्रष्ट हृदय जो वाइटाचा झरा, जो अशुद्ध व ओंगळ पांखरांचा पिंजरा, तें शुद्ध होत नाहीं. हे पवित्र देवा, येशूच्या रक्ताने मला धू ह्मणजे मी स्वच्छ होईन.

या सनाची समाप्ति होत आहे, इतक्यांत म्या ह्या वर्षाचे शाब्बाथ दिवस कोणत्या प्रकारें घालविले आहेत, हें आठविण्यांत तत्पर होऊन असा विचार केला कीं, त्या दिवसांत म्या जीं तारणाचीं साधनें केलीं त्यांविषयींचें जें जें लिखित दर पवित्र विसाव्याच्या दिवसीं देवापासीं केलें होतें, तें

कांहीं एका प्रकारें तरी त्याला अनुकूळ व्हावें, असें त्या वेळीं चालून म्या तीं साधनें सिद्धीस नेलीं कीं काय? असल्या प्रकारें जी आचरणाची पुनरावृत्ति झाली ती तर किती अवघड व असंतोषकारक होती. "जो दिवस परमेश्वराने केला तो हाच आहे; ह्यांत मी हर्ष व संतोष करीन," असें म्या किती विरळा पवित्र दिवसाच्या पाहाटेस जागृत होऊन ह्मटलें आहे! बहुत वेळां या दिवसाच्या सकाळीं माझ्या भावना वर्ज केलेल्या विषयांकडे झाल्या आहेत. देवाच्या भक्तिस्थानांतहि माझी असी अनुचित वृत्ति झाली आहे. आपला मनोरथ करण्याने आणि आपली गोष्ट बोलण्याने म्या वारंवार विहित नियम मोडिला आहे.

सन १८४२. जसें पूर्वीं तसें या सनाच्या शेवटीं देवाची दया व उपकार जे मज अपात्र व पातकी मनुष्यावर झाले आहेत, त्यांविषयींचें गायन करणें मला भाग आहे. खरोखर संसाराविषयींचे आणि आत्म्याविषयींचे आशीर्वाद या वर्षांत औदार्याने मजवर झाले आहेत. देव जो माझ्या सर्व वाटा निटावितो, जो माझ्या डोक्याचे केस मोजितो, आणि मी बंडखोरपणाने व अकृतज्ञतेने जगून वर्त्तत असें तेव्हां जो मला कधींहि विसरला नाहीं, तो स्तुत्य असो. जे असंख्य उपकार मजवर झाले आहेत, त्यांतील कांहीं कांहीं वर्णावे आणि आपलीं पातकें स्मरावीं, याकडे म्या आपलें मन लाविलें. म्या प्रार्थना करून मागितलें कीं माझी आणि माझ्या स्नेह्यांची पापक्षमा व्हावी. पुढें आह्मी सर्वांनी आपआपली वर्त्तणूक शुद्ध करून जगावें, आणि देव ज्याने नित्य आमचें विशेष कल्याण पाहिलें आहे, त्याच्या सर्व

आज्ञा आह्मी पाळाव्या, यासाठीं आह्मास ज्ञान व कृपा प्राप्त व्हावी.

सन १८४३. जरी अधीं माझ्या अंतःकरणाचें पुष्कळ कापट्य व दुष्टपण अनुभवास आलें होतें, तरी या सनाच्या प्रारंभीं जेव्हां म्या मोठ्या गांभीर्यानें निश्चय केला तेव्हां आपल्या आत्म्याचा उपयोग आणि ज्यावर माझ्या बुद्धीचें बळ चालतें, त्यांच्या आत्म्याचा उपयोग करण्यांत मी केवळ इतका अल्प वेळ घालवीन, असें मला वाटलें नव्हतें. अहा प्रभूच्या दिवसीं सद्गुणांची वृद्धि करण्याचे काय काय प्रसंग आले. पण ते कसे निरूपयोगी झाले आहेत! त्यावरून मला केवढा दोष झाला! तथापि अजून माझ्या देवाची मजवर फार ममता आहे. तिच्या योगाने माझें कठीण हृदय पाझरेल कीं नाहीं? देवाच्या आशीर्वादानें मी उद्यां आपलें पितृगृह सोडीन आणि कितीएक शाब्बाथ दिवस एथे असणार नाहीं. तर म्या त्यांतील एक देखील अनुचित उद्योगांत न घालवावा. म्या चिरकाल ह्या दिवसाकडे मागें पाहून ह्मणावें कीं याच्या सायंकालीं ह्या भ्रष्ट व पापी हृदयावर उजळलेल्या दिवसाचा प्रकाश पडला. मी देशाटन करणार आहें, त्या समयीं परम पराक्रमी देव हा माझा रक्षक होईल; तो माझें हित होण्याकरितां सर्व होणारीं कार्यें आणि माझ्या सर्व वाटा निटावील. यांत मला हर्ष आहे. माझ्या फिरण्यांत जर मला उघड भयें अथवा गुप्त भयें होतील तर धन्य संबोधक जो पवित्र आत्मा हा जवळ असून मला आश्वासून शांति देईल. अहा येशूवर भरवसा ठेवणें, हा केवढा आश्रय आहे. हें मी शिकलें यामुळें देवाचें स्तवन होवो. आणि मी आनंदानें व विश्वा-

साने आपणाला आणि जे सर्व मला प्रिय आहेत त्यांला त्याच्या हातांत ठेवायास जाणितें.

सन १८४९. देवाची जी आश्चर्यकारक प्रीति पतित व पापी मनुष्यांवर आहे तिजविषयीं म्या फार विचार केला. अहा त्याच्या निष्कलंक व परिशुद्ध स्वभावाचें ध्यान केल्यावरून केवढा संतोष होतो. तो जर क्रोधाधीन असता तर माझी काय दशा झाली असती! तो असा असता तर त्याच्या प्रीतीविषयीं जी अकृतज्ञता व अवज्ञा मजकडून होत असे त्यांवरून त्याने किती लवकर मला निबिड काळोखांत घातलें असतें! त्याचा प्रत्येक विधि व प्रत्येक आज्ञा संतोषकारक आहे, आणि अपरंपार ज्ञान व प्रेम यांचा छाप त्यांवर बसला आहे. देवाने मज-सारिख्या किडेवर जी अनिर्वचनीय सहनशीलता व प्रीति केली आहे, त्यांविषयीं म्या एकांतीं विचार केला, तेव्हां आत्म्याचें पाझरणें माझ्या अनुभवास आलें. अहा देवाची आज्ञा केवढ्या ज्ञानाने व प्रेमाने भरली आहे. ती असी कीं "जेव्हां तूं प्रार्थना करितोस तेव्हां आपल्या खोलींत जा, आणि आपलें दार लावून गुप्तांत जो तुझा बाप त्याची प्रार्थना कर." जेथे कोणी आपल्याविषयीं व आपल्या महान उत्पादकाविषयीं विचार करणार नाहीं, तेथच्या मार्गाच्या कोनांमध्यें अथवा बाजारामध्यें आपला आदर केला जावा, असा जो अनाद्यंत नाहीं तो आपलाच आदर पाहून इच्छीत असेल. पण सर्वज्ञ असा जो तो केवळ अंतःकरणाची प्रीति व आदर मागतो. त्याचें नाव स्तुत्य असो. कां तर त्याने असें सांगितलें आहे कीं "मग गुप्तांत पाहतो असा तुझा बाप तो तुला लौकिकांत फल

देईल." अहा ! काय भलें वचन जें आकाश लोकाचा धनी, सर्व सृष्टीचा उत्पन्न कर्त्ता, याने आपलें पायासन अस्या पृथ्वीवर बसणाऱ्या नष्ट व पापी कीटकांस दिल्हें, असें तें आहे. तर, हे माझ्या आत्म्या, तें पुरें आहे कीं नाहीं ? देवानेच तें वचन केलें. तें तर पुरावेंना ? प्रार्थना कसी करावी हें शिकविण्याकरितां तो आपला आत्मा दीनांस देतो. याशिवाय त्याचा प्रिय पुत्र जो पाप्यांचा तारक, तो त्याच्या उजवेस त्यांसाठीं विनंती करितो. अस्या अपार विनयावरून दिव्य दुतांला विस्मय अवश्य वाटेल.

सकाळीं चांगल्या झोंपेंतून मी जागृत झालें, तेव्हां सर्व सृष्टि आपल्या महान उत्पादकाची स्तुति करितीच कीं काय असी दिसली. ह्या सकाळींच्या प्रशस्त स्तवन गीतांत माझें अंतःकरण सहज अनुकूळ होऊन मिळावें, असी उत्कंठा माझ्या ठायीं झाली. सूर्य उगवून आपले तेजस्वी किरण पृथ्वीवर पाडीत होता, इतक्यांत न्यायीपणाच्या सूर्याने आपल्या किरणांत निरोगी करण्याच्या उपायासुद्धां माझ्या आत्म्यावर उगवून प्रकाश पाडावा, असें म्या आपला बाप व देव यापासीं प्रार्थिलें. म्या मार्त्तिन लूथराचार्याचें स्मरण केलें. जेव्हां त्यावर मोठ्या कामाचा भार होता तेव्हां तो प्रत्यहीं प्रार्थना करण्यांत दाहा घटिका घालवीत असे. जो प्रार्थनेविषयींचा प्रेमावेश त्याला होता तोच मला व्हावा, असें म्या फार इच्छिलें. मग माझा देव व उद्धारक याचा मला स्नेहयुक्त व गोड परिचय होईल, आणि कधींहि देवाच्या घरीं पोंचण्याविषयींचा संदेह व भय धरून मी या जगांतून चांचपडून जाणार नाहीं.

दिवस आणि रात्रि, उन्हाळा आणि हिंवाळा, पेरणी आणि कापणी, इत्यादि सृष्टीच्या अनुक्रमाच्या गतींवरून आह्मास वर्त्तमान घटका आणि भविष्यकाळ यांविषयीं देवावर भरवसा होतो. अहा भुवनांचा धनी हा जर जगाचा वहिवाट करण्यांत चंचलचित्त असता, जर तो काल आणि आज आणि सर्वकाळपर्यंत तसाच नसता तर मनुष्याला कोठून आश्रय मिळावा? हा वसंत ऋतु फार थंड असल्यामुळें उन्हाळा येण्याचा भास अधीं झाला नव्हता. पण हा तेजस्वी व रमणीय दिवस असें ह्मणतोच काय उन्हाळा संनिध आला आहे. तथापि त्याच्या सौंदर्यावरून माझ्या हृदयांत हर्ष भरला आहे असें नाहीं. माझें आयुष्य जसें उपयोगी व्हावें तसें झालें नाहीं, आणि पुढें तें कांहीं विशेष प्रकारें अधिक उपयोगी होईल असीहि संभावना नाहीं. मला भय आहे कीं माझ्या पापिष्ठ चित्ताच्या योगेंकरून मी नित्यांत भूमि धरून चालेन. मी कदापि विश्वासाने दिव्य नगराकडे आपले डोळे लावून चालणार नाहीं. अहा माझा देव व उद्धारक याची आणि माझी लगत होत असावी आणि माझा आत्मा देवाच्या पवित्र आत्म्याने वाप्तिस्मी व्हावा हें बरें आहे. नंतर म्या आपल्या धन्याच्या द्राक्षमळ्यांत विश्वासू व उद्योगी कामकरीण व्हावें.

आजच्या सकाळीं माझ्या मनाच्या चांचल्यामुळें माझ्याने प्रार्थना करवली नाहीं. अहा माझें अंतःकरण किती पापिष्ठ आहे कीं ज्या आशीर्वादांचें मला फार अगत्य आहे ते माझ्याने आपल्या आकाशांतील धन्य बापापासीं त्याच्या प्रिय पुत्राकरितां मला द्यावयास मागवत नाहीं.

हे माझ्या आत्म्या, जो गुलाबाच्या फुलास सुंदरपण व सुवास देतो, जो पाकोळ्यांचे पंख रंगवितो, आणि अति नीच जीवजंतूला प्राण देतो, जो माझ्या डोक्याचे केस मोजितो, सूर्य चंद्र तारे व विशाल भुवनें उभारून धरितो, जो सर्व दिव्य दूतांची सेवा व स्तुति पावतो, आणि सर्व प्राण्यांला जीवन व अन्न व प्रकाश देतो, त्याचें ध्यान व स्तवन कर. अहा आमच्या देवाचें महात्म्य अपरंपार आहे खरें. म्या ह्मणावें कीं "कोण शोध करून देवाला जाणील! तो आपल्या सर्व जीवांच्या कल्याणावरून संतोष पावतो असा विचार केवढा सुखकारक आहे. डोळ्यांला आनंद व्हावा यासाठीं त्याने सौंदर्याच्या योगानें पृथ्वीला पांघरूण घातलें आहे. आणि सकळ इंद्रियांची तृप्ति करण्यासाठीं सुख देणारे असंख्य पदार्थ उत्पन्न करून ठेविले आहेत. त्याचें सुख तो केवळ आपल्या भाविक अनुसरणाऱ्यांस यथातृप्ति भोगूं देतो, असें नाहीं. तर जे त्याचे बंडखोर प्रजालोक आहेत तेहि यथाबुद्धि त्यांचा उपभोग करीत असतात. अहा ज्याकडून मला जीव व प्राण व सर्व वस्तु प्राप्त होतात अस्या माझ्या बापाचा आणि माझ्या देवाचा विसर मी एक क्षणभर देखील कसा करीन! त्याजविषयीं माझीं ध्यानें मधुर होत असावीं." मग गीतें करणारा जो दावीद त्याच्या बोलानी म्या ह्मणावें कीं "हे ईश्वरा, त्यांचें धान्य व त्यांचा द्राक्षरस वाढल्या वेळेस जो आनंद त्यापेक्षां त्वां माझ्या हृदयांत अधिक आनंद दिल्हा आहे."

अनुक्रमानें पवित्र शास्त्राचें अध्ययन करीत असतां आज सकाळीं मी बेचाळिसावें गीत वाचूं लागलें. म्या

आपले गुडघे टेंकून त्यांतील एकएका वाक्याचें मनन केलें, आणि त्यावरून देवाची स्तुति, अथवा त्यास विनंती केली. म्या वारंवार आपल्या मनांत असें आणिलें आहे कीं एकांतीं भक्तिभजन करण्याकरितां माझें अंतःकरण नीट असण्याचें अगत्य आहे, असें केवळ नाहीं. तर अनेक प्रकारचें स्वारस्ययुक्त बोलणें व्हावें, याचेंहि अगत्य आहे. पृथ्वींतल्या एका राजापासीं मला जर प्रत्यहीं अर्ज करायाचा असता, अथवा आभार मानायाचा असता, तर जें बोलणें त्याच्या प्रतापाला शोभतें तेंच रचावें यासाठीं मी फार सोसाने चांगले चांगले शब्द निवडून बोललें असतें. बरें तर राजांचा राजा आणि प्रभूंचा प्रभु असा जो त्यासमोर बोलण्याविषयीं मला सावधगिरी व्हावी कीं नाहीं? ज्या ज्या भिन्न भिन्न प्रार्थना शास्त्रामध्यें लिहिल्या आहेत, त्यांतल्या कल्पना फारच उंच व प्रगल्भ आहेत. तथापि त्या प्रार्थना अज्ञानांच्याहि समजण्यांत स्पष्टपणाने येतात. हे माझ्या आकाशांतील बापा, मी तुझें स्तवन करितें यासाठीं कीं बुद्धि व कल्पनाशक्ति यांचा व्यापार करण्याचीं प्रशस्त स्थानें तुझ्या पवित्र शास्त्रांत आहेत. त्यांतल्या गोष्टी अखंडित आहेत. मी तुला स्तवितें. कारण कीं जे विश्वासयुक्त अंतःकरणानी तुझें शास्त्र शिकतात त्यांला अनेक प्रकारच्या प्रार्थ्य व स्तुत्य गोष्टी सांपडतात. पण जें विधिनिषेधाचें दिव्य लेखन मनुष्यजातीला प्राप्त झालें आहे त्याचें शोधन, सौरस्य, अनेकत्व, व प्रागल्भ्य, यांवरून मला विस्मय व हर्ष होतो. इतक्यांत खेदहि होत असतो. कारण कीं एकांतींचें भक्तिभजन करण्यांत मला केवळ अल्प बोलणें येतें, कां तर शास्त्राच्या ईश्वरी खरेपणाने

माझें अंतःकरण निस्तूक व्यापिलें नाहीं. मी आपला प्रभु व उद्धारक जो येशू ख्रीस्त त्याची स्तुति करितें यासाठीं कीं चांगल्या बोलण्यामुळें अथवा पुष्कळ बोलण्यामुळें तो माझें ऐकतो असें नाहीं. अहा नाहीं. ज्याच्या हृदयांत प्रशस्त भावना भरल्या आहेत त्याला केवळ त्या जकातदारासारिखें आरडतां येतें कीं "हे देवा मज पाप्यावर दया कर." आणि जर पवित्र आत्मा आह्मासाठीं विनंती करीत असता तर तो अवाच्य कण्हण्याने विनवीत असता. अहा मला प्रार्थना करावयास शिकवावें यासाठीं देवाचा पवित्र आत्मा मिळेल तर बरें.

अहा अधिक उपयोगी आचरणाने म्या आपला वेळ घालवावा. जगांत अधिक क्षेमदायक कामें करावीं. आपल्या अनुपयोगित्वामुळें मी उसास टाकितें, आणि प्रार्थना करून मागितें कीं म्या उद्योग करण्यांत तत्पर व्हावें, आत्म्यांत आवेशी व्हावें, आणि प्रभूची सेवा करावी. वेळ पळतो! पळतो! तरी जो यथोचित पालट व्हायाचा तो माझ्या ठायीं होत नाहीं. माझ्या आयुष्याचे दिवस केवळ खाडे झाले असें दिसतें. यामुळें जरी माझा आत्मा देवाच्या कोंकऱ्याच्या अमोल्य रक्ताने खंडून घेतला गेला आहे, तरी न्याय ठरण्याकरितां देवासमोर जाण्याची कल्पना करणें मला दुःसह होतें. ज्याच्या दयेने अजर आत्मा आहे, त्याची सेवा व गौरव करण्यांत आयुष्य न घालविणें हें आत्म्याला अगदींच शोभत नाहीं. तें अत्यंत अनुपकारित्वाचें लक्षण होय. मन इत्यादि तत्वांचा सुप्रयोग करण्याने जर त्यांची प्रौढी आणि ज्ञानाचें वर्धन होत असलें तर त्या योगाने मला कांहींसा संतोष झाला असता.

पण हाय हाय मला असें भय आहे कीं मी आपलें मन हलक्या गोष्टींकडे लावीत आहें तोंपर्यंत त्याला न्यूनत्व येत आहे. त्या गोष्टी अगत्याच्या दिसतात. पण म्या अधिक उद्योगी होऊन त्यांत फार थोडा वेळ घालवावा. तर हे देवा असें करायाला मला साह्यकारक हो.

मला संतोष झाला यासाठीं कीं वीज लकाकून माझ्या दृष्टीस पडली आणि गर्जना मोठ्या गडाडाने माझ्या ऐकण्यांत आली. तरी त्यांवरून मला भय वाटलें असें नाहीं. तर संतोष वाटला. कां तर "जो गर्जनेच्या विजेसाठीं मार्ग पाडीत असतो," तो सन्निध असण्याची खूण असी वीज आहे, असें आपल्या मनांत आणून मी परितोष पावलें.

अहा ! देवाला सर्व गौरव होवो. कारण कीं तो आपल्या लेंकरांला सुज्ञान व सामर्थ्य देतो. आणि त्याची पवित्र इच्छा कसीहि रक्तमांसाला ह्मणजे मनुष्याच्या देहस्वभावाला दुःसह असो तरी तिजला वश्य होण्याची कृपा तो त्यांस देतो. आणि त्यांच्या संसाराच्या गरजा पुरवितो. अहा ह्या स्नेहाळू व सहृदय बापावर माझा बाळकासारिखा भरवसा व्हावा. अहा माझी फार अधिक प्रीति माझ्या गोड व धन्य तारकावर होत असावी. मग म्या ह्मणावें कीं मी आणि माझे इष्टमित्र जरी समुद्रामध्यें बुडत आहेत तरी आह्मी ख्रीस्ताचा आश्रय करून निभाव पावूं.

अहा ! माझा उद्धारक व देव याची व माझी जवळीक माझ्या अनुभवास यावी असी माझी फार उत्कंठा आहे. तर मग तूं माझा आहेस असें मी त्याला ह्मणेन आणि मी त्याच्या वल्लभ कळपांतील एक आहें याचा उमज मला होईल. हे दयावंत बापा, तूं प्रसन्न होऊन माझें दुष्ट अंतः-

करण पवित्र करायाला आपला पवित्र आत्मा मला दे. त्या योगाने म्या आपल्या सर्व मनाने आणि आपल्या सर्व सामर्थ्याने तुजवर प्रीति करावी आणि जगापासून विरक्त होऊन वर्त्तावें. अहा ही आसक्ति मला व्हावी कीं म्या आपल्या आत्म्याच्या बापाची लगत करण्यांत कांहीं पूर्ण दिवस घालवावे, आणि माझ्या कल्पना अल्पस्वल्प गोष्टींत रंजित होऊन ओढाळ न व्हाव्या, आणि देवाच्या गुणलक्षणांचें ध्यान करण्यावरून मला कंटाळा कदापि न व्हावा. जे परिशुद्ध आत्मे देवाच्या वैभवयुक्त सिंहासनासभोंवती उभे आहेत, त्यांला पवित्र प्रभू व दूतगणांचा देव जो खंडणी करणारा त्याविषयींच्या सारिखी कांहींच गोष्ट मनोहर व रंजनकारक व्हावयाची नाहीं. त्याच्या रक्ताने त्यानीं आपले झगे धुतले आणि त्यांस शुभ्र केलें आहे. ते उत्साहाने त्याचा गुणानुवाद करून गात असतात.

आज सकाळीं मी निघून फिरायाला गेलें तेव्हां सर्व सृष्टि नव्या तुकतुकीने व सौंदर्याने जागी झालेली दिसली. लक्षावधि दहिंवराच्या थेंबांत सूर्याची लकलकीत प्रभा प्रतिबिंबली. आमचा महान पूर्वज हा जेव्हां आदीं या सुंदर पृथ्वीवर ठेविला होता, तेव्हां त्याने केवढ्या विस्मयाने व संतोषाने इचें अवलोकन केलें असावें. पण त्यानंतर त्याचें पतन आणि त्याच्या संतानाचें भ्रष्टत्व यांच्या योगेंकरून तिचें सौंदर्य बिघडलें आहे. तथापि परम समर्थ निर्माण कर्त्याचीं पावलें सर्व ठिकाणीं दृश्य आहेत. तर रात्रीं जेव्हां आकाश पडद्याने सजतें आणि सकाळीं जेव्हां पृथ्वी नव्या दिवसाच्या जागत्या कांतीने हर्षित असती, तेव्हां म्या ह्मणावें कीं जो अदृश्य ईश्वर या विश्वाला

निर्मून त्याचें धारण व रक्षण करितो, तो केवढा महान, केवढा ज्ञानी, व केवढा गौरवी आहे. तो तर माझा बाप आणि माझा मित्र होय. हें आश्चर्यकारक आहे. तर मग एक क्षणभर तरी मला त्याचा विसर करितां येईल काय? कधीं तरी मला त्याजवर प्रीति करितांना सोडितां येईल काय? नाहीं, असें कदापि होणार नाहीं, असें बुद्धि ह्मणती. पण अहा! पापाच्या योगानें माझें हृदय केवढें कठीण झालें आहे. चित्ताचें कसें वैकल्य झालें आहे. हे ईश्वरा, तूं माझ्या अंतःकरणाला मऊ व पवित्र कर. दूताच्या सारिखें माझ्या स्वभावाला सौम्य कर.

हे प्रिय तारका, हे वैभवी मध्यस्था, तूं माझीं अशक्तपणें जाणतोस. तर तूं मज निरूपाय पाप्यावर दया कर. आपल्या दृष्टीपासून मला घालवूं नको. पण मला आपल्या पवित्र आत्म्याचा शुद्ध करणारा गुण दे, यासाठीं कीं मी तुझ्या दृष्टींत आणि माझ्याहि दृष्टींत एवढी द्वेषपात्र नसावें. माझें अंतःकरण इतकें अतिदुष्ट आणि सर्वांहून इतकें कपटी आहे कीं माझ्याने आपल्यासाठीं कांहींच करवत नाहीं. माझी सर्व आशा तुजवर आहे. हे पवित्र बापा, ह्या धन्य येशूच्या विशाळ नीतिरूप द्राक्षमळ्यांत विश्वासू सहकारीण व्हावें, ह्मणून तूं माझें साह्य कर. मी तुझी कारभारीण आहें. यावरून मला हर्ष आहे. माझ्या हृदयाच्या दुष्टाईखेरीज जें सर्व मजजवळ आहे तें तुझेंच होय. माझे बंधुजन, माझा जीव, माझे श्वासोश्वास, माझें आरोग्य, माझ्या बुद्धीचें बळ, माझें धन, हीं सर्व तुझ्या संपत्तीचीं दानें त्वां नष्ट पापी किडेला दिल्हीं आहेत. हे कृपावंत बापा, मी निरंतर तुझ्या वाऱ्यानें श्वासोश्वास करितें. मी तुझ्या

शोभावंत सूर्याच्या प्रकाशाने चालतें. मी तुझ्या मेजापासून अन्न आणि तुझ्या पोशाकखान्यांतून वस्त्र पावतें. तर मग मी कसी तुला विसरेन? अथवा मी कसी तुजवर प्रीति करितांना सोडीन? हे धन्य उद्धारका, त्वां मजसाठीं त्या दानांसुद्धां तारण हें अमोल्य दान विकत घेऊन ठेवावें, यासाठीं त्वां जें जें केलें आणि सोसिलें नाहीं तें काय आहे! परोपकारी दूतहि तुझी कृपा व प्रीतियुक्त विनय पाहून विस्मय पावतात, आणि उत्साह करितात. तर मी सद्गदित होणार नाहीं काय? माझें अंतःकरण जड राहील काय? हे प्रभू, तूं त्याला मऊ कर आणि त्यांत आपलीच प्रीति भरीव.

आज या वर्षाची आणि या शतकार्धाची शेवटली प्रार्थनेची ऐकमत्यसभा झाली. अहा हा तर्क केवढ्या गांभीर्याचा आहे कीं प्रायः या वर्षांत २,४०,००,००० मूर्तिपूजा करणारीं माणसें मरून लोकांतरीं गेलीं आहेत. पण म्या आणि या फार अनुग्रहयुक्त देशांतील मंडळ्यांतल्या मनुष्यानी त्यांचें तारण साधण्याविषयीं केवळ थोडेच यत्न केले आणि केवळ अल्प विश्वासाने प्रार्थिलें आहे. हे पवित्र बापा, तूं माझें झालेलें मांद्य व उपेक्षा यांची क्षमा कर, आणि आपल्या प्रिय पुत्रास्तव आपल्या पवित्र आत्म्याने माझा बाप्तिस्मा कर, यासाठीं कीं म्या या मर्त्य जगाकरितां कष्ट व प्रार्थना करून इष्टफलसंपत्ति संपादावी. हे देवा, तुला कळतें कीं जेव्हां मी ख्रिस्ती होऊन वर्तूं लागलें तेव्हां म्या ख्रिस्ती सद्भक्तीच्या उंच पायरीवर लक्ष्य ठेविलें आणि फार वेळ झाली नाहीं, इतक्यांत ती मला प्राप्त होईल, असी माझी आशा होती. परंतु अठरा वर्षे भरतीं आलीं तरी मला दिसलें कीं माझा

स्वभाव माझ्या ईश्वरी धन्याच्या सौम्य व स्वार्थ नाकारणाऱ्या स्वभावासारिखा आदींच्या पेक्षां अधिक झाला नाहीं. याचें कारण काय असेल? असें मी वारंवार आस्याच्या फारच कडूपणानें ह्मणालें आहें. माझा येशू जो माझी सर्व आशा त्याचा व माझा दृढ व स्नेहकारक परिचय होणें, त्याच्या प्रीतिरूप सागरामध्यें आपल्या आत्म्याचें नहाण करणें, आणि त्याचें गौरव जें त्याचीं कामें व मार्ग यांवरून प्रसिद्ध आहे, त्याचें रंजनयुक्त ध्यान करण्यांत आपण तल्लीन होणें, अस्या गोष्टी घडण्याला ज्याच्या योगानें बाध होतो असें माझ्या ठायीं कांहीं गुप्त पाप असेल. तर तें कोणतें आहे? हाय मला ठाऊक नाहीं. आपल्या अंतःकरणाचें कठीणपण व अपश्चात्तापीपण यांचें निमित्त माझ्यानें करवत नाहीं. जेव्हां मी आपल्या अंतःकरणाकडे आणि आपल्या गतायुष्याकडे दृष्टि लावून पाहतें, तेव्हां कल्पना व शब्द व कृत्य असें कांहींच प्रीतिपात्र माझ्या दिसण्यांत येत नाहीं. तर मग ज्याच्या ठायीं अपरंपार पवित्रता आहे आणि ज्याच्या वासस्थानांत ईश्वराची प्रभा भरली आहे, त्या स्थानीं त्या देवाच्या दृष्टींत माझी वर्त्तणूक किती द्वेष्य असावी. असा विचार करीत असतां मी आपल्याविरुद्ध कडु गोष्टी लिहितें, आणि मला भय होतें कीं माझें अंतःकरण दुसऱ्या जनांच्या पेक्षां अधिक कठीण व काळें आहे. हे धन्य उद्धारका, तुजवांचून मी केवळ निरुपाय व निराश आहें, असें माझ्या अनुभवास येतें. ह्मणून मी आपणाला तुझ्या स्वाधीन करितें. होय, मी आपणाला तुझ्या पायांवर घालून ह्मणतें कीं मजकडे एकदा कृपादृष्टि लाव, यासाठीं कीं हा माझा अशुद्ध आत्मा तुझ्या रक्तानें धुतला जावा, तो धन्य पवित्र आत्म्यानें शुद्ध केला

जाऊन तुझ्या प्रीतीच्या स्वच्छ व शुभ्र वस्त्राने पांघरविला जावा. अहा हा आश्रय मला नसता, माझ्या अंतःकरणाच्या खोडीपासून मला हें लपण्याचें ठिकाण नसतें तर मला केवढी निराशा झाली असती. अहा हें कदापि न व्हावें कीं मी परात्पर देवाच्या कृपेवर भरवसा ठेवून पाप करण्यांत जगेन. मला जें बोलावणें व निवडणें झालें, तें खचीत करण्यासाठीं म्या विशेषेंकरून लगट करावी. हे देवा, पूर्वींच्या पेक्षां मजवर मिश्शनेरी आत्म्याची अधिक वृष्टि कर, मग खीस्त जो माझा प्रिय तारणारा त्याची सेवा करण्यांत मी अति हर्षाने आयुष्याचा खर्च करीन आणि आपण खर्चलें जाईन.

सन १८५०. हे पवित्र बापा, मी तुझा आभार मानितें यासाठीं कीं कांहींसा अधिक प्रकाश आणि कांहींसी अधिक प्रीति माझ्या अंतःकरणावर झाल्यावरून तें पाझरलें आहे. हे पवित्र बापा, मी तुजला स्तवितें कीं अधिक विश्वासाने व अधिक संतोषाने मला तुझी प्रार्थना करितां येती. अहा जो उजेडाचा व प्रीतीचा झरा त्या तुजपाशीं म्या अधिक संनिध यावें यासाठीं माझें साह्य कर. जर त्वां मला अंधारांत माझी एकचएक आशा आणि माझा एकचएक आश्रय यांपासून दूर भ्रमण करितांना सोडिलें असतें तर तें यथान्याय झालें असतें. योसेफ ज्याला फारो राजाने बंदीशाळेंत घातलें होतें त्याविषयींचें जें निरूपण ज्ये या साहेबाने केलें आहे त्याचें पठण आज सकाळीं करीत असतां म्या ईश्वराची उपकारस्तुति केली, यासाठीं कीं सर्व युगांत त्याने आपल्या अवघ्या अनुसरणारांतील प्रत्येक जनाचें चांगलें केलें आहे. जे जे जन बंदीशाळांत, अग्निज्वाळांत आणि कोंड्यांत घातले गेले होते, त्यांच्या जवळ तो सदा होता.

रोगांत आणि मरणांत तो नेहेमी त्यांस प्रत्यक्ष झाला होता. त्याचें पवित्र नाव स्तुत्य होवो. तो सदासर्वदा तसाच आहे. त्याचीं सर्व वचनें ख्रीस्त येशूकडून होय व आमेन असीं आहेत. तर हे ईश्वरा, म्या तुझीं वचनें आत्मसात करून त्यांच्या द्वारा तुझ्या सिंहासनासमोर येऊन आग्रहाने विनंती करावी. याविषयीं तूं माझें साहाय्य कर.

आह्मा मंडळीची प्रार्थनेची पोथी ही काल सायंकाळीं फार मनःप्रिय होती. ख्रीस्ती भाऊ विनयाने भरून प्रार्थना करण्याविषयीं एवढे उत्सुक झाले कीं मला इकडच्या मंडळीस चांगला दिवस उजेडला आहे, असी आशा झाली. अहा आमच्या तारणाचा अधिकारी जो प्रभु येशू ख्रीस्त त्याचें गौरव जसें योग्य तसें मजकडून आणि मंडळींतल्या प्रत्येक जनाकडून प्रसिद्ध व्हावें. फार वेळपर्यंत आह्मी आपले पंख मिटवून संसारीपणाच्या मातीने लिपिले आहेत. पण हे प्रिय प्रभू, आतां तूं आह्माला सहाय हो, यासाठीं कीं आह्मी उठावें, आणि जी धूळ मळघावितो ती झटकून टाकून आह्मी गरूडासारखें पंखानीं उडावें. मग आह्मी जेथील संग्रह सांठवीत आहों त्या उत्तम देशीं पोहंचून वस्ती करावी. याविषयीं उत्कंठित होऊन आयास करीत आहों असें आह्मी जगांतल्या मनुष्यांस दाखवूं. मी उतारवेळीं स्त्रीलोकांचें प्रार्थनापुस्तक वाचण्यास जाणार आहें. तेव्हां प्रभूने ह्या निरूपाय पापी किडेसंगतीं यावें, आणि प्रीतीने व अनुतापाने सर्व बहिणींचीं हृदयें पाघळवावीं.

गिरोंदिस्त असी जी बखर लामार्तीन साहेबाने लिहिली तिचें अध्ययन म्या आज संपविलें. अहाहा! अपराध, महत्वाकांक्षा आणि अघोर उत्संकळ हांवा यांचें कथन कसें

तींत आहे! आपल्या मनुष्यजातीविषयीं मला लाज वाटती. होय, आपल्या स्त्रीजातीविषयीं मला लाज वाटत आहे! अहा! ज्याला शांतिकारक शुभवर्त्तमानाची नीतियुक्त मर्यादा नाहीं, असा पुरुष काय आहे! असी स्त्री काय! वेडेपण मनुष्याच्या हृदयांत आहे, तो सर्व गुणानीं भ्रष्ट आहे, असें ती खबर वाचितांना कोणाच्या मनांत आल्यावांचून राहील? शास्त्रद्वेषी ह्मणजे दांभिक तत्वशोधक यानीं जनस्वातंत्र्याचा पुरस्कार करण्याचें सोंग घेऊन कसे दारूण वध व अघोर मारामाऱ्या केल्या! अरेरे अभाग्य फ्रान्स देशा! तुझें जें पात्र अपराधाने आणि अंधाधुंदीने भरलें होतें, तें बहुवार रक्ताने उचंबळून सांडिलें आहे. तुझ्या मातबर जनांचें रक्त तीन वेळांपेक्षां अधिक नद्यांसारिखें तुझ्या मार्गांत वाहिलें आहे. पण जनसंबंधी आणि धर्माचारसंबंधी मोकळेपण हें तुझ्या अवांक्यांत येत नाहीं. याचें कारण काय आहे? हाय! त्याचें कारण हेंच आहे कीं तूं शांतीच्या धन्य धर्मसंप्रदायाने आपल्या देवापासीं त्याचा शोध करीत नाहींस. राष्ट्राचें राज्य परिवर्त्तन झाल्यापूर्वीं त्याला प्रकाशन झालें होतें, असें ह्मटलें आहे. पण जेथून तें प्रकाशन उमटलें तेथच्या जाग्याची गंधकयुक्त घाण त्याला लागली. हे ईश्वरा, न्यायीपणाच्या सूर्याने त्वरेने उगवून त्या अंधारमय देशावर आपले प्रकाशकारक किरण पाडावे असें कर.

मंगळवारीं स्त्रीलोकांची प्रार्थनेची पोथी फार विशेषेंकरून मनोगम होती. मंडळींतल्या प्रिय बहिणींनीं अत्यंत आग्रहाने आपआपले भर्त्तार, लेंकरें, शेजारी, इष्टमित्र, यांविषयीं देवाची प्रार्थना केली, आणि आपणास अधिक विनय प्राप्त होण्याविषयीं फारच विनंती

केली. मी रात्रीं देवाच्या भजनस्थानीं गेलें- "बिघडलेल्या हृदयाचा मनुष्य आपल्या मार्गांनी तृप्त होईल," या वाक्याचें विवरण करून रेवरेन्ड जोन्स साहेबाने उपदेश केला. तो जें सर्व बोलला त्यावरून मला दोष आहे असें ठरलें. मला वाटलें कीं माझ्या अंतःकरणांत बिघाड आहे, असें केवळ नाहीं. तर माझें बोलणें व चालणें जसें योग्य तसें ख्रीस्ताच्या पतकराला शोभत नाहीं. पण माझी विपरीत वर्त्तणूक जगाला दिसली आहे. तर वस्तुतः मी आपल्या मार्गांनी तृप्त झालें आहें. आणि म्यां आपल्या कर्मांचें फळ भोगिलें आहे. त्यामुळें मला जगाचें यथायोग्य भय वाटलें नाहीं. मी त्याच्या चालीस अनुसरलें आहें. देवाच्या दृष्टीचा प्रकाश पावल्यावांचून मी बहकून संदेहांत आणि अंधारांत चाललें आहें. माझ्या तारणाऱ्याकडे माघारें जाणें हें मला सवघड वाटलें नाहीं. सुधारण्याविषयीं म्यां जो जो निश्चय केला तो तो मोडिला आहे. खरेंपण ज्याच्या योगाने मी दोषी ठरलें त्याच्या द्वारेंकरून माझें हृदय पाघळलें, असें नाहीं. अहा त्या योगाने माझें मागें फिरणें केवढें अघोर सिद्ध झालें!

"सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो कीं "माझ्या घरांत खाणें असावें ह्मणून तुह्मी अवघे दाहावे भाग कोठारांत आणा, आणि तुह्मी असें करून मी तुह्मासाठीं आकाशाच्या खिडक्या उघडून ज्याला पुरती जागा मिळणार नाहीं, एवढा आशीर्वाद तुह्मासाठीं घालीन कीं नाहीं, असी माझी परीक्षा करा." यावरून जोन्स साहेबाने बुधवारीं उपदेश केला तर तें वाक्य आवडतें आहे खरें. पण, अहाहा! मला माझ्या देवाला व उद्धारकाला जे जे दाहावे भाग द्यावयाचे

आहेत ते देण्याविषयीं माझी अवज्ञा त्या वाक्याने कसीं प्रगट झाली. हे प्रभू,तुजकडेच माझें साहाय्य आहे. सायंकाळीं हबशी मनुष्याने दासपणाच्या अवस्थेविषयींचा उपदेश केला. त्याचें म्या ऐकिलें. त्याला वाचणें आलें नव्हतें. तथापि त्याची स्मरणशक्ति आणि वाचाशक्ति फारच विशेष होती. अहा, हबशी देशांतील काळ्या पुत्रानी उतावळी करून आपले हात देवाकडे उभारावे.

मंडळींतल्या मनुष्यानी उपवास व प्रार्थना करण्याचा दिवस मानिला. मी देवासमोर धुळीने आपणाला नीच करण्यांत आसक्त झालें. पण हाय जसें म्या इच्छिलें तसी मी नीच झालें नाहीं. अहा माझ्या हृदयावर दडपण झालें असतें तर बरें. पापी मनुष्यांचें तारणसाधन करण्याविषयींचें अंगचें वजन असलें दडपण असावें. हे प्रभू येशू, माझें स्वनीचपण होणें आणि अजरामर आत्म्यांचें जें मोल त्याचा उमज होणें ह्या गोष्टी घडण्याला काय अडचणी होतात, हें मला दाखीव. मी आपल्या अंतःकरणांत कांहीं तरी पापवासना अथवा कोणतीहि वर्ज्य गोष्ट लपवून ठेवीत आहें कीं काय? हे प्रिय तारका, तुजकरितां मी जिला सोडावयास इच्छीत नाहीं, असी कोणती तरी गोष्ट आहे काय? असली तर म्या सर्वतः तिचा त्याग करावा ह्मणून ती मला दाखीव.

कितिएक सप्तकांपर्यंत कांहींच पाऊस पडला नाहीं, इतक्यांत आकाश पितळासाखें आणि भूमि दारूसारिखी झाली. पण आज सकाळीं संजीवनकारक पाऊस पडला. आहा हा निर्धार केवढा संतोष करणारा आहे कीं परमेश्वर पृथ्वीची पाहणी करून तिजवर पाऊस पाडितो,

आणि त्या योगाने तिला सफल व सुंदर करितो. हे धन्य देवा, तुं मला उपकार मानणारें हृदय दे. हे पवित्र बापा, तुं आपल्या बंडखोर लेंकराचें कल्याण व स्वास्थ्य यांविषयीं केवढा विचारशील व सहृदय आहेस. तूं आपल्या सत्तेने ही सृष्टि चालवितोस तरी तूं आह्मासाठीं पृथ्वी सुंदर व शोभमान करितोस. तूं गवताला हिरवेपण, गुलाबाच्या फुलाला सुवास व कांति, आणि सर्व प्रकारच्या फुलांस त्यांचे त्यांचे उज्वल रंग देतोस. स्वर काढणारे सपक्ष जीव आह्मासाठीं माधुर्याने गात असतात. नद्या व ओंहळ खडकावरून खळखळ वाहून मंजूळपणाने चालतात, आणि वळणें घेऊन कुराणांतून वाहतात, आणि त्यांला पिकाऊपणा आणितात. ज्याचा अदृश्य हात वायूच्या भांडारांतून मंदवायू सोडून त्यांच्या द्वारा झाडांच्या पाल्यांस आह्मावर वारितो, त्याचें चातुर्य व प्रीति ते पाले हालून मधूर शब्दानी सांगत असतात.

नेमलेल्या वेळेस हा पवित्र विश्रांति घेण्याचा दिवस केवढ्या गोडपणाने या जगावर उगवत असतो. त्याच्या योगाने मनुष्याच्या भागलेल्या आत्म्याला व देहालाहि संजीवन होत असतें. जे कोणी आपल्या अंतःकरणांत ईश्वराला उंच मानितात आणि त्याच्या शाब्बाथाला पवित्र मानून पाळितात, त्यांसाठीं जें अमोल्य वतन राखिलें आहे त्याचा विसार या दिवसीं प्राप्त होत असतो. मानस व्यापार करणें हें आज मला अवघड झालें आहे. ख्रिस्ती मनुष्यानी पृथ्वीचें मीठ व्हावें याच्या अगत्याविषयीं उपदेशकाने सकाळीं बोध केला, आणि उतारवेळीं त्याने तारणाचें सुवर्त्तमान गाजविलें, पण त्याची गोष्ट माझ्या ध्या-

नांत आली नाहीं. असी झोंपेची गुंगी व सुस्ती मला फिरून येणार नाहीं. आली तरी प्रभूच्या दिवसीं येणार नाहीं, असी माझी आशा आहे. हे प्रभू, तूं अनंतकाळच्या गोष्टींविषयीं मला यथायोग्य आस्था दे.

काल कांहीं गर्जना व हर्षकारक सर आली होती, आणि या सकाळीं पाऊस फार साजण्याने भूमीवर पडत आहे. अहा ही कल्पना कसी मनःप्रिय आहे कीं ईश्वराची फार दया त्याच्या सर्व कामांवर आहे. मी त्याच्या ज्ञानाच्या व दयेच्या व प्रीतीच्या शाळेंत मंद शिकणारी झालें, आणि त्याने माझें चांगलें शिक्षण केलें आहे तरी मांद्यामुळें म्या केवळ अल्प अभ्यास केला आहे. यावरून मला फार विस्मय होतो. तो कसा पृथ्वीचा सांभाळ करितो आणि आपल्या असंख्य जीवांच्या गरजा पुरवितो. माझा त्याजवर यथायोग्य भरवसा नाहीं. यांत फारच आश्चर्य आहे. अहा त्याच्या कृपेची वृष्टि त्याच्या नीतियुक्त द्राक्षमळ्यावर पडावी आणि त्या योगाने त्याच्या लेंकरांच्या तान्हेल्या आत्म्यांस प्राशन प्राप्त व्हावें. विशेषेंकरून आमच्या कुटुंबाच्या जनांस तें संजीवन करणारें प्राशन होत असावें.

सन १८९१. म्या हा निश्चय केला कीं मी प्रत्यहीं आमच्या कुटुंबांतील प्रत्येक जनासाठीं देवाची प्रार्थना करीन. मी मागेन कीं ज्यांचें अगत्य सर्वांस विशेष आहे असे प्रचंड आत्मिक आशीर्वाद माझ्या आईबापांस आणि प्रत्येक भाऊ व प्रत्येक बहीण यांस आणि यांच्या सर्व लेंकरांस मिळावे. हे ईश्वरा, तूं मला दृढ विश्वास दे, यासाठीं कीं म्या केवळ मागावें असें नाहीं. तर म्या मागून पावावें.

म्या वारंवार आपल्या आयुष्याच्या धोरणाविषयीं विचार केला आहे आणि तें बहुत प्रकारानी वेगळ्या कामांत खर्चिलें असतें तर बरें होतें, असें आपल्या मनांत आणिलें आहे. प्रभूने माझ्या वाटा निटाविल्या आहेत, असें मानणें हें अवघड वाटलें आहे. कां तर म्या आपलेच मार्ग निवडून घेतले आहेत, असें दिसलें. हा वितर्क सुखकारक नाहीं; ह्मणून तो सोडून द्यावा, असी माझी इच्छा आहे. कारण कीं ईश्वराने माझें भाग्य नेमिलें आहे, असी माझी खातरी आहे, आणि याप्रमाणें मला प्रतीति आली असती तर माझी तृप्ति झाली असती. कां तर देवाचें ज्ञान अनंत आहे.

काल आह्मी आपल्या स्वातंत्र्याचा पंचाहत्तरावा वार्षिक सण पाळिला. केवढ्या विस्मित प्रकारें देवाने या राष्ट्रावर आशीर्वाद केला आहे. त्यामुळें आह्मी खरोखरीं त्याचा आभार मानावा. एथच्या राष्ट्रिय सणाचा समारंभ करणारे हे या देशांतील पूर्वजांचे वंश आणि परदेशी लोक असे होते. एथच्या जनांसारिखे ते परदेशी हास्ययुक्त तोंडानी उत्साह करून कौतुकांचा उपभोग करीत होते. ते दुःखापत्ति आणि जुलूम यांपासून पळून एथे आले आहेत. त्याप्रमाणें त्यांच्या मनाला दासपणापासून सोडवण व्हावी. जसा सकाळीं सूर्याच्या प्रकाशानें अंधार पळून जात असतो तसें देवाच्या सत्यतारूप प्रकाशाने त्यांचें अज्ञान व पाप पळावें.

माझें मन हर्षयुक्त नाहीं. माझ्या जगण्याचें पापत्व, प्रभूच्या सेवेंत माझी अनुपयोगिता, त्याच्या विषयीं माझें अज्ञान, माझ्या विश्वासाचें अशक्तपण, ख्रिस्ती स्थिरतेविषयीं माझें उणें, माझ्या प्रिय तारणाऱ्याचें विस्मरण होण्याविष-

यींचा माझा कल, आणि प्रीति, व हर्षयुक्त मान्यता, यांविषयीं माझें उगेपण, या सर्वांच्या योगानें माझें हृदय शोकाकुल झालें आहे. माझें कृत आणि क्रियमाण आचरण, यांचें अवलोकन करून मला केवळ दुःख होत असतें. येशू ख्रीस्ताच्या योगानें देवाचें जें गौरव, त्यावरून मला हर्ष नाहीं. थोड्या दिवसांत म्या बहुत प्रार्थना केली आहे. म्या वेळोवेळ आपणाला देवाच्या स्थंडिलावर ठेवून विनंती केली आहे कीं त्यानें प्रसन्न होऊन हें जीवार्पण पतकरावें, आणि जसें त्याच्या दृष्टींत चांगलें दिसेल, त्याप्रमाणें त्यानें माझा उपयोग करावा. पण अहाहा! मला भय आहे, मला भय हेंच आहे कीं कांहींतरी जें मी पाहत नाहीं, पण देव पाहतो, ज्याच्या योगानें मला आशीर्वाद होत नाहीं, तें या कपटी व अतिदुष्ट अंतःकरणांत लपलें आहे. मी अनुदिन हाक मारून मागतें कीं प्रीति, हृदयाची शुद्धता, श्रद्धा, नम्रता, ह्या मला प्राप्त व्हाव्या, यासाठीं कीं म्या उपयोगी व प्रकाशमान ख्रिस्ती होऊन आपल्या पतकरलेल्या धर्मसंप्रदायाला शोभावें.

सकाळीं देवभजन करते वेळेस मला आणि माझ्या बंधुजनांला न्यायीपण व पवित्रता प्राप्त होण्याविषयीं माझ्या ठायीं आस्थायुक्त भावना उत्पन्न होतात. डोळ्यांत अनिवार आसवें येतात. पण देवाची प्राप्ति होण्याविषयींची ही माझी आसक्ति दिवसभर राहत नाहीं. मध्यान्न काळीं आणि सायंकाळीं जेव्हां मी देवीची प्रार्थना करितें, तेव्हां एवढा भक्तीचा आवेश मला येत नाहीं. अहा, म्या त्याजवळ असावें. पवित्रतासंबंधीं आणि नष्टोपाय जगावरच्या प्रीतीसंबंधीं म्या ह्या तारिखें व्हावें. हे कृपाळू देवा, म्या

यथायोग्य प्रकारें आपल्या भंगुर आयुष्याचा प्रत्येक क्षण मोजून कमावा, ह्मणून तूं मला सुज्ञान व कृपा दे. जसें तें मला आणि इतर जनांला फार विशेषेंकरून उपयोगी होईल, त्याप्रमाणें म्या त्याचा उपयोग करावा. हे प्रिय प्रभू, म्या आपलें स्वाभाविक आलस्य सोडून नाहींसें करावें, आणि उद्योगी शिष्य व्हावें, यासाठीं तूं माझें साह्य कर. हे प्रिय तारका, तूं प्रसन्न होऊन आपल्या सेवेंत माझा उपयोग करून घे. तूं परम पराक्रमी आणि सर्वज्ञानी आहेस. यामुळें माझ्या हलक्या व अपूर्ण सेवेची तुला गरज नाहीं खरी. तथापि अहा, तूं, बापुडें, मृतक, अस्या या पात्राकडून आपलें गौरव करून घे.

ज्या प्रकारानीं माझा आकाशांतील बाप मजवरची आपली प्रीति दाखवींत असतो, ते कितीक आहेत! जे उपकार मजवर होत असतात, त्यांची गणना मला होत नाहीं. तो मला पोषीत आणि वस्त्र नेसवींत असतो. जसा जाणू हा माझा देह मातींत मिळणार नाहीं, पण जगून तो त्याच्या आश्चर्यकारक विलक्षण शिल्पकर्माविषयीं अठवणूक असा होणार आहे, याप्रमाणें तो त्याचें पोषण व भूषण करीत असतो. जसी जाणू मी त्याच्या हातांतून कांहींतरी घ्यायास पात्र आहें, तसा तो पराकाष्ठेनें मनाचें बल, व इष्टमित्र, यांसुद्धां मला आरोग्य व शक्ति देत असतो. पण माझ्या आयुष्यांतील प्रत्येक घटिकेस पाप करण्यानें मी उपकार्यत्वास अंतरलें आहें. अहा, जे जे सांसारिक व आत्मिक उपकार मजवर होतात, त्यांचें केवढें मोल माझ्या प्रिय खंडणी करणारानें दिल्हें. याचा विचार माझ्या हृदयांत ठसल्यावरून माझी देवाविषयीं अकृतज्ञता

नाहींसी व्हावी, आणि म्या त्याची स्तुति करीत असावें. सर्व कल्पना करण्यांत, सर्व बोलण्यांत आणि सर्व आचरण्यांत, म्या आपल्यापुढें त्याची इच्छा ठेवावी, असी मला उत्कंठा आहे.

अणखी एक वाढदिवस मला प्राप्त झाला आहे. म्या आशा धरून प्रार्थिलें आहे कीं म्या आपले दिवस असे मोजावे कीं जेणेंकरून चित्त ज्ञानाकडे लागेल. अहा, ज्याने आपल्या अमोल्य रक्ताने मला खंडून घेतलें आहे, त्याच्या सेवेंत म्या अधिक ज्ञानी, अधिक उद्योगी, आणि अधिक स्वार्थ नाकारणारी व्हावें, असी मला फारच इच्छा आहे. प्रातःकाळीं म्या घरोघरीं जाऊन धर्मसंबंधी वह्यांच्या पोथ्या दिल्ह्या. प्रिय बाप माझ्या संगतीं फिरला. आह्मी एकशें वीस कुटुंबांची भेट घेतली. त्यांतील पुष्कळ जर्मन लोक होते. त्यांला इंग्रजी भाषा कांहींच समजली नाहीं. पण त्यांला त्यांची भाषा वाचतां येत होती, आणि त्यानी संतोषाने त्या पोथ्या घेतल्या. कांहीं आत्मिक सत्यता सांगून त्यांचें हित करावें, ही उत्कंठा माझ्या आत्म्यांत भरली.

पार्सनस मडम साहेब जी ख्रीस्तसंबंधीं प्रिय मित्रबहीण, ती मृत्यु पावली आहे, असें वर्तमान म्या आतांच ऐकिलें आहे. माझ्या डोळ्यांत आसवें येतात. कां तर मंडळीची आणि पाढरीची भारी हानि झाली आहे. तिचा भर्त्ता आणि लहान लेंकरें तिजपासून वियुक्त होऊन फार खिन्न झालीं आहेत. तिजसारिखें कोण त्यांचें चिंतन व समाधान करील? तिजसारिखें कोण मंडळीची वृद्धि पाहून देवाची प्रार्थना करील? माझी खातरी आहे कीं तिच्या प्रार्थना देवाजवळ स्मरल्या जाऊन तिच्या शोकातुर कुटुंबाला, आणि ज्यांवर तिची प्रीति होती, त्या लोकांलाहि आशीर्वाद देणाऱ्या

होतील. तिच्या सर्व वर्तण्यांत ती फारच प्रियंकर होती. ती ख्रीस्ताच्या सेवेंत अति आसक्त होऊन वर्तली. आतां मरणाच्या योगानें तिचा आत्मा तिच्या भग्न व दुःखित झालेल्या देहापासून मुक्त झाला असतां ती जगतां, आणि ज्यानें तिजला एवढें प्रियगुणक, एवढें शुद्ध, आणि दिव्य दूतांसारिखें एवढें सुंदर केलें होतें, त्याच्या बरोबर ती राज्य करीत आहे. मी आपल्यास असें विचारितें कीं भार्या व माता जी आहे, आणि वधस्तंभाची विश्वासू व उपयोगी सैनिकीण असी जी, ती घेतली जाती, आणि जी अयोग्य ती मी ठेविली जातें. तर याचें कारण काय आहे? अहा, या दुःखाच्या गोष्टीनें माझें आणि तिच्या सर्व आप्तजनांचें हित व्हावें.

माझ्या पाळकानें येऊन आपली मृत्यु पावलेली भार्या व माझी प्रिय मित्र, इच्या अंतकालाविषयीं अगखी कांहीं गोष्टी सांगितल्या. तिच्या अंतीं तिच्या मनांत शांति आणि आशा भरली. मरण हें केवळ देवाच्या विशाल सृष्टींतील एका खोलींतून दुसऱ्या खोलींत अभीष्ट गमन करणें आहे, असें तिला वाटलें. तिनें संतोषानें आपलीं दोन बापडीं लेंकरें देवाच्या हातांत सोपून दिल्हीं. त्यांतील वडील या हिमकाळीं मला मिळावें, असें माझ्या मनांत आलें होतें. पण ईश्वरानें आपल्या ज्ञानानें असें ठरविलें नाहीं. हे ईश्वरा, येशू ख्रीस्ताकरितां मला आपल्या सेवेंत फार काम करावयास लाव, आणि जें जें कर्त्तव्य तें तें करायाला मला विश्वासू कर. म्या दोन दिवसांत ऐरिश व जर्मन यांच्या एकशें त्रेपन्न कुटुंबांमध्यें वह्या नेऊन दिल्ह्या. त्यांसीं फार बोलावें, यासाठीं मला अवकाश व शक्ति नव्हती. परंतु म्या प्रार्थना करून

मागितलें कीं या वह्यांच्या योगानें देवाचें खरेपण त्यांच्या अंतःकरणांत ठिबून राहावें.

हा संवत्सर समाप्त होऊन जात आहे. त्यांतील ज्या घटिका म्या अयोग्य प्रकारें घालविल्या आहेत, त्या पुन्हा येतील, असें माझ्यानें करवत नाहीं. या जगांत वर्षानुवर्ष वांचणें ही गांभीर्याची गोष्ट आहे, असें मला भासतें. या वर्षाच्या प्रत्येक क्षणांत मजवरचे आणि आमच्या कुटुंबांतील प्रत्येक जनांवरचे उपकार भरले आहेत. फारकरून आह्मां-तील कोणाला दुखणें आलें नाहीं. मृत्यु हा गांभीर्याचा दूत आह्मांतील कोणाच्याहि वासस्थानांत आला नाहीं. अजून आमचीं आईबापें जगून आह्मा लेंकरांस आशीर्वाद-रूप आहेत. अहा, मी आपल्या वरले परमेश्वराचे सर्व उपकार त्याजवळ कसे फेडूं! इष्टमित्र हे त्याचे पृथ्वीवरले उपकार आहेत. माझ्या अंतःकरणांतली प्रीति करण्याची शक्ति फार मोठी आहे. प्रीति निरंतर माझ्या बंधुजनांवर होऊन वाहत आहे, आणि त्यांची प्रीति मजवर होत नाहीं तर मला सुख होत नाहीं. मी देवाला स्तवितें यासाठीं कीं मी उत्तम देशाकडे यात्रा करून जात आहें, तोंपर्यंत त्यानें मला मित्रहीन करून सोडिलें नाहीं. त्याची प्रीति एकरूप आहे. हा तर विशेष उपकार होय. याकरितां माझ्यानें त्याची पुरती स्तुति कशी करवेल! माझी त्यासीं अनुपकारिता व अविश्वासूपण, माझा त्याजविषयीं विसर व अमान्यता, यांवरून जश्या मनुष्याला तश्या भावना जर देवाला असत्या तर मी आतां कोठें गेलें असतें. मी नरकां-तल्या अपार दुःखामध्यें राहिलें असतें. अरेरे! म्याच

आपला नाश केला आहे. पण देवाच्या कृपेवर व सहनशीलतेवर माझी आशा आहे.

सन १८५२. देवाने माझें दमन करावें, आणि माझी परीक्षा करून जें माझ्या अंतःकरणांत आहे, तें मला दाखवावें, यासाठीं जो मार्ग मला माहीत नव्हता, त्यांतून त्याने मला चालविलें आहे. त्याने मला मोठें व भयंकर अस्या रानांत चालविलें आहे, असें नाहीं. तर ज्या देशांत पाण्याचे ओहळ, झरे, हे आकाशांतल्या भाकरीसुद्धां आहेत, त्या चांगल्या देशांत त्याने मला नेलें आहे. जे वृक्ष पाण्याच्या ओहळांजवळ लाविले होते, त्यांच्या छायेंत मी फार संतोषाने बसलें, आणि त्यांचीं फळें माझ्या रसनेस गोड लागलीं. पांखरें त्यांच्या फांद्यांवर बसून मधुर स्वरानीं गात होतीं. इतक्यांत स्नेही जन ह्मणत होते कीं प्रत्येक श्वासवानाने ईश्वराला स्तवावें. मागल्या वर्षाच्या आरंभीं जिने देवाचें स्तवन गायिलें, असी एक प्रिय मित्रीण व शेजारीण त्याच्या समाप्तीपूर्वीं तिच्या उद्धारकाच्या उरासीं घेतली गेली. हर्ष व शोक या प्रकारचे जे भिन्न भिन्न फेर माझ्या अनुभवास आले आहेत, त्यांच्या योगाने पाप व अकृतज्ञता असीं जीं मला माहीत झालीं आहेत, तीं त्या मनोविकारांवांचून माहीत झालीं नसतीं. हे ईश्वरा देवा, म्या ह्या वर्षाच्या आरंभींच तुझ्या सेवेंत तत्पर होऊन वर्त्तावें, यासाठीं माझें साह्य कर. हे ख्रीस्ता, त्वां जें शाश्वत मन मला दिल्हें आहे, त्याची वृद्धि करायास मला सहाय हो. शोध, तर्क, ध्यान, भास, स्मरण, या प्रकारचे मनोव्यापार करण्याच्या शक्ति त्वां माझ्या ठायीं उत्पन्न करून ठेविल्या आहेत. तर तुझ्या साह्येंकरून म्या त्यांची प्रौढी करून तुझ्या सेवेस समर्पून

द्याव्या. माझ्या अपूर्ण चाकरीने तुझा अनादिसिद्ध मान वृद्धिंगत होत नाहीं खरा. तथापि तुझें नाव स्तुत्य होवो, कारण कीं त्वां मला आपल्यास सहकारीण असें केलें आहे. अहा, हीच माझी खातरी आहे कीं तुजवांचून माझ्याने कांहीं करवत नाहीं. अहा, जीवदशेंतील सर्व जे जनकादि संबद्ध जन, त्यांविषयींच्या कर्त्तव्यकामांत तूं मला प्रसन्न होऊन विश्वासू असें कर.

हे ईश्वरा, तूं आमचीं पावलें सिद्ध कर, आणि वस्तीच्या सीमा नेमून ठेव. मनुष्यांमध्यें जी पदवी व जें वजन मला प्राप्त व्हावें ह्मणून उचित आहे, तें मला दे. अहा, म्या अधिक उपयोगी होऊन वर्त्तावें. माझा विश्वास देवावर अधिक दृढ व्हावा. म्या केवळ दृष्टीने न चालावें. तर विश्वासाने चालावें. देवाच्या प्रिय लेंकरांतील कोणीएक त्याच्या सर्व आज्ञा मानितो, आणि जें जें होणार आहे, त्याविषयीं उद्विग्न न होऊन सावधपणाने त्याकडे जाण्याच्या मार्गाने चालत आहे, अस्या जनाचें दर्शन किती सुंदर आहे. काल म्या आपल्या प्रिय बापाच्या संगतीने जाऊन एकशें आठ कुटुंबांची भेट घेतली. त्यांतील शाण्णव कुटुंबें जर्मन होतीं. सर्वांनी सुखसंतोषाने पोथ्या घेतल्या. त्यांतील बहुतेकांचीं वासस्थानें ठाकठीक नसून सुखसाधनरहित दिसलीं. पण जेव्हां आमच्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या धर्माने त्यांचीं अंतःकरणें प्रकाशित होतील, तेव्हां त्यांच्या घरांचें ओंगळपण व अव्यवस्था फारकरून नाहींसी होऊन जाईल. मी तीन चार कोस चालून फारच कष्टी होऊन घरीं पोहंचलें. तथापि देव मला धर्मपुस्तकांचा प्रसार करायास लावितो, यामुळें मी त्याला स्तविलें. जर्मन इत्यादि

परदेशी क्याथोलिक या बापड्या जनांशीं संभाषण बहुधा मला करतां येत नाहीं. परंतु ज्याने सर्व पाण्यांजवळ पेरायाला अह्मास आज्ञा दिल्ही, तो हीं पेरलेलीं बीजें उगवून फलांस आणील, असी माझी खातरी आहे.

अहा, धर्मसंप्रदायसंबंधी मला संजीवन व्हावें, ही माझी इच्छा आहे. म्या आपल्या हृदयासीं विचार करावा, आणि देवाच्या ऐश्वर्याविषयींचें अधिक मनन करावें. या योगाने म्या नम्र व्हावें, आणि फिरून कदापि आपणाला न उंचवावें. हे देवा, तूं मला शोधून माझें हृदय जाण; मला पारखून माझ्या भावाना जाण, आणि मजमध्यें विपरीत चाल आहे, किंवा नाहीं, हें पाहून त्वां मला सर्वकाळिक चालीने वागवावें. मी आपल्याला जाणावयास इच्छितें. आपल्या ख्रिस्ती धावेंत मला काय अडवितें. मला पवित्र आत्म्याचा गुणांश प्राप्त होण्याविषयीं कोणतें निवारण आहे? विश्वासाने व आनंदाने देवाची प्रार्थना करायाला मला काय अटकाव आहे! देवरहित आणि आशाविरहित असे जे जगांत आहेत, त्यांच्या नष्ट अवस्थेविषयीं जें माझ्या डोळ्यांस अंधळें, आणि माझ्या अंतःकरणास कठीण करितें, तें काय आहे? अस्या गोष्टी जाणण्याची मला फारच उत्कंठा आहे. अहा, जगाच्या मांडण्यापूर्वीं ज्याने मजवर प्रीति केली, त्याची सेवा करण्यांत म्या अधिक विश्वासू व उद्योगी व्हावें.

वीस तरुण मनुष्यें आमच्या मंडळींत मिळालीं. म्या त्यांसीं जो करार केला, त्याविषयीं विचार करून आपल्या मनांत आणिलें कीं हीं तरुण बहीणभावंडें माझी ओळखी नाहींत, आणि कदाचित् त्यांची ओळख मला होणार नाहीं. तर मग मी तो करार कसा पाळीन? एका मंडळींतल्या

मनुष्यानी यथाप्रसंग एकमेकांची ओळख करून परस्परांचें हित करण्यांत आस्थावाईक व्हावें, हें यथोचित आहे. कारण कीं ते एका मोठ्या कुटुंबांतला एक विभाग असे आहेत. या कुटुंबाचा वडील भाऊ आह्मासाठीं वासस्थानें सिद्ध करावयास गेला आहे. जसजसा आह्मांतील एकेक जन त्याच्या मागून देवाच्या घरीं जातो, तसतसें त्याला वासस्थान मिळतें.

सन १८५३. देव माझा प्रिय बाप आहे, असें मानून त्याकडे दृष्टि लावावी. तो सदासर्वकाळ माझ्याजवळ आहे. ह्मणून त्याने मला वाटेस लावून द्यावें. त्याने माझा मार्ग सिद्ध करावा, यासाठीं तो माझ्या पुढें आहे. त्याने वैऱ्यांच्या मारण्यापासून मला रक्षावें, ह्मणून तो माझ्या मागें आहे. त्याने माझ्या देहाच्या गरजा पुरवाव्या, आणि माझ्या अविनाशी आत्म्याच्या आकांक्षा तृप्त कराव्या, यासाठीं त्याचा हात निरंतर सरळला आहे, आणि त्याच्या अंतःकरणांत प्रीति भरली आहे. अशा अशा भावना उत्तरोत्तर माझ्या मनांत येत असतात. त्याचें पवित्र नाव स्तवनीय होवो. कां तर ख्रीस्त जो माझा प्रिय ज्येष्ठ भाऊ, त्याकरितां मला सर्व गोष्टींची प्राप्ति होत आहे. त्याच्या नांवाकरितां माझें नियमन व रक्षण होतें. अहा, तो माझा भाऊ आहे, असें मानण्यावरून मला केवढा संतोष होत असतो! कां तर मला एक पृथ्वींतला भाऊ होता. त्याने मजवर ममता केली. त्याने मजकरितां आपल्या स्वहिताचा त्याग केला. त्याने माझ्या मनाची विशेष प्रौढी, आणि माझ्या आत्म्याची नीतियुक्त वृद्धि फार इच्छून माझें कल्याण, व प्रतिष्ठा, व मनुष्यांमध्यें मान, यांचें संपादन करण्यांत अत्यंत

आयास केले. या गोष्टींच्या आठवणेवरून माझा प्रिय उद्धारकाची दया व अनिवार प्रीति स्पष्टपणाने ध्यानांत येती. आपल्या सर्व अपेक्षा, आपलीं सर्व संकटें, आपले सर्व शोक, आपले सर्व आनंद, आपल्या सर्व आशा, आपलीं सर्व भयें, आपलीं सर्व पापें, यांचें निवेदन मला त्यास शरण जाऊन करितां येतें, आणि जो प्रीतिपात्र पूर्ण केला जाऊन आकाशांत पार गेला, त्याच्या पेक्षां हा अधिक दयेने व सहनशीलतेने माझें ऐकेल. अहा, जर मला सहृदय तारका-जवळ आपलें अंतःकरण ओतण्याचा अधिकार नसता तर माझ्याने कसें जगवलें असतें.

सृष्टि सुस्मित होत आहे. पक्षी जसे जाणू आपल्या मोठ्या जनकाचें स्तवनगान करीत आहेत, तसे ते मंजुल-तेने गात आहेत. जसी जाणू पृथ्वी शाब्बाथ दिवसींचा विसावा, आणि काल सायंकाळींचा पाऊस पावून उजळली आहे, तसी ती सोज्वळ आहे. तर अहा, जो हर्ष सृष्टींत सर्वत्र दिसतो, त्याच्या द्वारें माझें हृदय व्याप्त होऊन कां न हर्षावें? पक्षी, वृक्ष, तृण, पुष्पें, आणि प्रांजळ सरोवर ज्यांत सूर्याचे लकलकीत किरण प्रतिबिंबतात, हीं अवघीं देवाचें सुज्ञान व प्रीति उघड करून दाखवीत आहेत, इतक्यांत माझें अंतःकरण जड व हर्षविरहित होईल काय? अहा, जी जगाच्याने देववत नाहीं, असी गोष्ट मिळण्याची मला फारच आसक्ति आहे. हे प्रिय तारणाऱ्या, मी तुझीच आहें, हें जाणावें, आणि ज्या योगेंकरून माझे सर्व संदेह नाहींसे होऊन जातील, त्या योगाने म्या प्रार्थना करून वर्त्तावें, ही माझी उत्कंठा होय. म्या एवढ्या अनुपयोगीपणाने आपलें आयुष्य घालविलें आहे कीं गतकाळाकडे अवलोकन करणें

हे मला दुःसह होतें. प्रतिष्ठेची पदवी पावायास मी जन्मलें आहें. अनर्थक कामें करण्यांत आपला वेळ घालवावी, यासाठीं मी एथे ठेविलेली नाहीं, असी माझी खातरी आहे. कांहीं काळाने आपण उद्योगी होऊन वृद्धि संपादावी, याविषयीं निश्चय करावा, असें नाहीं. तर आतांच इतर जनांचें हित पाहून अत्यंत आस्थेने उद्योग करावा.

हे ईश्वरा, तुला माझ्या सेवेचें अगत्य नाहीं खरें. तथापि अहा, तूं आपल्यासाठीं मज बापड्या पापिणीला काम करूं दे, तेणेंकरून म्या आपली तुजवरची प्रीति दाखवावी. त्वां माझें चिंतन, आणि जे जे मला प्रिय आहेत, त्यांचें चिंतन करून आह्मास संभाळिलें आहे, आणि त्वां मजवर दया करून गौरवयुक्त तरणोपाय मला कळविला. या सर्व गोष्टींविषयींची मला जी उपकारिता आहे, ती म्या तुजसाठीं काम करून दाखवावी. अहा, तुझ्या पवित्र शास्त्रांत अक्षय रत्नांची खाण आहे, असें प्रत्यहीं माझ्या अनुभवास यावें. जेव्हां जेव्हां मी त्याचें पठन करितें, तेव्हां तेव्हां कांहींतरी विपुल धनधान्य, एखादा अमूल्य मणि मला अढळावा. सद्गुणांविषयीं आणि आमचा प्रभु व तारणारा येशू ख्रीस्त, याच्या ज्ञानाविषयीं म्या नित्यांत वाढत जावें. जेव्हां मी फिरायास जातें तेव्हां म्या लोकांचें क्षेम करावें, आणि कांहीं तरी ज्ञान संपादावें. मी ज्या ज्या पुस्तकांचें पठन करीत असतें, त्यांच्या द्वारें माझ्या मनाची व अंतःकरणाची यथोचित प्रौढी होत असावी. जेव्हां मी आपल्या इष्टमित्रांच्या संगतीं असतें, तेव्हां म्या प्रचुर मानसिक व नीतियुक्त हितें घ्यावीं आणि द्यावीं. म्या उत्तरोत्तर अधिक उपयोग करावयास

सिद्ध होत जावें, यासाठीं दिवसोदिवसीं माझ्या मनाला शिक्षा होत असावी. माझ्या मनाला स्थैर्य व्हावें, आणि ज्याच्या ज्याच्या योगानें माझें आणि इतर जनांचें श्रेय वृद्धिंगत होत आहे, त्याचा साक्षेप करण्यांत म्यां तत्पर होऊन वर्त्तावें. हे ईश्वरा, तूं अनंत प्रीतीनें व ज्ञानानें माझ्या सर्व वाटा सिद्ध करीत आहेस, असा माझा पतकरलेला भरवसा आहे. तर मग आपल्या गतीविषयीं कुरकूर करण्यानें, आणि ती वेगळी असावी, असें इच्छिण्यानें, म्यां कार्यदृष्टीनें त्या भरवस्याचा नाकार न करावा. अहा, बाळकाच्या सारिखा जो भरवसा, तोच म्यां तुजवर ठेवावा, असें कर. माझ्या बुद्धीच्या द्वारा तो कदापि मला होत नाहीं. तर तो केवळ तुजपासून व्हावयाचा आहे. जेव्हां मी अंतरदृष्टि लावून पाहत असतें, तेव्हां माझ्या सर्व आंतल्या गोष्टी इतक्या पापयुक्त व अप्रीतियुक्त दिसतात कीं तूं मजवर प्रीति करीत आहेस, याची मला खातरी होत नाहीं. अहा, तूं हें दुष्ट अंतःकरण घेऊन शुद्ध कर, आणि त्याजवर आपल्याच प्रीतीचा छाप करून ठेव.

आज सकाळीं एकांतीं देवभजन करते वेळेस, देवाची जी प्रीति पापिष्ठ जगावर झाली तिजविषयीं, आणि येशू ख्रिस्त जो नवीन कराराचा मध्यस्थ, त्याकडून जो तरणोपाय सिद्ध झाला आहे, त्यासंबंधी औदार्य, ज्ञान, व गौरव, या अवाच्य गोष्टींविषयीं कांहीं मनोज्ञ भावना माझ्या ठायीं झाल्या. मला हर्ष वाटला, यासाठीं कीं उद्धारकानें जो कित्ता घालून ठेविला तो पूर्ण होय. आणि त्यानें आपलीं दुःखें व मरण यांच्या योगेंकरून जें प्रायश्चित्त सिद्ध केलें, त्याच्या द्वारें देवाचा नियम परिपूर्ण झाला आहे.

जेव्हां मी देवभजन संपवून उठलें त्या समयीं माझ्या मनांत आलें कीं म्या फिरून गुडघे टेंकून देवाची उपकारस्तुति करावी; कारण कीं त्याने प्रार्थना करण्याविषयीं मला फार प्रशस्तपण दिल्हें, आणि मजवर पुष्कळ मोलाचे उपकार केले.

आज सकाळीं मी फिरावयास गेलें. तेव्हां प्रसंगोपात पांखरांचें मधुर गायन ऐकावें आणि एकटीने थोर उत्पन्न करणाऱ्याचें भजन करावें, यासाठीं मी वळून रानांत हिंडूं लागलें. देवाची संतत समक्षता, आणि ज्यांवर मी फार प्रीति करितें त्या बंधुजनांवर तो नित्य जागत आहे, यांविषयींचा मला, गेलेल्या दोन तीन आठवड्यांत, विशेष उमज झाला आहे. तो अपार प्रीतीने माझी सर्व वाट सिद्ध करीत आहे, असी माझी खातरी होय. पण मजसारिख्या बापड्या अधम अनुपकारी पापिणीवर त्याला प्रीति करवेल, या गोष्टीवर विश्वास ठेवणें दुर्लभ आहे. तथापि तो नेहमी मजवर आशीर्वादांचा भार ठेवीत आहे. मला भासतें कीं त्याच्या साह्यावांचून माझ्याने कांहींच करवत नाहीं. त्याने माझ्या मनाला कल्पना करण्याची शक्ति दिल्ही आहे. पण तो जर त्याचें शासन करीत नसता तर तें मला किती निरर्थक झालें असतें. त्याने माझ्या ठायीं इंद्रियें उत्पन्न करून ठेविलीं आहेत. त्यांच्या व्यापार करण्याने शब्द स्पर्शादि विषय समजतात आणि भाव उठतात. पण केवळ माझ्या बिघडलेल्या स्वभावाच्या सत्तेने त्यांचा व्यापार झाला असता तर त्या योगाने माझा अगदी नाश झाला असता. पापाने केवळ माझें अंतःकरण बिघडविलें आहे असें नाहीं; तर त्याच्या योगाने माझ्या चित्ताचाहि

बिघाड झाला आहे. अहा! देवाच्या ज्ञानाने व कृपेने माझें अंतःकरण आणि चित्त हीं दोन्हीं पवित्र होत असावीं, आणि ज्यांकरितां पवित्र देवाने मनुष्यांचें मन निर्माण केलें तीं उंचीं व उत्तम कार्यें करण्यांत माझ्या सर्व शक्ति तत्पर होऊन राहाव्या.

हा तर्क सुखकारक आहे कीं जसीं आमच्या देहांत इंद्रियें आहेत, तसा आमच्या मनांत सुंदर व प्रीतिपात्र व नीतियुक्त विषयांचा भास होतो. इंद्रियगोचर मनांत भरले असतां फारच संतोष करणारे भास वारंवार उत्पन्न होतात. माझ्या आकाशांतील बापाने माझे डोळे व कान असे उत्पन्न केले आहेत कीं त्यांच्या द्वारें माझ्या मनांत पुष्कळ सुख होत असतें. यावरून त्याची केवढी दया दिसती. डोळे हे इकडे तिकडे फिरून भिन्न भिन्न पदार्थांच्या दर्शनाने संतोष पावत असतात, इतक्यांत पांखरांचें गाणें, ओहळाचें खळखळ चालणें, समुद्राच्या लहरींचें आदळणें व उसळणें, आणि जो सर्वांहून मधूर स्वर ह्मणजे प्रिय मित्राचें बोलणें, या सर्वांचा नाद कानांच्या द्वारें मनांत येऊन संतोष देतो.

जसे जाणू भारी रथ जोराने चालून आभाळावरून लोटत आहे त्याप्रमाणे आज सकाळीं गर्जना वरचेवर आमच्या डोक्यांवरतीं धडडड होऊन चालत आहे, आणि तिचा प्रतिध्वनि दिशांत दूरवर होत जातो. जी गर्जना आल्पस् पर्वत आणि आंदीस पर्वत यांमध्यें होत असती ती किती मोठी व भयंकर असती! आल्पस् पर्वतांमध्यें मेघांचा गडगडाट होतो, त्या समयीं मी जर तेथच्या एका उंच खिंडींत असतें, आणि जे सर्व डोंगर व पर्वतांचीं टेंकडें

सभोवतीं आहेत, त्या सर्वांवरून गर्जना व प्रतिगर्जना होतांना ऐकत असतें ,तर मला केवढें सुख प्राप्त होत असतें. तर मग म्या गीत करणारा जो दावीद त्याच्या बोलण्याने ह्मणावें कीं परमेश्वराची वाणी बळयुक्त आहे. परमेश्वराची वाणी वैभवयुक्त आहे. परमेश्वराची वाणी रान हालविती. परमेश्वर कादेश रान हालवितो.

प्रतिदिवशीं मी खिडकीजवळ बसतें तेव्हां घर आणि खोली ज्यांत माझ्या प्रिय पार्सन्स् मडम साहेबाने आपल्या आयुष्याचे शेवटले महिने घालविले, तीं झाडांच्या पानांतून माझ्या दिसण्यांत येतात. मी तिच्या सौशील्याविषयीं फार चिंतन करीत असतें, आणि दैन्य, सौम्यता, नम्रता, व स्वेच्छात्यागित्व, या गुणांसंबंधी तिजसारिखें व्हावयास इच्छीत असतें. तिने एथे केवळ्या आवडीने येरूशालेमाच्या कल्याणासाठीं आणि वर्धनासाठीं प्रार्थना केली. तर तिच्या प्रार्थना देवासमोर जाऊन आठवणरूप झाल्या आहेत कीं नाहीं ? तो त्यांचें उत्तर देऊन पवित्र आत्म्याची वृष्टि करून त्याच्या द्वारें पापी मनुष्यांस फिरवील कीं नाहीं ? मला कळतें कीं एथे माझी सोबत तिला आवडली. ती आतां ऊर्ध्वलोकींच्या वैभवामध्यें मजविषयीं चिंतन करिती काय ? निःसंशय तिची स्मरणशक्ति फार वाढली आहे. आणि ख्रीस्ताच्या सर्व लोकांवर तिची प्रीति सदृढ झाली आहे. पण कदाचित् माझ्या ठायीं पृथ्वीचें मांद्य आणि जगावरची एवढी प्रीति झाली आहे कीं तिच्याने माझी आठवण करून संतोष पाववत नाहीं.

हा आमच्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याचा शाहत्तरावा वार्षिक दिवस आहे. आमच्या पूर्वजानी जें मोहरीचें बीज पेरिलें

त कसें अंकुरून आत्लान्तीक समुद्रापासून पासिफीक समुद्रापर्यंत पसरलेलें असें झाड झालें आहे. सर्व राष्ट्रांतील पिळलेल्या आणि त्रासलेल्या लोकांनी त्याच्या फांद्यांखालीं आश्रय करून विसांवा घ्यावा. देवाने आमच्या राष्ट्रावर आशीर्वाद द्यावा. त्याने आपली दृष्टि आह्मावर प्रकाशित करावी. त्याने न्याय तेजाप्रमाणें आणि तारण जळत्या दिव्याप्रमाणें प्रगट करावें.

हा दिवस उजळपणाने उगवला आहे. न्यायीपणाच्या सूर्याने उगवावें आणि त्याच्या पंखांत निरोगी करण्याचा उपाय असावा. कां तर माझ्या थंड व अंधारमय आत्म्याला उष्णतेचें व उजेडाचें अगत्य आहे. जो दया करणारा बाप माझी रचना जाणतो; मी मातीची आहें, ही आठवण जो करितो ; माझ्या अंतःकरणाच्या भ्रष्टपणामुळें मी लाचार व निरूपाय आहें; माझे आंतले वैरी पुष्कळ व प्रतापी आहेत, आणि सैतान त्यांला चेष्टवीत असतो, ह्या गोष्टी जो जाणतो, असा देव होय. असें मनांत आणून म्या या सकाळीं त्याकडे दृष्टि लावावी. केवळ तोच माझी आशा व सामर्थ्य असा आहे. देशाटन करण्याकरितां मी संदुकेंत कापडें रचवीत असेन तेव्हां म्या नित्यांत आपलें हृदय त्याकडे लावून प्रार्थना करावी. त्याने मला आणि माझी प्रिय सेरा इला नेऊन रक्षावें. म्या आपला मार्ग त्याला सोपून द्यावा. आपला सर्व उपभोग, आपलीं सर्व संकटें आणि आशाभंग, उपयोगी होण्याविषयीं आपली सर्व आशा, देहाचें, मनाचें आणि आत्म्याचें सामर्थ्य वाढविण्याविषयीं आपल्या सर्व अपेक्षा, मी ज्यांवर फारच ममता करितें असे आपले सर्व बंधुजन, हीं अवघीं म्या त्याच्या हातांत सोपून

द्यावीं. कारण कीं कधीं कधीं म्या ज्याची आशा धरिली त्यापेक्षां त्याने मला अधिक दिल्हें आहे. मी मार्गांने चालत आहें, आणि आप्तजनांची भेट घेत देत असेन, त्या वेळेस जे सर्व लाहान मोठे उपभोग मला प्राप्त होतील, त्यांत देवाचें चांगुलपण दिसावें.

हे माझ्या देवा, हे माझ्या बापा, हे माझ्या खंडणीकरून सोडविणाऱ्या, तूं दयेने आपल्या लाचार व भ्रमिष्ट लेंकराचीं पावलें वाटेस लाव. तुजवांचून माझ्याने कांहींच करवत नाहीं. मला विपुल ज्ञान दे. यथायोग्य भावना माझ्या मनांत उत्पन्न करून ठेव. जो मजवर प्रीति करून मजसाठीं मरण पावला त्याची सेवा करण्यासंबंधी म्या सुज्ञानाने मोठाल्या गोष्टी योजून सद्धीस न्याव्या. पायमोडें घेण्याचा जो माझा कल आहे तो नसावा. जो कोणी तुझ्या द्राक्षमळ्यांत मजसमान निरूपयोगी आणि कल्पनेने व क्रियेने पापिष्ठ आहे त्याकडे तुझ्याने कृपादृष्टीने पाहवत नाहीं, असें मला वाटूं नये. अहा, ज्याने हें विश्व निर्माण केलें, जो आपल्या सत्तेने सर्व जगें फिरवितो, जो आज्ञेने धूमकेतूंची गति आणि चिमणीचें पडणें नेमितो, त्याच्या दृष्टींत मी काय आहें ? पण त्याने मला कल्पना करण्याची शक्ति दिल्ही. त्याला माझ्या दुर्बलत्वाची व पापत्वाची दया येती. तो मला निरंतर आपल्यापासीं वांचावयास व राज्य करावयास आज्ञा सांगतो. यावरून त्याची कसी आश्चर्यकारक प्रीति व कृपा दिसती.

"यास्तव आह्मी त्या विसाव्यांत जावयास प्रयत्न करावा यासाठीं कीं अविश्वासाच्या त्याच उदाहरणाप्रमाणें कोणी न पडावें." माझ्या उत्तम पाळकाने ह्या वाक्यापासून जो

बोध केला त्याच्या खरेपणाला माझें अंतःकरण अनुकूळ झालें. पण माझ्या कल्पना हिंडत फिरल्या. अहा, मी केव्हां यथायोग्य प्रकारें खरेपणाला मान्य होईन ? माझ्या कल्पना व वासना केव्हां यथोचित होतील ? त्या केव्हां खरेपणाच्या आधीन होऊन चालतील ? कदापि आपणाविषयीं आपणास कांहीं चांगलें सांगावयाचें अथवा लिहावयाचें नाहीं. पण जे स्त्रियांचे समुदाय पराकाष्ठेच्या अज्ञानांत आणि अधर्मांत राहतात, त्यांहून मला कोण वेगळें करितो, याविषयीं जर म्या विचार केला असता तर ज्यांकरितां देवाचा आभार मानावा, अस्या आपल्या हृदयांत मला पुष्कळ गोष्टी अढळल्या. देव स्वतां कसाहि आहे आणि त्याने या पतित व नष्टोपाय मनुष्यजातीच्या तारणाच्या उद्देशाने काय केलें आहे. याकरितां म्या त्याला स्तवून मान द्यावा, असें केवळ नाहीं. तर त्याने मजवर जे अगणित उपकार केले आहेत त्यांकरितांहि म्या त्याची स्तुति व मान करावा. म्या नित्य म्लान मुखाने आणि निराश हृदयाने कृपासनासमोर नमावें, हीं माझी इच्छा नाहीं. हे माझ्या आत्म्या, तूं वरतें पाहा आणि हर्षित हो. कां तर तुझा खंडणी करणारा जगतो. तो पराक्रमांत प्रतापी आणि विचारांत आश्चर्यवंत असा आहे. तो ह्मणतो "तुमचें हृदय घाबरूं नये."

पृथ्वी बर्फरूप सांखळ्यानी बांधिली आहे. अहा, त्याप्रमाणें माझें हृदय संसाराच्या व भ्रष्टपणाच्या त्रिड्यानीं न बांधिलें जावें. माझें अंतःकरण देवाच्या प्रीतीने पाझरावें आणि चेतावें, यासाठीं कीं पाण्याच्या ओहळाजवळ लावलेलें झाड जें यथाकाळीं आपलें फळ देतें, आणि ज्याचें

पान कोमत नाहीं, त्यासारिखें म्या व्हावें. अहा, त्याच्याच काळीं प्रत्येक काम करावें, हें किती सुंदर होय! असेंच म्या आमरणांत करीत जावें. देवाची स्तुति होवो. कां तर त्याच्या कृपेच्या साह्याने आणि त्याच्या सामर्थ्याच्या आधाराने मला तें करितां येईल. आपलें अंतःकरण, आपलें मन, आपलें बळ, आणि आपलें धन, यांचें समर्पण करून त्याच्या सेवेस द्यावें, याविषयीं म्या फारकरून प्रतिदिवसीं आपल्या सर्व बुद्धीने प्रयत्न केला आहे. तें दान कांहीं मोठें आहे, असें मी मानीत नाहीं. कारण कीं आदींच मी त्याची आहें. त्याने मला उत्पन्न करून रक्षिलें आहे. त्याने माझ्या देहाला आव दिल्हा आहे. माझें मन हें त्याचें बळ व कर्तृत्व यांसुद्धां त्याचें दान आहे. आपल्या मनाची प्रौढी करावी, यासाठीं त्याने मला प्रसंग दिल्हा आहे. यथायोग्य प्रकारें जर म्या त्याचा उपयोग केला असता तर त्याच्या कृपासनासमोर जें स्थंडिल त्यावर म्या एवढें अपात्र अर्पण करून ठेविलें नसतें.

प्रकरण ५.

मिशनेरी सहकारीण होण्याविषयीं आमंत्रण.

पाहा, मूर्त्तिपूजकांला
भ्रम झाला अनिवार,
देवज्ञान नाहीं त्यांला
कळवळा यावा फार.
सर्वजगीं
व्याप्त झाला अधंकार.

पृथ्वीवर वस्ती करणारे असे जे मनुष्य ते सगळे भ्रष्ट

आहेत. जन्मस्वभावाने ते सर्व एकसारिखे पुण्यविरहित आहेत. देवाकडच्या जीवनासंबंधी ते सर्व एकसारिखे नष्टोपाय आहेत. ते पातकांमध्यें मेलेले आहेत. पापाच्या भ्रष्टपणामुळें देवाचा क्रोध सर्व मनुष्यजातीवर झाला आहे. सर्व मनुष्यांच्या अंतःकरणांत पापाचें अमंगळपण भरलें आहे. याकरितां कोणाच्या कृत्यांवरून देवाला संतोष होत नाहीं. देवाची कृपा जी जीवनदायक आहे तिला पापाने सकळ मनुष्यजात अंतरली आहे. तर मग जीवन मनुष्यांला कोठून प्राप्त होईल? ते आपल्या आपण जीवंत होऊन उभे राहतील कीं काय ? नाहीं. तर कोण त्यांला जीवन देईल? पापाच्या झोंपेंत पडलेले असे जे मनुष्य, ते आपोआप जागृत होऊन उठतील कीं काय? नाहीं. पुण्यहीन असे जे मनुष्य ते देवाजवळ कसे पुण्यवान ठरतील ! पाप करून जे मनुष्य देवाचे वैरी झाले आहेत त्यांचा त्यासीं समेट कसा होईल !

देवाच्या पवित्र शास्त्रांत असल्या सर्व प्रश्नांचें समाधान करणारें उत्तर केलें आहे. तें मागें निरूपिलें आहे. "देवाने जगावर एवढी प्रीति केली कीं त्याने आपला एकुलता पुत्र यासाठीं दिल्हा कीं त्याजवर जो कोणी विश्वास ठेवितो, त्याचा नाश न व्हावा, परंतु त्याला सर्व काळचें जीवन व्हावें. देवाने आह्मास सर्वकाळचें जीवन दिल्हें आहे, आणि तें जीवन त्याच्या पुत्रामध्यें आहे. ज्याला पुत्र आहे त्याला जीवन आहे. ज्याला देवाचा पुत्र नाहीं त्याला जीवन नाहीं." या जीवनाची प्राप्ति मनुष्यांस व्हावी, यासाठीं देवाचा पुत्र जो येशू ख्रीस्त त्याने आपल्यावर विश्वासणाऱ्यांस ही आज्ञा केली– "तुह्मी संपूर्ण जगांत जाऊन

सर्व मनुष्यांस शुभवर्त्तमान गाजवा. जो विश्वास धरील आणि बाप्तिस्मा घेईल त्याचें तारण होईल. परंतु जो विश्वास धरणार नाहीं तो दंडी ठरविला जाईल."

जेव्हां देवाच्या पवित्र आत्म्याच्या करण्याने प्रिय मेरी इलि बाई पुनर्जन्म पावली, तेव्हां देवाच्या जीवनाने ती जगती झाली. मग ती येशू ख्रीस्ताला अनुसरून वर्त्तली. ती आपली स्वेच्छा नाकारून त्याच्या आज्ञांत चालली. त्याच्या सर्व इच्छेप्रमाणें आचरून आपल्या आत्म्याचें तारण साधून घ्यावें, आणि देवाची परिपूर्ण प्रतिमा व्हावी, यांच्या उत्कंठेने ती रात्रंदिवस प्रार्थना आदिकरून शास्त्रांत सांगितलेलीं तारणसाधनें करण्यांत तत्पर होत गेली, आणि ती आपले बंधुजन व इतर मनुष्य यांच्या आत्म्यांचें उद्धारण साधण्यांत फारच आसक्त झाली. सगळें जग जें दुष्टाईंत पडलें आहे, त्याचा तिला कळवळा आला. तिच्या प्रीति करणाऱ्या हृदयांत सर्व जगांतल्या मनुष्यांविषयींची दया भरली. आपला प्रभु व तारणारा जो देवाचा अवतरलेला पुत्र, त्याने आपलें अमूल्य रक्त पाडून जें पापाचें प्रायश्चित्त सिद्ध केलें आहे, तें पृथ्वीवर वसणाऱ्या सर्व स्त्रीपुरूषांस व लेंकरांस ठाऊक व्हावें. येशू ख्रीस्तावर विश्वास ठेविल्याने जें सर्वकाळचें जीवन आपणाला मिळालें आहे, तेंच सर्व मनुष्यांला मिळावें; आणि या योगाने मरणानंतर जेव्हां सर्व जगांतल्या मनुष्यांचा न्याय होईल तेव्हां कोणीहि नरकाच्या सर्वकाळीक यातना व दुःखें यांमध्यें न जावा, यांच्या इच्छेने तिने गांवच्या मुलांस ख्रीस्ताची गोष्ट शिकविली, आणि घरोघरीं जाऊन धर्म सांगणाऱ्या पोथ्या प्रसृत केल्या. आपल्या स्वदेशीय लोकांत आणि

परदेशीय लोकांतहि प्रभु येशू ख्रीस्ताच्या शुभवर्त्तमानाचा प्रसार व्हावा, यासाठीं तिने औदार्यप्रकारें आपलें द्रव्य खर्चिलें, आणि त्या योगाने ख्रिस्ती धर्माची वृद्धि होऊन मनुष्यानी देवाकडे फिरून सत्कर्में करावीं आणि तारण पावावें, यांविषयीं तिने देवाच्या पुष्कळ प्रार्थना व विनंत्या केल्या. प्रभु येशू ख्रीस्ताने आपल्या जीवाच्या श्रमाचें फळ पाहून तृप्त व्हावें, याच्या मोठ्या उत्सुकतेने तिने त्याच्या सेवेच्या स्थंडिलावर आपला देह, आपला गुण आणि आपला आत्मा, यांचें नित्य अर्पण करून ठेविलें.

जेथे मनुष्य आपल्या आत्म्यांवर अंधारमय पडदा घेऊन देवाला अवमानितात, आणि साकार व निर्जीव पदार्थांला देव ह्मणून भजतात– जेथे स्त्रीपुरुषें लेंकरांसुद्धां पापाच्या झोंपेंत असून दाटीने नरकाकडे जाण्याच्या मार्गाने चालत आणि प्रत्यहीं नरकाच्या यातनांमध्यें पडून अनंतकाळचें मरण पावत आहेत, तेथच्या लोकांमध्यें वस्ती करून देवाविषयीं ज्ञानाचा प्रसार करावा,– ख्रीस्ताकडून जें पापाचें प्रायश्चित्त सिद्ध झालें आहे तें सांगावें,– जगाचें पाप हरण करणारा जो देवाचा कोंकरा त्याची सुवार्त्ता प्रगट करावी,– त्यांच्या पायांस पुण्याच्या मार्गांत लावून त्यांस देवाच्या घरीं पोंचवावें आणि अनंतकाळचें जीवन द्यावें, असी तृष्णा देवाच्या पवित्र आत्म्याने या प्रीतिपात्र स्त्रियेच्या मनांत उत्पन्न केली होती, असें मागें सांगितलें आहे. या तृष्णेची तृप्ति करण्याला तिला अडथळा झाला, असेंहि कथिलें आहे. मग ईलि बाईने ती मनीषा सोडून दिल्ही, असें समजूं नये. तर ती देवापासून झाली आहे, ह्मणून यथाकाळीं ती सफल व्हावी, असा प्रसंग येईल. या-

प्रमाणें विचार करून तिने आपल्या हृदयांत मिशनेरी पदवी प्राप्त होण्याची आशा बाळगिली. वीस वर्षांपर्यंत ती देवाची ही प्रार्थना करीत गेली– "त्वां ज्या वचनावर माझी आशा ठेविली, त्याची आठवण तूं आपल्या सेवकिणीविषयीं कर." ज्याची आशा देवावर आहे, त्याला त्याचें हें वचन आहे– "तूं परमेश्वरावर आवड ठेव, म्हणजे तो तुझ्या हृदयांतील मागणीं तुला देईल. तूं आपला मार्ग परमेश्वराला सोपून दे. त्यावर आशा ठेव. म्हणजे तो परिपूर्ण करील."

ज्याने कांहीं वर्षांपर्यंत हिंदुस्थान देशांतील लोकांमध्यें आपलें बळ खर्चून ख्रीस्ताचें शुभवर्त्तमान गाजविलें होतें– ज्यापासून ईश्वराने प्रिय भार्या झपाट्याने काढून घेतली, असा एक मिशनेरी साहेब सन १८९३ नांत आपल्या स्वदेशास परतला. जेथे त्याने आपल्या तारुण्यावस्थेचे दिवस क्रमिले होते, तेथे जाऊन आपले बंधुजन व सोयरे यांची भेट घेण्यांत सुमारें एक महिना घालविला. नंतर तो आपल्या देशाच्या पश्चिम प्रांतांकडे देशाटन करून साहा सातशें कोस लांब गेला. त्या प्रांतांत तीस वर्षांमागें कोठेहि गावें नगरें नव्हतीं. शेतें भातें नव्हतीं. आकाश व पृथ्वी यांच्या मर्यादेपर्यंत सकळ देश एक पसरलेलें रान दिसे. तेथचे वसणारे जे मनुष्य ते न माणसळलेल्या जनावरांसारिखे रानटी होते. ते राबणी करणारे नव्हते. तर त्यांनी पशु पक्षी व मत्स्य यांची शिकार करून प्रावरण व पोषण केलें. पण तेथे केवढाले पालट झाले आहेत पाहा. सांप्रतकाळीं त्या सर्व प्रांतांत हजारों हजार मोठीं मोठीं गांवें नगरें झालीं आहेत. शेतकी, शिल्प, उदीम, इत्यादि प्रकारचे उद्योग करणारे, आणि विद्यायुक्त पदवीस

अनुसरणारे, असे लक्षानुलक्ष मनुष्य वसत आहेत. आणि तेथे पुष्कळ देवाचे भक्त होऊन भजनस्थानें रचीत आणि धर्मकार्यें करीत आहेत.

या नुकत्या वसलेल्या देशांत जे मनुष्य वसतात, त्यांतील पुष्कळ जन ज्ञानी, विचारवंत व धार्मिक, असे आहेत. तथापि त्यांनी यथायोग्य प्रकारें हिंदु देशांतील लोकांच्या तारणाविषयीं आस्थेवाईक होत असावें, आणि त्यांमध्यें जीवन प्रदर्शक शुभवर्त्तमानाचा प्रसार करण्याकरितां आपली मालमत्ता खर्चावी, आपले पुत्रीपुत्र यांचें प्रदान करावें, आणि देवावर भरवसा ठेवून प्रार्थना करावी, या अभिप्रायाने या मिशनेरी साहेबाने जागोजागीं जाऊन त्यांला तद्देशीय लोकांची स्थिति, चाली, धर्मकृत्यें, इत्यादि वृत्तांत कथिला. याप्रमाणें प्रभु येशू ख्रीस्ताची सेवा करीत असतां तो चिकागो या नगरास पोंचला. तेथे दोन तीन कुटुंबांशिवाय कोणी त्याचे ओळखी नव्हते. मग एका स्नेह्याच्या कृपेने मेरी ईलि बाईची त्याची भेट झाली. अगोदर त्या नावाच्या कोणत्याहि माणसाची त्याला ओळख नव्हती. साहा वर्षांमागें तिच्या बापाचें कुटुंब पूर्वेकडून त्या नवीन देशांत येऊन राहिलें होतें. मिचिगान नामें एक मोठें व रमणीय सरोवर आहे, त्याच्या पश्चिम तीरीं चिकागो हें नगर वसविलें आहे. तेथून उत्तरेस वीस कोस लांब वाकीगन ह्मणून एक गांव त्याच तीरीं आहे. तेथे ईलि बाईच्या बापानें कांहीं जमीन विकत घेऊन घर बांधिलें आणि वृक्षपुष्पवाटिका लाविली. तेथे कांहीं वेळपर्यंत प्रिय मेरी ईलि बाईने वस्ती करून आपल्या आईबापांची सेवा केली. तेथे तिची सर्वोत्कृष्ट आई देवाची आज्ञा पावून त्याच्या घरीं

गेली. यावरून त्या वासस्थानावर तो विधुर झालेला पिता, आणि त्याची स्नेहाळू पुत्री, हीं विटलीं. नंतर तो तिला संगतीं घेऊन चिकागो नगरास आला. तेथे त्याचे तीन पुत्र आणि एक जावाई सौदागरी करून आदाय संपादीत होते. त्यांच्या कुटुंबांत त्या बापाला आणि बहिणीला सुखाची वस्ती मिळाली. जसी आपल्या बापाच्या घरांत तसी आपले भाऊ व मेहुणा यांच्या घरांत मेरी बाई सर्व जनांच्या हृदयांस आवडती झाली. तिचा संतोष करण्यास सर्व उत्सुक होतीं. तिला वित्तविषय होता. फारच प्रीति करणारे असे नातलग व इष्टमित्र तिला होते. इहलोकाविषयीं आणि परलोकाविषयीं मनुष्यांचें हित करावें, याविषयीं ती प्रसंग पावून यथाशक्ति सुप्रयुक्त साधनें करीत होती. तथापि त्या योगाने तिची तृप्ति झाली नव्हती. ती देवाची प्रार्थना करून आपलीं मागणीं त्याला कळवीत होती— हे परमेश्वरा, त्वां ज्या वचनावर माझी आशा ठेवविली, त्याची आठवण तूं आपल्या सेवकिणीविषयीं कर.

कोणीएक उदीम करणारा असा साहेब वाकीगन गांवांत राहत होता. तो विद्यावान, विचारशील व मर्यादशील असा होता. तो गुणाढ्य आणि धनाढ्य होता. तो विधुर झाला होता. त्याला पांच सात वर्षांची असी एक कन्या होती. त्याने मेरी ईलि बाईची ओळख केली होती. ती आपल्याला भार्या आणि आपल्या लेकीला आईच्या जागीं व्हावी, ह्मणून त्याने तिला आपली मनीषा कळवून विवाहाची सूचना केली. तिने ती त्याची सूचना अगदी अवमानिली, असें नाहीं. तर तुमचा मनोदय मनांत घेऊन ती सूचना पतकरावी किंवा नाकारावी, याविषयीं मी देवाची

शिक्षा मागून विचार करीन, असी प्रतिज्ञा तिने देवाच्या भयाने केली. तो साहेब गुणनिधि व भक्तिमान आहे, ह्मणून त्याचा तुझा विवाह व्हावा, असें कुटुंबांतल्या जनानी वारंवार ह्मणून आपली आशा तिला कळविली. तिच्या पित्याने तिला जो मनोरथ सांगून कळविला तोच संक्षेपाने सांगतों. माझ्या प्रीतिपात्रा कन्ये, देवाने तुझी सर्वोत्कृष्ट माता मजपासून आपल्यापासीं नेली. तेव्हांपासून शोक माझ्या हृदयांत भरला आहे. माझे दिवस थोडे राहिले असावे. त्यांत कांहींएक समाधान व्हावें यासाठीं मला तुझें प्रयोजन आहे. तुझ्या भरवस्यावर मी राहिलों. आतां आइते वेळेस भरवस्याचा अभरवसा करूं नको. तर ह्या साहेबाची सूचना स्वीकारून त्याची पत्नी हो. मग तेथे वाकीगनीं माझें घर जमीन वगैरे मालमत्ता आहे ती मी तुह्मा दोघांला देईन आणि तुह्मा दोघांजवळ राहीन.

आपल्या मनांत ती प्रतिज्ञा ठेवून त्या सुचविलेल्या विवाह कार्याविषयीं जो निर्णय देवाच्या मनाला अनुकूळ आहे तोच करावा, या अभिप्रायाने प्रिय ईलि बाई मोठ्या उत्कंठेने देवापासीं प्रार्थून ईश्वरी शिक्षा व साह्य मागत, आणि सदसद्विचार करीत आहे. इतक्यांत तो मिशनेरी साहेब चिकागो नगरीं पोहंचून तिची ओळख आणि मैत्रिकी कर्त्ता झाला. या उपरांत सन १८५४ नाच्या प्रारंभीं त्याने तिजपासीं हा प्रश्न केला कीं तुह्मी मजबरावर विवाह करून हिंदु देशास याल कीं काय? तेव्हांच ती उत्तर देऊन ह्मणाली कीं जर ईश्वर माझ्यापुढें जाण्याची वाट स्पष्ट करून मजबरोबर येईल तर मी येईन. असें उत्तर देण्याने तिने देवाचा आश्रय करून आपला स्वदेश, बंधुजन, इष्ट-

मित्र, इत्यादि इहलोकांतले ऐच्छिक विषय व लाभ एकी-कडे ठेविले, आणि मिशनाच्या कामांत हेळणा, कष्ट व रूदनें येत असतात, तीं सर्व पतकरिलीं. पण जें करूं नये, तेंच तिने केलें ह्मणजे आपला वयस्क पिता आदिकरून आप्त-जनांची आज्ञा अवमानिली, असें जर कोणी संशय धरून ह्मणेल तर त्याने हा विचार करावा कीं तिचें जें उत्तर तें तिने पवित्र आत्म्याची प्रेरणा मानून केलें. तें तर देवाचें उत्तेजन प्रदर्शक होय. या गोष्टीसंबंधी तिने जीं जीं दिनवृत्तपत्रें व लिखितें लिहून आपल्याच मनोवृत्ति सांठ-विल्या आहेत त्यांतून कांहीं कांहीं काढून निवेदितों.

मी आपलें पाझरलेलें हृदय देऊन पाणिग्रहण करीन, याच्या आशेने ज्याने इतकी वेळ मजवर प्रीति केली आहे, त्या मित्राकडे म्या पत्र लिहून पाठविलें आहे. त्यांत म्या त्याला सांगितलें कीं "ज्या स्थितींत मी आहें ती बदलल्याने जर अधिक उपयोगी पडणार नाहीं तर म्या ती बदलून दुसरी घेऊं नये, असें म्या फार वेळापासून देवाची प्रार्थना करून मागितलें आहे. परदेशींच्या मिशनाचें काम करावें, याचें मला आमंत्रण झालें आहे. माझ्या हृदयाने त्या आ-मंत्रणाला होय, असें ह्मटलें आहे. त्यावरून तुह्मी शोक करूं नये. त्यापेक्षां हर्ष करावा. कारण तुमची प्रीति एवढ्या ममतेने जिजवर जडली आहे, ती असलें पावन व अहंभाव नाकारणारें काम करायाला आपणाला सोपून द्या-वयास इच्छीत आहे." त्याने मजवर आपलें हृदय असें ठेविलें कीं त्याला माझी प्राप्ति झाली नाहीं तर जग शून्य दिसूं लागेल, असें त्याला भासलें. ह्मणून त्याकरितां मला फार खेद वाटतो. त्याचा जो अभरवसा झाला आहे त्या-

च्या योगेंकरून देवाने त्याला पवित्र करावें, आणि आपल्या पवित्र आत्म्याच्या द्वारें त्याला आपल्या चित्तवृत्ति मजवरून वळवून ख्रीस्तावर ठेवाव्या, असी प्रार्थना म्या केली आणि करीत आहें. देवाने आपल्या प्रीतीनें व कृपेने त्याला भार्या द्यावी.

माझा भाऊ दावीद याने मला खुणावून एकांतीं नेलें, आणि मिशनाचें काम करण्याविषयीं माझे उद्देश विचारिले. म्या त्याला सांगितलें कीं तें काम करावें, असी माझी इच्छा आहे, आणि माझे बंधुजन खुशी होतील तर त्या कामावर जावें, हा माझा निश्चय आहे. तेव्हां तो ह्मणाला कीं "तें आत्मघात करणारें आहे. तूं भ्रांत झाली आहेस. एथे या देशीं जें जें तुजकडून जगाचें श्रेय होईल तें तें परदेशीं जळत्या अभाळाखालीं तुजकडून होणार नाहीं. तूं या कामावर जासील, या भयाने तुझा स्नेहाळू बाप अत्यंत उद्विग्न झाला आहे. आणि जर तूं जासील तर त्या योगाने त्याचे दिवस फार थोडे होतील, याचें मला फारच भय आहे." तेव्हां म्या आपल्या प्रिय भावाला अभिवचन देऊन ह्मटलें कीं माझ्या प्रियतम बापाचें अनुमत घेतल्यावांचून मी जाणार नाहीं.

मी या कामाकडे लक्ष लावून जसजसा विचार करितें तसतसी मला त्यावर जाण्याची उत्सुकता होती. हाहा! परदेशीं सुपीकाचें सांठवण करायाला कामकरी जातात तें किती थोडे आहेत! कोट्यानकोटी मूर्त्तिपूजा करणारीं माणसें प्रतिवर्षीं मरून जातात. पण कोणीएक त्यांला असें सांगत नाहीं, तुह्मी पापी असून परलोकांत आनंदाच्या व धन्यपणाच्या स्थितीने जगावें, यासाठीं तुह्मी उद्धारकाच्या

रक्ताने धुतलें जाऊन शुद्ध झालें पाहिजे. आमच्या विपुल उपकार पावलेल्या देशांत पुष्कळ ख्रिस्ती जन असे आहेत कीं ते आपला पैका या कामाला देतील, परंतु आपल्यांस देणार नाहींत. आपल्या स्वदेशीं स्वास्थ्याने जगावें, येणेंकरूनच त्यांची तृप्ति आहे, आणि ते कोट्यावधि मरत्या मनुष्यांच्या आरोळीला आपले कान बंद करितात. हे प्रभू, तूं मला त्यांकडे जाऊं दे. एवढें यशस्कर काम करण्याकरितां मी आपल्याला सोपून देण्यास योग्य नाहीं खरी. तथापि तूं असल्या अशक्त कार्यकारिणीची सेवा घे ह्मणजे सर्व स्तुति व गौरव तुझेंच होईल. म्या कां जाऊं नये? एथे माझ्या जन्मदेशांत फार हितकार्य मजकडून होईल, असें माझे आप्त लोक ह्मणतात. तर हिंदुदेशांत मजकडून कांहींच होणार नाहीं काय? हे देवा, याचें तुला कांहींच नाहीं कीं जेव्हां माझ्या तारूण्यावस्थेंत मला सवघडपणाने परभाषा बोलण्याची सवई लागली असती, तेव्हां म्या दुसऱ्या कामांत आपलें आयुष्य घालविलें. माझी सर्व शक्ति आणि मनाचें बळ तुझ्या स्वाधीन आहे. ज्या ज्ञानाचें मला प्रयोजन पडेल तें शिकून संपादण्याकरितां तुझ्याने मला यथायोग्य बुद्धि आणि स्मरणाची शक्ति देववती. हें तुला कांहींच नाहीं कीं माझे डोळे अशक्त आहेत. कां तर तुला त्यांला बरें करण्यास यथोचित औषधोपाय कळवून लाववतो. मला देहाचें बळ फार नाहीं. पण ज्याच्या ठायीं जीवनाचे झरे आहेत त्याच्या दृष्टींत अल्प बळामुळें मला त्या कामावर जाण्यास विघ्न व्हावें असें नाहीं. कोणतीहि व्याधि माझ्या शरीरास आहे, असें मला माहीत नाहीं. आणि माझ्या आहेपणाचा उत्पादक ईश्वर

जो पूर्वेच्या वाऱ्याच्या दिवसीं आपला प्रचंड वारा दूर करितो, तो हिंदुदेशाची उष्णता इतकी कमी करून माझ्या देहाला अनुकूळ करूं शकतो कीं त्यावरून मला आरोग्य आणि दीर्घ आयुष्य प्राप्त होईल.

परदेशांत मिशनाचें काम करण्याविषयीं म्या काल आपला प्रिय भाऊ स्तैलस यापासीं संभाषण केलें. त्याने मला सांगितलें कीं "आपल्या देहाचें रोगारोग्य, आपल्या डोळ्यांचें अशक्तपण, आणि आपल्यावर आपल्या वयातीत बापाचा अधिकार, यांविषयींचा दृढ विचार करून पाहावें. तुह्मी आपल्या जन्मदेशांत राहून आदितवारींच्या शाळा शिकवाव्या, पोथ्यांचा प्रसार करावा, आणि इतर प्रकारचीं परोपकारयुक्त कामें करावीं. हें बरें दिसतें. परदेशीं जाऊन वस्ती करावी हें करणें तुह्माला भाग आहे, असें मला वाटत नाहीं." मग रात्रीं म्या मनाच्या खेदाने रुदन केलें. मित्रहीन, आधारविरहित, कुटुंबरहित, असा जो पृथ्वीवर एकला व निराश्रय आहे, त्याच्या सारिखा मला अनुभव झाला. मिशनाचें काम करावें, यात्रिषयीं उत्तेजन देणाऱ्या भावना मला प्रेरितात, त्या देवाच्या दृष्टींत यथोचित नाहींत, आणि माझी जी प्रीति मूर्त्तिपूजा करणाऱ्यांच्या आत्म्यांवर आहे, ती जसी मोठी असावी तसी नाहीं, यांचें मला फार फार भय वाटलें. तर मग देवाने ह्या गोष्टी यथास्थित सिद्ध कराव्या ह्मणून त्याचा आश्रय करून त्याला आपल्याला, आणि आपले सर्व मार्ग सोपून देण्याकरितां म्या त्याजवर भरवसा ठेवून साक्षेपाने त्याची प्रार्थना केली. पण फार वेळपर्यंत माझे डोळे अश्रूंच्या झऱ्यांचा

ओघ आटवायास समर्थ होईनात, आणि माझें मन शांत होईना.

ईश्वराने माझी वाट माझ्यासमोर सिद्ध करावी. जे मनुष्य अंधकाराच्या आणि मृत्युच्छायेच्या देशांत राहत आहेत, त्यांतील जर एक तरी मनुष्य माझ्या द्वारें तारण पावेल तर मी या कामांत आपल्या प्राणास मुकलें, आणि माझे बंधुजन, इष्टमित्र, द्रव्य, प्रतिष्टा, इत्यादि गोष्टींची हानि झाली, तरी या सर्व गोष्टींबद्दल मला त्या एका आत्म्याचें तारण हें पुरतें प्रतिफल आहे. होय, एवढी हानि सोसल्यावरून असला परिणाम झाला तर मला हर्षच वाटेल. ख्रीस्तासाठीं जगावें, आणि कष्ट करावे, असी इच्छा माझ्या ठायीं वृद्धिंगत होत आहे. अनंतकाल व देवलोक, अवधिकाल व इहलोक, या उभयांची तुलना केली असतां पृथ्वी आणि अवधिसमय यांची कथा काय आहे! आत्म्याचें मोल आणि या जगांतील गोष्टींचें मोल, यांची तुलना करून यथायोग्य विचार केला तर पृथ्वीकडचीं आंदणें, सुखसंतोष, वित्तविषय, वगैरे ऐच्छिक पदार्थांचें वजन काय आहे! अहा, उद्धार करणारा जो प्रभु येशू ख्रीस्त, ज्याने नष्टोपाय मनुष्यजातीवर प्रीति केली, त्याची मला अधिक अनुगुणता प्राप्त व्हावी. अहा, केव्हां मी त्यासारिखी होऊं लागेन! केव्हां माझ्या जड व निरुत्सुक अंतःकरणांत पवित्र प्रेमाची उकळी येऊन उसळेल?

माझ्या मनांत निरनिराळ्या समयीं निरनिराळ्या भावना उत्पन्न होऊन प्रवर्त्ततात. कधीं कधीं मी पर्वतावर वस्ती करितें, आणि प्रतिज्ञात प्रदेश ह्मणजे आकाशांतील खनान, हा देश इतका माझ्याजवळ दिसतो कीं त्यांतला

मंद व सुगंध वायु माझ्या अंगाला लागावा. अस्या समयीं एदेनांतील बागांत वसल्यासारिखा मला भास होतो. देवाच्या चांगुलपणाविषयीं मी विचार करितें आणि त्यावरून माझ्या मनांत संतोष भरून राहतो. जें प्रत्येक जनाचें तोंड माझ्या दृष्टीस पडतें तें प्रसन्न व स्नेहयुक्त, असें दिसतें. आणि माझे आप्तजन व ओळखी माझें साह्य करायाला उत्सुक आहेत. यामुळें मी संतोषकारक विस्मयाने देवाचें स्तवन करितें. पण आजच्या उतारवेळीं कांहींएक मेघ माझ्या दृष्टीस आड आला. देवाच्या ज्ञानाविषयीं अथवा त्याच्या कृपेविषयीं मी कांहींच वृद्धि पावत नाहीं. सांसारिक गोष्टींसंबंधी माझ्यापुढें वर्त्तण्याचें अनुसंधान अगदी स्थिर झालें आहे. माझे इष्टमित्र माझें साह्य करीत नाहींत, आणि दुसराहि कोणी करीत नाहीं, असें दिसतें. पण मला हर्ष आहे, यासाठीं कीं माझा देव व उद्धारक हा नित्य तसाच आहे. जसी माझी आस्था वारंवार त्याचें कार्य करण्याविषयीं कमी होत चालली आहे, तसी त्याची काळजी माझें अभीष्टचिंतन करण्यांत कदापि कमी होत नाहीं. त्याची दया व प्रीति निरंतर आहे. सूर्य जो आकाशांत आहे त्यावर जर अभाळ आलें तर तो तेजाने विरहित होतो काय? असें नाहीं. तारकाचें प्रसन्न मुख माझ्या दृष्टीपुढें अविश्वासाने आच्छादित होत आहे. म्या त्याला स्तवावें. तो मला बोध देऊन ह्मणतो कीं जीं सर्वांहून चांगलीं कृपादानें, त्यांची तुह्मी फार इच्छा धरा. म्या त्यांची प्राप्ति संपादून घ्यावी, आणि त्यांच्या द्वारें जे जे जयत्रिषय मला मिळतील, ते सर्व म्या आपल्या मनाच्या व देहाच्या शक्तीसुद्धां त्याच्या चरणीं अर्पावे.

मिशनाच्या कामाला जावें, असा जो बेत म्या केला त्याला माझा भाऊ अनुकूळ झाला आहे, असें समजून मी काल त्यापासीं संभाषण करून आपला संतोष निवेदीत होतें, तेव्हां त्याने जें उत्तर केलें त्यावरून मला फार दुःख वाटलें. त्याच्या मनाला थोडा तरी पालट झाला, असें दिसत नाहीं. माझ्या देहाच्या अशक्तपणामुळें तो बेत भ्रमाचा आहे, असें त्याने ह्मटलें. तर थोडक्यांत माझी खातरी झाली आहे कीं देवाने मला त्या कामावर जायाला बोलाविलें नाहीं. म्या आपल्या बुद्धीचा आश्रय करूं नये. तर आपल्या प्रियंकर बंधुजनांच्या विवेकावर भरवसा ठेवावा. मग मीं आपल्या धन्य स्वामीच्या पायीं शरणागत होऊन आपल्या कर्त्तव्याविषयीं विचारणा करूं लागलें. माझ्या वाटा नीट व्हाव्या यासाठीं मला प्रकाश व ज्ञान वरून प्राप्त व्हावें, याविषयीं उत्सुक होऊन मी देवाची प्रार्थना करीत असतां रात्रीं फार वेळपर्यंत जागृत राहिलें. जीं जीं निमित्तें उत्तेजनरूपाने माझ्या ठायीं प्रवर्त्तलीं, त्या सर्वांची चौकसी करून पाहिली. आणि देवाला प्रार्थून मागितलें कीं त्यांतील जीं शास्त्रविरुद्ध आहेत त्यांची क्षमा व्हावी. म्या आपल्या आकाशांतील बापाला सांगितलें कीं "या कामावर जाण्याची मला मोठी उत्सुकता आहे. पण या कामाचा अधिकार व प्रतिष्ठा मिळावी, यासाठीं मी योग्य नाहीं. कां तर मी पापी व दुर्बळ आहें. मी या कामाविषयीं जें जें बोलून चुकलें आहें त्यापासून मी मागें हटायास लाजतें. आणि त्या योगाने कदाचित् तुझ्या मिशनाच्या प्रकरणाला डाग लागेल. तथापि जर तुझी समक्षता व आशीर्वाद मजबरोबर येणार नाहीं,—जर मी तेथे

जाऊन वधस्तंभ हा ध्वज उभारणार नाहीं, – जर माझ्याने कोणाचें क्षेमकार्य होणार नाहीं, तर आपल्या स्वदेशीं राहावें हें बरें होय."

म्या आपल्या देहाच्या आणि मनाच्या शक्तींचा व्यापार करून केवळ आपलेंच सुख संपादून अनुभवावें, ह्मणून देवाने एवढ्या आश्चर्यकारक युक्तीने माझें शरीर निर्माण करून त्याला अमर आत्म्याचें वसन केलें आहे, असें नाहीं, आणि ह्या चेष्टायुक्त कल्पना करणाऱ्या शक्ति माझ्या ठायीं ठेवून अस्या नित्य काळजीने या सुंदर व सुप्रयुक्त केलेल्या कामाचा संभाळ केला आहे, असेंहि नाहीं. तर म्या त्यासाठीं कष्ट करावे. कोठे आपल्या शक्तींचा व्यापार करून आयुष्य घालवावें, याविषयीं मला कांहीं विशेष चिंता नाहीं. जेथे मजकडून उत्तम कार्य घडेल– जेथे म्या आपला देह व आत्मा सार्थकीं लावून परमार्थ संपादन करावा,– तेथे म्या जगून कष्ट करावे. एवढीच मला इच्छा आहे. अहा! देवाने मला न्यावें. त्याने माझ्या पुढें कर्त्तव्य कामाची वाट इतकी स्पष्ट करावी कीं मी या दुःखकारक संदेहाने उद्विग्न न व्हावें. मी आपल्या आप्तांवर फारच प्रीति करितें. ह्मणून मी अनुचित पर्याय काढून जात आहें, मी भ्रांतचित्त आहें, असें त्यांस वाटावें हें कठीण होय.

माझ्या बंधुजनांपासून वियुक्त होऊन जावें, याचें संकट उत्तरोत्तर अधिक अघोर दिसण्यांत येतें. ती घटिका येईल तेव्हां सर्वसमर्थ देवाने मला प्रसन्नतेचा आधार द्यावा आणि मला संतोषवावें. एथे मला पुष्कळ स्वास्थ्य व सुख आहे, आणि या सर्व स्वहितकारक गोष्टींचा त्याग करून

जाण्याची कल्पना केल्याने माझें अंतःकरण कधीं कधीं खचून जातें. एथे माझ्या कुटुंबांतल्या जनांसीं मला मनःप्रिय सहवास आहे. उपकारशीलतेच्या सूचनेने आणि द्रव्याच्या साहाय्याने जे जे पदार्थ मला स्वास्थ्य व संतोष करण्याजोगे आहेत, ते ते माझे बंधुजन हर्षपूर्वक मला देत असतात. उष्णतेच्या आणि मानसिक अंधाराच्या देशास जाऊन पोंचल्यावर मला फार सुखाची दशा प्राप्त होईल, असी आशा नाहीं. उलटी मी दुःखाची वाट पाहत आहें. पण तें ज्ञानी व प्रतापी असा जो पुरस्कर्त्ता आहे त्याच्या सत्तेत आणि त्याच्या यशस्कर कार्यास्तव मी सोसणार आहें. त्याच्याने आपल्या उपकारिकपणाने मला हर्षित करवेल.

मिशनाच्या प्रकरणांत जे जे श्रम आणि स्वार्थ नाकारण्याचीं कार्यें होत असतात, यांविषयीं म्या काल प्रिय भावजई कार्री इजसीं आपल्या मनोवृत्ति कथून कांहीं गोष्ट व संभाषण केलें. तिने उत्तर देऊन ह्मटलें कीं "तुह्मी पहिल्याने त्या गोष्टीविषयीं बोलूं लागलां तेव्हां माझ्या मनांत असें आलें कीं ती गोष्ट व्हावयाची नाहीं. ती अघटित आहे. कारण कीं तुह्मी एथे नाहीं तर आमच्या प्रियतम बापास सुखी होणें अशक्य आहे. त्याचें सुख जें माझ्या सर्व शक्तीने होईल तें मी मोठ्या संतोषाने करीन. पण तुह्मी त्याच्या हृदयांतील ज्या जाग्यांत आहां तो दुसऱ्या कोणीएकानेहि भरला जाणार नाहीं, असी माझी खातरी झाली आहे. तथापि त्याचें स्वास्थ्य व सौख्य करण्यास मला प्रसंग येईल तर मी अत्यंत प्रयत्न करून सुखाचा परिणाम होतो कीं नाहीं हें पाहीन. मूर्त्तिपूजा करणाऱ्या

मनुष्यांचें कल्याण करावें, आणि केवळ ख्रीस्तासाठीं आपलें आयुष्य घालवावें, याची जी उत्कंठता तुह्माला आहे, ती माझ्या मनाला अनुकूळ आहे."

माझी खातरी उत्तरोत्तर अधिक दृढ होती कीं म्या त्या मानसिक अंधाराच्या आणि मरणाच्या दूर देशांत जाऊन काम करावें. हा जर देवाचा अभिप्राय असला तर तो मला माझी वाट स्पष्ट करून दाखवील. जर तेथे माझा फार उपयोग पडणार नाहीं तर जाऊं नये, असें माझ्या मनांत आहे. असली भारी सेवा करण्याची मला योग्यता नाहीं, असें दिवसभर माझ्या मनांत येतें. पण ख्रीस्त माझें पुण्य आहे, आणि त्याच्या ठायीं ज्ञानाची व सामर्थ्याची परिपूर्त्ति आहे. मला माहीत आहे कीं मी जर त्यासाठीं सर्व सोडितें तर मी या काळीं शंभरपट पावेन. इहलोकींच्या द्रव्याच्या आणि सुखाच्या शंभरपट नव्हे. तर जसें आकाश आणि पृथ्वी यांमध्यें अंतर आहे, तसें तें शंभरपट आणि ऐहिक क्षणभंगुर पदार्थ यांमध्यें अंतर आहे. जीं संकटें अंधाराच्या आकाराने माझ्या पायवाटेवर येत असतील, आणि जेथे अंतरिक्षांतील सत्तेचा अधिकारी हा फारकरून अक्षुण्ण सत्तेने राज्य करितो, तेथे ज्या मोहयुक्त गोष्टी माझें मन भयांत घालतील, त्यांच्या प्रसंगीं मला आश्रय होत असावा, यासाठीं मात्र जें प्रतिफळ इहलोकीं प्राप्त होणार आहे, तें मी आपल्या मनांत घेऊन ठेवितें. ही गोष्ट केवढी विस्मय करणारी आहे पाहा. कोणी बिचाऱ्या, अपात्र पाप्याने आपल्या तारणाऱ्यासाठीं जें जें थोडकें सुख सोडिलें आहे, त्याचें तो त्यापासून प्रतिफळ पावेल. ही गोष्ट जर देवाच्या सत्य शास्त्रांत कथिली नसती तर ती

केवढी असंबद्ध दिसली असती. अहा, देवाची जी कृपा येशू ख्रीस्ताच्या द्वारें प्रगट झाली आहे, ती केवढी आश्चर्यकारक आहे ! ती अपूर्वच होय. आह्मी त्याकरितां कांहींसी सेवा करितों, तो आह्माला सेवा करण्याची इच्छा व ज्ञान व सामर्थ्य देतो, आणि मग आह्मी त्यासाठीं जें केलें त्याचें तो आह्माला वेतन देतो. जसें जाणू आह्मी त्याच्या अनुग्रहाने तें केलें नव्हतें– तर आह्मी स्वतंत्र दैवतें असून तें केलें होतें, त्याप्रमाणें तो आह्माला आशीर्वाद देऊन त्या कामाचें प्रतिफळ देतो. अहा ! कोण असल्या तारणाऱ्याला ओळखून मान देऊन स्तविणार नाहीं ? प्रत्येक श्वासवानाने त्याला स्तवावें, असें कोण त्याला जाणून ह्मणणार नाहीं ? अहा, त्याच्या ठायीं जी प्रीतीची आणि कृपेची पूर्त्ति आहे, ती अनिर्वचनीय आहे खरी. तथापि ती सर्व आमची आहे. कां तर त्याने आपणाला आह्मासाठीं दिल्हें आहे. तर मग आह्मी कोणत्याहि ऐहिक विषयावर, अथवा प्राण्यावर, ख्रीस्तापेक्षां अधिक प्रीति कसी करूं? अहा, ख्रीस्त हा माझा आश्रय आहे. तो माझा अक्षय विभाग आहे. असी जर माझी नित्य खातरी होईल तर मी कोणतीहि हानि सोसीन, आणि मला कोणत्याहि प्रकारचीं संकटें प्राप्त झालीं, तरी त्यांविषयीं मी चिंता करणार नाहीं. त्या सर्वांचा परिणाम वैभवाचा होईल. होय, तो अकथनीय वैभवाचा होईल.

मी आपल्या प्रियतम वृद्ध बापाला टाकून जाणार आहें, ही कल्पना मनांत येतांच माझीं आसवें धारेने पडतात, आणि माझें अंतःकरण शोकाने गळतें. हें माझ्यामुळें नव्हे, तर बापामुळें आहे. फारकरून त्याच्या तारुण्यावस्थे-

तले हर्षास्पद स्नेही, सोबती, इत्यादि वारून गेले आहेत. सुमारें अर्धशतकापर्यंत ज्या प्रियेने त्याचीं द्वंद्वें, अडचणी, व सुखें विभागून त्याबरोबर अनुभविलीं आहेत, ती गमावली आहे. तर त्याला सुख करावें, याची ओढ माझ्या हृदयांत कसी भरली आहे. म्या केवढ्या हर्षाने जीवाच्या सर्व खुशाल्या सोडून त्याची सेवा करावी, त्याच्या उतारवयांतलीं असुखें शांतवावीं, आणि मायाममता व स्नेह, यांच्या योगेंकरून सर्वोत्कृष्ट कन्या व्हावें. पण मला माहीत आहे कीं सर्व शांतवनाचा देव याकडून जसें त्याचें कल्याण होतें, तसें माझ्या द्वारें होत नाहीं, आणि जर तो मला जावयास बोलावील तर तो माझा प्रियावियुक्त पिता याची हानि भरून देऊन त्याला यथास्थित प्रतिफळ देईल. यांत संशय नाहीं.

येशूने बिचाऱ्या बंडखोर किड्यांवर जी प्रीति केली आहे, तिजविषयीं आह्मी कोणत्याहि भाषेने विस्मययुक्त प्रशंसा करण्यास समर्थ आहों काय ? त्याने त्यांसाठीं अत्यंत दुःखें सोसिलीं. मग ते पापाच्या मार्गाने चालले तोंपर्यंत त्याने त्यांजवर फार फार उपकार केले. आणि शेवटीं तो आकाशांत त्यांसाठीं शोभमान वासस्थानें सिद्ध करितो. अहा, आह्मी तर या तारणाच्या यशस्कर अधिकाऱ्याचे भावीक अनुसारी होऊं कीं नाहीं ? आह्मी नित्यांत आपल्या अंगावर आपली उजळ युद्धशस्त्रसामग्री ठेवून त्याच्या निशाणाकडे चालण्यास, आणि जो प्रत्येक शत्रू आमच्या पुढें वरतें जाण्याच्या मार्गावर येईल, त्यासीं युद्ध करण्यास सज्ज होऊं कीं नाहीं !

आपले प्रिय बंधुजन व इष्टमित्र, आपलें रमणीय घर-

दार, आपला प्रिय जन्मदेश, हीं ख्रीस्तासाठीं, आणि तो ज्यांकरितां मरण पावला, अस्या कोट्यानकोटि नष्टोपाय मनुष्यांसाठीं सोडावीं, हा निर्धार म्या केल्यापासून इहलोकचीं सुखें, द्रव्यें, आणि प्रतिष्ठा पडताळून पाहतें तेव्हां तीं मला बहुधा हलकींच दिसत आहेत. मी आपल्या बाल्यापासून आणि तारूण्यापासून ज्यांजवर फार आवडीने प्रीति करीत आलें आहें, त्या इष्टमित्रांस मी सोडून जाणार आहें, आणि कदाचित् त्यांची माझी भेट फिरून यार्देनेच्या ऐलतीरीं होणार नाहीं, असें मी आपल्या मनांत आणितें, तेव्हां आकाशलोक मला फार जवळ भासतो. मी वारंवार आपली दृष्टि या नदीच्या पाण्यांवर लावीत असतें. तीं अंधाराचीं आणि वादळाचीं असीं दिसत नाहींत. कां तर न्यायीपणाचा सूर्य आपले लकलकीत किरण त्यांवर पाडीत आहे. त्यावरून जो प्रकाश पडतो तो एवढ्या जोराने तपतो कीं नश्वर डोळ्यांच्याने तो पाहवत नाहीं. पैलपार सुगंध कुरणें व वनें अत्यंत हिरवेपणाने उद्भवून शोभतात, आणि तेथे उद्धारक बसला आहे. जे कोणी त्याची वाणी जाणून सत्कीर्त्ति, श्रम, व दुःखें, हीं सोसून त्याच्या मागून चालले आहेत, त्यांस देवाच्या दूतानी वाटेस राखण करून त्याकडे पोहंचविलें आहे. तेव्हां त्याने त्यांला आलिंगन करून देऊन आपल्याजवळ ठेविलें आहे.

आह्माला कसा गौरवयुक्त धर्म आहे. आह्मी जीवनाचा उजेड अंधारमय अंतःकरणांत ओतितों. तेव्हांच त्यावरून आमचीं अंतःकरणें हर्षाने परिपूर्ण होतात. आह्मी इतर जनांला पाणी पाजितों, आणि आह्माला पाणी पाजितील. आह्मी जर उदारपणाच्या गोष्टी योजितों तर आह्मी

उदारपणाच्या गोष्टींनी स्थिर राहूं. प्रवास करणारा असा जो आमचा कष्टी व शोकातुर सहचर, त्याजपासीं केवळ एक संतोषकारक शब्द दयेने बोलल्याने आमच्या हृदयांत शांति व्यापून राहती. एवढाले महान् आशीर्वाद व अधिकार पावण्याला आह्मी योग्य नाहींच, तथापि जें संसिद्धीचें गौरव आह्मास प्राप्त व्हावयाचें आहे, तें आमच्या मानवी दृष्टीपलिडे फार उंच आहे. जेथे राजांचा राजा व प्रभूंचा प्रभु असा जो आह्मासाठीं वधलेला कोंकरा, तो आकाशलोकांत देवाच्या सिंहासनावर बसला आहे, तेथे त्याच्या ओढीने आह्मी नेले जात आहों. जेथे कोणीएक स्नेहाळू डोळे प्रीतीने आह्माकडे पाहत नाहींत, आणि कोणत्याहि मधुर वाणी आमच्या शोकाकुल, आणि वारंवार नष्टाश झालेल्या अंतःकरणास हर्ष करीत नाहींत, तेथे जाऊन काम करावें, असी जर आह्माला देवाची आज्ञा असती तर ज्या वैभवयुक्त साक्षीदारांच्या समुदायाने आह्मी वेढिले आहों, त्याकडे आह्मी वर दृष्टि लावून पाहूं. आकाशलोकांतले सर्व जन ज्याचें स्तवन करीत आहेत, त्यावर आपली प्रीतिच दाखवावी, यासाठीं त्या साक्ष्यांस आमच्या सारिखी सोई असली तर ते मोठा हर्ष पावतील. मी तुमचा आहें, आणि तुह्मी माझे आहां, असें जो ह्मणत असतो, त्या आपल्या प्रियतमापासीं आह्मी बोलणें चालणें करूं. याप्रमाणें आह्मी उत्तरोत्तर अधिक अधिक कष्ट आणि युद्धें करण्यास बलवान होत जाऊं. आह्मी ज्यांत विश्रांति करून घ्यावी, अस्या कांहीं भारलेल्या गुहा, अथवा कितिएक पृथ्वींतले एदेन बाग आह्मास आढळणार नाहींत, तरी जीवनाच्या पाण्याची शुद्ध नदी जी स्फटिकासारिखी नितळ असून देवाच्या व त्या कोंकऱ्याच्या

सिंहासनापासून निघती, तिजवर आह्मी सूक्ष्म दृष्टि ठेवून आपले डोळे लावावे, आणि नदीच्या कांठीं जीवनाचें झाड ज्याच्या छायेमध्यें आह्मी तारणाऱ्याच्या उरासीं शयन करून निरंतर विसावा घेऊं, त्याचें अवलोकन करीत जावें. अस्या दर्शनाच्या द्वारें आह्मी क्रांतिवलयांतल्या सूर्याची भारी उष्णता सोसून हर्ष पावूं कीं नाहीं ? आणि कठीण, नीच, व नष्ट, असअसें करणारें जें पापाचें बळ आमच्या सहचर मनुष्यजातीच्या ठायीं उद्भवून प्रवर्त्ततें, त्याचा संसर्ग जेव्हां आह्माला लागेल, तेव्हां विशेषेंकरून आह्मी त्या गोष्टी ध्यानांत आणून संतोष अनुभवूं कीं नाहीं?

उपकारस्तुति आमचा तारणाचा महात्मा अधिकारी याला असो. कां तर तूं आपलाच खर्च करून लढावयास जा, असी आज्ञा तो मला देणार नाहीं. मी तुला युद्धशस्त्रें देईन, आणि त्यांचा व्यवहार करायाला तुला बळ व चातुर्य पुरवीन, असें त्याचें वचन आहे. तो मला जय देईल. मी त्याच्या द्वारें प्रत्येक शत्रूला जिंकून अतिशय विजयी होईन, आणि आपला मुगुट त्याच्या पायीं ठेवून निरंतर हर्ष पावेन. तुह्मी अधींच या पूर्वी लढाईंत व्यवहारवृद्ध झालां आहां. मी वाटेवर धीर सोडून पडेन, याचें जें भय मला आहे तें तुह्माला नाहीं. वृद्ध, विधुर बापाचे उच्छ्वास रुंद रुंद पाण्यांवरून येऊन तुह्माला पोहंचून तुमचें अंतःकरण माघारें वळवून ओढणार नाहींत. तुह्मी शिणलेले असतां रात्रीं पलंगावर निजून झोंप पावणार नाहीं, तेव्हां कोणीएका बहीणभावंडांच्या वाणी त्यांच्या लहान मुलांच्या गोड गळ्यांत मिळून दूर उल्लासांची प्रतिध्वनि करून आमच्या सुखाच्या घरांत व उत्साहाच्या मंडळ्यांत

आह्मास येऊन मिळावें, असी सूचना करणार नाहींत. तुह्मी फार वेळामागें ख्रीस्तासाठीं या जगाचीं सुखें नाकारून दिल्हीं. आपल्या कामांत सुखी व हर्षित व्हावें, यासाठीं मला असाधारण ईश्वरी अनुकूलता पाहिजे कीं नाहीं! आपल्यासंगतीं मला घ्यावें, याचें तुह्माला कधीं कधीं भय वाटत नाहीं काय ? मी संकटाच्या दिवसीं निरूत्साह होईन, कीं नाहीं होणार, याविषयीं तुह्माला कांहीं तरी संशय होत आहे कीं नाहीं ? मला ठाऊक आहे कीं तुह्मी ह्मणाल आह्मी ईश्वराकडून बळवान आहों. तर त्याचा आश्रय करावा. पण मजसारिखे बिचाऱ्या पापी किडेवर भरवसा ठेवूं नये.

प्रिय ईलि बाईची मोठी व मुख्य इच्छा या गोष्टींवरून प्रसिद्ध आहे. एथे हिंदुस्थान देशांत मूर्त्तिपूजक लोकांमध्यें वधस्तंभाची गोष्ट प्रसृत करावी, आणि त्या योगानें जीवंत व सर्व सत्ताधारी देवाकडे पापी मनुष्यांस फिरवून सर्व काळचें जीवन पोहंचवावें, याची जी इच्छा तिच्या हृदयांत भरली, ती तृप्त करण्याविषयीं कस्या काय बाधक गोष्टी तिला प्राप्त झाल्या, त्याहि प्रसिद्ध आहेत. तिची प्रकृति बळकट नव्हती. कोणतीहि व्याधि तिच्या देहांत जुनाट झाली नव्हती. तरी त्याची क्षमता तिच्या विशाल हृदयाच्या समान नव्हती. अस्या प्रकारच्या तिच्या आणि तिच्या बंधुजनांच्या समजुती होत्या. मिशनाची पदवी संपादन करण्याविषयीं ईश्वराने माझ्या ठायीं तृष्णा उत्पन्न केली आहे. ह्मणून तो माझ्या देहांतल्या सर्व अपुरींचा पुराव करून ती तृप्त करील, अस्या खातरीने ती देवावर भरवसा ठेवून आपल्या इच्छेस अनुकूल होण्यासाठीं आपला पिता आदिकरून बंधूंची मनावणी आणि आपली तयारी

करीत गेली. ईश्वरी वाक्यरूप शस्त्राच्या द्वारें मानवी आत्म्याचीं पापबंधनें तोडावीं, आणि देवाचा अर्पिलेला कोंकरा जो देवाचा अवतरलेला पुत्र, त्याच्या प्रायश्चित्त सिद्ध करणाऱ्या रक्ताच्या योगानें त्या आत्म्याला शुभ्र करून परात्पर देवापासीं सर्वकाळचें जीवन प्राप्त होण्याची योग्यता द्यावी. या कार्यांचीं साधनें करणें हें ईश्वरी धर्मास अनुसरणाऱ्यांचें या जगांत विशेष कार्य आहे. असी तर ह्या प्रिय बाईच्या बंधुजनांची दृढ समजूत होती. ह्मणून तें काम करण्यास हिंदुस्थान देशीं जावें, असी जी इच्छा तिच्या मनांत उत्पन्न झाली, ती देवापासून आहे, असी जेव्हां त्यांची खातरी झाली, तेव्हांपासून त्यांनी तिच्या जाण्याविषयीं कांहीं एक बाधक गोष्टी सांगून अडचणी केल्या नाहींत. उलटें त्यांनी तिचें जाणें सोईचें व हर्षावह व्हावें, याविषयीं सर्व प्रकारें यथोचित बंदोबस्त केला. यावरून देवाचें वचन त्यांच्या अनुभवास पटलें, असें कीं जो बुद्धीनें गोष्टीकडे लक्ष्य लावितो तो हित पावेल, आणि जो परमेश्वरावर भाव ठेवितो तो सुखी.

सन १८५४ च्या आगस्त महिन्याच्या १५ व्या तारखेस रेवरेंड एस. बी. मंगर साहेब आणि मेरी ई० ईलि बाई या उभयांचा विवाह झाला. या कार्याविषयीं मंगर मडमेनें आपल्या दिनवृत्तपत्रांत असें लिहून ठेविलें आहे कीं "माझा भाऊ दीजे आणि त्याची भार्या, हे आह्मासंगतीं देवभजनस्थानांत आले, आणि माझ्या जवळ उभे राहिले. तेव्हां जे वारून गेले आहेत ते जीवंत असते तर एथे असण्याविषयीं कांहीं भावना माझ्या मनांत झाल्या. पण मी ज्यावर आपलें पाऊल पुढें ठेवणार होतें, त्यावरून मला खेद

झाला, असें माझ्या सभोंवत्या मनुष्यांस न वाटावें, ह्मणून म्या अश्रुपात आवरिला. माझ्या उत्तम पाळकाने फार प्रीतीने आह्मासीं भाषण केलें, आणि आह्मी ज्या कामांत उद्युक्त होणार त्याविषयीं तो अति स्वारस्याने बोलला. मग म्या लौकिकांत भार्या होण्याविषयींच्या भाका करून घेतल्या, आणि जो संबंध एदेनांत स्थापिला होता, आणि जो ख्रीस्ताने काना एथे अनुकूलतेने मानिला, तो म्या स्वीकारून घेतला. तेव्हां भार्येचीं आणि मिशनपदवीचीं जीं जीं कर्त्तव्य कर्में माझ्या अंगावर येतील, तीं सर्व मी साक्षेपाने करीन, असा म्या दृढ निश्चय केला. तेथे त्या समयीं म्या देवाची प्रार्थना करून साह्य करणारी कृपा मागितली. जो वल्लभ मजपासीं उभा राहिला होता, तो सर्वांहून माझ्या लगतेचा आहे, असें मला भासलें खरें. तथापि जो एवढा माननीय, एवढा संभावित, एवढा माझ्या स्नेहास योग्य आहे, त्याला भ्रतार हें स्नेहावह नाम ह्मणण्यावरून होण्याजोगा जो संतोष, तो या निमित्ताने फार न्यून झाला. तें असें कीं माझा प्रियतम व प्रतिष्ठित पिता जो एवढा वृद्ध व विधुर आहे, माझीं स्नेहाळू बहीणभावंडें, त्यांचीं प्रितिपात्रें लेंकरें, आणि इतर आप्तजन व इष्टमित्र, यांस विरह देऊन जाणार आहें. या विचाराने त्या धटिकेचें सुख फार कमी झालें. मग रेवरेंड मिस्तर कर्तीस याने प्रसंगोपात गोष्ट सांगितली. मंडळींतल्या माणसानी मिशनेरी गायन गायिलें, आणि रेवरेंड मिस्तर एग्लीस्तन याने देवाची प्रार्थना केली. नंतर आह्मी माघारें माझ्या भावाच्या घरीं आलों. तेथे आमच्या इष्टमित्रानी मोठ्या दाटीने येऊन आमची भेट घेऊन अभिनंदन केलें. नंतर विरहालिंगन देऊन ते आपल्या घरीं

गेले. १६ व्या तारखेच्या पाहांटेस आह्मी उठून जाण्याला उत्सुक झालों. आह्मी त्वरेने कांहींसें अन्न भक्षून देवासमोर गुडघे टेंकून प्रार्थना केली. मी धावून माडीवर गेलें. तेथे माझी लहान लाडकी मेरी गोड झोंपेंत निजली होती, तिचें म्या चुंबन घेतलें. मी आपली प्रिय दयाळू भावजई कार्री, इला आलिंगित असतां चिरविरहालिंगन देत आहें, असी मला संभावना झाली नाहीं. रेलवे दीपो एथे माझी प्रिय बहीण आगस्ता, माझा प्रियंकर भाऊ दीजे, आणि माझा दयाळू उत्तम मेहुणा, यांचा आणि आमचा वियोग झाला. मी फारच उतावळीने चिकागो नगर सोडून गेलें. असें झालें नसतें तर म्या रोदन केलें असतें.

मंगर साहेब आणि मडम हे तिचा पिता व दोन भाच्या यांसुद्धां चिकागो नगर सोडून देशांत आणि जलावर अटन करून तिसऱ्या दिवसीं न्यूयार्क शहर एथे पोहंचले. मंगर मडमेचा भाऊ जबुलून स्तैलस् हा या शहरांत राहत असतो. हे आप्तजन त्याच्या घरीं जाऊन राहिले. तेथे मंगर मडमेने कांहींएका दिवसांत आपल्या इष्टमित्रांची सुसंगति करून फार उल्लास अनुभविला. तथापि ते तिच्या स्वदेशांत शेवटले दिवस होते. ह्मणून त्यांत तिला केवळ संतोष व सुख वाटलें, असें समजूं नये. अधींच विरहानळ तिच्या प्रीति करणाऱ्या हृदयांत पेटूं लागला होता. “मी आपल्या फारच प्रिय, वृद्ध, व दुःखित झालेल्या पित्याचें अवलोकन करून शेवटली भेट घेत आहें,” असें अनेकवार तिच्या उद्विग्न मनांत आलें, आणि तिने गुप्त अश्रुपात केला. याविषयीं तिने असें लिहिलें. “इष्टमित्रांनी येऊन माझी भेट घेतली. त्यांच्या वहिवाटी-

वरून मला फार सुख झालें. पण मी त्यांस विरह देणार आणि दूर देशांत जाऊन राहणार आहें. या कल्पनेनें वारंवार मला दुःख झालें. जसजसा जाण्याचा दिवस जवळ आला, तसतसे ते अधिक प्रिय आणि अधिक प्रीतिपात्र झाले, असें मला दिसलें. पण "पाहा, मी तुह्माबरोबर सर्वकाळ आहें," असें तारणाऱ्याचें जें वचन त्याचा प्रत्यहीं आश्रय करण्यांत मी तत्पर झालें."

आपला स्वदेश सोडून दूरच्या परदेशांत राहावयास जाण्याच्या समयीं बहुत शेवटलीं कामें करायाचीं, आणि बहुत सरते शब्द बोलायाचे असतात. आपल्या वित्तविषयाचें यथोचित व्यवस्थापन करावें, असें एक काम त्या वेळीं मंगर मडमेला पडलें. आपण देवाची कारभारिण आहें, असें ती आपल्या जमाखर्चाच्या वहीच्या प्रथम पृष्ठावर लिहून ठेवीत असे. आणि आपण मार्गानें जातांना मृत्यु पावेन, अथवा कोठेतरी एकाएकी गम्रावेन, तर माझ्या ऐहिक विषयाविषयीं अव्यवस्था किंवा आशंका नसावी. अस्या विचारानें तिनें मृतपत्र लिहून आपल्या भावाच्या हवालीं केलें. कांहींएक हजार रूपये तिच्या अंगत्वें तिला मिळाले होते. तिचा भाऊ हनोख यानें आपल्या मरणाच्या वेळेस आपली सर्व ऐपत तिजला बक्षीस दिल्ही होती. तर या प्रकारें तिनें सरासरी वीस बावीस हजार रूपये आपल्या मृतपत्रांत लिहून दिल्हे.

माहे सप्तेंबराच्या साहाव्या तारखेस रेवरेंड मिस्तर मंगर आणि मंगर मडम हे आपले आप्तजन व इष्टमित्र इत्यादि स्वदेशांतील आनंदास्पदें सोडून इकडच्या अंधारमय देशास येण्याला निघाले. तर जाणावें कीं ज्याच्या योगानें

मनुष्याचा आत्मा मोठ्या पेंचांत पडून ईश्वराचा विशेष साह्यकारक अनुग्रह पावण्याजोगा होतो, असा तो दिवस त्या फार ममता करणाऱ्या स्त्रीच्या अनुभवास आला. आतां ज्याने तिच्या आयुष्याच्या प्रथम दिवसापासून तिचें अभीष्टचिंतन करून अत्यंत प्रीतीने व जतनेने तिला संभाळिलें, आणि तिजसाठीं फार आग्रहाने देवाची प्रार्थना करून ऐहिक व पारलौकिक आशीर्वाद मागितले, त्या वयातीत व अतिप्रिय पित्यापासून ती फारच प्रीतिवंत कन्या आपलें तोंड फिरवून पृथ्वीच्या दूर खंडांत जाणार आहे. त्याचें वदन ज्याच्या अवलोकनावरून तिला केवळ संतोष प्राप्त झाला आहे, तें प्रायः अणखी तिच्या दृष्टीस पडणार नाहीं. ती फिरून त्या पित्याची प्रेमावह वाणी ऐकणार नाहीं. ज्यानी बहुवार आपल्या स्नेहयुक्त सहवासाच्या द्वारें तिच्या अंतःकरणांत शांति व परितोष ओतून भरविला, आणि आपल्या घरचारांच्या माधुर्याकडून तिच्या जीवाला अपूर्व सुख दिल्हें, तो परम स्नेहाळू भाऊ, आणि त्याची सर्वोत्कृष्ट पत्नी, यांस, आणि आपल्या दावीद भावाची कन्या सेरा नाम्नी, जी मातृवियुक्त होऊन तीन चार वर्षांपर्यंत पोटच्या मुलीसारिखी तिच्या जवळ राहिली होती, आणि आपल्या एकट्या बहिणीची कन्या मेरी आगस्ता, जिच्या कोंवळ्या हृदयांत आपल्या मेरी मावसीवरची प्रीति भरली आहे, अस्या दोन्ही फार स्नेहाळू भाच्यांसहि शेवटलें विरहालिंगन देणार आहे. यांशिवाय तिचा आणि इतर नातलग इत्यादि स्नेह्यांचा वियोग होणार आहे. कांहींएक दिवसांनी तिच्या आणि ह्या सर्व इष्टमित्रांच्या मध्यें रुंद रुंद समुद्र होतील. तर

त्या दिवसीं मंगर मडमीच्या मनांत शोक भरला, असें ह्मण-ण्यावरून कोणाला आश्चर्य वाटेल काय! पण केवळ शोक तिच्या मनांत भरला, असें वाटूं नये. तो शोक हर्षानें मिश्रित होता. ज्याने तिला पाहिलें, त्याने तिच्या हसत्या तोंडावरून न्याय ठरवून ह्मटलें असेल कीं ती केवळ हर्षानें भरली आहे.

या दिवसींच्या कार्याविषयीं मंगर मडमेनें आपल्या दि-नवृत्तपत्रांत असें लिहिलें. "आज माझ्या आयुष्यामध्यें एक सीमा झाली आहे. म्या पाहाटेस उठून आपल्या पित्याच्या इच्छेप्रमाणे लिहिलें. आह्मी शेवटल्या वेळीं बरोबर प्रात-र्भोजन आणि देवाची प्रार्थना केली. मिशनाची प्रार्थना-सभा दाहा घटिका दिवसास बैबलघरांत नेमिली होती. तेथे यथासमयीं पोहंचावें, यासाठीं मला इतकी कार्याकुलता होती कीं तिने माझ्या ठायीं ज्या दुःखप्रद भावना होत्या, त्या चिंतन करून वाढवायास माझ्या मनाला अवकाश मिळाला नाहीं. आमचे आप्तजन आदिकरून अंगचे स्नेही, आणि मिशनकामाचे पुरस्कार करणारे, असे मनुष्य त्या प्रार्थनासभेत येऊन मिळाले. आह्मी सर्व संगतीनें देवाचें गायन व प्रार्थना केली. रेवरेंड डाक्तर आदाम्स् आणि मिस्तर मंगर यानीं संक्षिप्त भाषणें केलीं. मग सभाविसर्जन होत अ-सतां आह्मी अश्रुपात करणाऱ्या डोळ्यानी आणि खेदयुक्त अंतःकरणानी एकमेकांला विरहाचें आलिंगन देऊन वि-युक्त झालों. त्यांचीं व आमचीं तोंडें पुढें या जगांत पर-स्परांच्या दृष्टीस पडणार नाहींत, असें समजण्यावरून आह्मास विशेष दुःख वाटलें. तेव्हां प्रिय भावजई सेरा आपल्या घरीं परतली. ही फार स्नेहाळू भावजई अम-

ळसी अधिक वेळ आपल्याजवळ राहवून घ्यावी. तिचें वदन जें ममतास्पद तें पाहावें, आणि तिची मधुर वाणी ऐकावी, यांची मला केवढी उत्कंठा होती. अहा! तिजला वियोगाचें आलिंगन दिल्ह्याने माझें हृदय कसें घसरलें. त्या घटिकेस जो खेद मला झाला, त्याचें वर्णन कोण करूं शकेल? तेव्हां म्या आपल्या पित्याच्या गळ्यांत फार वेळ मिटी घालून शेवटीं त्याचें चुंबन घेतलें. तेव्हां म्या ज्या भावासीं गोडपणाने विचार केला, आणि ज्यासीं बंधुभावाने वहिवाट करण्यांत दिवस, आठवडे, व वर्षे घालविलीं, त्याला म्या फारच शोकाने विरहाचें आलिंगन दिल्हें. तेव्हां माझ्या मनांत असें आलें कीं माझ्या प्रीतिपात्र भाच्या ज्या माझ्या डोळ्यांदेखत आपआपल्या जन्माच्या पायऱ्यांवर येतील, असें मला वाटत होतें, त्या लौकर माझ्या दृष्टीआड होतील. कां तर त्यांच्या तारूण्याचा उदय होत आहे, इतक्यांत मी त्यांस सोडून जातें. असो. माझ्याने ह्या दुःखप्रद गोष्टींचा विस्तार करवत नाहीं. मिशनेरी जनाने मुळींच सुखसोईचा त्याग करावा लागतो, याचा मला उमज झाला. या उपरांत ते एशीया नामक आगबोट इजवर मला सोडून गेले. तेव्हां मला रडण्याची शक्ति होती तोंपर्यंत म्या रूदन केलें. मग म्या हा विचार केला कीं एथे ह्या जलाटन करणाऱ्या मनुष्यांच्या समक्ष एवढें रूदन करणें हें उचित नाहीं. कां तर मी वधस्तंभाची मिशनेरीण आहें, असें त्यांस कळूं येईल, आणि मग मी आपल्या धन्यासाठीं हा वधस्तंभ उचलून वहायास खुशी नाहीं, असें कदाचित् त्यांस वाटेल.

जे कोणी प्रभू येशू ख्रीस्ताची आज्ञा मानून सर्व पृथ्वीं-

तल्या मनुष्यांमध्यें तारणाचें शुभवर्त्तमान घोषण करितील, त्यांस हीं आप्तजन आदिकरून इष्टमित्रांचा वियोग पावण्याचीं दुःखें होतील, असें आमच्या राजाला व तारकाला माहीत होतें. तथापि त्याने आपल्या अनुसाऱ्यांवर त्या दुःखांचें ओझें घातलें. पण ते असलीं दुःखें सोसून कांहींएक विशेष हानि पावतात, असें समजूं नये. उलटें ते असलीं दुःखें सोसून आपला प्रभू व तारणारा याला अनुसरतात, आणि ईश्वराचे सर्वोत्कृष्ट आशीर्वाद पावण्यास योग्य होतात. आपल्या प्रभूची आज्ञा मानण्याने ते त्याची संतोषावह कृपा पावून उत्साहाने वर्त्ततात. तर सर्व प्रकारच्या दुःखांमध्यें त्यांला शांति व तुष्टि होत असती. "जगाच्या समाप्तीपर्यंत मी तुह्माबरोबर सर्वकाळ आहें," हें प्रभूचें वचन सर्व संकटांमध्यें धैर्य व समाधान देणारें आहे. "ज्याने माझ्या नामासाठीं घरें, किंवा भाऊ, किंवा बहिणी, किंवा बाप, किंवा आई, किंवा बायको, किंवा लेंकरें, किंवा शेतें, हीं सोडिलीं आहेत, तो शंभरपट पावेल, आणि सर्वकाळच्या जीवनाचें वतन पावेल." या प्रभूच्या वचनाच्या द्वारें त्याच्या आज्ञा पाळणाऱ्यांस इहलोकीं आणि परलोकीं यथायोग्य आधार मिळत असतो.

प्रभू, भक्तां आज्ञा द्यावी
जावया दिगंतरीं,
त्यांनी हर्षें गाजवावी
मोठी कृपा ईश्वरी,
हो त्यांसंगें
जग जाई तोंवरी.

प्रकरण ६.

मिशन पदवींतली प्रतीति आणि आशा.

पृथ्वींतलीं काळोखमय ठिकाणें बलात्काराच्या वस्त्यांनीं भरलीं आहेत. याप्रमाणें देवाच्या पवित्र शास्त्रांत मूर्त्तिपूजेच्या राज्याचें निरूपण केलें आहे. तर मूर्तिपूजा करणारे असे जे काळोखाच्या ठिकाणांत वस्ती करीत आहेत, त्यांस उजेड कोठून मिळेल? जो अंधारांत बुडाला, त्याने उजेड पाहावा, असें कसें घडेल? असें घडणार नाहीं. त्याने दिवा उजळावा, असें जर कोणी ह्मणेल तर त्याने त्यासाठीं ज्योति कोठून आणावें? त्याच्या ठायीं उजेड आहे, असें ह्मणणें संभवणार नाहीं. जो अंधारांत बुडाला त्याला उजेड आहे, असें ह्मणण्याची संभावनाहि नाहीं. बलात्कार अंधाराने होत असतो. तर उजेडाच्या बळाने अंधार नाहींसा झाला असतां बलात्कार आदिकरून सर्व दुर्गुण निघून जातात, आणि त्या ठिकाणीं नम्रता, प्रीति, इत्यादि सद्गुण प्रगट होतात. सूर्योदयाने निशा पळून जाती, आणि ईश्वराचीं आश्चर्यकारक कार्यें दिसण्यांत येतात. तर निश्चयें समजावें कीं दीपाशिवाय मूर्त्तिपूजकाला पाहतां येत नाहीं, आणि त्यांच्या वस्त्यांतून कठोरत्व, वगैरे अवगुण जाणार नाहींत. तर मग हा प्रश्न पुनः पुनः येतो कीं जे मनुष्य पृथ्वींतल्या काळोखमय ठिकाणांत वस्ती करून बलात्कार, इत्यादि दुष्कर्में करीत असतात, त्यांला उजेड कोठून मिळेल? कोण अंधाराच्या देशांत घरोघरीं जाऊन भ्रमण करणाऱ्या मनुष्यांच्या वाटेवर जीवनाचा दीप ठेवील? कोण बलात्काराच्या वस्त्यां-

च्या ठिकाणीं सौम्यता, प्रीति, तुष्टि, इत्यादिकांच्या वस्त्या रचून उभारील! कोण मनुष्यजातीच्या शोकातुर हृदयांत हर्ष भरून ठेवील?

या प्रकारच्या प्रश्नांला देवाच्या शास्त्राचें सत्य उत्तर हें आहे– प्रभु येशू ख्रीस्त जगाचा उजेड आहे. तो न्यायीपणाचा सूर्य आहे. तर हा उजेड सर्व पृथ्वींतील मनुष्यांस मिळावा. हा सूर्य ज्या कोणांच्या अंतःकरणांवर उगवून आपला जीवनकारक प्रकाश पाडितो, ते सुधारून दैन्याने व प्रीतीने वर्त्ततात, आणि जीं कामें देवाच्या मनाला अनुकूळ आहेत, तीं सुखसंतोषाने करितात. "तुझें वचन माझ्या पायांस दीप व माझ्या वाटेस प्रकाश असें आहे. कां कीं आज्ञा हा दीप आहे, आणि नेम हा प्रकाश आहे. आणि संबोधाचे निषेध हे जीवनाचा मार्ग असे आहेत." हें तर जाणावें कीं अंधारमय देशांतील मनुष्यांमध्यें या उजेडाचा प्रसार करावा, आणि त्या योगानें सद्धर्माच्या मार्गानें त्यांला लावून चालविण्याचीं विहित साधनें करावीं, हें मिशनाचें काम होय. हें काम उत्तरोत्तर जसजसें सिद्धीस जाऊन त्याचे इच्छिलेले परिणाम होत जातात, तसतसे मिशनाचे पुरस्कारी आणि त्यांचे कामकरी यांस हर्ष प्राप्त होतो. पण ह्या कामाचे यथोचित व अभीष्ट परिणाम झाल्यापूर्वीं, त्या सर्व जनांच्या अनुभवास पुष्कळ अडचणी आणि क्लेश येतात. एथें ज्यांचें राहणें केवळ थोडे महिने होईल, त्यांच्या पाहण्यांत आणि ऐकण्यांत बहुत ओंगळ व अति शोकावह गोष्टी येतील. ज्यांचें आयुष्य एतद्देशीय लोकांमध्यें खर्चलें आहे, त्यांस त्या गोष्टी कदाचित् विलक्षण वाटणार नाहींत. पण

जेथे ख्रिस्ती देशांत ईश्वरी धर्माचा उत्कर्ष मनुष्यांच्या मनांवर प्रबल होऊन चालला आहे, तेथे कोढ्ये, लुले, अंध, खंगार, व्याधित, इत्यादि आपन्न लोकांची उपजीविका व प्रतिपालन सर्काराच्या औदार्याने केलें आहे. ह्मणून असले लोक फारकरून घरोघरीं हिंडत नाहींत, आणि समुदायांच्या दृष्टीस पडत नाहींत. तेथे ईश्वराचे भजणारे हे आत्म्याने व सत्यतेने त्याला भजतात. दगड, माती, इत्यादि पदार्थांच्या मूर्त्ति ठिकाणोठिकाणीं दिसण्यांत येत नाहींत, आणि सूर्य, चंद्र, आप, तेज, आदिकरून साकार वस्तूंचें भजनपूजन करणारे अढळत नाहींत. तेथे स्त्री ही देवाची अंत्य व सर्वोत्कृष्ट कृति, आणि पुरुषजातीची अनुपम भूषा असी आहे, असें मानितात. तिने सर्व प्रकारचा ज्ञानाभ्यास करून यथायुक्त प्रकारें पुरुषाची बराबरीची सोबतीण असावें. सर्व पुरुषानीं यथायोग्य आदरें तिची आब्रू मानावी, आणि सर्व मर्यादेने तिची परिचर्या करावी. हीं सर्व आबालवृद्धांचीं साधारण मतें आहेत. ह्मणून बहुधा स्त्रीची स्थिति सोईची व प्रतिष्ठायुक्त आहे. असें असतां जे कोणी तेथे न्यायीपणाच्या सूर्याच्या लकलकीत किरणांत, आणि ईश्वरी धर्माच्या यथार्थ संप्रदायांत चालले आहेत, ते जेव्हां एथच्या गाढ अंधारांत येऊन मूर्त्तिपूजक लोकांचीं धर्मकर्मे लक्ष्यांत घेतील, आणि मनुष्यांची दुर्दशा पाहतील, तेव्हां फार फार शोक केल्यावांचून कसे राहतील ? राहणार नाहींत. एथे सर्वत्र शोच्यता पाहाण्यांत व ऐकण्यांत येती. सर्वत्र मनुष्य भ्रांतीने वर्त्ततात. सर्व आपल्या बुद्धीला कर्त्तव्यशिक्षा अवमानून साकार पदार्थांला उपासितात. कोणीहि निराकार देवाला भजत

नाहींत. त्याची ओळख कोणालाहि नाहीं. पर्वता एवढा असत्य धर्माचा भार सर्व जनांवर पडला आहे. सर्व ठिकाणीं सर्व स्त्रीजात, आणि विशेषेंकरून सर्व विधवाजात, ही पुरुषानी केलेल्या अन्यायांच्या ओझ्यांखालीं सांपडून वन्हत आहे. भ्रमाची दाट सावली साऱ्या देशावर फांकली आहे.

सर्वांची इच्छातृप्ति,
ती व्यर्थ जाई, जाण,
जनाला वेड प्राप्ति,
मूर्त्तीला देती मान.

सन १८५४. माहे नोवेंबराच्या तिसऱ्या तारखेस मिस्तर मंगर आणि मंगर मडम हे रेवरेंड डाक्तर आन्दर्सन आणि रेवरेंड मिस्तर तामसन यांच्या संगतीने येऊन मुंबईस पोहंचले. हे चौघे जण जलमार्गाने येत असतां लंका बेटास पोहंचून कांहीं दिवस राहिले. तेथे मूर्त्तिपूजा करणारे असे जे बौद्ध, त्यांचे देवधर्म त्यांच्या पाहण्यांत आले. त्या लोकांतील बहुत मनुष्य तारणाची सुवार्त्ता ऐकून जीवंत व सत्य देवाकडे फिरले आहेत. हे मार्गस्थ त्यांच्या भजनस्थानांत जाऊन, आणि त्यांच्या भजनाची व्यवस्था व पद्धति पाहून, मिशन कामाविषयीं फार आनंद व उत्तेजन पावले. तेथे मूर्त्तिपूजन करणाऱ्या मनुष्यांचा अंधारमय देश प्रथमतः मंगर मडमेच्या पाहण्यांत आला. तेव्हां तिचें हृदय फारच करूणेने विरघळलें. तेथे शुभवर्त्तमानाच्या द्वारा जो जो जय असत्य धर्माच्या अमलावर झाला आहे, त्याविषयीं तिने जें जें दृष्टीने पाहिलें, आणि

कानानें ऐकिलें, त्याकरितां तिनें फार हर्षावेशानें देवाला स्तविलें. पण ज्या दिवशीं ती मुंबईस पोहंचली, त्या दिवशीं तिला मोठा उत्साह प्राप्त झाला. तथापि हर्षानें व शोकानें मिसळलेलीं आसवें तिच्या डोळ्यांत दिसलीं. याचें काय कारण, असें जर कोणी पुसेल तर जाणावें कीं ज्या मूर्त्तिपूजकांमध्यें तिला तारणाचें शुभवर्त्तमान सांगण्याचा प्रसंग येणार होता, त्यांचीं तोंडें पाहून आणि त्यांची भाषा ऐकून ती संतोष पावली. पण हे कोट्यानुकोटी अमर आत्मे अंधारांत चालून शाश्वत नाशास जात आहेत, याचा विचार करण्यानें तिच्या हृदयांत शोक भरला. तेथें सर्व जन तिला परखे होते, आणि सर्व विषय विलक्षण असे होते, तरी ती बंदरापासून मिशनाच्या घरीं जात होती, तेव्हां तिचें मन कशानें प्रेरित होतें, हें पाहा. असें कीं तिनें म्या चांगली मिशनेरीण व्हावें, असें आपल्या मनानें देवाची प्रार्थना करून मागितलें.

अहमदनगराजवळ भिंगार ह्मणून एक गांव आहे. तेथे मंगर साहेबानें अगोदर कांहींएक वर्षें राहून मिशनाचें काम चालविलें होतें. फिरून तें काम करावें, या अभिप्रायानें तो आणि मडम साहेब तेथे जाऊन राहिले. तेव्हांच त्यानीं सातारा शहरांत त्या कामावर जावें, असा ठराव झाला. यामुळें सन १८५५ च्या फेब्रुएरी महिन्यांत मिस्तर मंगर आणि मंगर मडम हे सातान्यास जाऊन पोहंचले. मिशनाच्या कामाविषयीं मंगर मडमीनें आपली प्रतीति, आशा, इत्यादि मनाच्या भावना दिनवृत्तपत्रांत लिहून ठेविल्या. तर एथें कांहीं गोष्टी त्यांतून काढून लिहितों.

मुक्काम अहमदनगर, सन १८५४. मिशनाची जी सभा वीस दिवसपर्यंत जमली होती, ती आज विसर्जित झाली आहे. आह्मास असा उमज पडला कीं देव आमच्या संगतीं आहे. आह्मी दोन प्रार्थना केल्या, आणि "येशू राज्य करील," इत्यादि या सुंदर गीताच्या दोन ओव्या गायिल्या. या सभेच्या परिणामाने उत्तरोत्तर मिशनाच्या कामाला अधिक गुणांश होईल, असी आमची आशा होय. एतद्देशीय ख्रिस्ती मनुष्यानी आपल्या पालकांच्या द्वारें डाक्तर आन्दर्सन आणि मिस्तर ताम्सन या साहेबांसीं बोलणें करावें, या इच्छेने ते उतारवेळीं देवाच्या भजनस्थानांत मिळाले. तेथे आह्मी सर्व गेलों. हरीपंत आणि रामकृष्णपंत हे दोघे सहृदयतेने चांगलें बोलले. त्यांचें बोलणें एणेप्रमाणें आहे कीं आह्मी अमेरिकान मंडळ्यांचे आभारि आहों. आह्मी त्यांच्या उपकारांपासून उत्तीर्ण होणार नाहीं. कारण कीं आह्मास जीवनाचा मार्ग ह्मणजे आकाशाकडे जाण्याचा मार्ग शिकवावा, यासाठीं त्यानी एथे मिशनेऱ्यांला पाठविलें आहे. तिकडचीं मातापितरें अतिशय ओजेने आपल्या पुत्रीपुत्रांस ज्ञान विद्या शिकवून संभाळीत असतात, आणि जरी त्या मुलांचा त्यांस अपार स्नेह आहे, तरी तीं त्यांला आपल्यांजवळ ओढून ठेवीत नसतात. तर या देशींच्या मनुष्यांला तरणोपाय शिकवावा, या कामावर तीं आपलीं लेंकरें पाठवून, त्यांस आपलें द्रव्य देऊन, त्यांचा निर्वाह करीत असतात. हे मिशनेरी जन आह्माला मिळाले आहेत, याकरितां आह्मी अमेरिकान मंडळ्यांतील ख्रिस्ती मनुष्यांचा आभार मानितों. अणखी तुह्मा उभयतानी एतद्देशांत येऊन आह्माविषयींच्या

व्यवस्थित गोष्टी आपल्या दृष्टीने पाहून व श्रोत्राने ऐकून त्यांस कळवाव्या; या हेतूने त्यानी तुह्माला आह्माकडे पाठविलें आहे. असें समजून आह्मी हा त्या अमेरिकान ख्रिस्ती मनुष्यांचा मोठा उपकार मानितों.

आजच्या दिवसाच्या कष्टांवर देवाचा आशीर्वाद होत असावा, यासाठीं म्या मोठ्या आग्रहाने प्रार्थना केली. मग मी भजनालयांत गेलें. तेथे खुरशी मजसाठीं ठेविली होती. एथे आसपास मूर्त्तिपूजा करणारे असे मनुष्य सहस्रावधि गणिले आहेत, तरी केवळ एकवीस जन तेथे निवांत बसले होते. त्यानी लक्ष्य लावून एकचित्ताने उपदेश करणाराचें बोलणें ऐकिलें, आणि कितिएकानी आपल्या डोळ्यांचीं आसवें पुसिलीं. त्या गोष्टीचा उच्चाराने त्यांचें नरकापासून तारण व्हावयाचें आहे, असें जाणू मिस्तर मंगराला वाटलें, त्याप्रमाणे त्याने फार आस्थेने ती गोष्ट उच्चारिली. कोणी कोणी मार्गावर त्याचे शब्द ऐकून उभे राहिले. कोणी दाटीने दारांत बसून गोष्टीला कान दिल्हा. पण उपदेश समाप्त झाल्यापूर्वीं ते फारकरून निघून गेले. येशूकडे पाहत असावें, असें त्यानी शास्त्र वाक्य मानून करावें, हें मी देवाची प्रार्थना करून मागत बसलें. मला इतकें वाईट वाटलें कीं घरीं पोहंचल्यावर माझ्याने आपल्या अश्रुपाताचें निवारण करवलें नाहीं. जेथे इतके थोडके ऐकणारे असतात, तेथे उपदेश करणें हें माझ्या भ्रताराला फार कठीण असावें, असें मला भासलें. उद्धारकाविषयीं ज्यांला कांहींच ज्ञान नाहीं, असले सहस्रावधि नष्ट मनुष्य सभोंवते आहेत. त्यानी श्रवण करून हित पावावें, असा प्रसंग आहे. कां तर

उद्धारकानें त्यांसाठीं मरण सोसिलें आहे. आणि त्यांस त्याचें सुवर्त्तमान सांगावें, यासाठीं त्यानें एथें येण्याला आपल्या सेवकांला आज्ञा देऊन पाठविलें आहे. तर त्यानें त्यांला ऐकण्याचा कान कां दिल्हा नाहीं? देवाचें करणें हें किती गहन असतें. त्यावरून त्याच्या मिशनेरी सेवकांचा विश्वास व धैर्य यांची केवढी परीक्षा होत असती.

डाक्तर आन्दर्सन या साहेबाचें पत्र आह्मास आलें आहे. आह्मी सातान्यास जावें, असी त्याची इच्छा त्यांत सांगितली आहे. ही तर कसी दुःखाची गोष्ट आहे! एथे केवळ तीन दिवस आह्मी राहिलों. तर मग आपणाला कांहीं तरी स्थिर वस्ती करायाची आहे, याची आशा मिशनेऱ्याला होईल काय? एथे आह्माला फार सुखाचें घर आहे. आह्मी जर सातान्यास गेलों तर जिकडे मिस्तर मंगरानें अगोदर हिंडून कष्ट केले आहेत, तिकडचीं सकळ नगरें गांवें व खेडीं यांमध्यें जे लक्षानुलक्ष बापडे मूर्त्तिपूजक असतात, त्यांचा समाचार घेईल, असा कोणी नाहीं. ह्मणून त्यांस पुनः मिशनेऱ्याच्या ओठांकडून स्तुत्य येशूविषयींची गोष्ट ऐकायास मिळणार नाहीं, असी कल्पना आह्मी कसी करूं? ईश्वरानें आमचीं पावलें निटावावीं.

आज मी आपल्याजवळ पंडिताला बसवून मराठी अक्षरवटिका शिकूं लागलें. ती मला कठीण वाटली. म्या ही भाषा लौकर शिकून बोलावी, यासाठीं प्रभूची प्रार्थना करून देहाचें आरोग्य, डोळ्यांचें बळ, आणि मन, व स्मरण, यांची शक्ति मागितली. अणीक या भाषेच्या द्वारें त्याचें गौरव करावें, यासाठीं म्या यथायोग्य अंतःकरण मागितलें. सातान्यास जाण्याविषयीं आमचें कर्त्तव्यकाम काय

आहे, याचा विचार आह्मी फार आस्थेने करीत आहों. आह्मी आपल्या मार्गांत देवाला जाणितों, आणि तो आमच्या वाटा निटावील, असी आमची खातरी आहे. या विचारांत सुख आणि स्वार्थ यांच्या गोष्टी न याव्या, ह्मणून मी प्रयत्न करितें, आणि ईश्वराचें राज्य चालविण्याविषयीं आमच्या द्वारें कोठे अधिक उपयोग घडेल, याचाच विचार करितें.

मी एकटीच चंद्राच्या पूर्ण प्रकाशाने आमच्या बागांत फिरत, आणि आपल्या हृदयांतले जे स्नेहाळू जन अमेरिका देशांत आहेत, त्यांविषयींच्या कल्पना करीत होतें, इतक्यांत मला कांहीं एक उपद्रव होईल, अस्या काळजीने घरच्या हमालाने येऊन भयाचें कारण खुणेने दाखविलें. तेव्हां त्याची मला करूणा आली, आणि ईश्वराने आह्मास आमची चाकरी करायाला असले उत्सुक व विश्वासू चाकर दिल्हे आहेत, यामुळें म्या आपल्या मनांत त्याची उपकारस्तुति केली. रात्रीं देवाचें भजन करीत असतां आह्मी आपला मार्ग त्याला सोपून दिल्हा, आणि अश्रुपाताने त्याची विनंती केली कीं जेथे आमची सेवा त्याच्या राज्यांतील कार्याला अतिशय उपयोगी पडेल, तेथे त्याने आह्माला पाठवावें.

आज सकाळीं सूर्य फारच वैभवाने उगवला. त्या योगाने ढगें अतिशोभेने रंगीत झालीं. सूर्याचे किरण विभक्त होऊन इंद्रधनूच्या रूपाने पश्चिम दिशेवर पडले. प्रिय बार्कर बहीण गडाजवळ मला भेटली. आह्मी दोघी हर्षयुक्त विस्मयाने ती कांति पाहून उभ्या राहिलों. दीर्घापेक्षां केलेली विलायतेची डांक काल रात्रीं पोहंचली. बार्कर मडमेने पत्रांचीं दोन पुडकीं आणून मला दिल्हीं. तेव्हां माझ्या हृदयाने कसा हर्षाने उल्हास केला. म्या तीं

घेऊन घरीं आपल्या प्रिय भर्तारापासीं वाचिलीं. मग आह्मी गुडघे टेंकून ईश्वराची उपकारस्तुति केली. कां तर त्यानें आमच्या बंधुजनांची प्रीति व रक्षण केलें आहे, आणि आपल्या दयेने त्यांच्या क्षेमाचें वर्त्तमान आह्मास ऐकविलें आहे.

आज माझ्या प्रियतम पितराचा अठ्याहत्तरावा वाढदिवस आहे. म्या त्याविषयीं पुष्कळ चिंतन केलें. त्याची संगती करावी, जें निर्बळपण त्याच्या वृद्धत्वावरून होतें, आणि जे शोक त्याच्या विधुरत्वावस्थेवरून होतात, त्यांमध्यें तो असतां त्याला संतोषवावें, आणि त्याचें समाधान करावें, असी मला सवड असती, तर कसें मला अनिर्वचनीय सुख झालें असतें. जर कोट्यानकोटि मूर्त्तिपूजक लोक शुभवर्त्तमानाविषयींच्या अज्ञानानें नाशास जात नसते, तर मी घराकडील सुखसंतोष अनुभविण्यास त्याबरोबर राहिलें असतें. पण माझ्या स्तवनीय धन्यानें असें सांगितलें आहे कीं जो माझ्यापेक्षां बापावर, अथवा आईवर प्रीति करितो, तो मला योग्य नाहीं." मी अंतःकरणाच्या पीडेने ह्या प्रियंकर बापाला सोडून आलें.

मी पुनः भजनालयांत गेलें. तेथे चोवीस एतद्देशीय मनुष्य बसून जीवनाची गोष्ट ऐकत होते. आपला उद्धारक जसा जाणू मिस्तर मंगराजवळ उभा राहून आपण त्यासाठीं, आणि त्या हिंदु मनुष्यांसाठीं काय काय केलें होतें, तें सुचवीत होता, त्याप्रमाणे माझ्या प्रिय भर्त्यानें आसक्तीनें शुभवर्त्तमानाचा संदेश दिल्हा. मला वाटलें कीं खरेपणासहित पवित्र आत्म्याचा गुणांश आल्यावांचून तें अगदी निर्बळ होईल. तर मंडळीची सेवा होई, तोंपर्यंत म्या देवाची

प्रार्थना करून आत्म्याची वृष्टि मागितली. मंडळी विसर्जन केली असतां म्या घरीं जाऊन तेंच मागणें केलें. उतारवेळीं साठांहून अधिक माणसें त्या ठिकाणीं मिळालीं, आणि यांशिवाय बहुतेक दारांत बसून श्रवण करीत होतीं. त्यांतील कोणी कोणी अंधळीं, पांगळीं, असीं होतीं. मंडळी विसर्जित झाल्यावर त्यांला भिक्षा मिळाली.

रात्रीं म्या आकाशाकडील जी विश्रांति, तिचें फार चिंतन केलें. माझा जीव माझ्या मनांतील पापांच्या द्वारें एवढा उद्विग्न झाला आहे, आणि मी देहांत आहें तोंपर्यंत त्यांपासून मुक्त होईन, याची इतकी थोडी आशा आहे कीं देहाचा वियोग मला चांगला वाटला. खरेंच तें हर्षदायक असें वाटलें. तथापि अणीक पुढें जगून कांहींएक हितकार्यें करावीं. होय, पुष्कळ हितकार्यें संपादावीं, असी माझी इच्छा आहे. तीं घडलीं असतील तरी मी केवळ निरूपयोगी चाकरीण झालें असेन. शुभवर्त्तमानाचा उपदेश श्रवण करण्यावांचून मी जर शाब्बाथानुशाब्बाथ घालवीन, तर माझा आत्मा कृश होईल कीं नाहीं! असली दशा मला प्राप्त होईल, असी माझी खातरी आहे. अहा, माझे आप्तजन जे अमेरिका देशांत आहेत, ते प्रतिशाब्बाथीं अनुपम सत्यवचन श्रवण करीत असतात. त्यांनी देवाची उपकारस्तुति करून आपली वृद्धि करण्यांत ऐकण्याचा विनियोग करावा, आणि त्या योगानें प्रभूची सेवा करायाला बलवान होत असावें.

आजच्या सकाळीं मी भजनालयांत गेलें नाहीं. पण घरीं राहून म्या देवाची प्रार्थना केली, आणि माझा भर्त्ता जो ह्या लाचार लोकांच्या समक्ष खोहजाला दाखविण्या-

साठीं आयास करीत आहे, त्याच्या कष्टांवर ईश्वरी आत्म्याची वृष्टि मागितली. इतर मिशनेरी जन जे श्रम करीत आहेत, आणि जे अमेरिका देशांत शास्त्रार्थ सांगतात, आणि जे बोध ऐकितात, असल्या मनुष्यांसाठींहि म्या प्रार्थना केली. सायंकाळीं मी आपल्या प्रिय भर्त्याबरोबर भजनस्थानीं गेलें. तेथे ज्यांचें दर्शन मला झालें त्यांच्या दृष्टीवरून मी सद्‍गदित झालें. जे सकळ दरिद्री व लाचार कधीं कधीं माझ्या पाहण्यांत आले होते, त्यांतील जे परम दुःखापन्न, असले साठांहून अधिक मनुष्य तेथे मिळाले होते. त्यांचीं अपुरतीं वस्त्रें हीं केवळ चिंधकें होतीं. कोणीएकांचीं अंगें कंपवायूने कांपत असत. अंधळे, लुले, पांगळे, असे कोणी कोणी होते. कोणी वृद्धत्वाच्या आणि अशक्तपणाच्या भाराखालीं लवलेले होते. ते सर्व भूमीवर निवांत बसून एकचित्ताने जीवनाची गोष्ट ऐकत होते. आमचा धन्य तारणारा हा एथे पृथ्वीवर होता, तेव्हां असल्या मनुष्यांच्या दुःखांच्या आणि दुष्टाईच्या गोष्टी त्याच्या दृष्टीस पडल्यावरून तो हृदयांत सद्गदित झाला. मोठ्या उत्कंठेने व आग्रहाने म्या नित्य त्यास विनंती करून मागितलें कीं त्याने आपल्या अपार दयेने ह्या निरूपाय व अंधारमय मनुष्यांचें अवलोकन करावें, आणि आपलें जें खरेपण घोषण केलेलें, त्यावर आपल्या आत्म्याचा गुणांश ठेवावा, आणि त्या योगाने त्यांच्या आत्म्यांचें तारण साधून द्यावें. तो तर त्या मनुष्यांसाठींच मरण पावला, आणि त्याच्या अमूल्य रक्ताच्या द्वारें त्यांनी आपल्या सर्व पापांपासून शुद्ध होत असावें. असले जन दिव्य दूतानी पाहिले असतां त्यानी रूदन केलें असावें. अहाहा! सांसर्गिक व मानसिक व आत्मिक

अश्या प्रकारचें जें त्यांचें नीचपण व बिघाड, त्यांच्या अधम पदांतून त्यांला सोडवून घ्यावें. आकाशांत जें अक्षय वतन प्राप्त व्हायाचें आहे, तें पावण्यासाठीं आपल्यांच्या संगतीं त्यांला वतनदार असें करावें, आणि शेवटीं आपल्या बापाच्या घरीं त्यांला पोहंचवून वासस्थानें द्यावीं, त्यांवर शुभ्र झगे घालावे, आणि त्यांच्या हातांमध्यें खारकेच्या डाहाळ्या ठेवाव्या. तर तो आपल्या नावाला मोठा प्रताप पावेल कीं नाहीं! मला देवाचा आभार वाटला. कां तर असल्या दुःखापन्न व लाचार मनुष्यांत ख्रीस्त गाजवावा, याचें पद माझ्या प्रिय भ्रताराला आहे. त्याने जर त्यांला ख्रिस्ताची गोष्ट सांगितली नसती, तर जो मार्ग व सत्यता व जीवन असा आहे त्याविषयीं त्यानी कदापि ऐकिलें नसतें. भजनाची सभा विसर्जन केल्यावर मिस्तर मंगर याने त्यांला भिक्षा दिल्ही. त्या समयींहि म्या मागती देवाची उपकारस्तुति केली. कारण कीं आह्मी दरिद्री लोकांच्या गरजा पुरवाव्या, यासाठीं ईश्वराने आह्मास ऐपत दिल्ही आहे. माझा उमज असा आहे कीं ज्यांला अन्नवस्त्र मिळत नाहीं, असले हजारों मनुष्य माझ्या सभोंवतीं असतात. ह्मणून जितक्याने माझा देहनिर्वाह होईल, तितकेंच म्या आपल्याकडे खर्चावें. अधिक खर्चूं नये.

मी प्रत्यहीं देवाची प्रार्थना करून एतद्देशीय भाषेचा अभ्यास करण्यावर त्याचा आशीर्वाद मागतें. ती भाषा बोलण्याची मला इतकी उत्सुकता आहे कीं त्या गोष्टींविषयीं देवाची प्रार्थना केल्यावांचून माझ्याने राहवत नाहीं. माझ्या विनंत्या सहजांत होत असतात. अहा, प्रार्थना करणें हा कसा अपूर्व उपाय आहे. आपल्या प्रियतम

बापासाठीं, आणि आपलीं बहीणभावंडें व त्यांचीं लेंकरें, यांसाठींहि देवाची प्रार्थना करणें हें केवढें शांतवनकारक आहे. देव माझ्याजवळ आहे, आणि माझ्या अपूर्ण विनंत्या ऐकत असतो, असें मला भासतें.

प्रार्थनासभा करण्यासाठीं मी हेजन बहिणीच्या घरीं गेलें. तेथे मी आपल्या मिशनेरी बहिणींस भेटलें. बालेंतैन बहीण योहान्नाचा चवदावा अध्याय पठन करून आमच्या उद्धारकाच्या प्रीतीविषयीं बोलली. त्यांतल्या प्रथम वाक्याने माझ्या डोळ्यांतून आसवें येऊन गालांवरून टिकपत पडलीं. माझा प्रिय भ्रतार निरोगी नसतो तथापि मला घाबरणें नसावें. तदाकार बोध दोनदा त्या अध्यायांत मला झाला. हेजन बहीण थोड्या दिवसानी आह्मास सोडून मुंबईस जाणार आहे, आणि थोड्या वेळाने मी ह्या प्रिय बहिणींस सोडून एकटीच राहणार आहें. तर ईश्वराने आह्मासर्वांस रक्षावें. रात्रीं बालेंतैन भावाने आपल्या तीन कन्यांचीं पत्रें वाचून आह्मास कळविलीं. त्या कन्या तर अमेरिका देशांत आहेत. त्या फार स्नेहाळू मुली आणि आस्थेवाईक ख्रिस्ती आहेत, असें दिसतें. त्यांचा वियोग करून एतद्देशांत येणें यांत त्यांच्या आईबापांची कसी मोठी परीक्षा झाली! तर ईश्वर त्यांला त्या कामाचें प्रतिफल देईल. आह्मी आपल्या गाडींत बसून घरीं आलों, तेव्हां तारे कांतीने प्रकाशून फार शोभले. जसे जाणू एतद्देशीय लोक परात्पर देवाचें भजन करीत आहेत, त्याप्रमाणे त्यानी या अंधारमय देशावर आपला सौम्य प्रकाश पाडिला. देव तर फार सहनशील आणि सर्वांला उपकारी असा आहे. असा तो नसता तर मीहि

कोठें असतें. मी कस्या निराशेंत देवाचीं कामें पाहिलीं असतां.

गाडींत बसून फिरत असतां म्या सत्य शास्त्र वाचिलें. माझें चित्त विशेष प्रकारें ह्या सुंदर वाक्याकडे गेलें असें कीं "कां तर परमेश्वर आपल्या लोकांवर प्रसन्न आहे ; तो दुःखितांस तारणाने शोभमान करितो." यावरून म्या आपल्या मनांत ह्मटलें कीं त्याची औदार्य ग्रहण करणारी जी एवढी अयोग्य, एवढी ओंगळ, त्या मजवर तो प्रसन्न आहे, असें होईल काय? तो आपल्या तारणाने मला शोभमान करील काय? म्या एकांतीं जाऊन असाधारण आस्थेने निववून मागितलें कीं माझा दोषी आत्मा पवित्र देवाच्या दृष्टींत शोभमान होत असावा, यासाठीं तो दुसऱ्याने येशूच्या रक्ताच्या द्वारें धुतला जावा. मी एकांतीं देवाच्या समक्ष असतां कधीं कधीं माझ्या कल्पना इकडेतिकडे हिंडूं लागतात. तर हें काम इतकें अवमानयुक्त आहे कीं मी त्याकडील जड दंड पावण्यास पात्र आहें. तर जो सर्वांहून सर्वोत्कृष्ट असा मला दिसावा, त्याकडे माझें मन अधिक स्थिर होऊन लागावें, या अभिप्रायाने म्या देवाला प्रार्थून पवित्र आत्म्याचा प्रेरणायुक्त व्यवहार मागितला.

शास्त्र शिकण्याची सभा ही मिस्तर बार्कराच्या घरीं मिळाली. प्रायः आह्मी सर्व नऊ जन फिरून ईश्वराचें आवडतें शास्त्र शिकण्यास असे एकत्र जमणार नाहीं. आह्मी आपल्या घराकडे चाललों तेव्हां आमच्या आकाशांतील घरीं जाऊन पोहंचणें, आणि ख्रीस्तापासीं असणें, या गोष्टींसंबंधी माझा उत्तम भ्रतार बोलला. तो फार दुःख सोसणारा आहे, या अर्थीं असल्या गोष्टी सांगितल्याने माझ्या

डोळ्यांत आसवें आलीं, आणि माझ्या अंतःकरणांत शोक भरला. कां तर जो परितोष त्याला प्राप्त व्हायाचा आहे, त्यांत तो फारच त्वरेनें प्रवेश करणार आहे, ह्मणून अधींच असल्या भावना त्याच्या ठायीं उठल्या असतील, असें मला वाटलें. या पापमय व दुःखित जगांत त्याला खोळंबवावें, याची इच्छा म्या करूं नये. पण एथे शोक व रुदन करायाला आणि खेदाच्या वाटेवर चालायाला त्याने मला एकटीला सोडून जावें, याचें दुःख माझ्याने कसें सोसवेल. याशिवाय ज्यानीं कधींहि पाप्यांच्या तारणाऱ्याविषयीं कांहींच ऐकिलें नाहीं, असे कोट्यानकोटि मनुष्य अद्यापि या देशांत आहेत. तर मग या अंधारमय देशापासून त्याचें जाणें आह्माला कसें सुसह होईल ?

शाब्बाथ हा सौख्यकारक दिवस सर्व पृथ्वींतील वसणाऱ्या मनुष्यांला येत असतो. पण केवळ आपल्या व्यापारांत आणि सुखांत हा दिवस घालवावा, असी बहुत जनांची इच्छा आहे. आणि इतरांला ठाऊक नाहीं कीं लोकांतरीं जाण्याची तयारी करावी ह्मणून हा दिवस त्यांस दिल्हा आहे. मी फारर् मडमीबराबर इंग्लिश भजनालयीं मद्रासी बिशप याचा उपदेश ऐकण्यास जात होतें, तेव्हां ज्या स्त्रिया ओझीं नेतांना माझ्या दिसण्यांत आल्या, त्यांला या दिवसाचें सार्थक कळलें नाहीं. असल्या पुष्कळ स्त्रिया मोठे मोठे तृणभार आपल्या डोक्यांवर घेऊन चालत होत्या. तर ह्या मूर्त्तिपूजा करणाऱ्या किती दयापात्र असतात. पंचावन्न दरिद्री माणसें, कांहींएक लेंकरांसुद्धां, मिस्तर मंगराच्या ऐकणाऱ्यांमध्यें होतीं. तीं अत्यंत आपन्न दिसलीं. असल्यांविषयीं आमच्या उद्धारकाने सांगितलें

आहे कीं "दरिद्री तुह्माजवळ सर्वकाळ असतात, आणि जेव्हां तुह्मी इच्छितां तेव्हां त्यांचें बरें करावयास सांपडेल." अहा, त्यानी जें खरेपण आज ऐकिलें, त्याच्या द्वारें त्यांच्या आत्म्यांचें हित व्हावें.

मिस्तर हेजन आणि हेजन मडम, हे मुंबईस जावयाला निघण्यापूर्वीं त्यांची भेट घ्यावी, आणि त्यांबरोबर भोजन करावें, यासाठीं उत्कृष्ट बालंतैन मडमेने मजसाठीं आपली गाडी पाठविली. त्या समयीं प्रायः आह्मी पांच बहिणीनी एकत्र आपली शेवटली प्रार्थनासभा केली. ती संधी फारच आवडीची होती. मग प्रयाणालिंगन केल्यापूर्वीं आह्मी सर्व स्त्रीपुरुषानीं एकवट होऊन देवाचें गायन व प्रार्थना केली. एवंच ईश्वराने त्यांच्या संगतीने जावें आणि त्यांचें अभीष्ट करावें. त्यांचीं लेंकरें त्यांला आणि जगालाहि आशीर्वादरूप होत असावीं.

साताऱ्याकडे जाण्याचें प्रस्थान.

मिशनाचे सर्व भाऊ आणि बहिणी बालंतैन साहेवाच्या घरीं मिळाल्या. भोजन केल्यावर बहिणीनी आस्थायुक्त प्रार्थनासभा केली. तेव्हां त्या सर्वानी ईश्वराच्या जतनेस आह्मास सोपून दिल्हें, आणि आह्मी देशाटन करीत असतां, इतक्यांत आह्मावर आणि मग आमच्या श्रमाच्या नवीन शेतावर त्याचा आशीर्वाद विनवून मागितला. नंतर आह्मी एकमेकांचें प्रस्थानालिंगन केल्यापूर्वीं सर्वानी एकत्र होऊन ईश्वरी शास्त्र वाचिलें, आणि देवाचें स्तवन गाऊन प्रार्थना केली. वियोग करणें इत्यादि ज्या गोष्टी माझ्यापुढें आहेत, त्याप्रीत्यर्थ त्या प्रार्थनांच्या द्वारा मला शक्ति झालीसें

वाटलें. सूर्य पश्चिमेस उतरून चालला, तेव्हां आह्मी त्या प्रियंकर मिशनेरी मित्रांचा वियोग करून निघालों. "मिज्पा," हा संकेतशब्द आह्मामध्यें आणि त्यांमध्यें असावा. (याचा अर्थ असा उत्पत्ति ३१ अ० ४९ व्या ओवींत सांगितला आहे कीं आह्मी एकमेकांपासून वेगळे होऊं तेव्हां माझ्यामध्यें व तुझ्यामध्यें परमेश्वर जपो.) सुप्रभ सूर्याने आपले लकलकीत किरण तेजस्वी पश्चिमेंत आच्छादिले, तेव्हां लागलेंच सौम्य चंद्राने आपले रजताचें आच्छादन भूमीवर व तारामय आकाश यावर घातलें, आणि फिरून ईश्वराचें मोठेपण व गौरव प्रगट केलें. ती रात्र तर फारच सुंदर होती.

साताऱ्याच्या कांहीं जवळ गेल्यापूर्वीं रस्त्यावर चांगली सावली देणाऱ्या झाडांमधून आह्मी चाललों. तेव्हां पाऊलस जो विधर्मी लोकांचा महान् प्रेषित, तो जेव्हां प्रथम ख्रीस्त वधस्तंभीं दिल्हेला याविषयीं घोषण करण्यास एका मूर्त्तिपूजकांच्या मोठ्या नगरांत प्रवेश करीत होता, तेव्हां त्याच्या मनांत कश्या भावना अवश्य उठल्या, याविषयीं म्या चिंतन केलें. ज्या नगरांत ४०,००० मूर्त्तिपूजक असतात, त्यांत आह्मी दोघे जण मात्र काम करण्याला जात आहों. अणीक तेथचा सर्व सभोंवता देश शाश्वत प्राण्यानीं व्याप्त आहे, आणि ते ज्याच्या योगाने मात्र त्यांचें तारण साध्य आहे, त्या शुभवर्त्तमानाचा द्वेष करणारे असे आहेत. मग तुझें अंतःकरण खचलें कीं नाहीं? आणि योना जो नीनवे या नगरीकडे पाठविला गेला, त्याच्या सारिखा तुला भास झाला कीं नाहीं? असें तुह्मी ह्मणाल तर अहा! नाहीं, असें मी ह्मणतें. देवाची स्तुति होवो. कां

तर अगोदर माझें अंतःकरण कदापि अधिक धैर्यविशी नव्हतें. मी सर्व समर्थ देवाच्या सामर्थ्यानें संतोष पावलें. आह्मी एथे आलों आहों, याकरितां मला हर्ष वाटला. जे सहस्र आणि दशसहस्र आमचे विरोधी आहेत, त्या सर्वांहून आह्मी दोघे दुर्बल कीट बलवान आहों. कारण कीं प्रभु येशू हेंच आमचें सामर्थ्य आहे. मी सर्वकाळ तुह्माबरोबर आहें, असें त्याचें अभिवचन आहे.

सातार्‍यांत प्रथम शाब्बाथ.

"प्रभूच्या दिवसीं आह्मास
    होतोच नेहेमी उल्हास,
वर्त्तें विश्रांति मिळणार,
    ती पावायाची इच्छा फार.
तेथे नाहींत कष्ट, हाल,
    मरण, पाप, मोह जाळ,
कधीं न होई कण्हणें,
    परी मधुर गायनें."

म्या आपल्या मनांत ही गोष्ट ठेवावी. कां कीं मला आशा आहे कीं तेथे मी आपल्या तारकाला पाहीन, असें केवळ नाहीं. तर म्या ज्यांला आपल्या स्वदेशांत सोडिलें, त्या प्रियंकरांची व माझी भेट तेथे होईल. मी नित्य प्रभूच्या दिवसीं त्यांविषयीं फार चिंतन करितें. माझ्या भ्रताराने शुभवर्त्तमान ऐकावयास एथच्या लोकांला एकत्र बोलाविलें होतें, त्या समयीं त्या प्रिय जनानी आह्माकडे अवलोकन करून पाहिलें असावें, असी कांक्षा मला झाली. इंग्लिश लोक दरिद्री माणसांसाठीं जी पैस्याची वर्गणी

करीत असतात, तींतून जे भिक्षा पावतात, असले सुमारें पन्नास आमच्या वाड्याकडील मोठ्या शालालयांत मिळाले. दरिद्र हें तर कदाचित् त्यांला कल्याणाचें कारण होत असेल. कां तर ख्रीस्ताने सांगितलें कीं दरिद्र्यांस शुभवर्त्तमान गाजविलें जातें. पांगळे, अंधळे, चिंध्या पांघरलेले, असे ते होते. एका ह्यातारीचा मला अतिशय कळवळा आला. ती फारच खंगार होती, व तिचें अंग वांकून डोई गुडघ्यांपर्यंत लागली होती. तिचे हात व सर्व शरीर कांपत होतें. ह्या दरिद्र्यांशिवाय आमचे चाकर लोक ऐकणारे होते. दुसरे कोणी नव्हते. अहा, देव जो सर्वसत्ताधारी आहे, त्याच्या हातांत खरेपण नसतें तर आमचें काम किती आशाहीन झालें असतें. ह्या मूर्त्तिपूजकानीं आपली मूर्त्तिपूजा करण्यांतच भयाने कांपावें. हें कार्य परात्पर देवाच्या आत्म्याने साध्य आहे. माझी खातरी आहे कीं तो थोड्या वेळाने या शहरांतील माणसांमध्यें आपला मान खरा करून दाखवील.

मी प्रत्यहीं आमच्या चाकर लोकांसाठीं देवाची प्रार्थना करीत असतें. त्यानीं सुवंदनीय येशूचे खरे अनुसरणारे व्हावें, ही माझी मोठी उत्कंठा आहे. दोन तीन दिवसांमागें मूर्त्तिपूजा करणारे असे दोन मनुष्य आह्मास भेटायाला आले. त्यांची मी आपल्या एकांतीं आठवण करीत असतें. इचा परिणाम पाहावा, यासाठीं मी ही गोष्ट दिनवृत्तपत्रांत लिहून ठेवितें. ते विधर्मापासून ख्रिस्ती धर्माकडे फिरतील तोंपर्यंत त्यांसाठीं देवाची प्रार्थना करायाला मला विश्वास होईल, असी माझी आशा आहे.

मी गाडींत बसून फिरायाला गेलें. तेव्हां शहराच्या

जवळच्या गांवांमध्यें माणसें कसीं आपलें आयुष्य घालवून राहतात, हें कांहीं म्या पाहिलें. कितिएक इतर गांवांतले जन जे माझ्या दिसण्यांत आले आहेत, त्यांपेक्षां हे स्वस्थ असतात, असें दिसलें. अहा, ख्रिस्ती देशांत माझा जन्म, वाढ, आणि शास्त्रज्ञान झालें— यास्तव म्या देवाचा केवढा आभार मानावा. अंधार एथच्या मनुष्यांच्या मनांवर आच्छादन करितो. ज्या परलोकाकडील गोष्टी त्यांच्या आढळण्यांत येणार आहेत, त्यांवर गाढ काळोख पडला आहे. आहा! दिवस हा केव्हां या अंधारमय देशावर उजेडेल? आणि पहाटेचा तारा केव्हां उगवेल?

आह्मी पहाटेस उठलों आणि घोड्यांवर बसून फिरायाला गेलों. मग माघारें नगराच्या दाटीच्या रस्त्यावर आलों, तेव्हां जेथे देवळांत रामचंद्राचे भक्त उपासना करीत होते तेथे दृष्टि लावून त्यांला पाहिलें. एथचे सहस्रावधि मनुष्य सर्वात्मना मूर्त्तिपूजापरायण आहेत, असें मनांत येऊन मला खेद झाला. मग आह्मी राणीच्या सौधाजवळून गेलों. बापड्या स्त्रिये! ती नुक्ती काशीस राहत होती. मग त्यांनी कपटयुक्त आशांनी तिला भुलवून तेथून एथे आणिलें. आणि एथें तिला कळून आलें कीं आपल्यास पुढें राज्य दुर्लभ आहे. तर आतां ती मोठ्याने रडत असेल. मला हीच इच्छा आहे कीं तिने उद्धारकाविषयीं ऐकून त्याची आमंत्रण करणारी वाणी मानावी. त्याचें आमंत्रण असें आहे कीं अहो कष्टकरी आणि ओझ्याने लादलेले, तुह्मी सर्व माझ्या जवळ या, ह्मणजे मी तुह्माला विसांवा देईन." ईश्वराने इंग्लिश लोकांला एतद्देशावर अमल दिल्हा आहे. याच्या योगाने

एथच्या लोकांचें कल्याण, आणि देवाचें राज्य वृद्धिंगत झालें आहे, असें परिणामीं खरें पटावें.

आह्मी नगरांतल्या दाटीच्या मार्गांनी भजनालयास गेलों. लोक भूमीवर बसून देणें घेणें करीत होते. शेकडों माणसें आमच्या भजनस्थानाजवळून येत जात होतीं, तरी कोणी आंत आलीं नाहींत. आमच्या वाड्यांतील मनुष्यांवांचून केवळ थोडेबहुत जन आंत आले. तेथे देवाची गोष्ट ऐकणारे हे वीसएक मात्र होते. ते इतके थोडे असल्यामुळें मला खेद झाला. हाहा! इकडच्या पाहण्यावरून फार आशा होती, असें नाहीं. तर निराशा होती. पण हें काम प्रभूचेंच आहे. या लोकांप्रीत्यर्थ माझें हृदय दुःखित होतें. मी एकलीच घरीं गेलें, तेव्हां माझीं आसवें आवरण्यास मला शक्ति नव्हती. त्यांबद्दल म्या ईश्वराचा धांवा केला. अहा, त्यानी खरेपण शोधून घ्यावें, ह्मणून ईश्वराने त्यांच्या दैवतांविषयीं त्यांच्या मनांत अभरवसा उत्पन्न करावा. तीं आह्माला तारूं शकत नाहींत, असी त्याने त्यांची खातरी करावी. हीं तर माझी इच्छा आहे. हे देवा, तूं गाजविलेल्या शुभवर्त्तमानाला फल देऊन आपल्या सेवकाचें आश्वासन कर. अहा, त्याच्या हातांला दृढ कर. आह्मास तुझा आशीर्वाद प्राप्त व्हावा यासाठीं आह्मास विश्वास दे. या पवित्र दिवसीं मी नित्य सहृदयतेच्या ओढीने आपला प्रिय बाप, आणि बहीणभावंडें, यांविषयीं चिंतन करीत असतें. अहा, माझ्या स्वदेशांत देवाच्या भजनालयाकडील व्यवस्था ह्या कस्या आवडत्या असतात! माझा प्रियंकर पालक पात्तर्सन, हा नेहमी आपल्या भांडारांतून नवीन व प्राचीन गोष्टी काढून सांगत असतो.

आज केवळ अठरा मनुष्य उपदेश ऐकायाला येऊन बसले. यांशिवाय कोणी कोणी येत जात होते. यथापूर्व माझें अंतःकरण फारच खेदित झालें. कारण कीं अगदी थोडे लोक शुभवर्त्तमानाचें श्रवण करण्यास एकत्र जमतात, आणि सहस्रावधि लोक सैतानाकडून पाडाव होऊन त्याच्या इच्छेप्रमाणे चालतात. मला भय आहे कीं माझा प्रिय भ्रतार निराश होऊन ह्मणेल कीं आमच्या वार्त्तेवर कोण विश्वासला आहे ! आमच्या वाड्यांतील बायकालोक आज भजनस्थानांत गेले नाहींत. कां तर या सणाच्या वेळीं कुचाळ पुरुष स्त्रियांची विभर्त्सना करीत असतात. ते परस्परें एकमेकांच्या अंगावर चिखल घालतांना आमच्या दृष्टींत आले. तो तर त्यांच्या अमंगळपणयुक्त धर्माची यथोचित खूण असा आहे. उतारवेळीं मी घरीं राहिलें. आपल्या चालीप्रमाणे म्या देवाची प्रार्थना करण्यांत कांहीं वेळ घालवून झालेल्या उपदेशावर त्याचा आशीर्वाद मागितला. आमचे चाकर लोक कांहींएक प्रकारें एकचित्त होऊन देवाची गोष्ट ऐकत असतात. एवढें आश्वासन झाल्याकरितां मी प्रभूला स्तविलें.

मिशनेरी होण्याविषयीं म्या निश्चय केला, तेव्हां आपल्या मनांत असें आणिलें कीं या कामावर गेल्यामुळें माझें आयुष्य लवकर सरेल, असें जरी मला कळलें असतें, तरी माझें जाणें बरें झालें असतें. कां तर मी उद्धारकाची शेवटली आज्ञा मानण्यास खुशी आहें, याचें प्रमाण माझ्या जाण्यावरून बंधुजनांला आणि मंडळीला पटेल. तर माझें जाणें फार वजनाचें होत असेल, असें मला वाटतें. मग हे माझ्या जीवा, काम करण्याकरितां शक्ति व आरोग्य हो-

ण्याविषयीं आपली अपेक्षा मोडिली आहे, तरी देवावर भरवसा ठेवावा. संसाराच्या ओढीपासून मानवी अत्म्याला शुद्ध करून देवाच्या घरीं पोहंचण्याची त्याची तयारी शेवटास न्यावी, यासाठीं व्याधि, व बाधा, हे बहुवार ईश्वराचे विश्वासु जासूद होत असतात. आमच्या कुटुंबांतले सर्व प्रिय जन हे आज मला केवढे आवडते वाटले आहेत. त्यांसाठीं, इतर इष्टमित्रांसाठीं, माझ्या प्रियंकर पालकासाठीं, आणि त्याच्या मंडळींतल्या प्रिय मनुष्यांसाठीं, देवाची प्रार्थना करण्यांत मला किती मोठी आवड आहे.

हा महिन्याचा प्रथम सोमवार असतां ऐकमत्य प्रार्थना होत आहे. तर माझी आशा आहे कीं माझे ख्रिस्ती स्नेही जे अमेरिका देशांत आहेत, ते आज आह्मासाठीं आणि आमच्या कामासाठीं देवाची फारच प्रार्थना करितील. अहा, त्यांच्या प्रार्थनांचें आह्मांला केवढें प्रयोजन आहे! माझा प्रिय भर्त्ता ऐकमत्य प्रार्थनेस गेला आहे. पण जगाच्या देवाकडे फिरण्याविषयीं त्याच्या बरोबर प्रार्थना करावी, असें कोणीएक ख्रिस्ती अंतःकरण तेथे त्याला अढळेल, असें मला वाटत नाहीं. तो गेल्यावर गर्जना व वीज होऊन पाऊस थेंबाथेंबानी पडला. वारा सुटून घोंघावला, पण तो कोठून आला, आणि कोठे गेला, हें मला ठाऊक नाहीं. म्या केवळ त्याचा शब्द ऐकिला. आहा, एथे पुष्कळ मनुष्यानी त्याप्रमाणे पवित्र आत्म्यापासून पुनर्जन्म पावावें. हें तर देवाला किती सवघड आहे कीं त्याने या सहस्रावधि सुकलेल्या हाडांच्या ठायीं श्वास घालून त्यांला सजीव करावें.

एतद्देशीय भाषा शिकण्यांत मला बहुत पायमोडी

येतात. पण ईश्वराने मला एथे येण्यास बोलाविलें, तर या भाषेची प्राप्ति करण्याकरितां तो मला देहाचें आणि मनाचें बळ देईल कीं नाहीं ? "ख्रीस्ताने मला सामर्थ्य दिल्ह्यावरून, मी सर्व गोष्टी करावयास शक्तिमान आहें," याच्या आश्रयानें मी एथे आलें. तर मी निरुत्साह होणार नाहीं. देवाचें वचन सत्य आहे. माझ्या सभोंवतीं जे मोठे मोठे डोंगर आहेत, ते नाहींसे होऊन जातील. परंतु देवाचें वचन नाहींसें होणारच नाहीं. ओंगळ पापीण जी त्याच्या कृपादृष्टीस अयोग्य आहे, असी स्त्री मीच आहें खरी. तथापि तो माझें पालन करितो, आणि त्यानें जें कोणतेंहि वचन मला दिल्हें आहे, त्याला मी मुकणार नाहीं. म्या पृथ्वींतल्या गोष्टींकडे फारच चित्त न द्यावें, आणि ऊर्ध्वलोकाच्या प्रकाशांत चालून अधिक उपयोगी व्हावें, यासाठीं म्या नुक्तेंच आकाशलोकांतलीं गौरवें व हर्ष व पापविरहितत्व यांविषयीं फार चिंतन केलें.

मला भय आहे कीं म्या देहाचें आणि मनाचें बळ पावून एतद्देशीय भाषाभ्यास करावा, यासाठीं म्या ईश्वरावर पुरता भरवसा ठेविला नाहीं, आणि त्याची पुरती प्रार्थना केली नाहीं. कां तर माझा अभ्यास फारच मंदगतीनें होत असतो. अमेरिका देश सोडत्या समयीं मला ठाऊक होतें कीं ही भाषा शिकणें सवघड नाहीं, आणि मला शारीर बळ चांगलें नाहीं. पण "ख्रीस्ताने मला सामर्थ्य दिल्ह्यावरून मी सर्व गोष्टी करावयास शक्तिमान आहें." हें सुखदायक बोलणें नित्य माझ्या अंतःकरणांत आश्वासन करून राहतें. त्या योगानें माझा निश्चय दृढ झाला असतां मी आपले सर्व प्रिय बंधुजन आणि घरदाराकडील

सुखसंतोष यांला टाकून एथे या अपथ्य हवेच्या देशांत आलें. तर म्या निराश होऊं नये. पण तें सुखदायक बोलणें आपल्या हृदयांतीं धरून प्रत्यहीं देवाची प्रार्थना करावी, आणि यथास्थित सामर्थ्य मागावें. या देशांत मी निरुपयोगी आहें, असें वारंवार माझ्या मनांत येतें. मग अमळसा हर्ष माझ्या हृदयांत होतो. तेव्हां मी एथे असून ईश्वराच्या खरेपणाविषयीं साक्ष देण्याचा प्रसंग पावत आहें, असें मनांत आणून मी देवाला स्तवितें.

असल्या प्रकारच्या गोष्टी मंगर मडमेच्या दिनवृत्त-पत्रांत भरल्या आहेत. या पुस्तकाचा विस्तार न व्हावा, म्हणून आम्ही त्यांतून अगर्धी तिच्या भावना काढून एथे सविस्तर लिहीत नाहीं. पण ह्या प्रिय मडमेचे अणीक दोन तीन गुण प्रसिद्ध करावे, यासाठीं त्या पत्रांतील कांहीं कांहीं गोष्टी फार संक्षेपाने लिहितों.

प्रभु येशू ख्रीस्त जो पापी मनुष्यांस तारायाला जगांत आला, त्याची गोष्ट सांगावी, आणि या योगाने नष्टोपाय जनांला तरणोपाय कळवावा, याची आसक्ति मंगर मड-मेच्या अंतःकरणांत भरली. असें मागें लिहिलेल्या सर्व वृत्तांतांवरून प्रसिद्ध आहे. एतद्देशीय भाषेने तारणाची गोष्ट सांगावी, यासाठीं ती भाषा शिकण्यांत ती उत्सुक होऊन अष्टौप्रहर अभ्यास करीत गेली. ती गाडींत बसून फिरायास जाई, तेव्हां आपल्यापाशीं कांहीं पुस्तक घेऊन शिकत असे. या अर्थाविषयीं तिने असें लिहिलें. “अहा, मला बोलण्याची केवढी उत्सुकता आहे! यासाठीं कीं मी शाला स्थापून मुलांस शिकवावें, आणि जो आपल्या बाहूंनीं कोंकरें एकवटीत, आणि आपल्या उरासीं धरून वाहत

असतो, त्याविषयीं त्यांला सांगावें." "म्या चांगला अभ्यास करावा, आणि अधिक आस्थेनें बोलण्याची तयारी करून येशूविषयीं ह्या बापड्या मूर्त्तिपूजकांस बोध करावा. मला देहाची शक्ति नाहीं, आणि स्मरणाची बळकटी नाहीं, यामुळें मी शोक करितें. पण म्या ही अवघड भाषा शिकून बोलावें, याकरितां जें बुद्धीचें बळ मला पाहिजे तें देण्यास देव समर्थ आहे. याचा उमज मला नित्य असावा कीं या लाचार लोकांची भाषा शिकण्यांत मी आयास करीत आहें, तोंपर्यंत त्या योगानें मी देवाचें गौरव करीत आहें. आणि ही भाषा शिकण्याचा हा हेतु आपल्या मनांत ठेवावा कीं मेलेला, उठलेला, व गौरविलेला, असा उद्धारक जो पवित्र देव, व पापी मनुष्य, या उभयतांमध्यें मध्यस्थ आहे, त्याचें कथन म्या या भाषेच्या द्वारें एथच्या मनुष्यांला करावें."

आपली खंडणी आणि उद्धार करणारा जो प्रभु येशू ख्रीस्त, त्याच्या राज्यांतलीं कार्यें करून उपयोगी व्हावें, आणि त्याचा आश्रय व सेवा व गौरव करणारे असे एथचे मनुष्य होण्याविषयीं त्यांची यथाशास्त्र समजूत करावी, या कामाच्या आसक्तीनें मंगर मडम एतद्देशीय भाषाभ्यास करण्यांत तत्पर होऊन राहिली खरी. तथापि ती भाषा बोलण्याची सवई होई तोंपर्यंत ती मनुष्यांचें हित पाहून आपल्या मनांतील तृष्णा तृप्त करण्यास स्तब्ध राहिली, असें समजूं नये. तर ख्रीस्ताच्या प्रीतीची तिच्या अंतःकरणांत उकळी येऊन नित्यांत राहत होती. यावरून ख्रीस्ताप्रीत्यर्थ कांहीं तरी करावें, याचें तिला अगत्य वाटलें. तर मग जसजसी ती मराठी भाषेंत अभ्यासी झाली, तसतसा तिनें तिचा व्यवहार केला. अक्षरओळख केली

असतां तिने कितिएक मुलींस जमवून अक्षरें शिकविलीं. तिला ही भाषा वाचतां येऊं लागतांच तिने ईश्वरी शास्त्र इत्यादि धर्मपुस्तकांचें अध्ययन सांगून शिकविलें. नंतर वाड्यांतील सर्व जन हे नगरांतल्या कांहींएक मुलींसुद्धां पवित्र शास्त्राचीं वाक्यें, प्रश्नोत्तरें, सद्गीतें, मुखपाठ करून आदितवारीं तिजपासीं सांगूं लागले. याप्रमाणे त्यानी आपल्या स्नेह करणाऱ्या मडमेची मनीषा मानून आपल्या मनांत बहुत ईश्वरी खरेपण सांठविलें. लाहानपणीं तिने आपल्या मनांत अस्या प्रकारचीं मोठीं मोठीं निधानें भरून ठेविलीं होतीं. त्यावरून केवळ अतिशय हित होत असतें, असें तिच्या अनुभवास आलें. ह्मणून तिने आपल्या शक्तीप्रमाणे तरूणांच्या मनांमध्यें देवाचें खरेपण सांठवायास प्रयत्न केले.

प्रार्थना करण्याने देवाचें साहाय्य प्राप्त होतें. तर प्रार्थनेच्या योगाने खरेपणाचें राज्य विश्वासणाऱ्या मनुष्याच्या अंतःकरणांवर प्रबळ होऊन चालतें, आणि त्याच योगाने तें राज्य जगांतल्या लोकांमध्यें प्रसृत होऊन अरिष्टनाशक आणि इष्टकारक असें होत असतें. याच्या विश्वासाने मंगर मडम देवाची प्रार्थना करण्यास फार उत्सुक होत चालली. प्रत्यहीं तिने देवाची प्रार्थना करण्यांत पुष्कळ वेळ घालविली. ती भजनस्थानांत बसली, अथवा घरीं राहिली, तरी देवाची प्रार्थना करून झालेल्या उपदेशावर आशीर्वाद मागत असे. पवित्र आत्म्याचें साह्य झाल्यावांचून देवाची गोष्ट उपयोगी पडणार नाहीं. यास्तव तिचा भर्त्ता नगरांत शुभवर्त्तमान घोषण करीत असे, त्या वेळेस ती आपल्या घरांत ईश्वराला प्रार्थून पवित्र आत्म्याची

वृष्टि मागण्यांत तत्पर होती. तिने आपल्या दिनवृत्तपत्रांत लिहिलें. "आज सकाळीं माझा प्रिय भ्रतार नगरांत जाऊन शुभवर्त्तमान गाजवीत होता, तेव्हां प्रिय ग्रेवस मडम आणि मी एकत्र अमळसी वेळ प्रार्थना करण्यांत घालवून उपदेशावर देवाचा आशीर्वाद मागत होतों. देवाने माझ्या प्रिय भर्त्यावर आणि मजवरहि पवित्र आत्म्याचा नवीन बाप्तिस्मा करून द्यावा, यासाठीं कीं आह्मी या अंधारमय नगरांत सफलता पावणारे कष्ट करून ह्या मूर्त्तिपूजकांला खरेपणाकडे फिरवावें, असें मी फार आस्थेने प्रार्थना करून मागितें. हाहा! केव्हां या पापिष्ठ मूर्त्तिपूजक नगरावर पहाटेचा तारा उगवेल, आणि दिवस उजेडेल! किती वेळपर्यंत, हे ईश्वरा, किती वेळपर्यंत, तूं आपलें तोंड या बिचाऱ्या मूर्त्तिपूजक लोकांपासून लपविसील? अहा, या दाटीने वसलेल्या नगरांत जे मनुष्य आहेत, त्यांतील बहुतांला पाझरवून कळीव कीं त्यांचीं दैवतें त्यांला तारूं शकत नाहींत, आणि त्यांस समजीव कीं जो पंथ येशू ख्रीस्ताकडून सौख्याकडे व आकाशलोकाकडे नेतो, तो त्यांच्याहून चांगला व निस्संशय आहे."

"जें कांहीं करायाला तुझ्या हाताला प्राप्त होतें, तें तूं आपल्या पराक्रमाने कर. कां कीं ज्याकडे तूं जात आहेस, त्या मृतलोकांत कांहीं कर्म, अथवा संकल्प, अथवा विद्या, अथवा ज्ञान नाहीं. रात्र येती तेव्हां कोणाच्याने काम करवत नाहीं." हीं पवित्र वाक्यें मंगर मडमेने आपल्या मनांत ठेवून फार चिंतेने आपलें आयुष्य खरचिलें. प्रत्येक घटिका मोठ्या मोलाची आहे. असें मानून ती कांहीं तरी हितकार्य करण्यांत वेळ घालवीत असे. याविषयीं

तिने लिहिलें. "अहा, वेळ ही किती मोलाची आहे! किती वेळ म्या वावगेपणाने घाळविला आहे! सांप्रत दिवसास बिसावा घेणें हें मला दुःसह आहे. मला फार शिकायाचें आणि फार करायाचें आहे. तरी माझें आयुष्य हें तर वाफ होय. अहा, जसा जाणू प्रत्येक दिवस हा शेवटला दिवस होय, याप्रमाणें म्या तो घालवून वर्त्तावें. ही माझी उत्कंठा आहे. देवाने माझ्या पूर्ववयांत मला सांगितलें कीं तूं माझ्या द्राक्षमळ्यांत जाऊन काम कर. तेव्हां आरोग्य, सामर्थ्य, सोयरे, इष्टमित्र, घरदार, इत्यादि ऐच्छिक विषय त्याने मला दिल्हे. तर म्या काम कसें केलें! कष्टाने, आस्थेने, आणि उपकारस्तुतीने, तें काम केलें कीं काय! अरेरे! नाहीं. अळसाने, व मांद्याने, व असावधपणाने मी वर्त्तलें. म्या ईश्वराला संतापविलें आहे तरी कसें! त्याने मला टाकून दिल्हें असतें तर तें यथोचित झालें असतें. पण अजून त्याने मला सोडिलें नाहीं. तर जें अणखी आयुष्य आहे, तें सर्व म्या त्याच्या सेवेंत घालवून वर्त्तावें."

ह्या उत्कृष्ट स्त्रियेचें जें निरूपण या पुस्तकांत केलें आहे, त्यावरून हें प्रसिद्ध आहे कीं ती देवाच्या कृपेकरून मिशनाचें काम करण्यास असाधारण योग्यता पावली होती. तिची त्या कामावर फारच आस्था व आवड झाली होती. ती आपलीं पुष्कळ व मोठीं स्वहितें नाकारून एथे त्या कामावर समुद्राच्या भयांतून आली होती. एथे त्या कामाचें अपार अगत्य आहे. मिशनाचें काम केलें नाहीं, तर खरेपणाचें राज्य चालणार नाहीं. मनुष्यांचें तारण होणार नाहीं. एथे कोट्यानकोटि नष्टो-

प्राय मूर्तिपूजा करणारीं स्त्रीपुरुषें नाशास जात आहेत, तथापि मिशनाचे कामकरी अगदीं थोडे आहेत. असें आहे तर जे कोणी फार आस्थेनें व उत्सुकतेनें मिशनाच्या कामावर येतात, त्यांनीं त्या कामांत निपुण होऊन ह्मातारपण घालवावें, असें कोणी ह्मणतील. पण ज्याच्या सत्तेंत मिशनाचें काम आहे, त्याची तशी बुद्धि नाहीं. त्याच्या इच्छेवांचून कोणी त्या कामावर येत नाहींत, आणि कोणी तें काम सोडून जात नाहींत. तथापि असें बहुवार होतें कीं जे त्या कामावर येऊन विशेष प्रकारें उपयोगी होण्याजोगे असतात, ते मुळारंभीं ईश्वराची आज्ञा पावून तरलेल्या मनुष्यांच्या वासस्थानीं जाऊन पोहंचतात. खरेपणाचीं युद्धें करण्याकरितां कोणी कोणी आपल्या अंगावर युद्धाची शस्त्रसामग्री घेऊन रणांगणांत येत आहेत, इतक्यांत ते पडून जय पावतात. तर त्यांप्रमाणे मंगर मडमेची स्थिति झाली. ती एथे मिशनाच्या कामांत आपल्या मनाच्या तृष्णा तृप्त करूं लागली तों इतक्यांत तिजला एथून जाण्याचा निरोप आला.

प्रकरण ७.

आत्मोत्क्रमण आणि संतोषाची पूर्त्ति.

या जगीं राहाया मी न मागणार,
कां पाप मोहाचे प्रसंग अपार,
पापाने दीनाला उद्भवतें भय,
पापाने भक्ताच्या हर्षाचाहि क्षय.
या जगीं राहाया मी न मागणार,
देवाज्ञा होतांना संतोषें जाणार,
सद्भक्त हे चालले धरूनी धीर,
त्या वाटें जायाला कां करूं उशीर?

मृत्यु हा भयांचा राजा आहे खरा. तो पापाने उत्पन्न झाला. तर मूळ स्त्रीपुरुषानी प्रथम पाप केलें, तेव्हांपासून तो भयंकर राजा सर्व पृथ्वींतल्या मनुष्यांवर राज्य करीत आला आहे. देवाच्या शास्त्रांत ह्या राजाचें निरूपण असें केलें आहे. एका माणसाकडून पाप जगांत आलें, आणि पापामुळें मरण, मग सर्वांनी पाप केल्यावरून सर्व माणसांवर मरण आलें. तें मरण तर आत्मिक व दैहिक आहे, असें समजावें. त्याच्या योगाने देवाची जीवनकारक कृपा मनुष्यजातीवरून गेली, आणि त्या कृपेच्या ठिकाणीं देवाची अरिष्टकारक अवकृपा सर्व मनुष्यजातीवर झाली, ह्मणून असें लिहिलें आहे— जस्या ठिणग्या सहज वर जातात, तसा मनुष्य कष्टासाठीं जन्मतो. तर मग पापासारिखें काय ओंगळ आहे! कोण मरणाचें यथोचित वर्णन लिहील? त्याच्या योगाने बहुत प्रकारचीं

दुःखें आबालवृद्ध अश्या सर्व मनुष्यांच्या अंतःकरणांत भरलीं आहेत.

मृत्यु ज्याला भयांचा राजा असें ह्मटलें आहे, त्याचा अधिकार सर्व मनुष्यांवर एकसारिखा आहे, असें समजुं नये. तर तो केवळ पापाच्या द्वारें राज्य करितो. ह्मणून त्याचा विशेष अधिकार पाप करणाऱ्या मनुष्यांवर आहे. तो भयांचा राजा असा त्यांला भासतो. या जगांत जगून सुखदुःखें अनुभवावीं– मरणाच्या सत्तेंत येऊन लोकांतरीं न जावें, ही त्यांची मोठी इच्छा आहे. मरण जवळ आलें, असें जेव्हां त्यांस वाटतें, तेव्हां ते थरथर कांपून पळायास पाहतात. पण असले सर्व मनुष्य नव्हत. खरेपणाचा राजा जो देवाचा अवतरलेला पुत्र, त्याजवर जे मनुष्य विश्वासून देवाचीं लेंकरें होण्याचा अधिकार पावतात, त्यांच्या ठायीं पाप मृत असून अगदींच नाहींसें होणार आहे. जीवनाचा अधिकारी जो प्रभु येशू खीस्त, तो त्यांचा राजा होय. तर मग मृत्यु जो पापाच्या सत्तेने राज्य करितो, त्याचा त्यांजवर काय अधिकार आहे? कांहीं विशेष नाहीं. देवाचा अवतरलेला पुत्र जो त्यांचा राजा, त्याने मृत्यु हा भयांचा राजा पाडाव करून घेऊन आपल्या सत्तेंत ठेविला आहे. असें लिहिलें आहे– "आपण आपल्या मरणाकडून मरणाचा अधिकारी जो सैतान, त्याचा नाश करावा; आणि जे मरणाच्या भयाने सर्व आयुष्यभर दासपणांत असतात, त्या सर्वांस मोकळें करावें," यासाठीं देवाच्या पुत्राने इहलोकांतल्या मनुष्यांच्या सारिखा मांसरक्तसंपन्न देह धरिला. यावरून मृत्यु जो सैतानाच्या अनुसाऱ्या मनुष्यांवर राज्य करून पापामुळें त्यांला भयांचा

राजा होत आहे, तो ख्रीस्ताच्या प्रायश्चित्तामुळें देवाच्या लेंकरांला आशास्पद होत आहे. तो शत्रु आहे, असें जर ह्मणाल तर ह्मणा. तरी तो पाडाव केलेला शत्रु आहे, असें समजावें. तो आपल्या सत्तेने देवाच्या लेंकरांजवळ येत नाहीं. तर तो त्यांच्या राजाचा निरोप घेऊन येतो. देहांत राहणारे असे जे मनुष्य ख्रीस्ताच्या मरणाकडून पापक्षमा, आणि पवित्र आत्म्याच्या नवें करण्याकडून नवा स्वभाव पावले आहेत, त्यांला नित्यांत पाप होण्याचें भय आहे. त्यांच्या अंतःकरणांत देवाची प्रीति आणि देवाकडला हर्ष आहे खरा. तथापि ती प्रीति व हर्ष अपूर्ण आहे, असें केवळ नाहीं. तर तीं कदापि यथायोग्य प्रकारें विपुल नाहींत. यामुळें त्या जनांला खेद वाटतो. पण मृत्यु हा पाडाव केलेला शत्रु निरोप घेऊन आला, ह्मणजे लागलेंच काय होतें पाहा. ते जन देहविरहित होऊन आपला बाप जो देव, याच्या घरांत आपला प्रियतम उद्धारक व सर्वोत्कृष्ट ज्येष्ठ भाऊ, याजवळ वस्ती करितात. तेव्हांपासून पापाचा मळ त्यांला लागत नाहीं. पापाने जो उद्वेग होतो तो त्यांच्या मनांत होत नाहीं. त्यांला ख्रीस्ताची पूर्ण प्रीति, हर्ष, इत्यादिकांची पूर्त्ति प्राप्त होती. तर प्राणोत्क्रमण झाल्यावर ख्रीस्तापासीं सहवासी व्हावें, ही परमागति होय. आणि मरण याला हानि असें मानूं नये. तर लाभ असें मानावें.

सन १८५६. माहे मे महिन्याच्या प्रथम तारखेस प्रातःकाळीं मंगर मडम यथापूर्व उठून गाडींत बसून फिरायाला गेली. तेव्हां पूर्वेकडला वारा तिच्या अंगाला लागला. त्यावरून तत्क्षणीं तिजला दुःसह बाधा झाली.

ती तेहतीस दिवसपर्यंत अत्यंत दुःखें सोसून निजली. मग ज्यून महिनाच्या तिसऱ्या तारखेस, मंगळवारींच्या सकाळीं, जेथे त्या मिशनेरी साहेबाच्या घरांत ती दुखणाईत, पीडायुक्त माणूस, निजत होती, तेथे बरोबर जाऊन सुखरूप पोहंचती करणारे असे दिव्य दूत उतरून आले. नंतर ती गेली. जेथे तरलेलीं माणसें वासस्थानें पावून राहतात तेथे येशूने आपल्या बापाच्या घरीं तिला पोहंचविलें. तर तेथे त्या समयीं तो प्रियावियुक्त विधुर, साताऱ्यांतली लहान ख्रिस्ती मंडळी, वाड्यांतील चाकर लोक, या सर्वांनी उत्तम डाक्तर साहेब, व रोग्याची चाकरी करणारी सहृदय स्त्री, यांसुद्धां गुडघे टेंकून, आसवें, उच्छ्वास, व हुंदके, यांच्या द्वारें देवाची स्तुति केली, यासाठीं कीं त्याने आपली प्रिय व प्रीति करणारी कन्या या पापिष्ठ जगाचीं दुःखें व शोक यांतून सोडवून घेतली आहे, आणि त्याने आमचा प्रभु व तारणारा येशू ख्रीस्त, याच्या सर्वकाळच्या राज्यांत तिजला प्रशस्तपणाचा प्रवेश दिल्हा आहे.

मंगर मडम अत्यंत दुःखें सोसून वारून गेली, ह्मणून तिला अभाग्यदशा झाली, असें समजूं नये. तर तिला शुभाची अवस्था प्राप्त झाली. ती व्याधित होऊन ज्या खोलींत निजली, ती तरलेल्या मनुष्यांच्या सौख्यालयाच्या देवडीसारिखी होती. ह्मणजे तींत उजेड व शांति व हर्ष हीं भरलीं होतीं. तेहतीस दिवसपर्यंत ती प्रिय दुखणेकरीण व्याधि व पीडा यांहींकरून व्याप्त होती, तथापि त्या दिवसांत ती देवाचे उपकार मानीत आणि त्याचें स्तवन करीत होती. ती बोलत असे कीं “प्रत्येक श्वासवानाने परमेश्वराला स्तवावें. अहा, त्याचें चांगुलपण केवढें

विपुल आहे." समाचार घेतल्यामुळें तिने वैद्याचा आभार मानिला. ज्यानीं तिची चाकरी करून अति कडू औषधें दिल्हीं, त्यांचीहि तिने आभारस्तुति केली. कितिएक वेळीं तिचीं दुःखें व वेदना हीं प्रहर प्रहर जीवापरतीं होत असत, तथापि तिने कधींहि कुरकूर केली नाहीं. एकदा देखील जळफळण्याचा शब्द तिच्या ओंठांतून निघाला नाहीं. कांहीं वेळा श्वासोश्वास टाकून तिने हायहूय केली. त्या-शिवाय तिच्याने राहवेना. तथापि तिच्या आत्म्यांत केवळ शांति होती. ती वारंवार बोलली कीं मी नष्ट पापीण आहें तरी माझीं दुःखें व पीडा यांची आणि धन्य उद्धार-काच्या दुःखांची व वेदनांची तुलना केली असतां माझ्या वेदना किती हलक्या आहेत. कोणी लेकरूं आपल्या मम-ताळू जनकाच्या हातांवर निजत असतें, अस्या दृष्टांताने ती दुसऱ्या वेळेस आपल्याविषयीं बोलली. मी सर्वकाळच्या हातांवर निजत आहें. माझा आकाशांतील बाप माझें कांहींच वाईट करणार नाहीं. म्या प्रिय तारणाऱ्याला असें सांगितलें आहे कीं प्रार्थना करावी, याची शक्ति मला नाहीं. माझ्याने कल्पना करवत नाहीं." तर तो मजक-रितां सर्व करील. ईश्वराने मला भट्टींत घातलें आहे, आणि तो रुप्याचा गाळणारा व स्वच्छ करणारा तसा जवळ बसतो. त्याच्या योगाने माझा सर्व गाळ आणि कथील घा-लविलें जाईल, आणि पवित्र केलेलें व स्वामीस उपयोगी असें पात्र मी होईन, एवढें दुःख तो मला देवो.

या रोगाने मरणें, अथवा निरोगी होऊन जगणें, याचा जो भास तिला झाला, त्याविषयीं मंगर मडम वारंवार बो-लली. ती बोलत असे कीं "मी निरोगी होईन, असें मला

वाटतें. परमेश्वर मला कबरेच्या तोंडापासून चढविण्यासारिखें असें करील. एतद्देशीय नष्ट मनुष्यांला धन्य उद्धारकाकडे आणून चालवावयाला आयास करण्याकरितां मी वांचण्यास राजी आहें. तथापि जग सोडून ख्रीस्तासंगतीं व्हावें, हा मोठा लाभ होय." ती रोगाच्या जोराने बेशुद्ध होऊन ज्या ज्या गोष्टी बोलली, त्या त्या बहुतकरून खऱ्या पटून फार हृदयंगम झाल्या आहेत. ती स्नेहास्पद दुखणेकरीण बोलली कीं माझें काम समाप्त झालें आहे. धन्य तारणारा हा मला एथच्या पेक्षां उंच पदवी देण्यास बोलावीत आहे. आकाशलोकांतील आकर्षक विषय पृथ्वीवरच्या पेक्षां मला अधिक ओढून घेतात. मला घेऊन नदीला न्या. देव तुह्मास आज्ञा देतो. तो मला दिव्य दूतांचें सामर्थ्य देईल. त्याने आधींच मला दूतांचे पंख दिल्हे आहेत. पण मी नदीच्या मध्यभागीं पोहंचेन तोंपर्यंत माझ्याने त्यांचा उपयोग करवत नाहीं. अरे मरणा ! तुझी नांगी कोठे आहे ? अरे लोकांतरा ! तुझा जय कोठे आहे? तर मरणाची नांगी पाप आहे. आणि पापाचें सामर्थ्य नेमशास्त्र आहे. परंतु देव जो आमच्या प्रभु येशू ख्रीस्ताकडून आह्मास जय देतो, त्याची उपकारस्तुति असो.

याप्रमाणे मंगर मडम आयुष्याचा अंत पावून आपल्या आकाशांतील बापाच्या घरीं पोहंचली. जसें प्रीति करणारें लेंकरूं आपल्या ममताळू आईच्या मांडीवर निजून झोंपेंत निमग्न होतें, तसी ही प्रेमाळू शिष्य आपल्या प्रिय तारणाऱ्याच्या उरावर आपलें डोकें ठेवून निजत असतां, तिचा शांत आत्मा देहाचा वियोग पावून मुक्त झालेल्या मनुष्यांच्या सौख्यालयांत वर चढला. कांहींच भय नव्हतें.

कांहींच उद्वेग नव्हता. सर्व शांति होती. जसे तारे प्रातःकाळीं सूर्योदयाच्या उजळत्या उजेडाने अदृश्य होत जातात, तसी ही प्रिय मडम न्यायीपणाच्या सूर्याच्या पूर्ण किरणांमध्यें प्रवेश करून आमच्या दृष्टीपासून आच्छादित झाली आहे. ती ख्रीस्ताच्या परिशुद्धतेच्या कांतीने वेष्टित होऊन सूर्यासारिखी शोभमान झाली आहे. तर तिची एथची दशा, व तेथची दशा, या दोहोंमध्यें किती व कसें अंतर आहे, याचा विचार करून पाहा. एथे तिची श्रद्धा व प्रीति इत्यादि सर्व सद्गुण अपूर्ण होते. ते तेथे सर्व परिपूर्ण आहेत. तेथे ख्रीस्ताची पूर्त्ति ही तिची परमागति होय. "म्या आकाशांतील वाणी ऐकिली. ती मला बोलली कीं तूं हें लिही– आतांपासून मेलेले जे प्रभूकडे होऊन मरतात, ते धन्य आहेत. आत्मा ह्मणतो, होय. कां कीं ते आपल्या कष्टांपासून विसांवा पावतात, आणि त्यांचीं कामें हीं त्यांच्या मागून जातात."

समाप्तीची गोष्ट.

ज्या प्रियंकर स्त्रियेचें निरूपण या पुस्तकांत केलें आहे, ती पृथ्वी सोडून देवाच्या घरांत पवित्र दूत, आणि पवित्र झालेलीं माणसें, यांची सोबतीण झाली, तेव्हांपासून ती देवाची पूर्ण सेवा आणि स्तुति करून केवळ हर्ष अनुभवीत आहे. यांत संशय नाहीं. तथापि तिने आपल्या मनांतल्या आतांच्या भावना आणि स्वानुभव निरूपिले नाहींत, आणि तरलेल्या मनुष्यांच्या सविस्तर गोष्टी शास्त्रांत कथिल्या नाहींत, ह्मणून एथे या प्रियेचें निरूपण समाप्त केलें आहे.

देवाच्या भावीक व संभावित भक्तांचीं निरूपणें कधीं कधीं इतर भक्तांला फार उपयोगी पडतात. असलीं निरूपणें पवित्र शास्त्रांत अढळतात. त्यांवरून शुद्ध वर्त्तण्याचे नियम होतात, असें नाहीं. तर त्यांवरून वर्त्तणुकीचीं निरनिराळीं उदाहरणें प्रसिद्ध आहेत. देवाच्या सेवकांचें जें निरूपण केलें आहे, त्यांत नव्या मनुष्यपणाची सुरूपता आणि जुन्या मनुष्यपणाचें वैरूप्य हीं दोन्ही दिसतात. आपल्या आत्म्यांत अशुद्धतेचें वैरूप्य अगदी नाहींसें करावें, आणि केवळ शुद्धतेची सुरूपता पूर्ण करून वर्त्तावें, या उत्कंठेने जो कोणी त्या निरूपणाचें पठन करून ध्यानांत ठेवील, त्याला तें फार हितावह होईल. यांत संशय नाहीं. आपल्या अंतःकरणाच्या ठायीं खरेपणाचें राज्य संपूर्ण प्राबल्याने स्थापित व्हावें, याच्या आसक्तीने जो असलें निरूपण वाचून यथायोग्य प्रकारें निरूपिलेलीं

कार्यें मानील, त्याच्या दिसण्यांत जरी खरेपण आणि खोटेपण, या दोहोंच्या राज्यांचीं परस्पर युद्धें व प्रतियुद्धें, जय व अपजय येतील, तरी शेवटीं खरेपणाचा राजा आपल्या सगळ्या वैऱ्यांस वश करून अनंत विजय पावेल, असी त्याची खातरी होईल. तेणेंकरून तो आश्वासित होऊन फार साक्षेपाने आपलीं विहित कर्मैं करून, फार धैर्याने आपल्याला झालेलीं दुःखें सोसीत जाईल. तो आपल्या प्रियंकर तारणाऱ्याच्या आज्ञांत सत्वर चालून गाईल कीं,

सुखाच्या शेजीं निजूनी
जाई वर्त्तें काय?
कीं दुःखें निंदा टाळूनी
पावेन ख्रीस्तपाय?

हे प्रभू मला द्यावा धीर,
लढाई चालवीन,
संकटें सोसूनी गंभीर,
तें राज्य मिळवीन.

खरेपणाच्या राज्याकडील जे स्त्रीपुरुष मराठी भाषा समजतात, त्यांला मंगर मडमेचें निरूपण कोणत्यातरी प्रकारें विहित वर्त्तणुकींविषयीं उत्तेजनावह होऊन उपयोगी पडावें, या आशेने तें लिहिलें आहे. तर असल्या मनुष्यांला आमची ही सुचना आहे कीं तें निरूपण तुह्मास हितकारक होऊन देवाची अधिक सेवा व स्तुति करण्याचें कारण होत असावें, यासाठीं देवाचा आशीर्वाद मागून हें पुस्तक वाचावें. देवाची जी विपुल कृपा या भावीक व प्रेमाळू स्त्रियेवर झाली, ह्मणून ह्या निरूपणावरून

प्रसिद्ध आहे, तीच तिजसारिख्या विपुलतेने तुह्माला प्राप्त व्हावी, ही ग्रंथकाराची इच्छा आहे. तुह्मी देवाजवळ आणि माणसांजवळ तिजसारिखें समर्थ होऊन कुटुंबांत, मंडळींत, आणि जगांत आशीर्वादरूप व्हावें, ह्मणून तुह्मी तिजसारिखें देवावर आणि त्याच्या वचनावर निष्ठा ठेवून त्याची प्रार्थना, ध्यान, इत्यादि सर्व कर्त्तव्यकामें यथाकाळीं करावीं. ती मृत्यु पावून देवाच्या कृपेने आपल्या तारकाच्या सुप्रभ व सत्वसंपन्न वासस्थानांत वस्ती करायाला गेली आहे खरी. तथापि तुह्मी जर तिचें निरूपण वाचून तिच्या विश्वास, प्रीति, शांति, इत्यादि सद्गुणांला अनुसराल तर ती पुढें त्या योगाने कांहींएका प्रकारें एथे जगेल, आणि खरेपणाचें राज्य चालण्यासंबंधी तुमचें आश्वासन करीत जाईल. ही गोष्ट आठवावी कीं ही प्रिय स्त्री विशेष प्रकारें तुमची बहीण झाली. महाराष्ट्रांतल्या पुत्रीपुत्रांकरितां तिने आपला स्वदेश, आप्तजन, घरदार, इत्यादि स्वहितें टाकून हा तुमचा देश व लोक आपलेसे केले. एथे तुमच्या देशांत तिने कष्ट व प्रार्थना व रुदन केलें. एथून ती प्राणोत्क्रमण झाल्यावर देवाच्या घरांत आपला मुगुट आणि वीणा घ्यावयास गेली. एथे तुमच्या देशाच्या मातींत तिचें आवडतें शरीर निजलें आहे. पुनः उठण्या दिवसाच्या सकाळीं एथे ती तुह्माबरोबर उतरून प्रभू येशू ख्रीस्ताच्या गौरवी शरीरासारिखें पालटलेलें असें आपलें शरीर पावेल. तर तुह्मी आपल्या पिढीमध्यें देवाच्या इच्छेप्रमाणें सेवा करून एकामागें एक तिकडच्या उजेडाच्या व प्रेमाच्या भुवनांत जाऊन पोहंचाल तेव्हां ती कस्या हर्षालिंगनाने तुमची भेट घेईल. आणि तिज-

शिवाय अनेक बहिणी आणि भाऊहि आपआपले स्वदेश सोडून एथे पुष्कळ प्रार्थना व आयास करून या देशाच्या जमिनींत निजले आहेत. त्यांचे आत्मे येशूच्या सौख्यालयांत मिळाले आहेत. आपले इकडचे कष्ट व दुःखें व आसवें यांच्या द्वारें ते सर्व तुम्हाला सांगत आहेत कीं अहो प्रिय बहीणभावंडानो, तुम्ही स्थिर व अढळ आणि प्रभूच्या कार्यांत सर्वदा तत्पर असा. कां कीं प्रभूसंबंधी जो तुमचा श्रम तो व्यर्थ नाहीं.

ते महाकष्टांतूनी
कृपें पावुनी निभाव
आले ख्रीस्तसदनीं,
कां कपाळीं त्याचें नाव.
शुभ्र झगे ल्याले ते
जयध्वजा धरिती,
जयवंत पुरते,
ख्रीस्तापासीं ठरती.
